म. ग्रं. सं. ठाणें
विषय
क्र.
REFBK-0016042

॥ श्रीस्वामीसमर्थ ॥

# अक्कलकोटनिवासी

## श्रीस्वामीसमर्थ चरित्रदर्शन

वर्णावी ती थोरी एका सद्गुरुची । येरा मानवाची कामा नये ॥ १ ॥
सद्गुरु समर्थ कृपेचा सागर । मनीं वारंवार आठवावा ॥ २ ॥
सद्गुरुचरणीं तल्लं … क्षणमात्रें ॥ ३ ॥
एका जनार्दनीं आ … वलासे ॥ ४ ॥

REFBK-0016042

चरित्र
23/3/68

लेखक

श्री. वि. के. फडके, बी. ए.

१६०४२

रम्य कथा प्रकाशन
३९२ नारायण पेठ, कान्हेरे बिल्डिंग, पुणें २.

किमत ५ रुपये

प्रकाशक :
वा. ग. मेहेंदळे
रम्यकथा प्रकाशन
३९२ नारायण पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति :
२६ जानेवारी १९६८

किंमत ५ रुपये

सर्वाधिकार
प्रकाशकाधीन

मुद्रक
वा. ग. मेहेंदळे
जयभारत मुद्रणालय
५५१ बुधवार, पुणें २.

# सादर समर्पण

माझे परमपूज्य वडील
कै. तीर्थरूप
केशव धोण्डदेव फडके,
ऊर्फ मामा
यांच्या पवित्र
स्मृतीस-

# लेखकाचें निवेदन

श्रीअक्कलकोटनिवासी स्वामीसमर्थांचें हें नवें चरित्र श्रीसमर्थप्रेमी वाचकवृंदाच्या हातीं देतांना मला अतिशय आनंद होत आहे. या चरित्राला मी 'नवें' हें विशेषण मुद्दामच योजीत आहें. कारण, कांहींतरी नवी माहिती, नवा विचार वाचकांपुढें ठेवण्याचा उद्देश मनाशीं बाळगूनच या चरित्र-लेखनास मी प्रवृत्त झालों व सतत सहा महिने त्या दृष्टीनें प्रयत्न करीत राहिलों. या काळांत अनेक निष्ठावान समर्थभक्तांच्या गांठीं पडल्या, श्रींच्या काळांत लिहून ठेविलेल्या कांहीं जुन्या मौलिक बखरी प्रयत्नानें हातीं लागल्या. चिपळूण येथें श्रीसमर्थांचे परम शिष्य श्री. गोपाळबुवा केळकर यांनीं श्रींच्या लीलांची हकीकत मोडीत लिहून ठेवलेली आहे अशी माहिती स्वामी श्री सत्यदेवानंद सरस्वति (आळंदी) यांचेकडून समजली. त्यामुळें मुद्दाम चिपळूणला जाऊन ती बखर वाचून आलों. त्याचवेळीं पुणें येथील 'इतिहास संशोधक मंडळांत' श्री. ना. के. जोशी यांनीं श्रीखंडे यांचें प्रवासवर्णन' हा निबंध वाचून दाखविला. त्यांत अक्कलकोट स्वामींची हकीकतहि होती. तेव्हां श्री. जोशी यांना भेटून तो निबंध मिळविला. तसेंच श्री. द. का. मोडक पुणें यांनींहि अतिशय प्रेमानें त्यांच्या आजोबांनीं लिहून ठेवलेली हकीकत मला वाचावयास दिली. त्या हकीकतीचे कागद जीर्णशीर्ण अवस्थेंत असल्यामुळें व मोडीत लिहिलेलें असल्यामुळें (खरी अडचण हीच !) एक एक शब्द अतिशय प्रयासानेंच लावावा लागला !

तात्पर्य, वाचकांना श्रीसमर्थांच्या लीलांचें, चरित्राचे कांहीं नवे पैलू दाखविण्याचें माझें उद्दिष्ट श्रीसमर्थ कृपेनेंच पार पडलें. ही नवी माहिती मला मिळाली नसती तर हें चरित्रलेखनाचें काम मी कदाचित् स्वीकारलेंहि नसतें. कारण श्रीसमर्थांचीं चार पांच तरी उत्कृष्ट चरित्रें बाजारांत सध्यां उपलब्ध आहेत. अशा परिस्थितींत 'आणखी एकाची भर' घालण्यांत कांहींच स्वारस्य नव्हतें !

अर्थात् ही नवी माहिती देतांना जुनी माहिती, म्हणजेच श्रीसमर्थांच्या प्रसिद्ध लीला—देणेंहि आवश्यक होतें. व त्याकामीं मुख्यत: श्रीगुरुलीलामृत आणि श्री. मुळेकर यांनीं लिहिलेलें स्वामींचें चरित्र हे दोन ग्रंथ प्रमाण मानलेले आहेत. तथापि त्या जुन्या लीलांच्या अनुषंगानें कांहीं नवे विचार मांडण्याचाहि यथामति प्रयत्न केला आहे.

श्रीसमर्थांच्या शिष्यवर्गाची एकत्रित स्वरूपांत अशी माहिती वाचकांना मिळावी या उद्देशानें तीहि माहिती येथें मुद्दाम दिली आहे. त्यापैकीं श्रीकृष्ण सरस्वती ऊर्फ कुंभारस्वामी (कोल्हापूर), चिपळूणचे केळकर महाराज, श्री रांगोळी महाराज इत्यादींची माहिती वाचकवृंदाला फारशी नाहीं. त्यामुळें 'श्रीसमर्थांचे महान् शिष्य' असें एक प्रकरणच देण्याचें ठरविलें.

थोडक्यांत सांगावयाचें तर वाचकवर्गापुढें श्रीसमर्थांच्या दिव्य चरित्रातील कांहींतरी नवे पैलू ठेवावेत एवढें एकच उद्दिष्ट मनांत बाळगून मीं हें चरित्रलेखनाचें कार्य गेल्या दत्तजयंतीला सुरू केलें व माझें उद्दिष्ट अल्पांशानें का होईना श्रीसमर्थकृपेनें साध्य झालें आहे असें मला वाटतें.

तसें पाहिलें तर चरित्रलेखनाचा मला मुळींच सराव नाहीं. यापूर्वीं '**दत्तयोगी गुळवणी महाराज**' हें एकच चरित्र मीं लिहिलेलें आहें. त्यामुळें श्रीअक्कलकोटस्वामी महाराजांचें चरित्र लिहिणें आपल्याला कितपत जमेल अशी थोडीशी भीति माझ्या मनांत निर्माण होणें साहजिक होतें. परंतु अनेकांनीं सहकार्याचे हात पुढें केल्यामुळेंच हें अवघड कार्य मी पूर्ण करूं शकलों. तें कितपत यशस्वी झालें आहे तें ठरविण्याचें काम सुबुद्ध वाचक आणि टीकाकार यांचें आहे.

या कार्याला प. पू. **स्वामी स्वरूपानन्द** (पांवस) यांचा शुभाशिर्वाद मिळाला हें मी माझें भाग्य समजतों.

या चरित्रलेखनाचें कामीं ज्यांनीं ज्यांनीं आपुलकीनें मदत केली त्यांचें ऋण कधींहि न फिटणारें आहे. त्यांचा नामनिर्देश करणें आवश्यक आहे.

प. पू. **स्वामी सत्यदेवानंद सरस्वति** (आळंदी) यांनीं या कामीं केलेली आपुलकीची मदत कधींहि विसरतां येणार नाहीं. संपूर्ण हस्तलिखित

वाचून त्यांत त्यांनीं अनेक सुधारणा सुचविल्या व बहुमोल मार्गदर्शन केलें. या चरित्रलेखनाच्या निमित्तानें त्यांची व माझी ओळख झाली हा देखील फारच मोठा लाभ मी समजतों. त्याचप्रमाणें नगर मठाचे श्री. कृ. द. रेखी यांनींहि श्री. नानाजी रेखी यांच्याविषयीं बहुमोल माहिती अगत्यानें पाठविली. तसेंच चिपळूण मठाचे श्री. कृ. द. केळकर यांनींहि अत्यंत प्रेमानें त्यांच्या आजोबांची बखर अवलोकनार्थ दिली. माऊलीचे संपादक श्री. अप्पासाहेब चव्हाण यांनीं श्रीकृष्णसरस्वतींची पोथी व माऊलीचे जुने अंक संदर्भासाठीं दिले. तसेंच पुस्तकांत टाकण्यासाठीं श्री. स. कृ. फाळे मुंबई व श्री. जि. भि. दीक्षित पुणें या दोन श्रेष्ठ चित्रकारांनीं फोटो उपलब्ध करून दिले. श्री. ना. के. जोशी, श्री. द. का. मोडक, श्री. ग. कृ. जोशी यांनींहि श्रीसमर्थांविषयीं अप्रसिद्ध माहिती पुरवून फारच मौलिक सहाय्य केलें आहे. बडोद्याचे श्री. र. कृ. पट्टणकर यांची मदतहि अमोल आहे.

त्याचप्रमाणें श्री. स. के. नेऊरगांवकर व स्वामी सत्यदेवानंद सरस्वति यांनीं पुस्तकाला मर्मग्राही, सुंदर प्रस्तावना लिहून दिली.

आमचे प्रकाशक मित्र श्री. काकासाहेब मेहेंदळे यांनीं हें चरित्र मजकडून लिहवून घेऊन मला कायमचें ऋणी करून ठेविलें आहे.

या सर्वांच्या सक्रीय सहानुभूतीशिवाय हें पुस्तक इतक्या लवकर पूर्ण होणें कधींहि शक्य नव्हतें.

सरतेशेवटीं —

तरी न्यून तें पुरतें। अधिक तें सरतें। करूनि घेयावें हें तुमतें। विनवितु असे ॥ एवढीच प्रार्थना करून प्रस्तावना पुरी करतों.

श्रीदत्तजयंती—१८८९
३३३ नारायण पेठ,
'विश्वास' बंगला, पुणें २.

वाचकांचा नम्र,
विश्वनाथ केशव फडके

# प्रस्तावना

## (१)

॥ ॐ ॥

॥ श्रीस्वामीसमर्थ महाराज श्री प्रसन्न ॥

**'कृतार्थ करी चतुर्विध भक्तां।**
**ते हे स्वामी–समर्थ कथा ॥'**

एक चारशें पांचशें वर्षांचें जुनाट, जीर्ण पण थकून कमरेंत न वांकलेलें विस्तीर्ण वडाचें झाड! त्या महाकाय, पुराण्या वटवृक्षाच्या लोंबत्या पारंब्या अजूनहि वैपुल्यानें विराजत आहेत. पानेंसुद्धां कशी भरगच्च अन् टवटवीत...तो न्यग्रोध म्हणजे कित्येक पिलांपांखरांचें आश्रयस्थान. पहा, डोंगरावर चरावयास गेलेलीं गाईगुरें त्याच वटवृक्षाच्या गर्द सांवलींत बसून कशी निवांत रवंथ करीत आहेत. गुरांमागून उन्हांतान्हांतून फिरणारा, थकलेला गुराखी बुंध्याला टेकून पहुडला आहे. कोणी कोणी येऊन शारीरिक ठणका कमी व्हावा म्हणून त्या वडाचीं पानें नेत आहेत. केवळ आनंदासाठी, लहान अवखळ मुलें याच वडाच्या दाढयांना झोंबून सूरपारंब्या खेळताहेत! चिरंतन सौभाग्यलाभासाठीं सुवासिनी त्या वडाचीच पूजा करीत आहेत. उत्तराभिमुख बसून ईश्वराचें ध्यान करण्यांत निमग्न असलेले कांहीं साधकहि या वटवृक्षाच्या आश्रयाला दिसतात. सर्व विद्यांचे आद्यगुरु अशा भगवान श्रीशंकरांना वटवृक्ष अत्यंत प्रिय आहे. अन् म्हणूनच त्या वडालाच प्रत्यक्ष शिवरूप समजून ते साधक तपोमग्न झाले आहेत.

अक्कलकोटनिवासी पूर्णावतार श्रीस्वामीसमर्थ महाराज यांचें अत्यंत अलौकिक, केवळ अनुपमेय लीलाचरित्र हें असें हुबेहूब जुनाट वटवृक्षासारखें आहे. रानपांखरें आणि गाईगुरें म्हणजे या जगांतील यच्चयावत् प्राणि-

मात्र ! त्या सर्वांनाच सच्चिदानंद परब्रह्म रूपानें श्रीस्वामीसमर्थांचा आश्रय नाहीं का ? श्रीमहाराजांकडे बौद्धिक दृष्टया अत्यंत सामान्य माणसें हजारोंनीं आलीं व सध्यांहि येत आहेत. त्यांना खेडवळ पण शुद्ध सरळ मनाच्या गुराख्यांची उपमा साजून दिसेल. किंवा गुरें, गाई म्हणजे ओढाळ इंद्रियें व मोकाट मनोवृत्ति ! त्यांच्यामागें हिंडतां हिंडतां संसारतापानें सात्त्विक जीव पोळतो, दमतो आणि श्रीस्वामीसमर्थांच्या मांडीवर डोकें टेकवून स्वरूपी विश्रांति घेतो. हा परमार्थमुमुक्षु अथवा 'जिज्ञासु' समजावा. वडाच्या पानांचा उपयोग दुखणें शेकण्यासाठीं करणारा तो 'आर्त' कोटींतील स्वामीभक्त. वटपौर्णिमेच्या दिवशीं वटपूजा करून सौभाग्यदान मागणाऱ्या सवाष्णींप्रमाणें श्रीस्वामींकडे येणाऱ्या भक्तांमध्यें 'अर्थार्थी' भक्त आहेतच. (किंबहुना तेच बहुसंख्य आहेत.) श्रीस्वामींची उपासना निखिळ परमार्थ प्राप्तीसाठीं करणारे व त्यासाठीं ध्यानादिकांचे अभ्यासू साधक थोडे फार तरी असतात. अन् केवळ आनंदरूप होऊन, आनंदाला धरून, आनंदावर हिंदोळण्यासाठीं सूरपारंब्या खेळणारीं बाळें म्हणजे श्रीस्वामीसमर्थांचे अत्यंत निरहंकार, पुत्रवत् असे शिष्य होत. हेच भगवद्गीतेंतील भक्तचतुष्कांपैकीं 'ज्ञानी' होत !

असा हा स्वामीसमर्थरूपी दीर्घजीवि, विशालकाय, अक्षयवटवृक्ष चारहि प्रकारच्या भक्तांना सुखविण्यासाठीं यावच्चंद्रदिवाकरी उभा आहे !!

मानवी जीवनांत जोपर्यंत आधिव्याधि आहेत, जोपर्यंत जीव, जगत् आणि जगदीशाचें खरें स्वरूप कळावें ही जिज्ञासा जिवंत आहे, जावत्काल भौतिक, इंद्रियनिष्ठ राजस सुखांसाठीं हवेहवेपणाची भावना टवटवीत आहे आणि जोंपर्यंत अशा ऐंद्रिय सुखांतून मन हरिगुरुकृपेनें पूर्ण निवृत्त होऊन स्वरूपज्ञान झाल्यावरसुद्धां तो ज्ञानाचा सोवळा अहंकार घालविण्यासाठीं श्रीचरण हवेच आहेत तावत्काल आर्त, जिज्ञासू अर्थार्थी आणि ज्ञानी असे चारहि प्रकार जगांत असणार व त्या सर्वहि भक्तांना आनंदाची दिवाळी साजरी करण्यासाठीं श्रीस्वामीसमर्थांचें लीलाचरित्र पुनः पुन्हां सांगणेंहि तितकेंच आवश्यक ठरणार !

श्रीसद्गुरुभक्तिपरायण वि. के. फडके यांनीं, अनेक स्वामीचरित्रें उपलब्ध असतांना पुनश्च हें चरित्र लिहिण्यामागची भूमिका आमचे मतें

हीच असावी. उल्लेखनीय बाब अशी कीं, श्रीस्वामीभक्त फडके हे ३०–३५ वर्षे वयाचे तडफदार तरुण असून सुविद्य आहेत. श्रीदत्तयोगी श्रीगुळवणी-महाराज यांचें एक संक्षिप्त पण उत्कृष्ट चरित्र त्यांनीं लिहून नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. ते त्यांचे 'शक्तिपातयोगांतील' दीक्षितहि आहेत.

प्रस्तुत चरित्र लिहिण्यासाठीं लेखकानें खूप परिश्रम केले आहेत. श्रींची कांहीं अप्रसिद्ध माहिती मिळेल म्हणून ते मुद्दाम चिपळूण येथील स्वामी–मठांत गेले होते. तो चरित्र भाग सदर ग्रंथांत आहेच.

ह्या चरित्रांत श्री वामनबोवा ब्रह्मनिष्ठ महाराजांच्या पोथींतील हकीकती जशा आहेत तशी श्रीचरित्राची आणखी कांहीं माहिती या ग्रंथांत अगदीं प्रथमच प्रकाशांत येत आहे हें आम्ही मोठेंच वैशिष्टय मानतों. श्री. फडके यांची भाषाशैली सुबोध असून लेखनकार्यांत सेवाभाव असल्यानें विवेचनांत एक विशेष जिव्हाळा प्रतीत होतो.

श्रीस्वामीसमर्थ सद्गुरु महाराजांचा एक–चतुर्थाश्रमी–उपासक या भूमिकेंतून लेखकास नारायणस्मरणपूर्वक शुभाशिष–प्रदान होत आहे.

स्वातंत्र्यलक्ष्मी प्राप्तीसाठीं स्वामिहस्तींची अजिंक्य तलवार मिळावी म्हणून 'वि. के.' यांचे आडनांवबंधु समर्थांकडे गेले होते. त्यांना स्वामींनीं तलवार दिली नाहीं हें लोकविश्रुत आहे.

आमची श्रीसमर्थचरणीं प्रार्थना आहे कीं, संसाररिपु निर्दळून, मोक्ष-लक्ष्मीच्या प्राप्तीसाठीं, 'त्या' फडक्यांना नाकारलेलें तें खड्ग श्रीस्वामी समर्थांनीं आत्मज्ञानरूपानें 'ह्या' फडक्यांचें हातीं द्यावें ! नारायण ।

इति लेखनसीमा ।

मिति ज्येष्ठ शु. ११।१८८९
रवि. दि. १८ जून १९६७
मु. श्रीक्षेत्र आळंदी.

**स्वामी सत्यदेवानंद सरस्वति**

# (२)

श्रीदत्तात्रेयांचे सोळा अवतार व त्यानंतर इतिहास काळांतील श्रीपादवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती, श्रीमाणिक प्रभु व श्रीअक्कलकोटचे स्वामीमहाराज हे प्रमुख अवतारी पुरुष आहेत. श्रीवासुदेवानंद सरस्वती महाराज यांच्यासारखे इतर अंशावतार तर अनेक आहेत. या सर्वांनीं श्री दत्तात्रेयांचें लोकोद्धाराचें कार्य केलें आहे. प्रस्तुतच्या श्री. फडके यांनीं लिहिलेल्या चरित्रांत श्रीअक्कलकोटस्वामीमहाराजांचें कार्य आलें आहे.

श्रीअक्कलकोटस्वामीमहाराज यांचे नांव अखिल महाराष्ट्रांत अत्यंत पूज्यभावानें घेतलें जातें. ते अक्कलकोट किंवा सोलापूर जिल्हा या पुरतेच मर्यादित नाहींत, तर नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कर्नाटक या प्रांतांतहि त्यांच्या विभूतिमत्वाचा प्रसार झाला आहे. स्वामीमहाराज होऊन गेल्याला–त्यांचा अवतार संपल्याला ८९ वर्षें झालीं. त्यामुळें त्यांना पाहिलेल्या व त्यांची आठवण असलेल्या व्यक्ति आज हयात असणें शक्य नाहीं. फार काय, स्वामीमहाराजांचे जे अनेक सुप्रसिद्ध शिष्य होऊन गेले, उदा० काळ महाराज, ब्रह्मचारीबोवा त्या सर्वांनींहि या ऐहिक जगाचा निरोप घेतला आहे. या शिष्यांनीं अनेक भक्तांवर अनुग्रह केले आहेत. समकालीनांनीं दंतकथा लिहून ठेवलेल्या आहेत. हींच स्वामीमहाराजांच्या चरित्राचीं मुख्य साधनें होत व त्यांच्या आधारें आपणांस शंभर वर्षांपूर्वीच्या काळांत श्री. फडके यांनीं नेलें आहे. श्रीस्वामीमहाराजांसंबंधीं आजपर्यंत लहान मोठीं अनेक पुस्तकें लिहिलीं गेलीं आहेत. स्वामीमहाराजांसंबंधीं परिश्रमपूर्वक हिंडून, हस्तलिखितें वाचून, अनेक भक्तांच्या गांठी घेऊन तसेंच उपलब्ध-संबंधींत वाङ्मयाचा श्री. फडके यांनीं अभ्यास केला आहे व नंतर हें पुस्तक लिहिलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. श्री. फडके यांनीं कांहीं दिवसांपूर्वी सुप्रसिद्ध योगी श्रीगुळवणीमहाराज यांच्या चरित्रपर एक चांगलें पुस्तक लिहिलें, तें वाचल्यानंतर माझी श्री. फडके हे एक वयोवृद्ध पुरुष असावेत अशी कल्पना झाली. परंतु त्यानंतर या पुस्तकास मीं प्रस्तावना लिहावी अशी विनंति करण्यासाठीं ते मजकडे आले तेव्हां श्री. फडके हे तरुण गृहस्थ आहेत, हें पाहून मला फार आनंद वाटला. ते सरकारी एक्साइज इन्स्पेक्टर या जबाबदारीचा पदावर आहेत व मुख्य गोष्ट म्हणजे ते श्रद्धावान भक्त आहेत. श्रीगुळवणी महाराजांकडून त्यांनीं अनुग्रह घेतला आहे. हें सर्व सांगण्याचें कारण कीं, वाचकांना या चरित्र लेखकाच्यासंबंधीं नीट कल्पना यावी. भक्ताचा महिमा भक्तच जाणूं शकतात. श्री. फडके यांच्या पुस्तकाचा हा आणखी एक विशेष आहे.

श्री. फडके यांच्या या पुस्तकांत माहितीचा, संशोधनाचा भाग आहे. या चरित्राचीं तेरा प्रकरणें व चार परिशिष्टें आहेत. चरित्रांत पूर्व पीठिका, स्वामी महाराजांचें हिमालयांत भ्रमण, मंगळवेढें, मोहोळ, सोलापूर, अक्कलकोट येथील वास्तव्याची माहिती दिली आहे. याशिवाय श्री स्वामीसमर्थांच्या लीला चमत्कारांची हकीकत दोन स्वतंत्र प्रकरणांत आली आहे. स्वामीमहाराजांच्या शिष्यासंबंधीं हकीकत नवव्या प्रकरणांत दिली आहे. चिपळूण येथें जाऊन तेथील बखरी वाचून त्यांतील हकीकत अकराव्या प्रकरणांत आली आहे. स्वामीमहाराजांची अवतार समाप्ति सांगून लेखकानें जुन्या कागदपत्रांचा परामर्श घेऊन चरित्रांचा शेवट केला आहे. परिशिष्टांत श्रीसमर्थांच्या निरनिराळया ठिकाणच्या मठांची हकीकत, स्वामींची जन्मकुंडली, आरत्या, स्वामीमहाराजांच्या सेवेसंबंधीं माहिती दिली आहे.

आपल्याकडे चरित्र वाङ्‌मयाला उपयुक्त पडेल अशी माहिती यथार्थ दृष्टया लिहून ठेवण्याचा अभावच आहे त्यामुळें मोठ्या पुरुषांचीं चरित्रें लिहितांना दंतकथांचा आश्रय घ्यावा लागतो. त्यापासून हें पुस्तक अपवाद नाहीं. परंतु तो दोष लेखकाचा नाहीं. लेखकानें माहिती गोळा करण्याची शिकस्त केलेली आहे. लीला व चमत्कार यांत सांगणाराची अतिशयोक्ति असली तरी ज्या घटना घडल्या त्या अलौकिक आहेत यांत संशय नाहीं. त्यामुळें ' मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरीम् ' या वचनाची आठवण होते. चमत्कारांची सुद्धां बौद्धिक बैठकीवरून संगति लावतां येणें अशक्य नाहीं. फक्त त्यांतील अतिशयोक्ति वजा करतां आली पाहिजे. किंबहुना, ' समर्थ ' व्यक्ति म्हटली म्हणजे तिच्या ठिकाणीं ही अद्‌भुत, अलौकिक अघटित शक्ति असतेच. ज्ञानेश्वर महाराजानीं—

समर्थ जें करी तें न होता चराचरीं । असें म्हटलें आहे.

कर्तुम् अकर्तुम् अन्यथा कर्तुम् असें त्यांच्या ठिकाणीं सामर्थ्य असावें म्हणूनच ते ' समर्थ ' होतात व त्यांचीं चरित्रें लिहिलीं जातात. सामान्य माणसांच्या ठिकाणीं हें सामर्थ्य नसतें म्हणून त्यांचीं चरित्रें होत नाहींत. ' ये दशे चरित्र केलें नारायणें । रांगता गोघनें राखताहे ' असें वर्णन भगवंतासंबंधीं आहे व ज्ञानदेवांनीं रेड्यामुखीं वेद बोलविले, भिंत चालविली अशा साक्षी आहेत. ज्ञानेश्वरीसारखा असामान्य ग्रंथ वयाच्या पंधराव्या वर्षी लिहिला हाच केवढा चमत्कार आहे ! विज्ञान शास्त्रांत अगदीं बाळपणांत शास्त्र-पारंगत झालेले पुरुष आपणांस दिसतात. मग अध्यात्मशास्त्रांत अशी दिव्य शक्ति दृग्गोचर झाली तर ती मानलीच पाहिजे. किंबहुना अशा दिव्य शक्ति अधून मधून परमेश्वर या अवतारी पुरुषांच्यारूपानें भूतलावर पाठवून लोकांच्या डोळयांवर जें मायेचें पटल आलेलें असतें तें दूर करीत असतो.

उच्च नैतिक मूल्यांची स्थापना, धर्मरक्षण, लोकसंग्रह, इत्यादि अनेक महत्त्वाचीं कार्यें हे संत पुरुष करीत असतात. 'आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासी । बोलिले जे ऋषि । साच भावे वर्ताया ।' असें श्री तुकोबारायांनीं आपलें अवतार कार्य सांगितलें आहे. एऱ्हवी उच्च मूल्यें हीं अशक्य कोटीतील म्हणून त्यांची वासलात लागली असती. संत पुरुष ही मूल्यें जगवतात, आपलें अलौकिक सामर्थ्य दाखवून जगांत विश्वास, श्रद्धा टिकवतात. अंधाऱ्या भयानक रात्रींत बेबंदशाहींत सांपडलेलें जग ताळ्यावर आणण्यासाठीं या संतांचा फार उपयोग होतो.

आणि परमार्थ मार्गावर वाटचाल करणाऱ्या साधकावर तर त्यांचें मायबापापेक्षांहि मोठे उपकार आहेत. मायबाप हे दयाळू असतात हें खरें पण 'खरे हित' काय आहे हें त्या आईबापांनाच कळत नाहीं व ते आपल्या लेकरांना आपल्याप्रमाणें मत्सरांत गोंवतात ! संसार सागरातून सोडविणारे संत हे खरे मायबाप आहेत ! ते त्यांचे सख्खे आईबाप आहेत. बाकीचे सावत्र समजावें. याशिवाय साधक परमार्थ करूं लागला म्हणजे त्यातील कष्टानें तो चलबिचल होतो तेव्हां 'भागलिया मज वाहतील कडिये । त्यांचियाने जोडे सर्व सुख' हें कार्य संत करतात.

प्रापंचिक भक्तांना श्रीस्वामीमहाराजांसारखे सत्पुरुष हे मोठे आधार आहेत. आपला प्रपंच नीतीनें, न्यायानें करीत असतांना लबाड माणसांशीं संबंध येऊन नुकसान होण्याचे प्रसंग येतात. तेव्हां आपल्या आशीर्वादानें त्यांचें रक्षण करून त्यांना हे संत पुरुष धीर देतात.

स्वामीमहाराज जरी गेले तरी त्यांचें चरित्र गेलें नाहीं. श्री. फडके यांनीं त्यांत एक मौलिक भर घातली आहे. श्री. निळोबारायांच्या शब्दांत त्यांचें कार्य सांगून ही प्रस्तावना पुरी करतों.

मार्ग दावूनि गेले आधीं । दयानिधि संत ते ॥
तेणेचि पंथे चालो जाता । न पडे गुंथा कोठें कांहीं ॥

संतांचा अवतार संपल्यानंतर त्यांची स्मृति अशा चरित्र ग्रंथानेंच शिल्लक राहते. प्रत्येकानें संत चरित्राचा अभ्यास करावा, तीं नित्य वाचावीं असें ज्ञानेश्वर माऊलींचें सांगणें आहे.

'हारपले आपण पै पावे । तै संताते पाहत गिवसावे । म्हणोनि वानावे ऐकावे तेचि सदा ॥'

श्री. फडके यानीं अशा पैकीं एक असें श्रीअक्कलकोट स्वामीमहाराजांचें एक चरित्र मराठी वाचकांना सादर केलें ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करतों.

पुणें, वैशाख वद्य द्वितीया १८८९ — सदाशिव केशव नेऊरगांवकर

**प्रकरण दहावें : पृष्ठें २५२ ते २९९.**
**श्रीस्वामीसमर्थांच्या लीला व चमत्कार :**
राधा वेश्येचे स्तन सपाट झाले ! २५२. नखाचे ताईत करणारा न्हावी २५४. गोसाव्यास दत्तरूपानें दर्शन २५६. स्वामीसमर्थांचें छाया-चित्र २५८. श्रीसमर्थकृपेनें धनप्राप्ति २६३. कार्तिकस्वामींच्या रूपांत दर्शन २६७. गंगाभागीरथी झालीस म्हणजे व्याधि जाईल २६८. 'मादरचोद, पेढे भूल गया !' २६८. उंचनीच कांहीं नेणें भगवंत २६९. 'हरिवंश ऐका म्हणजे मुलगा होईल !' २७०. किमयाकार संन्याशाची विलक्षण हकीकत २७२. 'आम्ही सोंवळयाचें अन्न खात नसतों' २७७. सुंदराबाई सेवेकरीण २८०. बैरामजी शेठ २८५. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके २८७. दत्तभक्त फडके २८८. गोसाव्यास द्वारकाधिशाचें दर्शन ! २९०. चोहोंकडे जाहलें पाणी पाणी २९३ अन्नपूर्णेनें दिधलीं सकल सिद्धान्नें २९४. पुष्पासारिखे सूक्ष्म झाले २९६ चोळप्पाचें निधन २९८.

**प्रकरण अकरावें : पृष्ठें ३०० ते ३१५.**
**चिपळूण बखरींतील हकीकत :**
विचित्र स्वप्न ३०२. अनुग्रह ३०३. श्रींच्या अप्रसिद्ध लीला ३०६. मैंदर्गीचा मन्यावा ३०७. सुंठ–साखरेचा चमत्कार ३०८. 'अरे, काळचा हत्तीचें डोकें फोड !' ३०९. 'चार भुजंग ठेवले आहेत !' ३१०. खुणेनें अशुभसूचन ३११. लठ्ठेश्वर पंडिताचा पराक्रम ३११. अक्कलकोटीं राहून बार्शीस जेवण ! ३१२. बावडेकरशास्त्री ३१४.

**प्रकरण बारावें : पृष्ठें ३१६ ते ३२३.**
**प्रज्ञापुरीचा सूर्य मावळला . . . !**
महानिर्याण ३२०.


**प्रकरण तेरावें : पृष्ठें ३२४ ते ३३७.**
**जुन्या कागदपत्रांतील हकीकत :**
श्रीचें पुनर्दर्शन ३३१. 'हम गया नहीं, जिंदा है–' ३३४. श्रीसमर्थ-वचनामृत ३३६.

**परिशिष्टें–(१ ते ५) पृष्ठें ३३८ ते ३५२.**
(१) श्रीसच्चिदानंद महाराज ऊर्फ मौनीस्वामी ३३८. (२) श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज ३४०. (३) श्रीसमर्थांचे मठ ३४१. (४) श्रीसमर्थांची जन्मपत्रिका ३४७. (५) श्रीस्वामीसुतांचे प्रेमळ अभंग ३४९.

# प्रभु दत्तात्रेयांचे अवतार

४१७५९
१७१ ९९
चरित्र
23/3/68


धर्मोद्धारावतीर्णाय धर्मरक्षाय धर्मिणे ।
धर्मप्राण सुखार्थाय श्रीदत्ताय नमोनमः ।।




श्रीस्वामीसमर्थ



श्रीपाद श्रीवल्लभ



श्रीनृसिंह सरस्वती



श्रीमाणिक प्रभु





श्रीस्वामीसमर्थांच्या दोन दुर्मिळ मुद्रा

महान् विभूतींच्या प्रज्ञाचक्षूंना श्रीस्वामी समर्थ 'दत्तावतारी' दिसले, आणि त्यांनीं त्यांच्या आशीर्वादाची इच्छा केली. या सर्व गोष्टींना मोठा खोल अर्थ आहे.

हीच गोष्ट श्रीटेंबेस्वामी महाराजांची. प्रत्यक्ष दत्तमूर्ति त्यांच्याशीं बोलत असे, एवढ्या एकाच गोष्टीवरून त्यांची उग्र तपस्या आणि परमार्थ मार्गातील श्रेष्ठत्व यांची सहज कल्पना यावी ! अशा या महान् विभूतीनेंहि 'श्रीस्वामी समर्थ हे दत्तावतारी होते' असे स्पष्ट उद्‌गार काढल्याचा खात्रीलायक पुरावा आहे.

श्रीमाणिकप्रभू यांनींदेखील श्रीसमर्थांना उद्देशून, 'थोड्याच दिवसांत अनंत कोटि ब्रह्माण्डनायक अक्कलकोटीं प्रकटणार आहेत.' असे सूचक उद्‌गार श्री. बाबा सबनीस यांचेजवळ काढले होते.

गाणगापुरास सेवेसाठीं राहिलेल्या सेवेकऱ्यांना पुष्कळ वेळां अक्कलकोटास जाऊन श्रीसमर्थांसमोर नवस फेडण्याचे दृष्टान्त होत असत.

या सर्व गोष्टींवरून श्रीस्वामीसमर्थ हे श्रीदत्तात्रेयांचेच चतुर्थ अवतार होते याबद्दल थोडीसुद्धां शंका रहात नाहीं !

आतां 'अवतार' म्हणजे काय याचा थोडक्यांत विचार करूं-

## अवतार कल्पनेचें मूळ

'**अवतार**' या शब्दाचा अर्थ '**खालीं येणें**' असा आहे. श्रीअप्रबुद्ध यांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें हा मानवसर्ग अर्वाक्-स्रोत आहे. म्हणजे त्याची प्रवृत्ति उत्तरोत्तर खालीं जाण्याची आहे. त्याला मोठ्या प्रयत्नानें एका रेषेवर स्थिर ठेवावें लागतें. नैसर्गिक अर्वाक्स्रोतता आणि वर मुळाकडे जाण्याची नैसर्गिक प्रेरणा या द्वंद्वांतून जीवाला मुळाकडे जावयाचें आहे. परंतु हें काम वाटतें

तितकें सोपें नाहीं. विश्वरूपानें प्रकट होणारी शक्ति त्याला पुरी पडत नाहीं. त्याच्यापलीकडे त्याला व्यापून असणाऱ्या अनंत सत्तेंतून त्याकरितां शक्तीचा पुरवठा मिळावा लागतो. भारतीय शास्त्रांतील अवतार कल्पनेचें मूळ या कल्पनेंत आहे,

या मानवसर्गाची ओढ अधर्माकडे अधिक असल्यानें तो अर्वाक्स्त्रोत बनला असावा असे आम्हांस वाटतें. 'यदायदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थान मधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम्' हें भगवंतांचें वचन या दृष्टीनें चिंतनीय आहे. ज्या ज्या वेळीं अधर्मानें धर्माचा ऱ्हास होतो, त्या त्या वेळीं मी आपला जन्मरहितपणा बाजूला ठेवतों व निराकारपणाची आठवणहि धरीत नाहीं असें भगवान अर्जुनाला सांगतात. भगवंतांनीं असा अवतार धारण केल्यानंतर –अधर्माची अवघी तोडीं। दोषांचीं लिहिलीं फाडीं। सज्जनांकरवीं गुढी। सुखाची उभवीं।। दैत्यांचीं कुळें नाशीं। साधूंचा मानु गिवशीं। धर्मासीं नीतीशीं शेंस भरीं।। मी अविवेकाची काजळी। फेडुनि विवेकदीप उजळीं। तै योगियां पाहे दिवाळी। निरंतर। सत्सुखें विश्व कोंदे। धर्मुचि जगीं नांदे। भक्तां निघती दोंदे। सात्त्विकांचीं। तैं पापांचा अचळु फिटे। पुण्याची पहांट फुटे। जैं मूर्ति माझी प्रगटे। पंडुकुमरा।। ( ज्ञाने० अ. ४, ५२–५६) असा प्रकार होतो.

परमात्म्याची भूतलावर अवतार धारण करण्यामागची भूमिका ही अशी आहे. या अवतारी विभूतींनीं धर्मरक्षणाप्रमाणेंच वर्णाश्रमधर्माची विस्कटलेली घडी पुनश्च बसवून मनुष्याला 'स्व' ची ओळख देण्याचें महान् कार्य स्वतः किंवा आपल्या शिष्य-प्रशिष्यांकरवीं करवून घेतलें आहे. या महापुरुषांच्या केवळ संगतीनेंहि आत्मज्ञानाची ओळख होऊं शकते. भगवान श्रीकृष्णाची केवळ संगत केल्यानेंच गोपींसारख्या सामान्य अडाणी स्त्रिया

निर्विकल्प समाधीप्रत जाऊन पोंचल्या असें वर्णन वाचावयास मिळतें !

अज्ञानी मनुष्य 'मी म्हणजे देह' असें समजतो, परंतु हा त्याचा भ्रम नाहींसा करून 'पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पंचद्रव्यांपासून निर्माण करण्यांत आलेलें शरीर म्हणजे तूं नसून तूं शुद्ध, बुद्ध, मुक्त, सर्वगामी, सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप आत्मा आहेस' हें आत्मज्ञान केवळ सद्गुरूच करून देतो. म्हणजे सद्गुरु हादेखील एक अवतारच आहे. श्रीदत्तात्रेय हे 'विश्वगुरु' आहेत व त्यांनीं सद्गुरुरूपानेंच भूतलावर अवतार धारण केलेले आहेत असें दिसून येतें.

## श्रीदत्तात्रेयांचे सोळा अवतार

जगच्चालक प्रभु दत्तात्रेयांनीं धारण केलेले पुढील सोळा अवतार प्रसिद्ध आहेत–(१) योगिराज, (२) अत्रिवरद, (३) दत्तात्रेय, (४) कालाग्निशमन, (५) योगिजनवल्लभ, (६) लीलाविश्वंभर, (७) सिद्धराज, (८) ज्ञानसागर, (९) विश्वंभर, (१०) मायामुक्त, (११) मायायुक्त, (१२) आदिगुरु, (१३) शिवरूप, (१४) देवदेव, (१५) दिगंबर आणि (१६) कृष्ण-श्याम कमल नयन.

त्यानंतर इतिहासकाळाकडे दृष्टिक्षेप केला तर (१) श्रीपादश्रीवल्लभ, (२) श्रीनृसिंहसरस्वती, (३) श्रीमाणिकप्रभु व (४) श्रीअक्कलकोटचे स्वामी महाराज हे चार पूर्णावतार दृष्टीसमोर येतात. त्याशिवाय प. पू. टेंबेस्वामींसारखे अंशावतार तर अनेक आहेत. या सर्व महान् अवतारी विभूतींनीं, 'विश्वगुरु' म्हणून उपनिषद्कारांनीं गौरविलेल्या प्रभु दत्तात्रेयांच्या संप्रदाया-चेंच, प्राचीन काळापासून चालत आलेलें लोकोद्धाराचें, वैदिक धर्म-

रक्षणाचें कार्य नेटानें पुढें चालविलें आहे.

या ठिकाणीं प्रथमतः फार प्राचीन कालापासून चालत आलेल्या दत्तसंप्रदायाची थोडक्यांत ओळख करून घेणें आत्यावश्यक आहे.

## दत्तसंप्रदाय

उपनिषत्कालापासून भारतीयांच्या जीवनांत उपासनामार्गाला एक अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालें आहे, आणि या उपासनेच्या विविध प्रकारांतूनच वेगवेगळ्या संप्रदायांचा उगम झालेला दिसून येतो. त्यापैकीं **दत्तसंप्रदाय** हा सर्वांत प्राचीन व लोकाभिमुख असा लोकप्रिय संप्रदाय आहे. उपनिषद्कारांनीं 'विश्वगुरु' म्हणून यथार्थपणें गौरविलेलें **प्रभु दत्तात्रेय** हें या संप्रदायाचें आराध्यदैवत असून सरस्वती गंगाधरांनीं १५ व्या शतकांत लिहिलेला **श्रीगुरुचरित्र** हा वेदतुल्य ग्रंथ हा या संप्रदायाचा प्रमुख ग्रंथ आहे. श्रीअप्रबुद्ध लिहितात, –'**चरित्राची फक्त भूमिका घेऊन लोकशिक्षणाच्या उद्देशानें रचलेलें आद्य वाङ्मय श्रीगुरुचरित्र हेंच आहे.**' 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः' असा श्रीनृसिंहसरस्वतींचा कटाक्ष असल्यामुळें 'कर्मकाण्ड', 'ज्ञानकाण्ड' या काण्डांतून ब्राह्मणवर्गाच्या आचारधर्माची महति सरस्वती गंगाधरांनीं सांगितलेली आहे. कारण ब्राह्मण हा वैदिक धर्माचा जणूं कणा आहे. श्रीमद्शंकराचार्यांनींदेखील **ब्राह्मणत्वस्य। हि रक्षणेन रक्षितः स्यात् वैदिको धर्मः**' असा ठाम सिद्धान्त सांगितलेला आहे.

दत्तसंप्रदाय हा श्रीदत्तात्रेयांच्याइतकाच पुरातन आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. श्रीदत्त हे '**योगनाथ**' असल्यामुळें योगाला या संप्रदायांत विशेष महत्त्वाचें स्थान आहे. दत्तार्जुन आणि दत्तालर्क संवादामध्यें श्रीदत्तात्रेयांनीं यम, नियम, आसन,

प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि या अष्टांग योगांचें स्वरूप स्पष्ट केलें आहे. या मार्गाचें यथार्थ ज्ञान होण्यास सद्गुरूची आवश्यकता आहे व स्वतः श्रीदत्तात्रेय हेच 'विश्वगुरु' असून सांप्रदायिकांना सद्गुरूची भेट घडवून देण्याचें कार्य गुप्तपणें करीत आहेत असा सांप्रदायिकांचा विश्वास आहे.

श्रीसमर्थ रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें, 'आधीं अध्यात्म श्रवण । मग सद्गुरुपादसेवन । पुढें आत्मनिवेदन । सद्गुरुप्रसादें ॥ आत्मनिवेदनाउपरीं । निखळ वस्तु निरंतरी । आपण आत्मा हा अंतरीं । बोध जाहला ॥' सद्गुरूचा महिमा अपार असून त्याच्या प्रसादानें भक्ताला '**आत्मबोध**' होतो. आणि आत्मबोध हेंच दत्तोपासनेचें व दत्तसंप्रदायाचें साध्य आहे!

दत्तसंप्रदायांत मोक्षप्राप्तीसाठीं सगुणोपासनेचा मार्ग सुचविण्यांत आलेला आहे. दत्त-अनसूया संवादांत श्रीदत्त अनसूयेस सांगतात, '**जन्मोनि साधिजे हें स्वहित । सगुणभक्तिसी व्हावें रत । ईश्वर आहे सर्वगत । त्यापदीं नत होईजे ॥**' अशा प्रकारें सगुणभक्तीचें महत्त्व या संप्रदायांत विशेष आहे. शांडिल्यसूत्रांत भक्ती या शब्दाची व्याख्या-'**सा परानुरक्तिरीश्वरे**' अशी सांगितलेली आहे. याचा अर्थ, परमेश्वराचे सर्व गुण समजून आल्यानंतर त्याच्याविषयीं जी अनुरक्ति किंवा प्रेम निर्माण होतें तीच किंवा तिच्यांतूनच भक्तीचा उदय होतो. आणि हा भक्तीचा मार्ग दत्तसंप्रदायानें चतुर्वर्णासाठीं मोकळा करून दिलेला आहे. हा संप्रदाय समन्वयवादी असल्यामुळें त्यांत हरि-हरांचा, शैव-वैष्णवांचा किंवा हिंदु-मुसलमानांचा भेद नाहीं. 'कठिण दिवस योगधर्मं म्लेंछराज्य क्रूरकर्म' अशी देशाची चमत्कारिक परिस्थिति असतांहि यवन राजा श्रीगुरूंचा भक्त बनतो ही गोष्ट मननीय आहे. जनार्दनस्वामींनीं शुक्रवारच्या ऐवजीं गुरुवार हा सुटीचा दिवस

करून घेतला किंवा चांदबोधले याचा शिष्य शेख महंमद यानें भक्तियोगावर मराठींत ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला या गोष्टी समन्वयनिदर्शक नाहींत असें कोण म्हणेल ? माणिकप्रभु किंवा अक्कलकोटचे स्वामीसमर्थ यांनींदेखील हिंदु–मुस्लिम असा भेद-भाव न करतां दत्तसंप्रदायाचें हें उदात्त तत्त्व नेटानें अंगीकारिल्याचें दिसून येतें.

या संप्रदायांत संन्यासाश्रमाला विशेष महत्त्व आहे व श्रीनृसिंहसरस्वतींसारख्या अलौकिक विभूतींनीं या आश्रमाचें महत्त्व वाढविण्याचें महान् कार्य केलेलें आहे.

तथापि केवळ अध्यात्मिक क्षेत्रापुरतेंच या संप्रदायाचें कार्य मर्यादित नसून सामाजिक, राजकीय व भौतिक क्षेत्रांतहि नेत्रदीपक असें कार्य दत्तसंप्रदायानें करून दाखवून लोकमानसांत आदराचें स्थान प्राप्त करून घेतलें आहे. श्री. श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांच्या समर्पक शब्दांत सांगावयाचें तर, '**प्रवृत्तीची गंगा, निवृत्तीची यमुना आणि ज्ञानाची सरस्वती यांचा सुंदर त्रिवेणी संगम या संप्रदायांत झाला आहे.**'

आतां श्रीदत्तात्रेयांच्या (१) श्रीपादश्रीवल्लभ (२) श्रीनृसिंहसरस्वती व (३) श्रीमाणिकप्रभु या इतिहासकाळांतील तीन प्रमुख अवतारांची थोडक्यांत ओळख करून घेऊन चतुर्थ दत्तावतार. जे अक्कलकोटचे स्वामीसमर्थ यांच्या दिव्य चरित्राकडे वळूं.

## श्रीपादश्रीवल्लभ

श्रीपादश्रीवल्लभ यांची माहिती दत्तसंप्रदायाचा वेदतुल्य ग्रंथ जो 'गुरु–चरित्र' त्याच्या पांच, आठ, नऊ व दहा या चार अध्यायांत आलेली आहे. त्यापलीकडे त्यांची माहिती इतर कोठल्याहि ग्रंथांत विशेष करून मिळत नाहीं. श्रीगुरु–चरित्र ज्यांनीं

लिहिलें त्या श्रीसरस्वती गंगाधरांचा हेतु श्रीनृसिंहसरस्वतींची लीला वर्णन करण्याचा असल्यामुळें श्रीपादश्रीवल्लभांची माहिती त्यांत केवळ पूर्वपाठिका सांगण्यापुरतीच आलेली आहे.

श्रीपादश्रीवल्लभांचा जन्म मद्रास प्रांतांतील पीठापूर या गांवीं झाला. त्या गांवांत आपस्तंब शाखेंतील आपळराज या नांवाचा एक ब्राह्मण रहात असे. सुमता हें त्याच्या साध्वी स्त्रीचें नांव !

एकदां अमावास्येच्या दिवशीं त्यांचे घरीं श्राद्ध होतें. त्या-वेळीं माध्यान्ह काळीं श्रीदत्त अतिथिवेष घेऊन त्यांचे घरीं गेले. ‘ नानावेष भिक्षुकरूप । दत्तात्रेय येती साक्षेप ’ अशी श्रीदत्तात्रेयांची प्रसिद्धि पूर्वीपासूनच आहे. श्रीदत्तात्रेय आपळराज ब्राह्मणाच्या घरीं गेले त्यावेळीं श्राद्धकर्मासाठीं आलेल्या ब्राह्मणांचें भोजन व्हावयाचें होतें. तें झाल्याखेरीज अतिथीला भोजन घालणें शास्त्रनियमांच्या विरुद्ध होतें. परंतु त्या तेजःपुंज अतिथीला विन्मुख पाठविणेंहि सुमतेला योग्य वाटलें नाहीं व तिनें अगत्यानें त्या अतिथीला भिक्षा घातली.

त्यावेळीं तिचा उत्कट श्रद्धाभाव पाहून प्रभु दत्तात्रेयांनीं आपलें निजस्वरूप प्रकट करून तिला म्हटलें, ‘ माते, तुझ्या भिक्षेनें मी संतुष्ट झालों आहें. तुला काय हवें असेल तें माग.’

त्यावर सुमता समयसूचकतेनें म्हणाली, ‘ मला आपण ‘ माते ’ असें म्हणालांत. तेव्हां तेंच आतां खरें करून दाखवा.’

त्यावर प्रभूंनीं प्रसन्न हास्य करून ‘ तथास्तु ! ’ असा आशी-र्वाद दिला व ते गुप्त झाले. अशा प्रकारें अमावास्येला अतिथि-पूजन घडलें आणि सुमतारजनीचे पोटीं लवकरच बीजेच्या चंद्रा-प्रमाणें श्रीपाद जन्मास येऊन चंद्रकलेप्रमाणें वाढूं लागले. सातव्या वर्षीं त्यांचें मौजीबंधन झालें व तेव्हांपासूनच चतुर्वेद, मीमांसा,

तर्क यावर ते अधिकारवाणीनें भाष्य करूं लागले ! त्यामुळें ते जणू ज्ञानसूर्यच आहेत असें सर्वांना वाटलें. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांच्या लग्नाचा प्रश्न निघाला. त्यावेळीं श्रीगुरु हंसून म्हणाले, ‘ वैराग्य हीच माझी स्त्री असून इतर अन्य स्त्रिया मला मातेसमान आहेत.’ त्याच वेळीं ‘ जाणें असें उत्तरपंथा। दीक्षा द्यावया साधुजना ’ असें आपलें अवतारकार्य असल्याचेंहि श्रीगुरूंनीं स्पष्ट केलें व त्यासाठीं आपल्याला उत्तरपंथाला जाऊं देण्याची परवानगी त्यांनीं आपल्या आई-वडिलांजवळ मागितली.

परंतु या सर्वशास्त्रप्रवीण, विद्वान व गुणी मुलाचा विरह त्याच्या माता-पित्यांना सहन होणेंच शक्य नव्हतें. कारण त्यांचीं इतर मुलें आंधळीं, पांगळीं व मूढ होतीं. त्यामुळें हा निघून गेल्यावर आपलें रक्षण कोण करील अशी शंका त्यांनीं श्रीगुरूंजवळ बोलून दाखविली. त्यावर श्रीगुरूंनीं आपल्या चंद्राप्रमाणें शीतल अशा अमृतदृष्टीनें त्या मुलांकडे पाहिलें. त्याबरोबर तीं मुलें विद्वान व अव्यंग झालीं.

नंतर माता, पिता व बंधु यांचा निरोप घेऊन श्रीगुरु तत्काळ अदृश्य झाले व श्रीक्षेत्र काशी येथें मनोवेगानें जाऊन तेथें गुप्तरूपानें राहिले. तेथून पुढें बद्रिकाश्रमीं नारायणाचें दर्शन घेऊन ते यथाक्रम गोकर्णास आले. तेथें तीन वर्षें राहून ते कुरवपुरास प्रकट झाले.

तेथें अंबिका नांवाची एक विधवा स्त्री, आपला एकुलता एक मुलगा अत्यंत मूढ निघाला म्हणून जीवनाला वैतागून गंगेंत मुलासह देहत्याग करण्यास सिद्ध झाली होती. श्रीगुरूहि त्यावेळीं गंगास्नानासाठीं आले होते. त्यांची तेजोमय, प्रसन्न मूर्ति पाहून देहत्यागापूर्वीं त्यांचें दर्शन घ्यावें असा विचार करून अंबिका मुलासह त्यांचेजवळ आली व आपला प्राणत्यागाचा हेतु सांगून तिनें

त्यांना म्हटलें, 'गुरुमहाराज, पुढच्या जन्मीं तरी तुमच्यासारखा ब्रह्मज्ञानी व सर्वांना पूज्य असा पुत्र होऊं दे.' त्यावर श्रीगुरूंनीं 'प्रदोष काळीं श्रीशंकराची आराधना केल्यास तुझी मनोकामना पूर्ण होईल.' असें तिला सांगितलें. श्रीगुरूंनाच पुढें श्रीनृसिंहसरस्वती या नांवानें अवतार घ्यावयाचा होता व त्या अवताराची ही पार्श्वभूमि अशा प्रकारें तयार झाली होती. आणि ही पार्श्वभूमि सांगण्यापुरतेंच श्रीपादश्रीवल्लभांचें चरित्र श्रीसरस्वती गंगाधरांनीं आपल्या ग्रंथांत दिलेलें आहे. 'आणिक कार्य कारणासी । अवतार घेऊं परियेसी । वेष धरूनि संन्यासी । नाम नरसिंहसरस्वती ॥' या ओव्या या दृष्टीनें चिंतनीय आहेत.

त्याच गांवांत घडलेल्या आणखी एका विचित्र घटनेचे धागेदोरेहि श्रीगुरूंच्या पुढील अवतारपटाशीं जोडले जावयाचे होते ! त्या गांवांत एक म्हातारा रजक (धोबी) रहात होता. रोज प्रातःकाळीं घाटावर आल्यानंतर त्याला श्रीगुरूंचें दर्शन घडत असे. त्यांच्या दिव्य, प्रसन्न व तेजोमय मूर्तीला रोज भक्तिभावानें नमन करून तो आपलें दैनंदिन काम सुरू करीत असे. एक दिवस त्याच्या उत्कट भक्तिभावावर संतुष्ट होऊन 'सुखें राज्य करी आतां' असा आशीर्वाद श्रीगुरूंनीं त्याला दिला. त्या रजकानें हे राज्योपभोग आपण पुढील जन्मीं भोगूं असें श्रीगुरूंना विनम्रपणें सांगितलें. तेव्हां, 'तूं पुढील जन्मीं राजा होऊन मला भेटशील' असा त्यास त्यांनीं वर दिला.

या हकीगतीवरून असें स्पष्ट दिसतें कीं, 'वासना' या मोक्षमार्गांत अडथळा निर्माण करतात. त्या दरिद्री रजकाला, गंगेंत जलक्रीडा करणाऱ्या राजाचें वैभव पाहून राज्योपभोगाची वासना निर्माण झाली. ती वासना ओळखूनच श्रीगुरूंनीं 'तूं राजा होशील' असा वर त्यास दिला. वासनांचा क्षय केवळ हट्टानें होत नाहीं, तो

भोगूनच करावा लागतो. ' निववावीं इंद्रियें सकळ । ना तरी मोक्ष नव्हे निर्मळ । बाधा करिती पुढती केवळ । जन्मांतरी परियेसा ॥' या ओव्यांचें मर्म हेंच आहे !

त्यानंतर अश्विन वद्य १२ शके १३५० या दिवशीं श्रीगुरु गंगेंत अदृश्य झाले. परंतु त्यानंतरहि आपण अदृश्य रूपानें भक्तांच्या पाठीशीं उभे आहोंत याचें प्रत्यंतर दाखविण्यासाठीं श्रीगुरूंनीं वल्लभेश नामक एका भक्ताला चोरांच्या हल्ल्यांतून वांचविल्याची एक आश्चर्यकारक कथा गुरुचरित्रांत आली आहे.

श्रीपादश्रीवल्लभ यांचेविषयीं श्रीगुरुचरित्रांत यापेक्षां अधिक माहिती मिळत नाहीं. तथापि त्यांनींच पुढें ' श्रीनृसिंहसरस्वती ' या नांवानें नवा अवतार धारण केला, अशी दत्तोपासकांची दृढ श्रद्धा आहे व तिला पोषक असे अनेक भक्कम पुरावे श्रीनृसिंहसरस्वतींच्या दिव्य चरित्रांत पहावयास मिळतात !

## श्रीनृसिंहसरस्वती

श्रीनृसिंहसरस्वतींचा जन्म वऱ्हाड प्रांतांतील सुप्रसिद्ध ' कारंजा ' या गांवीं झाला. त्यांच्या जन्मतिथीविषयीं एकवाक्यता असली तरी जन्मशकाविषयीं विद्वानांत मतभेद आहेत. कांहींनीं त्यांचा जन्म शके १३०० च्या सुमारास झाला असें म्हटलें आहे, तर कुणी १३१४ हाच शक जन्मशक म्हणून मानतात. श्रीअप्रबुद्ध यांच्या मतें मात्र श्रीगुरूंचा जन्म शके १३८० बहुधान्य संवत्सरीं कुंभ राशीस चंद्र असतां झाला व त्यानंतर साठ वर्षें अवतार लीला करून शके १४४० त श्रीशैल्यावर बहुधान्य संवत्सरीं ते गुप्त झाले. (पहा: श्रीगुरुचरित्र: कामत प्रतींतील श्रीअप्रबुद्ध यांची पुष्पांजलि.) श्रीगुरूंच्या जन्मकाळासंबंधीं ' निस्संदिग्ध ' असा कोणताच पुरावा उपलब्ध नसल्यामुळें विद्वानांत असे मतभेद होणें अपरि-

हार्य आहे.

श्रीनृसिंहसरस्वतींचें पूर्वाश्रमींचें नांव ‘ नरहरी ’ असें होतें. त्यांच्या जन्मानतर (पौष शुद्ध द्वितीया) ते रडण्याऐवजीं प्रणवोच्चारच करूं लागले ! त्यामुळें गांवांतील लोकांना मोठें आश्चर्य वाटून नरहरीच्या दर्शनासाठीं सारा गांव त्यांच्या माता–पित्यांच्या घरीं म्हणजे अंबाभवानी व माधव यांच्या घरीं गोळा झाला. परंतु घरीं लोटलेली ही जत्रा पाहून त्यांच्या माता–पित्यास आनंदाबरोबरच दुःखहि झाल्यावांचून राहिलें नाहीं.

त्यांची आई म्हणाली–

‘आमुचे मनींची वासना। तुवा पुरवावी नंदना। तुझे बोवडे बोल आपणा। ऐकवावे पुत्रराया ॥

एवढ्या नवसासायासानें झालेला, अग्नीच्या स्फुलिंगाप्रमाणें तेजस्वी असा हा पुत्र नुसता प्रणवोच्चारच करतो त्याअर्थीं तो मुका तर निपजणार नाहीं ना, अशी त्यांच्या जन्मदात्रीस घोर चिंता पडली !

परंतु तेवढ्यांत नरहरीनें खुणेनें सांगितलें कीं, मौंजीबंधन झालें म्हणजे हें मौनव्रत आपणांस सोडतां येईल. परंतु पुत्राचें अलौकिकत्व पटूनहि माता–पित्यांचा संशय दूर होईना. तेव्हां बाल नरहरीनें एक लोखंडाची वस्तु केवळ हस्तस्पर्शानें सोन्याची बनवून माता–पित्यांचा संशय दूर केला. त्यानंतर यथाकाल त्याचें मौंजीबंधन झालें व हा मुका मुलगा गंभीर वाणीनें वेदघोष करूं लागला. तें ऐकून सारी सभा चित्रासारखी तटस्थ झाली ! माता-पित्यांचा आनंद तर गगनांत मावेना !

परंतु हा आनंदहि अल्पकालच टिकला. आईनें मुंजीच्या वेळीं भिक्षा मागण्याचा उपदेश केला होता. ती आज्ञा प्रमाण मानून श्रीगुरूंनीं आईचा निरोप मागितला व तिच्या मस्तकावर हात

ठेवून तिला पूर्वजन्मींच्या वृत्तान्ताचें स्मरण दिलें. पूर्वजन्मीं अंबा-भवानीनें (अंबिकेनें) श्रीपादश्रीवल्लभांना ‘ तुमच्यासारखा पुत्र मला होऊं दे ’ असा वर मागितला होता व दत्तात्रेयांनीं त्या वराची पूर्ति या जन्मीं केली होती. हें पूर्वस्मरण होतांच अंबा-भवानीनें श्रीगुरूंच्या पायांवर लोळण घेतली. त्यानंतर आईच्या आग्रहास्तव तिला दोन पुत्र होईपर्यंत घरींच वास्तव्य केलें व त्यानंतर हातीं जगदुद्धाराचें कंकण बांधून श्रीगुरूंची दिव्य मूर्ति एका शुभदिनीं घराबाहेर पडली. नंतर श्रीक्षेत्र काशीस कृष्णसर-स्वतींना गुरु करून त्यांच्याकडून त्यांनीं संन्यासधर्माची यथा-शास्त्र दीक्षा घेतली. त्या आश्रमांतील त्यांचें नांव ‘ नृसिंहसर-स्वती ’ असें ठेवण्यांत आलें. त्यानंतर नृसिंहसरस्वतींनी ज्ञानयज्ञ सुरूं करून अनेक मुमुक्षूंना मोक्षाचें ज्ञान दिलें. अनेक मार्गभ्रष्टांना सन्मार्गावर आणलें. कांहीं दिवस काशी येथें राहून आपल्या शिष्य-वर्गासह ते बद्रीवनास गेले. त्यानंतर भूमि–प्रदक्षिणा करीत करीत ते कलकत्त्याजवळ गंगासागरास गेले व परत तटाक-यात्रा करीत प्रयागास आले. त्यानंतर एकवीस वर्षांनीं ते पुन्हां माता–पित्यांना व बंधु-भगिनींना भेटण्यासाठीं कारंजास प्रकट झाले.

श्रीनृसिंहसरस्वतींनीं केलेले अनेक चमत्कार दत्तसंप्रदायाचा वेदतुल्य ग्रंथ जो ‘ गुरु–चरित्र ’ त्यांत विस्तारानें वर्णन करण्यांत आले आहेत.

तथापि त्यांचे चमत्कार हे केवळ ‘ चमत्कारांसाठीं चमत्कार ’ नव्हते. त्यामागें लोकोद्धाराची तळमळ होती. यवनांनीं केलेल्या दक्षिण भारतांतील अत्याचारांमुळें वैदिक संस्कृति नष्ट होण्याचीच वेळ आली होती. अशा वेळीं ती संस्कृति टिकवून धरण्यास योग्य अशी निर्भय वृत्ति त्यांनीं हिंदूंच्या मनांत निर्माण केली. त्यांचा शिष्य सायंदेव एका यवनाकडे नोकरीला होता. हा यवन प्रतिवर्षी

एक ब्राह्मणाला ठार करीत असे. (त्या सायंदेवाच्या उल्लेखावरून त्या काळच्या यावनी जुलुमांची वाचकांना कल्पना येईल.) एका वर्षी सायंदेवाची पाळी आली व त्यानें यांतून सुटण्यासाठीं श्रीगुरूंची करुणा भाकली. श्रीगुरूंनीं त्याला अभय देऊन यवनाकडे जाण्यास सांगितलें परंतु त्या यवनानें सायंदेवाचा घात करण्याऐवजीं सन्मानच केला !

ब्राह्मणवर्गाचा सर्वांगीण अधःपात पाहून श्रीगुरूंना उद्वेग वाटला. त्या वेळच्या ब्राह्मणवर्गाची स्थिति किती हीन दशेला पोहोंचली होती याचें गुरु-चरित्रांत पुढील वर्णन सांपडतें.

या भरत खण्डांत । पूर्वीं होतें पुण्य बहुत ।
वर्णाश्रमीं आचरत । होते लोक परियेसा ।।
या कलियुगांभीतरीं । कर्म सांडिलें द्विजवरीं ।
लोपले वेद निर्धारीं । गौप्य जाहलें क्षितीसी ।।
कर्मभ्रष्ट झाले द्विज । म्लेंच्छापुढें बोलती वेदबीज ।
सत्त्व गेलें याचि काज । मंदमति झाले जाण ।।

श्रीगुरूंनीं अशा मूढ ब्राह्मणांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. तसेंच चमत्कारांद्वारें अश्रद्धांच्या मनांत परमेश्वराविषयीं श्रद्धा निर्माण करून त्यांना भक्तिमार्गाची गोडी लावली.

अशा प्रकारें वर्णाश्रमधर्माला आलेली अवकळा नाहींशी करून वर्णाश्रमधर्म सुस्थापित करण्याचें महान् कार्य श्रीनृसिंहसरस्वतींनीं केलें.

संसारी मनुष्यानें जगांत कसें वागावें याबद्दल श्रीगुरूंचा उपदेश पुढीलप्रमाणें आहे—

'औट घटकेच्या लाभलेल्या अत्यल्प आयुष्यांतहि ईश्वरभक्तीची मंगल प्रभा फांकेल आणि ईश्वर कृपेनें जीवनाचें सोनें

होईल अशी वागणूक असावी. देहाच्या उखळांत मनाच्या मुसळानें विवेकाचे तांदूळ कांडले कीं, हळूहळू विवेकदीप्तीनें चित्त शुद्ध होईल, हें लक्षांत बाळगा आणि कुणालाहि शरीरानें, मनानें आणि वाणीनें दुखवूं नका !

## श्रीमाणिकप्रभु

श्रीपादश्रीवल्लभ, श्रीनृसिंहसरस्वती यांच्यानंतर दत्तात्रेयाचे तृतीय पूर्णावतार म्हणून श्रीमाणिकप्रभूंचेंच नांव घ्यावें लागेल. लिंगायत धर्माचे संस्थापक बसवेश्वर यांनीं श्रीमाणिकप्रभूंच्या अवताराचें भाकित बरेच दिवस अगोदर वर्तवून ठेवलें होतें.

श्रीमाणिकप्रभूंचें सारेंच चरित्र अतर्क्य व अद्‌भुत घटनांनीं भरलेलें आहे ! त्यांची अलोट संपत्ति, अतुल ऐश्वर्य, त्यांनीं केलेलें अमाप अन्नसंतर्पण इत्यादि लोकोत्तर गोष्टी वाचून वाचक खरोखरच स्तिमित होतो !

मोंगलाईंत कल्याण नामक गांवीं मनोहर नाईक हरकुडे नांवाचे एक देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होते. हे महान् दत्तोपासक होते. त्यांची धर्मपत्नी बयाबाई हीदेखील महासाध्वी स्त्री होती. मनोहर नाईकांनीं एका सत्पुरुषाच्या सांगण्यावरून निजामाची मोठ्या हुद्दयाची नोकरी सोडली व त्या दांपत्यानें दत्तसेवेला आपलें उर्वरित आयुष्य वाहून टाकलें. अशी सोळा वर्षें कडकडीत तपश्चर्या झाल्यावर एके रात्रीं प्रभु दत्तात्रेयांनीं स्वप्नांत येऊन वर मागण्यास सांगितलें. तेव्हां अंबिकेप्रमाणेंच त्यांनीं 'आपणांस तुमच्यासारखा पुत्र व्हावा' असा वर मागितला. त्याप्रमाणें मार्गशीर्ष शु॰ १४ शके १७४३ या दिवशीं दत्तात्रेयांनें 'माणिकप्रभु' या नांवानें त्यांच्या घरीं जन्म घेतला.

सर्व दत्तावतारांत माणिकप्रभु हे फार ऐश्वर्यसंपन्न असे राज-

योगी होते. लहानपणापासूनच त्यांच्या अंगावर सोनें, मोत्यें, हिरे, माणकें व पाचू यांचे बहुमोल दागिने असत. तसेंच त्यांना सांभाळण्यास दहा पांच अरब व रोहिले शिपाई असत. माणिकप्रभु नवसाला पावतात अशी त्यांची बालपणापासूनच ख्याति झाल्यामुळें दर गुरुवारीं हजारों लोक त्यांच्या दर्शनाला येत !

प्रभूंनीं कोणाकडून ब्रह्मकर्माची संथा घेतली नाहीं किंवा ते एखाद्या शाळेंतहि गेले नाहींत. परंतु चतुर्वेद व षट्शास्त्रें यांत पारंगत असलेल्या विद्वानांचीहि त्यांच्यापुढें शास्त्रार्थ करण्याची प्राज्ञा नव्हती !

श्रीज्ञानदेव अशा जन्मसिद्ध ज्ञानी पुरुषांच्या संबंधीं लिहितात—

मोटकी देहाकृती उमटे। आणि निज ज्ञानाची पाहांट फुटे। सुर्यापुढें प्रकटे। प्रकाशु जैसा ॥ तैसी दशेची वाट न पाहतां। वयसेचिया गांवा न येतां। बाळपणींच सर्वज्ञता। वरी तयांतें ॥ तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें। मनचि सारस्वतें दुभे। मग सकळ शास्त्रें स्वयंभें। निघती मुखें ॥ (अ. ६–५२, ५३, ५४.)

हें वर्णन माणिकप्रभूंच्याबाबतींत तंतोतंत लागूं पडतें !

प्रभूंना बालपणापासूनच वाक्सिद्धि प्राप्त होती. ते जें बोलत तें खरें होत असे. बालपणापासूनच घनघोर अरण्यांत जाऊन दिवसचे दिवस ते तपश्चर्या करीत. त्यांच्या वडिलांच्या देहावसानानंतर त्यांच्या मामानें त्यांस बळेंच एके ठिकाणीं चौकीवर नोकरीस ठेवलें, परंतु प्रभूंनीं दुसऱ्याच दिवशीं चौकीचें दप्तर, कलमदान व झोंपडी यांना आग लावून दिली व ती राख कपाळाला लावून पुन्हां अरण्याचा रस्ता धरला !

त्यानंतर बरेच अलौकिक चमत्कार करून ते भालकी गांवाजवळील अरण्यांतील एका गुहेंत वर्षभर समाधि लावून बसले. वर्ष संपल्यावर हजारों लोक प्रभूंच्या दर्शनासाठीं तेथें आले.

प्रभूंच्या धाकट्या बंधूंनीं–तात्यासाहेबांनीं–गुहेच्या तोंडावरील शिळेची पूजा–आरती करून शिळा बाजूला केली तों आंत प्रभूंची दैदीप्यमान तेज:पुंज मूर्ति आसनावर बसलेली दृष्टीस पडली ! तेव्हां जमलेल्या हजारों लोकांनीं ‘**भक्त कल्पद्रुम गुरु सार्वभौम श्रीमद्राजाधिराज योगिराज महाराज त्रिभुवनानंद अद्वैत अभेद निरंजन निर्गुण निरालंब परिपूर्ण सदोदित सकलमत संस्थापित श्रीसद्‌गुरु माणिकप्रभु महाराज की जय**’ अशी गर्जना करून प्रभूंच्या दिव्य शरीरावर हजारों फुलांची वृष्टि केली.

प्रभूंच्या हजारों लीला प्रसिद्ध आहेत. एकदां कांहीं मुसलमानांनीं प्रभूंना बाटविण्याचें ठरवून त्यांना आपल्याकडे भोजनाचें आमंत्रण दिलें. प्रभूंनीं त्यांचें कपट तेव्हांच ओळखलें. परंतु बाह्यात्कारीं तसें न दाखवितां ते आनंदानें भोजनास बसले. मुस्लिम नबाबानें प्रभूंना बाटविण्यासाठीं गोमांसमिश्रित अन्न तयार केलें होतें. परन्तु भोजनाचे वेळीं खान्यावरील चादर दूर करतांच गोमांसाच्या जागीं हजारों जाईजुईचीं फुलें दिसून आलीं ! त्यामुळें सर्व मुसलमान वरमले व त्यांनीं प्रभूंची क्षमा मागितली.

साक्षात् जगदंबेनें प्रभूंना झोळी व योगदंड दिला होता. त्यामुळें प्रभूंच्या भंडारखान्यांत कधीं कसलीच तूट पडत नसे. हजारों माणसें नित्य जेवत होतीं. परंतु स्वत: प्रभु मात्र भिक्षा मागूनच आपला उदरनिर्वाह करीत असत !

प्रभूंचें रूप पाहतांच त्यांचेविषयीं पूज्यभाव निर्माण होई. वर्ण सांवळा, आजानुबाहु, प्रसन्न व दयार्द्र मुखकमल, शांत व समदर्शी मुद्रा, नेत्रांत दिव्य तेज, मधुर व मोहक भाषण, अखंड आनंदाकार मूर्ति असा हा मनोहर दत्तावतार झाला !

एकदां शृंगेरीचे जगद्‌गुरु शंकराचार्य प्रभूंना भेटण्यासाठीं

आले होते. त्यांच्या स्वागताची तयारी प्रभूंनीं दोन महिने अगोदर चालविली होती. त्यांना भेट देण्यासाठीं साठ हजार रुपये किमतीचा चांफेकळीचा एक रत्नखचित हार प्रभूंनीं मुद्दाम बनवून घेतला होता. तसेंच एक लाख रुपये किमतीचा एक रत्नजडित सोन्याचा मुगूटहि तयार केला होता. जगद्गुरूंना आणण्यासाठीं स्वत: प्रभु सामोरे गेले. जगद्गुरूंसाठीं हत्तीवर सोन्याची अंबारी बांधली होती. चौघडे, वाजंत्री, ताशे वाजत होते. बंदुकांच्या फैरी झडत होत्या. त्यापूर्वीं प्रभूंनीं जगद्गुरूंचा मान राखण्यासाठीं सर्वांना आज्ञा केली होती कीं, कुणीहि त्यांचेदेखत आमचा 'सकलमतस्थापित भक्तकार्य' असा गजर करूं नये. कारण स्वामी आमचे गुरु आहेत. परंतु मंडळींनीं भान न राहून तशी गर्जना केलीच. परंतु त्याचवेळीं अचानक बंदुकीच्या चारशें फैरी झडल्या व ती गर्जना त्या आवाजांत लुप्त झाली! जगद्गुरूंना बसण्यासाठीं प्रभूंनीं जें सिंहासन तयार केलें होतें त्यावर सव्वा-लक्ष रुपये रोख पसरण्यांत आले होते. जगद्गुरूंनीं अडीच महिने त्याठिकाणीं राजेशाही पाहुणचार घेतला. प्रभूंनीं यासाठीं एकंदर पांच लक्ष रुपये खर्च केला!

आपल्या समाधीची जागा प्रभूंनीं कुणाच्या नकळत अपरात्रीं खपून स्वत:च तयार केली होती. मार्गशीर्ष शु. ११ शके १७८७ हा आपल्या निर्याणाचा दिवस प्रभूंनीं अगोदरच ठरविला होता. निर्याणापूर्वीं त्यांनीं गुपचुप यथाशास्त्र संन्यास ग्रहण केला. त्यांच्या समाधीची वार्ता त्यांच्या शिष्यांनीं एक दिवस कशीबशी गुप्त ठेवली. परंतु दुसऱ्या दिवशीं ती सर्वत्र फुटली व एकच हलकल्लोळ उडाला. कित्येकांनीं तर समाधि उघडून एकदां तरी प्रभूंना पाहण्याचा हट्ट धरला. शेंकडों लोकांनीं दु:खातिशयामुळें आत्महत्याहि केल्या.

समाधीच्या वेळीं प्रभूंचें वय अवघें पंचेचाळीस वर्षांचें होतें. प्रभूंनीं 'कल्पतरु' नांवाचा एक ग्रंथ लिहिला असून त्यांनीं रचिलेलीं अनेक पदेंहि प्रसिद्ध आहेत.

बाबा सबनीस हे प्रभूंचे एकनिष्ठ सेवक होते. अक्कलकोटचे स्वामी प्रभूंना भेटण्यासाठीं एकदां आले असतां प्रभूंच्या मांडीला मांडी लावून त्यांचे शेजारीं बसले. त्यावेळीं 'हे तुमचे गुरु' असें सांगून प्रभूंनीं सबनिसांना म्हटलें–

थोडे दिवसांत अक्कलकोटीं। ब्रह्माण्डनायक अनंतकोटी।
विराजतील जगदुद्धरणासाठीं। खूण दृढ पोटीं द्विजा धरीरे ।।

## वारुळांतून प्रकटलेली दिव्यमूर्ति !

श्रीस्वामीसमर्थांच्या जन्माविषयीं स्वामींच्या चरित्रकारांत व भक्तवर्गांत एकवाक्यता आढळत नाहीं. श्रींचे परमभक्त श्रीस्वामीसुत यांचें मत मध्य हिंदुस्थानांतील छेलीखेडा या ग्रामीं श्रींची अष्टवर्षीय मूर्ति चैत्र शुद्ध द्वितीया शके १०७१ या दिवशीं प्रकट झाली असें आहे. त्यानुसार स्वामीसुतांनीं स्थापना केलेल्या मठांत प्रस्तुत दिवशीं श्रींचा जन्मोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.

तथापि बहुसंख्य चरित्रकार श्रीस्वामी म्हणजेच श्रीनृसिंहसरस्वती अशा ठाम भूमिकेस चिकटून आहेत. त्यांचे मतें श्रीनृसिंहसरस्वती श्रीशैल्य यात्रेच्या निमित्तानें अदृश्य झाल्यानंतर श्रीशैल्य पर्वताच्या रम्य परिसरांत समाधि अवस्थेंत राहिले. ते महान् योगी होते हें वेगळें सांगावयाची आवश्यकताच नाहीं. कारण 'योगनाथ' श्रीदत्तात्रेयांचेच ते अवतार होते.

ही समाधि अतिशय प्रदीर्घ काल म्हणजेच जवळजवळ तीनशें वर्षें टिकली व या काळांत मुंग्यांचें प्रचंड वारुळ त्यांच्या दिव्य

शरीराभोंवतीं निर्माण झालें. वाल्मीकि ऋषींच्या देहाभोंवतीं असेंच वारुळ झाल्याची हकीकत वाचावयास मिळते.

श्रीगुरु समाधि अवस्थेंत असतांना एक लांकूडतोड्या आपली कुऱ्हाड घेऊन लांकडें तोडण्यासाठीं त्या ठिकाणीं आला. एका झाडाची फांदी तोडतां तोडतां त्याच्या कुऱ्हाडीचा एक घाव त्या वारुळावर पडला आणि त्यामुळें श्रीगुरूंची समाधि भंग पावली. त्या जोरदार वारामुळें श्रींच्या मांडीवर जखम झाली व त्या जखमेची खूण श्रीस्वामीसमर्थांच्या मांडीवर पुढेंहि स्पष्टपणें दृग्गोचर होत असे !

या हकीकतीच्या सत्यतेबाबत कोणताहि सबळ पुरावा चरित्रकारांनीं दिलेला नसला तरी '**प्रथम आम्ही कर्दळीवनांतून निघालों**' असें स्वत: श्रींनींच एका पारशी गृहस्थास सांगितल्याची श्रींच्या चरित्रांत जी नोंद आहे तीवरून पाहातां वरील हकीकत अगदींच काल्पनिक नसावी असें दिसतें. कारण श्रीनृसिंहसरस्वती याच कर्दळीवनांत गुप्त झाले होते ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

श्रीसमर्थ हे दत्तात्रेयांचे अवतार असले तरी ब्रह्मा, विष्णु, महेश या त्रिमूर्तींपैकीं शिवाचें रौद्र स्वरूपच या अवतारांत प्रामुख्यानें प्रकट झालें होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. कांहीं समर्थभक्त तर त्यांना साक्षात् शिवशंकरच समजतात. अर्थात् हा प्रत्येकाच्या भावनेचा प्रश्न आहे.

## हिमालयावर महाभारतकालीन सिद्धपुरुष

श्रीनृसिंहसरस्वती तीनशें वर्षांहून अधिक काळ समाधि अवस्थेंत होते ही गोष्ट प्रथमदर्शनीं कुणाला अशक्य व अविश्वासार्हच वाटेल ! परंतु केवळ प्राणमय कोशाच्या आधारावर योगी पुरुष आपलें शरीर वाटेल तितके दिवस समाधि अवस्थेंत राहून

टिकवूं शकतात ही वस्तुस्थिति आहे !

आज हिमालयावर असे कित्येक सिद्ध पुरुष आहेत, कीं जे महाभारतकालापासून समाधि स्थितींत बसले आहेत ! यावर कुणी म्हणेल कीं, याला आधार काय ?

अगदीं अशीच शंका उत्तर भारतांतील एक योगी स्वामी श्री. ज्योति:प्रकाशाश्रमजी यांच्या मनांत निर्माण झाली व या ऐकीव हकीकतीवर विश्वास ठेवण्यापेक्षां ‘ याचि देहीं याचि डोळां ’ त्या पुण्यवान सिद्ध पुरुषांना पहाण्यासाठीं ते स्वत: हिमालयाच्या कुशींत शिरले.

बालपणापासूनच त्यांना रामदर्शनाची ओढ उत्पन्न झाली होती. माता–पित्यांच्या निधनानंतर सर्व संपत्तीवर लाथ मारून त्यांनीं हिमालयाची वाट धरली. हेतु एकच, सिद्ध पुरुषांचें दर्शन घ्यायचें ! त्यांचा हेतु पुढें सफल झाला व त्यांनीं आपले आश्चर्य-कारक अनुभव तेथून परत आल्यावर श्री. दिवाकर शास्त्री या विद्वान् गृहस्थास सांगितलें. दिवाकर शास्त्री यांनीं ते श्री. राम-दास शरणदासजी यांना कथन केले. रामदास शरणदासजी यांनीं ते ‘ कल्याण ’ मासिकाच्या नोव्हेंबर १९६२ च्या अंकांत प्रसिद्ध केले.

प्रस्तुत हिंदी लेखांतील कांहीं महत्त्वाच्या भागाचा मराठी अनुवाद येथें दिल्यास तो अप्रस्तुत ठरेल असें वाटत नाहीं.

श्री. रामदास शरणदासजी लिहितात :—

“ योगिराज श्री. ज्योति:प्रकाशाश्रमजी यांच्या मनांत हिमालयांतील सिद्ध पुरुषांचें दर्शन घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली व त्यांनीं आपल्या या विलक्षण इच्छा पूर्ततेसाठीं एक दिवस बद्रीनारायणाचें दर्शन घेऊन सरळ हिमालयाच्या उत्तुंग शिखरांचा रस्ता धरला. वाटेंत एका वनराजानें दर्शन देऊन त्यांना चांगलेंच

घाबरून सोडलें. परंतु आश्चर्य असें कीं, तो सिंह त्यांना कसलीहि इजा न करतां त्यांच्या डोक्यावरून उडी मारून मार्गस्थ झाला ! वाटेंत दुसऱ्या एका ठिकाणीं त्यांना एक विशिष्ट प्रकारचा कंद सांपडला. हा कंद खाल्ल्यावर आठ आठ दिवस मनुष्याला भूक लागत नसे ! थोडें पुढें गेल्यावर त्यांना कांहीं औषधी वनस्पती सांपडल्या. त्या रात्रीच्या अंधारांतहि विलक्षण प्रकाशमान दिसत होत्या. त्यांचा प्रकाश त्यांच्यापासून चार सहा फूट अंतरापर्यंत पसरला होता !

असा बरेच दिवस प्रवास झाल्यावर स्वामीजींना एक जटाधारी ब्रह्मचारी भेटला. त्यानें चक्क संस्कृतांत स्वामीजींना विचारलें, 'कस्त्वम् कुतश्च समायतः ?' (म्हणजे 'तूं कोण व कशासाठीं इकडे आला आहेस ?')

स्वामीजींनीं सिद्धपुरुष दर्शनाचा आपला हेतु त्याला कळवितांच तो म्हणाला, 'मित्रा, तूं म्हणतोस ते सिद्धपुरुष हृषिकेशापासून पुढें सर्व हिमालभर पसरलेले आहेत. परंतु सामान्य जनांना ते कसे दिसतील ? शहाणा असशील तर परत फार !'

परंतु स्वामीजी मागें फिरण्यासाठीं आले नव्हते. 'देह जावो अथवा राहो' अशा जिद्दीनें ते सिद्धपुरुषांच्या दर्शनासाठीं इतके काबाडकष्ट सोसून तेथवर आले होते. ते थोडेच मागें फिरतात !

त्यांचा निश्चय पाहून त्या जटाधारी ब्रह्मचाऱ्यानें पूर्वतयारी म्हणून त्यांना एका प्रचण्ड वटवृक्षाखालीं तपश्चर्या करण्यास सांगितलें. त्या वटवृक्षाचा परिघ जवळजवळ एक मैलपर्यंत पसरलेला होता. त्याचें दुसरें वैशिष्टय असें कीं, थंडीच्या दिवसांत त्याच्या खालचें वातावरण गरम रहात असे तर उन्हाळयांत तें अतिशय थंड बनत असे ! प्रस्तुत ब्रह्मचाऱ्यानें एवढें सांगून त्यांचा निरोप घेतला.

पुढें दहाबारा महिने लोटल्यावर तो परत त्या ठिकाणीं आला व त्यानें स्वामीजींना आपल्या विचारापासून परावृत्त करण्याचा फिरून एकवार प्रयत्न केला. परंतु स्वामीजींच्या निश्चयांत तसूभरदेखील फरक पडला नव्हता !

तेव्हां त्या जटाधारी ब्रह्मचाऱ्यानें स्वामीजींना खूण करून आपल्या पाठोपाठ यावयास सांगितलें. स्वामीजी म्हणतात, 'थोडें अंतर चालून गेल्यावर आम्ही एका प्रचंड शिळेजवळ आलों. त्या शिळेवर एक योगी समाधि लावून बसला होता. त्यानें पद्मासन घातलेलें होतें. तो इतका उंच होता, कीं तो माझ्यासमोर बसला असूनसुद्धां माझ्यापेक्षां अधिक उंच दिसत होता ! त्याच्या जटा जमिनीवर लोंबत होत्या. त्याच्या भ्रुकुटीचे केंस दाढीसारखे लांब वाढले होते. त्याचीं वाढलेलीं नखें सिंहाच्या नखांसारखीं दिसत होतीं.'

त्याच्याकडे बोट दाखवून ब्रह्मचारी म्हणाला, 'हेच माझे पूज्य गुरु आहेत. गेल्या शंभर वर्षांपासून यांची समाधि लागलेली आहे.'

'त्यानंतर कांहीं दिवसांनीं त्या ब्रह्मचाऱ्यानें पुन्हां येऊन मला पुष्कळ दूर नेलें. आम्ही एका प्रचंड गुहेजवळ आल्यावर त्यानें गुहेच्या तोंडावरची खूप वजनदार शिळा अगदीं सहजपणें बाजूला केली. नंतर आम्ही त्या गुहेंत शिरून सतत आठ तास चालत होतों. आतां आम्ही गुहा ओलांडून एका प्रचंड मैदानांत आलों होतों. त्याला लागूनच एक अतिशय भव्य किल्ला होता. त्या किल्ल्यांत कितीतरी महात्मे व सिद्धपुरुष समाधि लावून बसलेले होते.

'त्यांच्याकडे बोट दाखवून तो ब्रह्मचारी म्हणाला, 'हे जे सिद्धपुरुष तुला दिसताहेत ते सारे महाभारतकालापासून इथें

समाधि लावून बसलेले आहेत !'

स्वामीजींनीं त्यांच्या सानिध्यांत कांहीं दिवस राहण्याची इच्छा त्या ब्रह्मचाऱ्याजवळ प्रकट करतांच तो ब्रह्मचारी मानेनें नकार देत म्हणाला, 'अं हं ! तें मुळींच शक्य नाहीं. कारण इथें फक्त ब्रह्मचाऱ्यांनाच राहण्याची परवानगी आहे !'

प्रस्तुतचा किल्ला अर्जुनानें बांधला होता व मुनिश्रेष्ठ व्यासांच्या सांगण्यावरून अर्जुन त्या ठिकाणीं तपश्चर्येला बसला होता अशीहि माहिती त्या जटाधारी ब्रह्मचाऱ्यानें त्यावेळीं स्वामीजींना दिली..."

प्रस्तुत लेखाचा भाग केवळ साररूपानें न देतां कांहींशा विस्तारानें येथें देण्याचा हेतु इतकाच कीं, ज्या हिमालयावर स्वामी समर्थांचा कांहीं काळ वास झाला त्या हिमालयाच्या अद्‌भुतरम्य वातावरणाची ओळखहि जातां जातां वाचकांना व्हावी. असो.

तात्पर्य, योगी पुरुष कांहीं यौगिक क्रियांच्या सहाय्यानें वाटेल तितके दिवस देहरक्षण करून समाधि अवस्थेंत राहूं शकतो व नृसिंहसरस्वतींनीं याच मार्गानें देहरक्षण करून समाधि लावली असावी. अशा वेळीं हिंस्र पशु-पक्षांचा त्रास होऊं नये म्हणून योगी पुरुष कांहीं तंत्रमंत्राच्या सहाय्यानें आजूबाजूची जागा भारून ठेवतात. अर्थात् तो एक वेगळाच ग्रंथाचा विषय होईल. त्यामुळें विषयांतर न करतां मूळ विषयाकडे वळूं.

श्रीस्वामीसमर्थ म्हणजेच श्रीनृसिंहसरस्वती याबाबत थोडीसुद्धां शंका बाळगण्याचें कारण नाहीं. तथापि चिकित्सक बुद्धीला नाहीं म्हटलें तरी एक शंका येणें साहजिक आहे, कीं स्वामीसमर्थ म्हणजेच श्रीनृसिंहसरस्वती म्हणावें तर श्रीनृसिंह सरस्वती आजानुबाहू असल्याचा उल्लेख कोठेंच आढळत नाहीं !

परंतु ही शंका फोल आहे ! श्रीनृसिंहसरस्वती आजानुबाहु

होते असा उल्लेख गुरुचरित्रकारांनीं कोठेंच केलेला नसला तरी त्याविरुद्ध उल्लेखहि कोठें नाहीं. तेव्हा श्रीनृसिंहसरस्वती आजानुबाहु नव्हतेच असें म्हणणेंहि धाष्टर्याचें होईल !

दुसरें असें कीं, योगी लोक आपल्या शरीरांत हवे ते इष्ट बदल सहज लीलेनें करूं शकतात. पुण्याचे सत्पुरुष प. पू. जंगली महाराज यांनीं एकदां आपले हात भराभर लांब वाढवावयास सुरुवात केला. तें पाहून आजूबाजूचे सर्व लोक आश्चर्यानें थक्क झाले. नंतर सर्वांनीं त्यांची प्रार्थना केल्यावर त्यांनीं आपल्या हातांची लांबी पूर्ववत् केली अशी एक हकीकत वाचावयास मिळते.

दुसऱ्या कुणास अशी शंका येण्याचा संभव आहे कीं, श्रीनृसिंहसरस्वती हे संन्यासी होते. त्यांचा वेषहि संन्याशाचा होता. म्हणजे काषाय वस्त्रें, दंड-कमंडलु इत्यादि. परंतु यापैकीं कोणतींच चिन्हें श्रीसमर्थांच्या ठिकाणीं दिसत नव्हतीं हें कसें ? याचें उत्तर इतकेंच कीं, संन्याशांचे एकंदर सहा प्रकार आहेत. (१) कुटीचक, (२) बहूदक, (३) हंस, (४) परमहंस, (५) तुरीयातीत व (६) अवधूत. यापैकीं कुटीचक प्रकारांतील संन्यासी एकाच ठिकाणीं कुटी बांधून राहातात, तर बहूदक संन्यासी नेहमीं संचार करीत असतात. त्यांना तीन दिवसांपेक्षां अधिक काळ एके ठिकाणीं रहाण्याची शास्त्राज्ञा नाहीं. हंस आणि परमहंस ही त्यापुढची पायरी आहे. परमहंस, तुरीयातीत व अवधूत संन्याशांना कटिसूत्र, दंड-कमंडलु इत्यादि नियम नसतात. श्रीस्वामीसमर्थ हे यापैकीं ‘अवधूत’ कोटींतील संन्यासी असल्यामुळें त्यांना या गोष्टींची जरुरी नव्हती.

शिवाय श्रीनृसिंहसरस्वतींना संन्यासाश्रमाची प्रतिष्ठा वाढविण्याचें कार्य करावयाचें होतें व त्यामुळें त्यांनीं दंड-कमंडलु व काषाय वस्त्रें यांचा अंगिकार केला असणें साहजिक होतें ! असो.

———

## प्रकरण दुसरें

# श्रीसमर्थांचें दिव्यस्वरूप

श्रीसमर्थांच्या अवतारकार्याची एवढी पूर्वपीठिका पाहिल्या-नंतर श्रीसमर्थांच्या चरित्र भागाकडे वळण्यापूर्वी श्रीसमर्थांची दिव्य मूर्ति डोळयांपुढें साकार करण्याचा प्रयत्न करूं.

श्रीसमर्थ 'कसे दिसत' यासंबंधीं त्यांच्या चरित्रकारांनीं पुष्कळच वर्णन करून ठेवलेलें आढळतें. श्रींची दिव्य मूर्ति एखाद्या अवधूताप्रमाणें दिसत असे असें म्हणतात. श्रीमद्‌भागवतांत यदु-राजाला भेटलेल्या एका अवधूताचें वर्णन वाचावयास सांपडतें व श्रींच्या मूर्तीला तें वर्णन तंतोतंत लागू पडतें.

यदुराजाला भेटलेला अवधूत कसा होता ?:–

'हा अवधूत सदैव ब्रह्मानंदांत डुलत असणारा आणि आत्म-ज्ञानाच्या तेजानें तळपणारा असा होता. तो ब्रह्मवेत्ता होता. त्याचें पहाणेंहि मोठें और होतें. दृश्याला दृश्यपणानें पहाणें त्याला ठाऊक नव्हतें. तो सर्वांगानें द्रष्टा झाल्यानें द्रष्टेपणानेंच सर्व दृश्य पहात असे. मी कोण ? मी वनांत राहाणारा आहें ही जाणीवच त्याच्या मनाला नव्हती. समदृष्टीच्या योगानें सर्वत्र आपण व्यापलेले आहोंत अशी साम्यता त्याच्या अंगीं बाणलेली होती. कर्म, कार्य आणि कर्ता हें सर्व तो स्वतः आपणच बनला असल्यानें, मी कर्म करतों ही वृत्ति निर्मूल झाली होती. त्या अवधूताच्या देहाला वार्धक्य आलें असें म्हणावें तर त्याच्या देहाला मुळीं देहपणच नव्हतें, मग

वार्धक्य कुठून येणार ! नित्य नवे असणारें त्याचें ज्ञान कधींच मलिन होत नव्हतें. नित्य नवेपणानेंच तो आत्मानंद भोगीत होता. आत्मज्ञानाच्या सामर्थ्यानें त्यानें द्वैतभावना पूर्णपणें जिंकली होती. म्हणून कोठेंहि, कसलेंहि भय न उरलेला तो निःशंकपणें फिरत असे. अनेक धर्मकर्में आचरून किंवा यमनियमांचा अभ्यास करून न साधणारी सद्बुद्धि त्याच्या ठिकाणीं सहज होती. सर्व कर्मांत तो मोठा कुशल दिसे, परंतु कांहीं न करतां तो निश्चल असे. अकर्तात्मबोध म्हणजे मी कर्ता नसून परमेश्वर कर्ता आहे हें ज्ञान झाल्यानें एकाद्या लहान बालकाप्रमाणें त्याची अहेतुक अवस्था होती. बालकासारखा वागला तरी त्याच्या ठिकाणीं बालबुद्धि मात्र नव्हती. तो पूर्णपणें सर्वज्ञ असूनहि आपलें ज्ञातेपण तो दिसूं देत नसे. आपल्या माधुर्यानें अमृताला लाजविणारें आणि ब्रह्मरसानें भरलेलें असें रसाळ भाषण तो करी. ब्रह्मरस पिऊन ब्रह्मानंदानें तो मस्त झाला होता. त्या मुळें 'उन्मत्त' होऊन कोणासहि जुमानीत नसे. तिन्ही जगांतील सगळे जीव काम, क्रोध, लोभरूपी आगीमध्यें जळत असलेले प्रत्यक्ष दिसतात, पण हा अवधूत मात्र त्या आगीमध्यें असूनहि पोळला जात नव्हता. ही त्याची अक्षोभ्यता मोठी और असून सामान्य जनांना आकलन होत नव्हती. सदैव ब्राह्मस्वरूपामध्यें निश्चळपणें बुडून राहिल्यानें सुखदुःखादि द्वंद्वें त्याला स्पर्शत नव्हती.'

श्रींच्या अंगलोटाचा ठळक विशेष म्हणजे ते दाशरथीरामाप्रमाणें आजानुबाहु होते. जणूं कांहीं रौरवांतील बुडत्या जीवांना वर ओढून काढण्यासाठींच परमदयाळू स्वामींनीं असे आजानुबाहु धारण केले होते ! श्रींची उंचीहि सहा फुटांपेक्षां अधिक असून

(श्री. के. वि. बेलसरेकृत 'भावार्थ भागवत') ('प्रसाद') जुलै १९६६.)*

विशाल पोट, रुंद खांदे व तीक्ष्ण भेदक नजर यांमुळें त्यांची मूर्ति प्रथमदर्शनींच भव्य व मनावर छाप पाडणारी अशी आकर्षक वाटे.

श्रींचा वर्ण गव्हाळ असून कांति नारिंगाप्रमाणें तेजस्वी होती. त्यांचे कर्ण मंगलमूर्ति गजाननाप्रमाणें मोठे असून त्यांचीं पातळ, नाजुक पाळीं श्रींच्या प्रत्येक हालचालीबरोबर एकसारखीं मागेंपुढें हालत.

श्रींचा चेहरा भव्य, नाक सरळ व कपाळ विशाल असून भुवयांचा रंग पांढराशुभ्र होता. त्यांचें एकंदर शरीर गुलाबाच्या फुलासारखें नाजुक असून एकंदर काया जुनाट वाटत असे. परंतु त्यांचा उत्साह तरुणाला लाजवील असा असे.

श्री. भीमाशंकर देशपांडे (आळंदीकर) यांच्या पणजी सौ. रंगूबाई यांनीं श्रीस्वामीसमर्थांचें प्रत्यक्ष दर्शन अक्कलकोटास जाऊन घेतलें होतें. त्या श्रींचें वर्णन पुढील शब्दांत करीत–' स्वामी महाराजांचे पाय खूप लांब अन् गुलाबाच्या फुलाप्रमाणें लाल व कोमल, कान मोठे व कपाळावर चंदनाचा भव्य टिळा असे.'

श्रींचें सान्निध्य ज्यांना बहुतकाळ लाभलें त्या ब्रह्मनिष्ठ वामनबुवांनीं श्रींच्या दिव्य, मनोहर स्वरूपाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे--

' रक्तशामलांग प्रसन्नवदन। वक्ष विशाल कंबुग्रीवासम शोभायमान। चंपकवत् नासा कमलदल नयन। आजानुबाहु सरल शोभती ॥ सुकुमार जन्म जरारहित। सुपाद स्वंगुली सुजंघ विराजित। सुनाभी शुभ ऊरू शुभलिंग सहित। आच्छादित कौपीन वस्त्रें ॥ सुपार्श्व जघनोत्तम विशाल। महास्कंद शोभती कौमल। दीर्घ पृष्ठोत्थ सर्वदां निश्चल। सुहस्तरेखा लक्ष्मीवान् साजती ॥ बिंबोष्ठ स्वच्छ शुभदंत झळकती। विद्युज्जिव्ह सुतालक शोभती ॥ दीर्घ चंपक नासा सतेज ती। प्रकाशती सुकपोल सुकर्ण तें ॥

मीलितोन्मीलित नेत्र शुभ्र विशाल ! सुभ्रुमध्य कोमल ! सुंदर दिव्य प्रकाशित भाल। भस्म सुगंधयुक्त ते। कंठीं रुद्राक्ष तुलसी माला स्फटिक। विलसतसे हेमयुक्त मुक्त प्रवाळक। कर्णी चार चार कुंडलरूप अमोलिक। ऐसे अलौकिक ध्यान पाहुनि ॥...'

या वर्णनावरून श्रींची मूर्ति वाचकांच्या मनःचक्षूंपुढें साकार होऊं शकेल !

स्वामी चरित्रकार भागवत लिहितात :– 'महाराजांची वृत्ति फारच विलक्षण प्रकारची असे. त्यांच्या वृत्तीस कित्येक लोक पिशाच्चवृत्ति म्हणत. प्रातःकाळ होण्याबरोबर नित्य नेमानें उठून संन्यास धर्मासि योग्य असा प्रातःस्नानादिक जप, तप किंवा अनुष्ठान अथवा ध्यान-धारणा वगैरे कांहीं एक करण्याचा नेम नसून स्वच्छंदानें व दुसऱ्याचे हातानें सर्व कारभार होत असे. महाराजांस स्नान दुसऱ्यानें घालावें, परंतु स्नान व्हावें असें त्यांच्या मर्जीस आल्यास. महाराजांस जेवण दुसऱ्यांनींच घालावें, परंतु जेवावें अशी महाराजांची लहर लागल्यास. महाराजांच्या अंगावर पांघरूण दुसऱ्यांनींच घालावें, परंतु तें अंगावर असावें असें त्यांस वाटल्यास. महाराजांनीं चाहील त्या ठिकाणीं जावें, ती जागा मग राजाचा रंगमहाल असो, अगर स्मशानभूमि असो, वाळवंट असो किंवा निवडुंगाची जागा असो. महाराजांस प्रतिबंध करणारा कोणी नसे. महाराज चाहील त्याच्या हातचें अन्न खात असत. परंतु महाराज अधर्मी होते, अशी कल्पनाहि कोणास करवत नसे. महाराज कधीं कधीं दिवसांतून दोन दोनदां स्नानें करीत. केशराच्या व चंदनाच्या उटया अंगाला लावून घेत आणि आरती करून घेत. कधीं कधीं आठआठ दिवस स्नानच करीत नसत. कोणास नकळत एखाद्या बागेंत अगर स्मशानांत अगर जंगलांत जाऊन रहात. महाराज चालूं लागले म्हणजे त्यांच्याबरोबर कोणा-

च्यानेंहि चालवत नसे. ते बोलूं लागले म्हणजे एकसारखे कांहीं तरी बोलत असत. हुक्का ओढूं लागले म्हणजे एकसारखा हुक्काच ओढीत बसत. लहान मुलांजवळ खेळूं लागले म्हणजे एकसारखा खेळच चालावा. एखादे वेळीं स्वारी रागावली म्हणजे सात सात दिवस त्यांचा रागच हालूं नये. आनंदांत स्वारी असली, म्हणजे सर्वांजवळ मधुर वाणीनें बोलावें. अशा प्रकाराची महाराजांची दर घटकेस वृत्ति बदलणारी असल्यानें त्यांच्याविषयीं खरी परीक्षा खऱ्या पारख्यावांचून कोणालाच झाली नाहीं.'

ते 'कसे चालत' याविषयीं वामनबुवांनीं आपल्या गुरुलीलामृतांत मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. ते लिहितात कीं, 'श्रीगुरु चालत असतांना आपल्याशींच बोलत व हंसत. चालतां चालतां त्यांना मध्येंच गुडगुडी ओढण्याची लहर येई. ते मधूनच झाडांवरून व दगडांवरून प्रेमानें पाय फिरवून त्यांना 'तुम्हांला काय पाहिजे?' असा प्रश्न करीत! हंसतांना त्यांचें सर्वांग हलत असे. तोंडांतून नित्य वेदमंत्र, श्लोक, दोहरे व अभंग बाहेर पडत. दुसऱ्याच्या मनांतील प्रश्न ओळखून त्यांचीं उत्तरें देण्याचा चाळा तर सारखाच सुरूं असे!

श्रीसमर्थांना भेटण्यासाठीं रोज हजार–दीड हजार लोक येत असें म्हणतात. त्यांचें बोलणें अत्यंत कमी व सूचक असे. त्याचा अर्थ समजावून घ्यावा लागे. बहुतेककरून मराठी व हिंदींतून ते बोलत. एकच वाक्य तीन तीन वेळां उच्चारीत. बोलणें अत्यंत ठांशीव असे, परंतु खुणेनेंच जास्त काम करीत. त्यांच्या तोंडीं शिव्याहि पुष्कळ ऐकूं येत. परंतु त्याबरोबरच ओंव्याहि असत! दुसऱ्याच्या मनांतील प्रश्न त्यानें न सांगतांच त्यांना समजत असे व त्या अनुरोधानें ते अगोदरच त्याचें उत्तर देऊन त्यास चकित करीत! भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला नेंहमीं असें वाटे कीं, आपणांपेक्षां या महापुरुषाला

अधिक ज्ञान आहे !

त्यांना सोंवळ्या-ओंवळ्याचा विधिनिषेध नसे. परंतु कोणी सेवेकरी भलत्याच ठिकाणीं नाक शिंकरला किंवा खांकरला तर तें त्यांना बिलकुल खपत नसे.

श्रीसमर्थांची हिंदूंप्रमाणेंच मुसलमानांवरहि फार प्रीति असे. त्यामुळें ते पुष्कळ वेळां शेख नुरुद्दीनचा दर्गा, खाज्या पिराचा दर्गा अशा दर्ग्यांच्या ठिकाणीं पडलेले असत. त्यांच्या संगतीला श्रेष्ठ दर्जाचे फकीरहि अनेक वेळां दिसून येत. एकदां समर्थांनीं मुसलमानांच्या कबरस्थानांत जाऊन बरीच नासाडी सुरूं केली. तेव्हां कांहीं मुसलमान खवळून त्यांना मारण्याकरितां निघाले. ही गोष्ट समर्थांनीं अंतर्ज्ञानानें जाणली व आपल्याजवळ बसलेल्या एका काळ्या कुत्र्यास त्यांनीं एका गृहस्थाला दाबण्यास सांगितलें. हा प्रयोग इकडे चालूं असतां त्या धांवून येणाऱ्या मुसलमानांच्या घरांत एकाएकीं इतका आकांत झाला कीं, त्यांना त्याच पावलीं घरोघर परतावें लागलें ! नंतर एका वृद्ध मुसलमानानें सर्वांना बोलावून सांगितलें कीं, स्वामी म्हणजे एक अवलिया आहे. त्यांच्या वाटेस जाऊं नका.

जनावरांत गाय व कुत्रा समर्थांना विशेष प्रिय असे, तर मांजरावर त्यांचा राग असे. फुलांत भगव्या रंगाचीं फुलें त्यांना जास्त आवडत. खाण्याच्या पदार्थांत बेसनाचे लाडू, पुरणपोळी, कडबोळीं व कांद्याचीं भजीं यांवर त्यांची प्रीति दिसून येई.

'सर्वांभूतीं समभाव' हें श्रीसमर्थांच्या स्वभावांतील एक ठळक वैशिष्टय दिसून येई. सर्व भक्त त्यांना सारखेच असत. वर्षानुवर्षें सेवा करणाऱ्या चोळापाला जी वागणूक, तीच एक दिवस सेवा करण्यासाठीं आलेल्या भक्ताला ! द्वैत त्यांना कसें तें ठाऊकच नव्हतें. रोज सकाळीं ते नियमानें फक्त दोन आचमनें घेत. श्री. स. कृ.

फडके लिहितात, 'दोन आचमनें घेऊन ते जणूं द्वैताचाच ग्रास घेत!'

सुंदराबाई समर्थांना जेवूं घाली. त्यावेळीं त्यांना लहान मुलासारखें भरवावें लागे. त्यांनीं भरपूर जेवावें म्हणून सुंदराबाई अनेक युक्त्याप्रयुक्त्या लढवी!

स्वामी निजले कीं, डोकीवरून पांघरूण घेऊन कांहींतरी असंबद्ध बडबड करीत. त्यांना झोंप अशी क्वचितच लागे. पुष्कळ वेळां त्यांच्या तोंडून पुढील श्लोक मंडळींना ऐकूं येत–

'ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदं। मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा ॥१॥ कार्तवीर्यार्जुनो नाम विख्यातो भूमिमंडले। तस्य स्मरण मात्रण जन्मसंसार बंधनात ॥ १ ॥ नमस्तस्मै नमस्तस्मै नमस्तस्मै नमो नमः। कार्तिके कृत्तिका योगे–यः कुर्यात स्वामिदर्शनं। सप्तजन्म भवेद्विप्रो धनाढ्यो वेदपारगः ॥१॥ पीठं यस्य धरित्री जलधर कलशं लिंगमाकाश मूर्ति। नक्षत्र पुष्पमाला ग्रहगण कुसुमं नेत्र चंद्रार्क वन्हिः। कुक्षौ सप्त समुद्रं भुजगिरि शिखरं सप्त पातालपादे ॥ वेदं वस्त्रं षडंगं दशदिशि वसन दिव्य लिंगं नमामि ॥१॥ मूले ब्रह्मा मध्यें विष्णुः शाखायांच महेश्वरः। पत्रेपत्रे तु देवाश्च वृक्षराजाय ते नमः ॥१॥ काशीक्षेत्रे निवासोयं जान्हवी चरणोदकं। गुरुविश्वेश्वरः साक्षात्तारकं ब्रह्म निश्चितं ॥१॥ श्रुतिस्मृतिं न वक्तव्ये केवलं गुरुसेवनं। ते वै संन्यासिनः प्रोक्ता इतरे वेष धारिणः ॥१॥ गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पस्तरुस्तथा ॥ पापं तापंच दैन्यंच सद्यः साधु समागमः ॥१॥ शिवहर शंकर नमामि शंकर शिवशंकर शंभो। ये गिरिजा पति भवानी शंकर शंभो...॥ इत्यादि...

स्वामी समर्थांच्या बोलण्याचालण्यांतील व इतर वागणुकींतील बारकाव्यांची कल्पना श्री. श्रीखंडे यांच्या बखरींवरूनहि वाचकांना येईल. तो भाग असा–

## श्री. श्रीखंडे यांचें प्रवासवर्णन

श्री. गोपाळ बाबाजी श्रीखंडे सबनीस, कोल्हापूरकरांचे खाजगी कारभारी यांनीं इसवी सन १८७३ मध्यें पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट या स्थळांचा प्रवास केला. त्याचें प्रवासवृत्त त्यांनीं मोडींत लिहून ठेविलें असून त्याचें वाचन श्री. ना. के. जोशी यांनीं दि. २२-३-६७ रोजीं पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळांत केलें. प्रस्तुतच्या प्रवास वृत्ताचा मराठी अनुवाद येथें मुद्दाम दिला आहे. तो वाचीत असतां आपण त्या काळांतच वावरत आहों असा भास वाचकांना होईल !

श्री श्रीखंडे लिहितात-

'फाल्गुन शु. १२ रोज अिदुवारी ता. ३ मार्च सन १८७३ अीसवी रोजी रात्रौ साडेचार तास रात्र जाली होती तेव्हा अकलकोटास पोचलो. मंगलवार पेटेत गेलो. तो चोळापा भेटले. त्याणी श्री. स्वामीमहाराज श्री. सीतारामचंद्राचे देवालयात आहेत. अता निद्रा जाली. जागे करुन भेटीस जाणे ठीक नाही. प्रातःकाली भेट घ्यावी. अता जंगमाचे मठात उतरावे म्हणोन जागा दाखविली तेथे उतरलो. जवळच चोळापाचे घर आहे त्याचे नजीक नवीन देवालय बांधणेचे काम चालले आहे व येक विहीर नवीन बांधली त्यास कुशावर्त तीर्थ असे नाव स्वामीनी दिल्हे आहे. देवालयासमोर औदुंबर वृक्ष स्वामीनी लावलेला असोन तळी पाषाणाच्या पादुका आहेत त्यास शेवेकरी प्रदक्षणा घालितात. जवल सोप्यातील खोली पूर्वाभिमुख आहे तेथे तीन मुकूट लावून श्री. दत्तात्रेयाची पूजा करितात. जवळच श्री. स्वामीच्या काष्टाच्या पादुका रुप्याचे करंड्यांत ठेविल्या आहेत. तीन मुकूटाखाली पादुका स्वामीच्या ठेवून पुजा

बांधतात. खाली समोरचे दाराचे गणेश पटीवर माणिक प्रभूची तसबीर लावली आहे. ही जागा रात्रीसच पाहिली. मोठी धर्मशाळा वगैरे अिमारत बांधलेली आहे. श्री. गणपतीची मूर्तीही हिंदुस्थानी संगमरवरी दगडाची चांगली स्थापना कर्णेत आलेली येका खोलीत आहे.

दुसरे दिवसी प्रात:काली सर्व मंडळी सव्हा दोन तास दिवसास श्री रामाचे देवळांत सर्व मंडळीसह दर्शनास गेलो तेव्हा देवालयाचे अवारात आतिल देवळाचे दक्षणेकडील भींतीस बाहेरचे बाजूस चौफाळचावर उत्तरेकडे भींतीचे बाजूस उसे करून निजले होते. पाय दक्षणेकडे होते. खुद चौफाले खाली येक रुपया व नारळ ठेवला व नमस्कार केलेवर अितर मंडळींनी येकक नारळ व काही दक्षणा कोणी कोणी ठेऊन नमस्कार केले. मी नमस्कार करून बसलो तेव्हा याचे काही घेऊ नको, ज्याचे त्यास परत दे, मग तुम्ही ते काय पाहिजे ते करा आशा प्रकारचे शब्द जवल असणारा चोलापाचा भाचा श्रीपाद भट यास बोललेवर त्याणे रुपया न देता पावली व नारळ श्री स्वामीचे पुढे केलेवर त्यांणी प्रसाद दिल्हा. पावली श्रीपाद भटजीनी दिल्ही. नारळ स्वामीनी दिल्हे चरणास हात लावुन सर्वानी नमस्कार केले तेव्हा आओनें पाय जरा जाजती धरले. अितक्यात नाचुलो बायकाची ×× जात येथें जिकीर कां अशा अर्थाचे शब्द बोलले. वर चुलीकडे जाऊन आओ आली. अनंत जवल बसलो असता नवीन अिमारतीचे कामाकडे काहीतरी घ्यावे, यादीवर अितरानी अंख घातला आहे म्हणोन श्रीपाद भटजी बोलले. नंतर पंचवीस रुपयांचा अंख घातला. तो स्वामीस त्याणी दाखविला. पाहून यादीची सुरळी फेकून दिल्ही व अंख कमी घातला. सबब आवडला नाही असे भावार्थाचे शब्द निघाले. मग पंनास घातले तरी जाजती असावे असे श्रीपादभटाचे बोलणें जालेवर बरे

आहे म्हणेचे मनात आले. अितक्यात चुन्या दगडाचे काम आहे असे समजणेसाठी स्वामीनी भींतीवर हात ठेऊन दाखविला आणि कल्याण आहे असे दोन वेल उच्चार मुखातून निघाले. नंतर शंभर रुपयाचा अंख घातला तो स्वामीस दाखविला तेव्हा संतोष मुद्रा होऊन 'बेखंडी दूध पीना कबे हंडी हलवा खाना' असे शब्द बोलले. नंतर प्रसाद घेऊन नमस्कार करून निघालो.

'नंतर स्नान करून षोडशोपचार घेऊन सर्व मंडळीसह पुन्हा दोन प्रहरी पुजेस गेलो तेव्हा त्याच देवळात दक्षणेकडे स्वारी पलंगावर निजली होती. श्रीपाद भटानी पुजा सांगितली व खुद केली. चरणावर पुजा केली. गंध कपाळास लावले. नैवेद्य दाखविला. आरती केली. तांबूल खलबत्त्यात कुटून मुखात घालणेस गेलो असता घेतला नाही. नंतर यका स्वामीचे हातानें तोच तांबूल घेतला. नंतर तोंडातील थोडा तांबूल प्रसादास दिल्हा. तो भक्षण केला. मग स्वामीवर केलेले पद लिहून आणलेले म्हटले तो कागद घेऊन दोनचार दाहाडातून काढून दिल्हा. नंतर शंभर रुपयें सकाळी यादीवर मांडलेले देणेस आणले ते श्रीपादभट घेत होते. इतक्यात उठून येक सोनार भक्त होता त्यास पाहून वाजऊन घे आणि धनगाराचे देणें आहे त्यास दे असे मुखातून शब्द निघाल. त्याप्रमाणें सोनारास मोजून वाजऊन शंभर रुपये दिल्हे. नंतर प्रसाद घेऊन नमस्कार करून बिराडी गेलो.

'याच दिवसी नारायण रावजी रावसाहेब बरवे न्यायाधीश याचे बरोबर जोशी बावाचे घराजवल चितोपंत याचे घरी पाटावर पादुका उमटलेल्या आहेत त्या व पाषाणाच्या दुसऱ्या पादुका व लिंग गणपती आंबाबाओची स्थापना करून बिनायक व वासुदेव याणी बांधलेले मोठे देवालय पाहून दर्शन घेतले. तेथे देवळात स्वामीनी लावलेला औदुंबर वृक्ष आहे व विहीर पाणी गोड आहे.'

'हे पाहून रामाचे देवुळी बरवे बरोबर गेलो ते दिवे लावले होते. नुक्ती रात्र झाली असून स्वामी प्रातःकालचे ठिकाणी चौफाळ्यावर पश्चमेकडे उसे करून निजले होते. तेव्हा नमस्कार करून बसले-नंतर किती एक मंडळी दर्शन घेऊन जातात बसतात असे चाललें आहे व असंबद्ध सारखे भाषण मुखातून निघत असता मी पादसमर्दन करीत बसलो होतो तेव्हा करवीर मोठे क्षेत्र नवा अगळी काशी ते निपाणीहून आठ कोश आहे निपाणीत एक वर्ष आम्ही होतो. भुधरगडावर बाबा आहेत काय हो म्हणून उठून पुसल्यासारखे बोलले. कोलापुरास पनाळा रत्नागिरी जवल आहे. रत्नाकरपत आणा थोर मुत्सद्दी आहे. सिध्धागिरी किंवा शेषगिरी असा शब्द असावा. ते आहेत काय म्हणोन पुसले. हे शब्द कांहीं कांहीं वेळांनी असंबध्ध शब्दांत मध्ये मध्यें निघाले. मध्ये एका ग्रहस्थाचे कानात 'सदा संतो भीगंतव्य:' हा श्लोक योग वासिष्टातील म्हणून अर्थ मी सांगत असता स्वामीनी उठून पुढे हात करून 'कार्तविर्यार्जुनो राम राजा बहु सहस्त्रवान' असे म्हणून याच्या पुढें 'तस्य स्मरण मात्रेण' हे अर्ध म्हणतात ते न म्हणता दुसरे दोन अर्ध म्हटले. ती लक्षांत नाहींत. त्याचेपुढें 'नमस्तस्ये नमस्तये नमस्तर नमोनमः' हेच अर्धे तीन वेल म्हणून कैसा उपदेश होता जे असे बोलून स्वारी निजली. मग कांहीं वेळानीं नमस्कार करून निघालो असता तुम्ही कित्तुरास गेला होता काय म्हणून विचारले. तेव्हां नाहीं असे सांगून गाणगापुरास जाणेचे आहे म्हणून सांगितले आणि नमस्कार करून निघालो तेव्हां चार तास रात्र झाली होती.

'तेच दिवशी पाहटेस आलो तो स्वामी त्याच चौफल्यावर उठून बसले होते. दुसरेकडे जाणेस मंडळी विनवीत होते. नंतर कांहीं वेळानी निघून नवीन इमारत चालले ठिकाणीं चोळापाचे

घरी गाडीत बसून आले. नंतर नापीत आला. त्याचे कृत्य चालले होते. नंतर स्नानास जाऊन कुशावर्तावर स्नान करून गडबडीने येतो तो स्वामीचे स्नान होऊन पुजा चालली होती. नंतर तेच साहित्यं घेऊन श्रीपाद भटजीनी सांगितले प्रमाणें सर्व पूजा पंचोपचार खुद केली. नमस्कार करून प्रार्थना करीत अंजुली जोडून बसलो आणि तुलसीपत्रे मुखात घातली. ती घेऊन खाली नंतर पुष्पांजलीस वगैरे ज्याणी जाणी फुले व तुलसीपत्रे विशेषकरून ती सर्व पायवरली वगैरे घेऊन माजे अंजुलीत घातली मी प्रसाद समजून घेतली. नंतर किती एक पल्या व पंचपात्रे मंडळीची जमीनीवर होती. पैकी एक रुपेची नागाची पळी घेऊन तीन चारदा माझे पुढचात आणून नागाचे फडीवर बोटे मारून दाखविली आणि ती पळीही माजे अंजुलीत शेवट घातली. त्याचा अभिप्राय मनात येताच किंचित हास्यवदन जाले पाहून नमस्कार करून निघालो. स्वामी जवल सोप्यात चौफाल्यावर निजले नंतर विराडी गेले वर स्वामीनी माझे स्मरण केले आहे लौकर चला असे दोन असामीनी सांगितले. नंतर गोविंदशास्त्रीबावा आले बोलावणेस ते वाटेत भेटलें मिळून स्वामीजवळ गेलो तेव्हां सुंदरबाई सोलापूरकर अिने मुग मागितला तेव्हां बरे आहे असे म्हणाले. ती तसे नाहीं मला देणेस सांगा म्हणून जिकीर करी. परभारे भाग देतील असे भावाचे शब्द निघत. तिचे म्हणणे मी लोकाकडे मागणार नाहीं. आपली शेवा कर्ते तें देणे तर आपण द्या. अगर देणेस सांगा असी जिकीर करी. तेव्हां ते आणि आम्ही दोन आहो कायगे येका माअिचे पुत दोघे असे शब्द निघाले. नंतर जिकीर करून मी देतों असें तिजला हलूच सांगितले. नंतर कांहीं वेळानें मजकडे मुख करून × × × तुम्हारा नाम चंदुलाल और लक्ष्मण प्रसाद किसन प्रसाद गणेश—लाल शंभुलाल आणखी नांवे बोलले ती चारपांच स्वरणांत नाहींत

शेवटी भगवंतराव और क्या अशाप्रकारचे शब्द निघाले तेव्हा सद्गदित कंठ व प्रेमाश्रु रोमांच उठून बोलणेस यवेना. असे जालेवर जाऊन घट्ट पाय धरले. सुंदरबाई आणखी कोणी जवळ होते. खरी भक्ती म्हाराज कृपा करावी मस्तकी हात ठेवावे म्हणोन येक दोन वेल म्हणताच मस्तकावर अभय कर ठेवले तेव्हा पाच तास दिवस अला होता. नंतर नमस्कार करून बिराडी आलो. सदरचे वेलेस गोविंदशास्त्री जवल होते.'

'नंतर स्वामीस नैवेद्याकरिता तयार केलेले पदार्थ भात क्षीर बसनाचा लाडू वगैरे घेंऊन सातवे तासी गेलो. तर स्वामी तेथेंच परसातील अंगणात चौफाल्यावर पुर्वेकडे उसे करून निजले होते. सुंदराबाईनी सर्व मंडळी बाहेर काढली. ती श्रीपादभट आई आणि मी असे चौघेच होतो. सुंदराबाईनी प्रथमत: संत्रे खावयास देऊन हालूच युक्तीनी मुखांत तूप, वरणभात, भाज्या वगैरेचे ग्रास घालीत चालली. स्वामी निजूनच जेऊं लागले.'

श्री. श्रीखंडे यांच्या प्रवास वर्णनांतील हा भाग श्री. समर्थांच्या दैनंदिन कार्यक्रमांची ओझरती कल्पना वाचकांना आणून देईल. त्याचप्रमाणें श्री. समर्थांच्या बोलण्याची लकब, त्याकाळची भाषा इ. गोष्टींचेंहि रम्य दर्शन वाचकांना होईल.

दक्षिणेकडे पाय करून झोंपणें आपण निषिद्ध समजतों, परंतु श्रीसमर्थ दक्षिणेकडे पाय करून झोंपले होते असा उल्लेख या वर्णनांत सांपडतो !

श्रीसमर्थांचें बोलणें फार अल्प असे. चुन्या-दगडाचें काम ही गोष्ट त्यांनीं केवळ खुणेनेंच सांगितली. त्यांच्या मुखांतून 'असंबद्ध भाषण' एकसारखें ऐकूं येत होतें असें श्री. श्रीखंडे लिहितात. श्रीसमर्थांसारखे महापुरुष उन्मनी अवस्थेंत मनुष्यवाणीचा त्याग

करून देववाणीचाच उच्चार करतात. श्री. मिटकरमहाराजांचे गुरू श्री. माळीमहाराज हेदेखील पुष्कळ वेळां असेंच असंबद्ध भाषण करीत असें खुद्द श्री. मिटकरमहाराजांनींच प्रस्तुत लेखकाला एकदां सांगितलें होतें. ही देववाणी असंबद्ध असते. (असंबद्धा देववाणी) मंगळवेढ्यानजीक एका डोंगरावर दोघे यती व श्रीसमर्थ यांच्यांत झालेलें भाषण या देववाणींतच होतें. (कां रडतो का? हांका कां मारतो? इत्यादि ही हकीकत पुढें येणारच आहे.) ही वाणी सर्व-सामान्य मनुष्यास कळणें सुतराम् शक्य नाहीं. मात्र तिचा अर्थ ती घटना घडून गेल्यावर कांहीं वेळां सामान्य मनुष्यासहि लागू शकतो. श्री. माळीमहाराजांनीं एका मुलीच्या बाबतींत, 'हत्ती आल्यावर चौकट पडेल' असे उद्गार काढले. त्यावेळीं त्या शब्दांचा अर्थ कुणालाच उकलला नाहीं. परंतु गणपति आल्यावर त्या मुलीला वैधव्य प्राप्त झालें, आणि तो स्पष्ट झाला!

सुंदराबाई आणि श्रीपादभट यांच्या लोभी स्वभावाचें ओझरतें दर्शन या लहानशा प्रवासवर्णनांतहि घडतें ही मोठ्या मौजेची गोष्ट होय!

श्रीसमर्थांच्या भोजनाचा खाक्या कसा होता याची कल्पना अखेरच्या परिच्छेदावरून चांगली येते. त्यांना लहान मुलाप्रमाणें भरवावें लागे. त्याचप्रमाणें भोजनहि लहान मुलाला ज्याप्रमाणें, 'हा चिऊचा घांस, हा काऊचा घांस' असें म्हणून त्याची आई युक्ती-युक्तीनें भरवते त्याप्रमाणें सुंदराबाईदेखील युक्तीनेंच समर्थांना घांस भरवीत असे व समर्थ निजल्या निजल्याच हें भोजन उरकीत असत!

## 'गोरें ग रूप तुझें....'

श्रीसमर्थ कोण, कुठले, त्यांचा जन्म कोठें झाला, त्यांचे

माता-पिता कोण यासंबंधीं स्वत: श्रीसमर्थांनीं कुणालाच कधीं थांग-पत्ता लागूं दिला नाहीं.

एकदां अक्कलकोटास श्रींची स्वारी चितोपंत टोळांच्या घराबाहेरील अंगणांत बिछान्यावर पहुडली असतां पुष्कळवेळ गप्पा चालू होत्या. त्या नादांत मध्यरात्रीपर्यंत कुणालाच वेळेचें भान राहिलें नाहीं. तेवढ्यांत श्रीसमर्थांनीं खड्या आवाजांत पुढील जुनी लावणी चालीवर म्हणावयास सुरुवात केली–

**'गोरें ग रूप तुझें । तुला पाहिलें**
**सात ताल माडीवरीं ॥...**

श्रींच्या तोंडीं ही शृंगारिक लावणी पाहून सर्वांनाच मोठें आश्चर्य वाटलें. त्यांपैकीं चितोपन्तांनीं थोडें धाडस करून श्रींना म्हटलें, 'महाराज, आपण पूर्वाश्रमीं गृहस्थ होतां असें वाटतें. आपली जात कोणती हें कृपा करून सांगाल का?'

त्यावर श्रीसमर्थ चटकन म्हणाले, '**आमची जात चांभार, आई महारीण, बाप महार आहे.**' एवढें सांगून समर्थ पोट धर-धरून मोठमोठ्यानें हंसत सुटले!

पुढें एकदां एका भक्तानें श्रींना हाच प्रश्न केला कीं, 'स्वामीन्, आपण कोण आहांत?'

त्यावेळीं श्रीसमर्थांनीं नेहमींप्रमाणें असंबद्ध वाणींत पुढील उत्तर दिलें,

**'मूळ पुरुष–वडाचें झाड–**
**दत्तनगर-मूळ मूळ–'**

या असंबद्ध वाणीचा कुणालाच बोध झाला नाहीं. परंतु तेथें एक वेडसर दिसणारी म्हातारी सोनारीण होती. तिला श्रींच्या सान्निध्यांत राहून राहून त्यांच्या बोलण्यांतील मर्म समजूं लागलें

–होतें. ती चटकन् पुढें होऊन म्हणाली, 'वटपत्रशयनी मूळ पुरुष दत्तात्रेयरूपानें अवतरले आहेत.'

त्याचवेळीं कर्वे नांवाच्या गृहस्थांनीं श्रीसमर्थांना याबाबत अधिक खुलासेवार सांगा अशी विनंति केली. तेव्हां समर्थ म्हणाले, **'आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण, आमचें नांव नृसिंहभान, काश्यप गोत्र आमची मीन राशी. पुन्हां विचारल्यास टाळक्यांत पायपोस.'**

श्रीसमर्थांना एकदां कलकत्त्याच्या एका पार्शी गृहस्थानें 'आपण कोठून आलांत?' असा प्रश्न विचारला.

त्यावेळीं श्रीसमर्थांनीं पुढील उत्तर दिलें–

**'प्रथम आम्ही कर्दळीवनांतून निघालों. पुढें फिरतफिरत कलकत्ता वगैरे शहरें पाहिलीं. बंगाल देश हिंडून काली देवीचें दर्शन घेतलें. नंतर गंगा तटानें फिरत फिरत हरिद्वार व केदारेश्वर पाहिलें.'**

(त्यानंतर श्रीसमर्थांनीं अनेक गांवांचीं व तीर्थांचीं पटापट नांवें सांगितलीं. तीं सर्वच्या सर्व लक्षांत ठेवणेंहि कुणाला शक्य नव्हतें.) **'नंतर आम्ही गोदातटाकास आलों. तेथें बरींच वर्षें राहिलों. नंतर मंगळवेढयास आलों तेथें बरींच वर्षें राहून नंतर पंढरपूर, बेगमपूर येथें जाऊन हिंडत हिंडत मोहोळास आलों. तेथून सोलापुरीं आलों. तेथें कांहीं काळ राहून अक्कलकोटास आलों तो येथेंच आहें.'**

या यादीवरून श्रींचा संचार जवळजवळ आसेतुहिमाचल असाच झालेला होता, ही गोष्ट वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

या संचारांत घडलेल्या कांहीं महत्त्वाच्या हकीकती व त्या अनुषंगानें घटलेल्या श्रींच्या विलक्षण लीला यांची माहिती पुढें पाहू–

---

प्रकरण तिसरें

# हिमालयाच्या तपोभूमींत

श्रीसमर्थांची स्वारी श्रीशैल्य पर्वतावरून निघून हिमालयाच्या तपोभूमींत प्रकट झाली.

श्रींच्या हिमालयांतील वास्तव्यांत अनेक लोकविलक्षण चमत्कार घडले.

## चिनी दांपत्याचा गर्वपरिहार !

चीन देशांतील एक जोडपें कांहीं दिव्य वनौषधींचा शोध करण्यासाठीं हिमालयावर आलें होतें. त्याठिकाणीं श्रीसमर्थांची काषाय–वस्त्रांकित अजानुबाहु मूर्ति त्यांचे दृष्टीस पडली. तसा वेष त्यांनीं यापूर्वी कधीं पाहिला नव्हता म्हणा, किंवा श्रीसमर्थांच्या भव्य, अजानुबाहू मूर्तीला घाबरून म्हणा, श्रीसमर्थ म्हणजे कुणीतरी भूत, सैतान किंवा मंत्रतंत्र करणारे जादूगार असावेत असाच त्यांचा प्रथमदर्शनीं श्रीसमर्थांविषयीं ग्रह झाला व या ' खविसा ' च्या नादीं लागण्यांत अर्थ नाहीं असा ' सूज्ञ ' विचार करून तीं दोघे जवळच्याच एका वृक्षाआड गेलीं.

नानाविध लता-वृक्षांनीं बहरलेल्या त्या अरण्यांत लहान-मोठे रंगीबेरंगी पक्षी सुस्वर गायन करीत होते. पर्वतराजीवरून वहात येणारा थंडगार वारा अंगावर शहारे आणीत होता. तेथील सर्वच वातावरण त्या रंगेल जोडप्याच्या प्रेमभावनेला ऊत आणणारें होतें. त्यामुळें त्या घनसान्द्र वृक्षाच्या आडोशाला जाऊन त्या उभयतांनीं

मनसोक्त प्रेमक्रीडा सुरू केल्या. ‘कामातुराणां न भयं न लज्जा: !’

त्यांचा हा वाह्यातपणा पाहून श्रीसमर्थांनीं त्यांना योग्य तो धडा शिकविण्याचें ठरविलें आणि थोडयाच वेळांत त्या स्त्री-पुरुषांच्या शरीरावयवांत हळूंहळूं बदल होऊं लागला ! स्त्रीचें रूपांतर पुरुषांत व पुरुषाचें स्त्रींत होऊं लागलें ! हा विलक्षण बदल पाहून तीं दोघेंहि कमालीचीं लज्जित झालीं आणि भीतीनें थरथर कांपूं लागलीं ! हा चमत्कार मघां पाहिलेल्या यतिवर्यांनींच केला असला पाहिजे याबद्दल त्यांना मुळींच शंका उरली नाहीं. व तीं दोघे तशा घाबरलेल्या स्थितींत धांवतच यतिवर्यांसमोर येऊन उभीं राहिलीं. त्यांच्या तोंडून शब्दहि फुटत नव्हता. त्या दोघांनीं यतिवर्यांच्या पायांवर डोकें ठेवून त् त् प् प् करीत त्यांची परोपरीनें विनवणी केली.

श्रीसमर्थ त्या मूर्ख चिनी दांपत्याकडे पाहून नुसते हंसले आणि नंतर त्यांनीं कामविकारामुळें मनुष्य दुःखाच्या गर्तेत कसा लोटला जातो हें त्यांना पटवून दिलें व कामक्रोधादि षड्रिपु जिंकण्याचा मनुष्यानें प्रयत्न करावा असा उपदेश करून त्या दोघांकडे कृपादृष्टीनें पाहातांच त्यांची शरीरें पूर्ववत् झालीं !

त्यानंतर यतिरायांनीं त्या दोघांना आपल्या देशाकडे निघून जाण्याची आज्ञा केली. त्यांची आज्ञा प्रमाण मानून तीं दोघे श्रींना वंदन करून आपल्या देशाकडे निघून गेलीं.

हिमालयाच्या वास्तव्यांत घडलेला आणखी एक चमत्कार खरोखरच लोकविलक्षण आहे !

एकदां अन्य देशांतील चार शिकारी हरिणांची शिकार करण्यासाठीं हिमालयाच्या घनदाट अरण्यांतून फिरत होते. स्वामीसमर्थांची स्वारी त्यावेळीं तेथीलच एका हिरव्यागार आम्रवृक्षाखालीं निजानंदांत पहुडली होती. व्याधांची चाहुल लागल्यामुळें त्या

अरण्यांतील निष्पाप हरिणांची पांचावर धारण बसली व प्राण रक्षणासाठीं त्यांनीं वायुगतीनें सैरावैरा धांवण्यास सुरुवात केली. एका गरीब, निष्पाप पाडसाला मात्र ही धांवपळ जमण्यासारखी नव्हती. त्यामुळें तें आश्रयासाठीं थेट समर्थांजवळ आलें व त्यांच्या मायेच्या उबदार कुशींत शिरलें. त्या कोंवळ्या, लोभस पाडसाचें कापसासारखें नाजुक शरीर इतका वेळ भीतीनें थरथरत होतें. परंतु श्रीसमर्थांच्या कुशींत शिरतांच जणूं मातेच्या कुशींत शिरल्याप्रमाणें तें निर्धास्त झालें ! त्या गोजिरवाण्या पाडसाच्या लुसलुशीत स्पर्शानें श्रींची समाधि उतरली व त्यांनीं त्या पाडसाच्या रेशमी शरीरावरून वात्सल्यभावानें हळुवारपणें आपला हात फिरविला. त्या पाडसाच्या हिऱ्यांप्रमाणें महातेजस्वी डोळ्यांतून त्यावेळीं जणूं साक्षात् कृतज्ञताच पाझरत होती !

तितक्यांत हातांत बंदुका घेतलेले ते चार उग्र शिकारी तेथें येऊन पोहोंचले. काषायवस्त्रधारी यतिरायांच्याजवळील त्या मोहक हरिण पाडसाकडे पाहून त्या शिकाऱ्यांचे डोळे आनंदानें चमकले व त्यांनीं त्या दोघांना घाबरविण्यासाठीं हवेंत बंदुकींचे बार काढावयास सुरुवात केली.

ठोऽ ठोऽऽ ठोऽऽऽ

बंदुकींतून गोळ्यांचा वर्षाव होत होता. त्या आवाजानें सारें रान शहारलें. झाडें थरारलीं. पक्षी बिथरले. काळ्या तोंडांचीं वानरें तर भयंकर चीत्कार करीत, लांब लांब उड्या मारीत कोठच्या कोठें पळून गेलीं ! कमलपुष्पांत मधुपान करणाऱ्या भ्रमरांनीं पंख मिटून आपलीं शरीरें शक्य तेवढीं फुलांत लपविलीं.

सर्वत्र एकच हाहाःकार उडाला !

परंतु तो भयंकर गोळीबार यतिराजांच्या गांवींहि नव्हता ! त्या निष्पाप पाडसांच्या रेशमी अंगावरून ते प्रेमभरानें आपला

मायेचा हात फिरवीत होते.

आपल्या बंदुकीचा या ‘बुवावर’ कांहींच परिणाम होत नाहीं हें पाहून ते शिकारी चिडले. त्यांच्या पराक्रमाला तें जबरदस्त आव्हान होतें. आजवर आपल्या अचूक गोळीबारानें त्यांनीं वाघ-सिहांसारखे क्रूर पशू लोळविले होते. परंतु आज...एक यःकश्चित हरीणहि त्यांच्या पिसाट गोळीबाराला जरासुद्धां भीत नव्हतें.

आणि ते काषायवस्त्रधारी यतिराज? त्यांच्या प्रसन्न मुद्रेवर परमानंदानें तृप्त झाल्यामुळें अपार शांति विलसत होती! ब्रह्मस्वरूपामधें निश्चळपणें बुडून राहिल्यानें बाह्य जगाचें जणू त्यांना भानच नव्हतें! परंतु त्यांच्या या अवधूत स्वरूपाचें ज्ञान त्या मूढ शिकाऱ्यांना कसें होणार? ते बंदुका सरसावून व भ्रुकुटी वक्र करून त्यांच्याकडे रागानें पाहूं लागले. त्यांनीं अद्वातद्वा बोलून यतिरायांना गालिप्रदान करण्यासहि सुरुवात केली, परंतु तो अखण्ड शांतीचा मेरु जरासुद्धां विचलित झाला नाहीं. यतिरायांनीं त्या संतप्त शिकाऱ्यांकडे फक्त एकवार पाहिलें व जमिनीवरचे दोन खडे उचलून त्यांच्या दिशेनें फेकले. त्याबरोबर ते सर्व शिकारी जागच्या जागीं पुतळ्याप्रमाणें खिळून राहिले. त्यांना आपले हस्तपादादि अवयव जरासुद्धां इकडचे तिकडे हलवितां येईनात!

हा सर्व अभूतपूर्व चमत्कार तेथेंच समोर गुहेंत राहणाऱ्या कांहीं तपस्व्यांनीं व योग्यांनीं पाहिला व विस्मयानें त्यांचे डोळे विस्फारले गेले.

पुढें दोन प्रहरपर्यंत ते शिकारी त्याच स्थितींत होते. नंतर स्वामीमाऊलीलाच त्यांची दया आली आणि त्यांनीं त्या चौघांकडे कृपादृष्टीनें पाहिलें. त्याबरोबर त्यांच्या शरीरांची हालचाल पूर्ववत् सुरू झाली आणि ते भानावर आले.

आणि मग--

पूर्वीचे ते अनेकछंदी । त्यागुनि मोह मद धुंदी ।
मग श्रीगुरुचरणारविंदीं । पश्चात्तापें लोळती ।

त्या निष्पाप हरिणांना इतका वेळ गांजल्याबद्दल त्यांना आतां पश्चात्ताप होऊं लागला व त्यांनीं श्रीस्वामीरायांपुढें लोटांगण घालून त्यांची अपार स्तुति केली. त्यांचेजवळ क्षमेची याचना केली.

त्यावेळीं श्रीसमर्थांनीं त्या चौघांना केलेला उपदेश मनन करण्यासारखा आहे. त्या उपदेशाचा सारांश असा–

**'सर्वांभूतीं अविरोध प्रेम करा. सत्य–स्वधर्म यांचें पालन करा. सर्व प्राणिमात्रांत स्वतःला पहा.'**

श्रीसमर्थ हे 'अवधूत' या उच्चत्तम कोटींतील संन्यासी होते. अह धुऊन टाकतो तो अवधूत. संकल्प विकल्पांना जाळून त्यांची राख अंगाला फांसणारा तो अवधूत. सभोंवतीं पसरलेला सर्व दृश्य प्रपंच आत्मज्ञानानें जो धुऊन टाकतो तो अवधूत! श्रीमद्भागवतांत यदुराजाला भेटलेल्या एका परमहंस अवधूताचें वर्णन करण्यांत आलें आहे. त्यांत ब्रह्मानंदानें डोलणाऱ्या आणि आत्मतेजानें तळपणाऱ्या त्या अवधूताच्या अंगीं 'सर्वांभूतीं समभाव' बाणलेला होता असें वर्णन आहे! संत सत्पुरुषांनीं व श्रीसमर्थांसारख्या महान विभूतींनीं सर्वांना कल्याणकारी असा हा सर्वांभूतीं समभाव ठेवण्याचा उपदेश केलेला आहे. तो अंगीं बाणविण्याचा प्रयत्न होणें चालूं घडीला आवश्यक आहे असें आम्हांस वाटतें. असो.

यतिरायांचा हिमालयांत संचार चालूं असतांना आणखी एक लोकविलक्षण चमत्कार घडला! श्रींचें अवतारकार्य अशा अनंत लीलांनीं नटलेलें आहे.

एक दिवस एका हरिणीचें तान्हुलें त्या महाघोर अरण्यांत

कोठें तरी वाट चुकलें त्याचा शोध घेण्यासाठीं ती हरिणी भांबावलेल्या, भेदरलेल्या नजरेनें त्या अरण्यांतून सैरावैरा पळत होती. अशाप्रकारें आपल्या पोटच्या गोळ्याला शोधण्यासाठीं पळत असतांना तिला ना व्याधांचें भय वाटत होतें ना वाघांचें !

परंतु तिची ही धांवपळ निष्फळ ठरत होती. तिचें बछडें तिला कोठेंच सांपडत नव्हतें. त्याला एव्हांना भूक लागली असेल, वणवण फिरून, पळून त्याचे इवले पाय दुखूं लागले असतील असे विचार मनांत येऊन तिचें कोमल मातृहृदय क्षणाक्षणाला अधिकच व्याकूळ होत होतें. व गडबडून, गोंधळून ती पुन्हां वाट फुटेल तिकडे वेड्यासारखी पळत होती. मधेंच तहानेनें व्याकूळ झाल्यामुळें ती एका शांत जलाशयाजवळ गेली आणि भोंवतालीं व्याध किंवा हिंस्त्र पशु नाहींत याची खात्री करून घेत तिनें पाण्याला तोंड लावलें. तेवढ्यांत तिचा पतीदेखील (नर हरीण) आपल्या पत्नीचा व पुत्राचा शोध करीत तेथें येऊन पोहोंचला.

हरिणीला पाहून त्यानें समाधानाचा निःश्वास टाकला, परंतु तिच्याबरोबर पाडस नाहीं हें पाहून त्याच्या हृदयांत धस्स् झालें !

नंतर तीं दोघे फिरतफिरत श्रीसमर्थ ज्या आम्रवृक्षाखालीं बसले होते तेथें आलीं त्यांना पाहून श्रीसमर्थ हंसून म्हणाले, ‘ **काय रे ब्राह्मणा, आम्हाला ओळखलेंस का ? पूर्वजन्मीं गाणगापुरांत असतांना तूं आमची भक्ति करीत होतास. आमच्याच सेवेनें तूं व्याधिमुक्त झालास, परंतु पुढें सत्पुरुषांचा छळ केल्यामुळें तुला हा मृगजन्म प्राप्त झाला. तथापि पूर्वपुण्याईमुळेंच तुला या जन्मीं आमचें दर्शन झालें...** ’

श्रीसमर्थ एवढें बोलत आहेत तोंच त्या हरिणांचें हरवलेलें पाडस उड्या मारीत मारीत तिथें अकस्मात् येऊन ठेपलें ! तें

पाहून त्या उभयतां हरीणदांपत्याच्या हर्षाला पारावारच राहिला नाहीं ! तेवढ्यांत त्या उभयतांना मनुष्यवाणी प्राप्त झाली आणि त्यांना पूर्वीच्या सात जन्मांचीहि आठवण झाली. गाणगापुरांत पूर्वी प्रकट झालेले योगिराज श्रीनृसिंहसरस्वती ते हेच ही खूण त्यांना पटली आणि तीं दोघे पश्चात्तापयुक्त स्वरांत समर्थांना म्हणालीं,

पुरे झाल्या जन्मखेपा । आतां सोडवा मायबापा ।
दीनबंधो व्हावी कृपा । त्रिविध तापां निरसावें ।

त्यांनीं आपणांस आत्मज्ञान देऊन आपल्या चरणीं कायमचा विसांवा द्यावा अशीहि श्रीसमर्थांजवळ मागणी केली. तेव्हां समर्थांनीं त्यांना आशीर्वाद देऊन म्हटलें, '**कांहीं काळानंतर तुम्ही पुण्यशील ब्राह्मण कुलांत जन्म घ्याल व दक्षिणदेशीं आमच्या भेटीस याल.**'

एवढें सांगून श्रीसमर्थांनीं त्या तिन्ही मृगांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना प्रेमभरानें निरोप दिला.

हा सर्व चमत्कार गुहेंतील ते योगी मघांपासून अतिशय विस्मयानें पहात होते. त्यांना श्रीसमर्थांच्या अधिकाराची खूण पटली. हे कुणी महान् अवतारी पुरुष असले पाहिजेत असें वाटून ते लगबगीनें समर्थांजवळ आले आणि त्यांनीं मोठ्या भक्तिभावानें वंदन करून त्यांना आपल्या गुहेंत चलण्याची विनंति केली. समर्थांनीं तेथेंच पलीकडे झुळूझुळू वाहणाऱ्या जलाशयाजवळ जाऊन स्नान व संध्यावंदन केलें व ते त्या तपस्व्यांसह गुहेंत आले. त्या ठिकाणीं त्या योग्यांनीं त्यांची भक्तिभावानें पूजा केली व सुमधुर कंदमुळें व ताजीं रसरशीत फळें त्यांना अर्पण केलीं. नंतर स्वामीसमर्थांकडून त्या योग्यांनीं योग मार्गातील शंकांचें निवारण

करून घेतलें. समर्थांनीं त्यांना वेदप्रणित महावाक्याचा बोध करून योगमार्गातील शेवटची पायरी जी समाधि, तेथवर त्यांची प्रगति करून दिली.

–आणि सर्व योगी समाधिसुखांत निमग्न झाले. नंतर बऱ्याच वेळानें समर्थांनीं तेथील वाघांना त्या योग्यांचीं मस्तकें हुंगण्यास सांगितलें. वाघांनीं तसें करतांच सर्व तपस्वी देहशुद्धीवर आले. नंतर त्यांनीं श्री समर्थांना यथासांग स्नान घालून त्यांच्या कपाळीं कस्तुरीचा टिळा लावला व गळ्यांत पुष्पहार घालून त्यांचें यथा-विधि पूजन केलें.

## संन्याशास दत्तदर्शन

याच हिमालयाच्या पायथ्याशीं एक संन्यासी रहात होता. त्यानें मौन धारण करून दत्तदर्शनासाठीं छत्तीस वर्षें उग्र तपश्चर्या केली, परंतु त्यास दत्तदर्शन झालें नाहीं. त्यामुळें तो व्यथित झाला. परंतु त्याच रात्रीं श्रीदत्तात्रेयांनीं त्याला स्वप्नांत दृष्टांत देऊन, आम्रवृक्षासमोरील गुहेंतील योग्यास भेटण्याची आज्ञा केली. तेव्हां तो योगी झोंपेंतून खडबडून जागा होऊन धांवतच मोठ्या आनंदानें त्या गुहेपाशीं आला. परंतु तेथें एक महाभयंकर असा वाघ उभा होता. त्याला पाहून तो संन्यासी विलक्षण घाबरून गेला. परंतु त्याचवेळीं श्रीसमर्थांनीं गुहेबाहेर येऊन त्यास अभय दिलें व श्रीदत्तात्रेयांच्या स्वरूपांत दर्शन देऊन त्याची मनोकामना पूर्ण केली. त्याचप्रमाणें दोन वाघांनाहि मुक्ति दिली.

नंतर सर्वत्रांस आशीर्वाद देऊन श्रीसमर्थ अंतर्धान पावले.

## जगन्नाथपुरीचा वृत्तान्त

हिमालयांतील संचार संपवून श्रीसमर्थ कांहीं दिवसांनीं जगन्नाथपुरीस प्रकट झाले.

जगन्नाथपुरीस अलवणीबुवा नांवाचे एक ब्रह्मचारी आपल्या बरोबर तिघांना घेऊन श्रीजगन्नाथाच्या दर्शनास आले होते. परंतु जगन्नाथपुरीस येतांच हे चौघेहि तापानें आजारी पडले. त्यांचा ताप इतका वाढला, कीं त्यांना अन्न-पाणी मिळविण्यासाठीं उठून चार पावलें बाहेर जाणेंहि अशक्य होऊन बसलें. बरें, यात्रेला आलेल्या असंख्य यात्रेकरूंपैकीं तरी कुणीं त्यांची चौकशी करावी? परंतु छे! तेवढा वेळच कुणाला नव्हता. जो तो हे चालते बोलते देव सोडून जगन्नाथाच्या पाषाणमूर्तीची पूजा करण्यांत गढून गेला होता! भूतमात्राच्या हृदयमंदिरांतला ईश्वर कुणाला दिसत नव्हता. 'जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत' अशा मनोवृत्तीची बैठक तयार होणें फार अवघड आहे.

सामान्य जनांचें सोडाच, परंतु स्वतःला साधु म्हणवून घेणाऱ्या कांहीं जणांतहि मनाची ही उच्च भूमिका आढळत नाहीं. अशा (संधि) साधूंना उद्देशून श्रीतुकोबा म्हणतात–

**टिळा टोपी घालुनि माळा। म्हणती आम्ही साधु ॥ दयाधर्म चित्तीं नाहीं। ते जाणावें भोंदू ॥ कलियुगीं घरोघरीं। संत झाले फार। वितिभरी पोटासाठीं। हिंडती दारोदार ॥** असो.

सांगायचें तात्पर्य, अलवणीबुवा आणि त्यांचे सोबती अन्न-पाण्यावांचून तळमळत होते. त्यांतहि समाधानाची गोष्ट इतकीच कीं, मरण आलेंच तर तें जगन्नाथाच्या दारांत येईल! नाहींतर कांहींजण शौचकूपांत मरतात. कांहीं कुत्र्या-मांजरांप्रमाणें रस्त्यांत हात-पाय तुटून मरतात! माणसाच्या मृत्यूवरून तो जगला कसा

लें समजतें !

अलवणीबुवांना देहासक्ती नव्हती. हा पांचभौतिक नश्वर देह, हा हाडामांसाचा गलिच्छ ‘पिंजरा’ केव्हांतरी सोडायचाच आहे, परंतु तो ‘शेवटचा दिस’ भगवंताच्या सान्निध्यांत गोड व्हावा अशी त्यांची इच्छा होती.

आणि म्हणूनच अलवणीबुवा भगवंताच्या नामस्मरणांत रंगून गेले होते. जीव भुकेमुळें कासावीस होत होता. पाण्याच्या अभावीं घशाला कोरड पडली होती. परंतु बुवांना या गोष्टींचें आतां स्मरण नव्हतें. त्यांचें नामामृताचें पान अखंड सुरू होतें.

इतक्यांत लख्कन वीज चमकल्याचा बुवांना भास झाला आणि त्या तेजस्वी प्रकाशलोळांतून श्रीसमर्थांची दिव्य मूर्ति प्रकट झाली ! त्यांच्या भस्मांकित भव्य भालप्रदेशाभोंवतीं कोटीसूर्याचें तेज विलसत होतें. श्रींच्या अमृतदृष्टींतून जणूं प्रेमाचा अखंड वर्षाव होत होता. श्रींनीं आपले दोन्ही हात कटीवर ठेवले होते. त्यांच्या हिऱ्यांप्रमाणें तेजस्वी नेत्रांत फुलांची प्रसन्नता, तर दृष्टींत चांदण्याची शीतलता जाणवत होती.

त्या अजानुबाहू, दिव्य मूर्तीनें केवळ अमृतदृष्टीनें त्यांच्याकडे पाहतांच त्या चौघांच्याहि निस्त्राण शरीरांत एकाएकीं विलक्षण चैतन्य संचारलें आणि ते ताडकन् उठून बसले व त्यांनीं त्या दिव्य मूर्तीला विनम्रभावानें वंदन केलें. नंतर गीर्वाण भाषेंत श्रीगुरूंची स्तुति करून त्यांनीं म्हटलें, ‘महाराज ! आपलें महान् पुण्यवंतांनाहि दुर्लभ असें दर्शन होतांच आम्ही क्षणांत निरोगी झालों. असा चमत्कार यापूर्वीं कधी घडल्याचें ऐकिवांत नाहीं. तरी महाराज ! आपण कोण, कोठून आलांत, आपलें स्थान कोणतें हें कृपा करून सांगावें.’

त्यावर परमहंस दत्तावधूत स्वामीसमर्थ प्रसन्न हास्य करीत

म्हणाले, ' अरे आमचा वास अखंड विश्वांत आहे. तथापि सह्याद्रि, गिरनार, काशीक्षेत्र, मातापूर, करवीर, पांचालेश्वर, औदुंबर, करंजनगर, नृसिंहवाडी, गाणगापूर हीं आमचीं विशेष प्रीतीचीं स्थानें होत.'

' वृद्ध नृसिंहसरस्वतींच्या ' मुखांतून बाहेर पडलेली ती अमृतवाणी ऐकून अलवणीबुवांसकट सर्वांनीं श्रींची अपार स्तुति केली.

तोंच आणखी एक चमत्कार घडला !

तेथेंच शेजारीं एक लहानसें टुमदार घर होतें. तेथून नानाप्रकारच्या पक्वान्नांचा खमंग वास येत होता. त्या घरांत चार रंगीत पाट मांडलेले होते. त्यांपुढें चांदीचीं ताटें ठेवलेलीं होतीं. पानांभोंवतीं रंगीबेरंगी, चित्ताकर्षक रांगोळी काढलेली होती. चांदीच्या चमकदार ताटांत चटण्या, कोशिंबिरी, भाज्या, पंचामृत, लोणचीं, पापड, कुडर्या यांची कलापूर्ण मांडणी केलेली होती. उदबत्त्यांचा व अत्तरांचा मंद सुगंध वातावरणांत प्रसन्नता निर्माण करीत होता. शेजारींच पिण्यासाठीं सुवासिक थंडगार जल चांदीच्या नक्षीदार फुलपात्रांत ठेवलेलें होतें. पानासमोर दक्षिणा व त्रयोदशगुणी तांबुल ठेवलेला होता. त्याचप्रमाणें वारा घालण्यासाठीं वाळयाचे थंडगार पंखे घेतलेले चार सेवक नम्रपणें उभे होते.

श्रीसमर्थांनीं त्या चौघांना त्या घरीं भोजनास जाण्यास सांगितलें. त्या चौघांच्या पोटांत भुकेनें कावळे ओरडत होते व पक्वान्नांचा खमंग वास भूक वाढवीत होता. अशावेळीं श्रींनीं भोजनाचें आमंत्रण देतांच ते चौघेहि लगबगीनें पळतच तिकडे गेले व त्यांनीं आकंठ भोजन करून तृप्तीची ढेकर दिली.

हा सर्व प्रकार जगन्नाथाच्या यात्रेला आलेले यात्रेकरू मघांपासून मोठ्या कौतुकानें पाहात होते. स्वामीरायांची ती अगाध लीला पाहून हे कोणी महान् अवतारी पुरुष असले पाहिजेत अशी

खात्री होऊन त्या सर्वांनीं श्रींच्या पायावर डोकें ठेवण्यासाठीं एकच गर्दी केली. साक्षात् जगन्नाथच त्या ठिकाणीं प्रकट झाल्यासारखें आज सर्वांना वाटत होतें. यात्रेकरूंनीं श्रींच्या गळ्यांत अनेक पुष्पहार घातले. त्यांना पंचारती ओवाळली. केशर-कस्तुरीचें गंध भालीं लावलें. तो अनुपम सोहळा ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिला ते भाग्यवान् होत !

## जन्मांधाला दृष्टिदान !

श्रीसमर्थांच्या अगाध लीलेची हकीकत थोड्याच वेळांत साऱ्या जगन्नाथपुरींत पसरली. आणि आधिव्याधीनें पीडलेले अनेक लोक श्रींच्या परमसुखद दर्शनासाठीं तेथें जमा झाले.

त्यांतच एक जन्मांध ब्राह्मण होता. स्वामीरायांची अपार स्तुति करीत तो हात जोडून म्हणाला, ' महाराज, आपल्या रूपानें आज साक्षात् जगदीश्वरच जगन्नाथपुरींत प्रकट झाला. माझ्या गरीबाची आतां फक्त एकच इच्छा आहे, व ती म्हणजे आपलें दर्शन व्हावें ! '

त्या गरीब, जन्मांध ब्राह्मणाचें तें नम्र भाषण ऐकून स्वामी माऊलींचें हृदय कळवळलें. त्यांनीं स्वतःच्या कंठांतील पुष्पहार काढून त्याच्या अंगावर फेकला. तेथील पंडितांनीं तो ' महाप्रसाद ' समजून त्या अंध ब्राह्मणाच्या डोळ्यांवरून फिरविला. त्याबरोबर त्या ब्राह्मणाला दृष्टिलाभ झाला व त्यानें श्रींच्या सच्चिदानंद स्वरूपाचें डोळे भरून दर्शन घेतलें. त्यावेळीं श्रींची अगाध लीला आठवून त्याच्या नेत्रांतून घळघळा अश्रु वाहूं लागले. त्यानें गीर्वाण भाषेंत श्रींच्या स्तुतिपर अनेक स्तोत्रें म्हटलीं.

## पूर्वजन्माची ओळख

तेवढ्यांत ऐंशी वर्षांचा एक शूद्र घाबऱ्याघुबऱ्या तेथें आला व श्रींना वंदन करून म्हणाला, ‘महाराज, आठ दिवसांपूर्वी माझी पत्नी या यात्रेंत कोठेंतरी चुकली. त्यामुळें संसारसुखाला मुकण्याचीच माझ्यावर आतां पाळी आलेली आहे.’

त्यावर श्रीसमर्थ आपल्या तीक्ष्ण नजरेनें त्याच्याकडे पहात म्हणाले, ‘**अरे थेरड्या, मरणाच्या दारांत येऊन ठेपलास तरी अद्याप तुझी कामवासना व संसाराबद्दलची आसक्ति कमी होत नाहीं? अरे मूढा, आतां यापुढें तूं मनोजय करून वासनारहित होणार केव्हां?**’

त्यानंतर श्रींनीं त्यास त्याच्या पूर्वजन्मींची स्मृत देत म्हटलें, ‘अरे, **पूर्वजन्मीं तूं तेली असून आमचाच भक्त होतास. परंतु विषयभ्रांतीमुळें आमची ओळखहि विसरलास !**’

इतकें सांगून श्रीसमर्थांनीं आपल्या सेवकांकडून त्याच्या कपाळीं भस्म लावलें. त्याबरोबर त्या शूद्रास पूर्वजन्मींची स्मृति झाली व तो गुरुमाऊलींच्या चरणीं दृढ मिठी घालून म्हणाला, ‘गुरुदेव ! मी पूर्वजन्मीं अप्पा तेली या नांवाचा तुमचा भक्त होतों. परंतु संसाराच्या मायाजाळांत गुंतल्यामुळें तुमची आठवणदेखील विसरलों. गुरुमहाराज ! श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराज ! आतां मात्र माझा अव्हेर न करतां आपला पवित्र चरणीं मला कायमचा आश्रय देऊन या त्रिविध तापांतून माझी मुक्तता करा.’

तो वृद्ध एवढें बोलतो आहे तोंच त्याची हरवलेली वृद्ध पत्नी अचानक् तेथें येऊन पोहोंचली. तिनें आपल्या तान्हुल्यांना उचलून पोटाशीं धरलें व त्यांचे पटापट मुके घेतले. त्यावेळीं त्या शूद्रानें तिला श्रींच्या पायांवर डोकें ठेवून त्यांना शरण जाण्यास

सांगितलें. त्याप्रमाणें तिनें अत्यंत विनम्रभावानें श्रींच्या पायांवर लोटांगण घातलें. त्यावेळीं श्रींनीं त्या उभयतांना अनेक शुभाशीर्वाद दिले व यतिरायांची स्वारी तेथून अंतर्धान पावली.

ही सर्व हकीकत पुढें स्वतः अलवणीबुवांनींच ब्रह्मनिष्ठ वामनबुवांना सांगितली व त्यांनीं आपल्या 'श्रीगुरुलीलामृत' या अप्रतिम ग्रंथांत तिचा उल्लेख करून ठेवलेला आहे. ( अ.६ )

अलवणीबुवा त्यानंतर बडोद्यास गेले. 'तेथें बालोन्मत्तपिशाचवत्' वृत्तीनें राहूनहि अनेक लोककल्याणाचीं कामें त्यांनीं केलीं. ते कधींहि मीठ ( लवण ) खात नसत व त्यावरूनच अ–लवणी असें त्यांचें उपनांव रूढ झालें. श्रीगुरुलीलामृतकारांनीं स्वामीसमर्थ जगन्नाथपुरीस असतांना त्यांचा उल्लेख 'वृद्ध नृसिंहसरस्वती' असाच केलेला आहे. ज्यांना श्रीसमर्थांचें निकट सान्निध्य लाभलें त्या वामनबुवांनीं समर्थांचा उल्लेख 'वृद्ध–नृसिंहसरस्वती' असा करावा याला मोठा सूचक अर्थ आहे! स्वामीसमर्थ म्हणजेच नृसिंहसरस्वती ही गोष्ट त्यांनाहि मान्य असावी असें त्यावरून दिसतें व त्या दृष्टीनें हा उल्लेख महत्त्वाचा ठरतो!

## हरिद्वार येथील वास्तव्य

वृद्ध नृसिंहसरस्वती म्हणजेच श्रीस्वामी समर्थ हरिद्वार येथें असतांना एक मोठीच नवलपूर्ण घटना घडून आली. हरिद्वार येथें ब्राह्मण जातीचे दोन मल्ल होते. ते दोघेहि मल्लविद्येत पटाईत असून शरीरानें आडदांड होते. परंतु त्यांचा स्वभाव अहंकारी असून आपल्या प्रचंड ताकदीचा त्यांना विलक्षण गर्व होता. पुढें पुढें तर त्यांनीं उन्मत्त होऊन वर्णाश्रमधर्माचाहि त्याग केला. एवढेंच नव्हे तर गांवांतील लोकांवर नानातऱ्हेचे अत्याचार सुरू केले! परस्त्री आणि परधन यांची तर त्यांनी मुक्तपणें

लूदच आरंभिली. मनुष्याला एखादी गोष्ट जास्त प्रमाणांत मिळाली कीं, त्याच्या मनांत गर्वानें घर केलेंच म्हणून समजावें. याला फक्त संत सज्जन हेच अपवाद. त्यांची वागणूक नेमकी याउलट असते. कविश्रेष्ठ वामन पंडित म्हणतात–

**वृक्ष फार लवती फलभारें**
**लोंबती जलद घेउनी नीरें**
**थोर गर्व न धरी विभवाचा**
**हा स्वभाव उपकार–पराचा ॥**

अहंकाराचा वारा लागूं नये म्हणून संत सत्पुरुष नेहमींच जागरूक असतात. कारण जिथें अहंकार तिथें पतन.

या दुष्ट मल्लांच्या पतनाची वेळहि जवळ येऊन ठेपली. त्यांच्या पापांचा घडा कांठोकांठ भरला. आणि मग त्यांच्या कुकर्मांचीं फळें भोगण्याची वेळ त्यांच्यावर आली. लवकरच त्यांचें सर्व शरीर महारोगानें सडून गेलें आणि मग इतके दिवस त्यांना पाहून थरथरणारे लोक आतां बेदिक्कत त्यांचा अपमान करूं लागले. पिंजऱ्यांतल्या सिंहाला लहान पोरांनीं दगड मारावेत तसा हा प्रकार होता. पोटासाठीं त्या दोघांवर झोळी घेऊन दारों-दार फिरण्याचा प्रसंग आला. परंतु त्यांनीं पूर्वीं केलेळा छळ आठवून त्यांना कुणी चार दाणेदेखील भिक्षा घालीना.

गर्वें करावें कर्म हांसत ।
तेंचि परिणामीं भोगावें रडत ।
द्यावें तैसें घ्यावें हा सिद्धान्त ।
लोकानुभविक सत्य असे ॥

त्यांची परिस्थिति अशा प्रकारें मोठी चमत्कारिक झाली. पूर्वींचे दिवस आठवून त्यांच्या डोळयांतून घळघळां अश्रूंचे पूर

वाहूं लागले. कुकर्मांचीं फळें भोगतांनाच मनुष्याला आपलीं कुकर्में आठवतात आणि मग पश्चात्ताप होतो. त्याचप्रमाणें त्या दोघां मल्लांना आपल्या पूर्वायुष्यांतील कुकर्मांचा पश्चात्ताप होऊं लागला. दिवसभर देवाचा धांवा करून त्याची क्षमा मागावी, त्याचें भजन पूजन करून वारंवार पश्चात्तापाचे अश्रु गाळावेत असा त्यांचा क्रम सुरू झाला.

त्यांचा धांवा ऐकूनच कीं काय, 'वृद्ध नृसिंहसरस्वती' एकाएकीं भोजनाच्या पंक्तींतून उठले व मनोवेगानें त्या मल्लांजवळ येऊन उभे राहिले. त्यांना पाहून त्या मल्लांनीं त्यांना भक्तिभावानें प्रणाम केला. त्यांची ती भयानक व्याधि पाहून श्रीसमर्थांनाहि कळवळून आलें. त्यांनीं त्यांच्याकडे कृपादृष्टीनें पाहून त्यांच्या व्याधिग्रस्त शरीरांना स्पर्श केला.

त्याबरोबर आश्चर्य असें कीं, त्यांची व्याधि दूर होऊन त्यांचीं शरीरें सुवर्णासारखीं दिव्य बनलीं!

तो चमत्कार पाहून ते दोघेहि आश्चर्यातिरेकानें खडबडून उठले आणि त्यांनीं दयाघन श्रीसमर्थांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांवर आनंदाश्रूंचा अभिषेक केला!

श्रीसमर्थ भोजनाच्या पंक्तींतून उठून आले होते. त्यांचा शोध करीत पंक्तींतील मंडळी त्याचवेळीं तेथें येऊन ठेपली. त्या मल्लांची हकीकत त्यावेळीं त्यांना समजली व त्यांचीं नवीं दिव्य शरीरें पाहून श्रीसमर्थांच्या अगम्य लीलेचें त्यांना विलक्षण आश्चर्य वाटलें व त्यांनीं श्रीसमर्थांची नानाप्रकारें स्तुति केली.

तेवढ्यांत त्या दोघां मल्लांपैकीं एकानें श्रीसमर्थांना, 'आपण कोण, कुठले' वगैरे हकीकत विचारावयास सुरुवात केली. त्यावर श्रीसमर्थ म्हणाले, '**थांब. तुला अगोदर तुझा वृत्तान्त सांगतों. मग मी कोण तें पाहूं.**'

असें म्हणून श्रीसमर्थांनीं त्याच्या पूर्वजन्मांतील व चालू जन्मांतील अनेक पापांची यादीच त्याला भराभर वाचून दाखविली आणि ते म्हणाले, ' **मूढ पापी माणसा, तुझें हें पापकर्म काल रात्रीपर्यंत चालू होतें. कालच रात्रीं तूं एका गाईचा वध केलास. बोल ! खरें कीं खोटें ?**'

हें ऐकून तर त्या दुष्ट मल्लाची बोबडीच वळली. तो लटलटा कांपूं लागला. त्यानें अंतर्साक्षी स्वामीसमर्थांची वारंवार क्षमा मागितली. नंतर समर्थ सर्वांना घेऊन त्या मृत गाईच्या कलेवराजवळ आले.

त्यावेळीं श्रीसमर्थांनीं त्या पश्चात्तापानें शुद्ध झालेल्या कुटिल ब्राह्मणाला ती गाय उठविण्याची आज्ञा केली. त्यानें समर्थ चरणांचें तीर्थ घेऊन तें त्या मृत गाईवर शिंपडलें. त्याबरोबर ती गाय थरथरून उठून उभी राहिली.

तो अपूर्व चमत्कार पाहून तेथें जमलेल्या सर्व ब्राह्मणांनीं उच्चस्वरांत श्रीसमर्थ नांवाचा जयघोष केला व मंत्रपुष्पांजलि आणि वेद–घोष करून श्रीसमर्थांना भक्तिभावानें साष्टांग नमन केलें. अशाप्रकारें हरिद्वारीं साक्षात् हरीच प्रगट झाला असें सर्वांना वाटलें.

त्यानंतर पूर्वी कबूल केल्याप्रमाणें श्रीसमर्थ स्वतःबद्दलची माहिती सांगूं लागले. ते म्हणाले,' **आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण, आमचें नांव नृसिंहभान. मूलपुरुष वटवृक्ष. दत्तनगर.**'

तें ऐकून एका ब्राह्मणानें मोठ्या आदरानें श्रीसमर्थांना वेदमंत्र म्हणण्याची विनंति केली. तेव्हां समर्थांनीं अस्खलित वाणीनें चतुर्वेद म्हणावयास सुरुवात केली. तेव्हा सर्वांच्या मनांतील शंका दूर होऊन त्यांच्या मनांत समर्थांच्या विषयीं नितांत आदराची भावना निर्माण झाली.

## राजूर गांवीं मठस्थापना

श्रींचा संचार त्यानंतर देवलग्राम या ठिकाणीं सुरू झाला. तेथील मुक्कामांतील विशेष घटनांची नोंद फारशी कुठें आढळत नाहीं. त्याठिकाणीं श्रींनीं आपल्या पादुकांची स्थापना केली. एवढी एकच घटना नमूद करण्यासारखी आहे. **या पादुकांच्या दर्शनानें ब्रह्महत्त्यादि पातकें नाहींशीं होतात असा या पादुकांचा अपार महिमा आहे.**

देवलग्राम येथून निघून श्रीसमर्थ मोंगलाईत आले. तेथें **राजूर** गांवीं त्यांनीं मठाची स्थापना केली. या मठाच्या दैनंदिन खर्चासाठीं त्यांनीं सरकारकडून आठ गांवची जहागिरीहि मिळविली. हा मठ आपल्या शिष्यवर्गाकडे सोपवून श्रीसमर्थ पुढे निघाले. त्यावेळीं ते '**चंचल भारती**' या नांवानें प्रसिद्ध होते.

पुढें श्रींची स्वारी रामेश्वर, उडुपी, पंढरपूर इत्यादि तीर्थस्थळीं गेल्याची नोंद सांपडते. त्यानंतर संचार करीत करीत ते '**मंगळवेढें**' या ठिकाणीं प्रकट झाले.

---

४१७५१
११४१६८
चारित्र
23/3/68

प्रकरण ४ थें

# मंगळवेढ्याच्या पुण्यभूमींत

इ. स. १९३८ चें सुमारास स्वामी समर्थांची स्वारी मंगळवेढ्यास दामाजीपंतांच्या समाधीजवळ प्रकट झाली. मंगळवेढ्यास त्यांचें वास्तव्य सुमारें बारा वर्षे झालें.

मंगळवेढें ही संतांची भूमि ! दामाजीपंत, कान्होपात्रा, चोखामेळा, गोविंदबाबा, मुनिबाबा, बाळकृष्णबाबा अशा संतरत्नांनीं येथें वास्तव्य करून लोकमानसांत भक्तिमार्गाची आवड उत्पन्न केली. अशा या पुण्यभूला समर्थचरणांचा परिसस्पर्श लाभला आणि ती भूमि पुन्हा एकदां नवचैतन्यानें उजळून निघाली.

मंगळवेढ्यास स्वामी समर्थांनीं आपला निवास जवळच्याच घनदाट अरण्यांत सुरू केला. त्यामुळें मंगळवेढ्यांत ते फारसे प्रसिद्धीस आलेच नाहींत. मंगळवेढ्यांतील बाळकृष्णबाबा या सत्पुरुषानें मात्र त्यांची योग्यता ओळखली होती. सत्पुरुषच सत्पुरुषांना ओळखूं शकतात ! समर्थ हे साक्षात् दत्तावतार आहेत अशा भावनेनेंच बाळकृष्णबुवा समर्थांकडे पहात. अर्थात् स्वामी समर्थ मंगळवेढ्यास असतांना 'स्वामी समर्थ' या नांवाऐवजीं '**दिगंबरबुवा**' या नांवानेंच ओळखले जात. समर्थांना विष्णूप्रमाणेंच अनेक नांवें होतीं. एकच विष्णु परंतु त्यांस सहस्रनांवें ! वास्तविक परमेश्वर निर्गुण आणि निराकार ! त्याला नांव-रूप कांहींहि नाहीं ! परंतु भारतीय संस्कृति सगुणाकडून निर्गुणाकडे

जायला शिकविते. आधीं सगुण, साकार परमेश्वराची मूर्ति हृदयांत स्थापन करून तिची आराधना करा. नंतर निर्गुण निराकाराची उपासना. आधीं सोपें मग अवघड !

श्रीस्वामी समर्थ कुठें '**चंचल भारती**' तर कुठें '**चैतन्य नृसिंहसरस्वती**' तर कुठें '**दिगंबरबुवा**' नृसिंहभान अशा वेगवेगळ्या नांवांनीं प्रसिद्ध होते. पुढें अक्कलकोटास आल्यावर ते '**अक्कलकोटचे स्वामी**' या नांवानें ओळखले जाऊं लागले. खरें सांगायचें तर त्यांना ना नांव ना गांव ! त्यांचा जन्म कुठें झाला, त्यांचीं मातापितरें कोण, कशाचाच थांगपत्ता नाहीं. अवतारी पुरुष आपला पूर्ववृत्तान्त नांव गांव सहसा प्रकट करीत नाहींत. शिर्डीच्या साईबाबांनीं देखील या गोष्टी कुणाला सांगितल्या नाहींत. मग शेवटीं त्यांचे भक्तच कांहींतरी नांव ठेवून सर्वांची सोय करतात !

श्रीस्वामी समर्थांजवळ एका पांचभौतिक देहाशिवाय दृश्य अशी दुसरी कोणतीच वस्तु नव्हती. वस्त्रांची देखील त्यांना कधीं जरुरी भासली नाहीं. मंगळवेढ्यास त्यांना अशा दिगंबर अवस्थेंत पाहूनच मंगळवेढेकरांनीं त्यांना नांव दिलें— 'दिगंबरबुवा' !

हे दिगंबरबुवा (स्वामीसमर्थ) मोठे लहरी होते. ते महिन्यांतून एखाद्या दिवशींच गांवांत येत व तेथें आल्यावर ते रस्त्यावरच्या धुळींतच वेड्यासारखे बसून रहात. कुणी कांहीं दिलें तर खात. पुन्हां लहर आली कीं गांवांतून थेट जंगलांत निघून जात ! त्यांची ही बालोन्मत्तपिशाचवत् वृत्ती पाहून गांवांतील लोक त्यांच्याकडे 'आहे कुणीतरी वेडा' अशा उपेक्षावृत्तीनेंच पहात असल्यास नवल नाहीं !

बाळकृष्णबुवा मात्र या दिगंबरबुवांच्या दर्शनाची संधि केव्हांहि वाया घालवीत नसत. ते दर्शनाला आले कीं दिगंबरबुवा

दोन्ही कर कटीवर ठेवून त्यांच्यासमोर पांडुरंगासारखे उभे रहात. त्यांच्या दर्शनानें बाळकृष्णबुवांचे अष्ट–सात्त्विकभाव उचंबळून येत.

श्रीबाळकृष्णबुवा हे देखील अध्यात्म मार्गातील फार मोठे अधिकारी पुरुष होते. त्यांनीं केलेले कांहीं चमत्कार आजहि मंगळवेढ्यांतील लोक मोठ्या कौतुकानें तुम्हांला सांगतील !

एकदां मंगळवेढ्यांतील गोरबाव विहिरीचें पाणी साफ आटून गेलें. मंगळवेढ्यांतील एक चतुर्थांश लोक रोज याच विहिरीचें थण्डगार, मधुर पाणी पिण्यासाठीं घेऊन जात. परंतु एका वर्षी ही विहिर अगदीं कोरडी ठणठणीत पडली. त्यामुळें पाण्यावांचून लोकांचे हाल होऊं लागले. ते हाल बाळकृष्णबुवांना पहावेनात. ते विहिरींत उतरले नि अहोरात्र तीन दिवस विहिरींतच बसून राहिले. चौथ्या दिवशीं विहीर पाण्यानें भरूं लागली !

या बाळकृष्णबुवांचें चरित्र कुणीं लिहून ठेवलें नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट होय. तसा प्रयत्न कुणी केला असता तर या साक्षात्कारी महापुरुषाचे जीवनपैलू अधिक स्पष्ट होऊन इतरांना मार्गदर्शक ठरले असते ! अस्तु.

## मंगळवेढ्यांतील लीला !

श्रीस्वामीसमर्थांच्या कितीतरी लीलांचें श्रीनृसिंहसरस्वतींच्या लीलांशीं विलक्षण साम्य आहे. या दृष्टीनेंहि श्रीनृसिंहसरस्वती व स्वामीसमर्थ हे दोन नव्हेत ही गोष्ट भाविक मनाला सहज पटूं शकेल !

श्रीगुरुचरित्राच्या बाविसाव्या अध्यायांत नृसिंहसरस्वतींनीं केलेला ‘ वंध्यामहिषी दोहना ’ चा चमत्कार प्रसिद्ध आहे. हुबेहूब असाच एक चमत्कार स्वामीसमर्थांच्या मंगळवेढ्याच्या वास्तव्यांत घडला !

स्वामीसमर्थांची स्वारी दामाजीपंताच्या समाधीजवळ निजानंदांत निमग्न असतां कृष्णंभट कापशीकर नांवाच्या एका ब्राह्मणाला त्यांचेविषयीं जिज्ञासा उत्पन्न झाली. त्यांची आजानु-बाहु, तेजःपुंज मूर्ति पाहून हे कुणीतरी महात्मे असावेत असें वाटून कृष्णंभटानें त्यांची विचारपूस सुरूं केली आणि मग संध्याकाळ झाल्यामुळें विश्रांतीसाठीं आपल्याच घरीं येण्याची त्यांना सविनय प्रार्थनाहि केली.

कृष्णंभटाचें निर्व्याज प्रेम आणि शब्दाशब्दांतून प्रकट होणारा आदरभाव पाहून समर्थांनीं त्याचें आमंत्रण लागलीच स्वीकारलें व ते अगदीं माहितगाराप्रमाणें नेमके त्याच्या घरा-समोर येऊन उभे राहिले !

कृष्णंभटाच्या आनंदाला पारावारच राहिला नाहीं ! त्यानें लगबगीनें घरांत जाऊन समर्थांसाठीं उत्तम आसन तयार केलें व कांहीं फलाहार घेऊन येण्याची बायकोला आज्ञा केली. परंतु कृष्णंभटाच्या घरची परिस्थिति थेट सुदाम्यासारखी होती ! बिचाऱ्याच्या घरीं समर्थांना देण्याजोगा एकहि खाद्यपदार्थ शिल्लक नव्हता. कृष्णंभटाच्या बायकोनें म्हणजे गीताबाईनें ही अडचण बारीक आवाजांत आपल्या पतीच्या कानांवर घातली.

त्यांची ही परिस्थिति ओळखून श्रीसमर्थ अंगणांत बांधलेल्या पांढऱ्या शुभ्र गाईकडे पाहून म्हणाले, '**मला दुधाची दशमी दिलीत तरी पुरे. दुसरें कांहीं नको.**'

त्यावर गीताबाई म्हणाली, 'मग थोडें थांबा. मी ही अशीच गौळीवाड्यांत जाऊन दूध घेऊन येत्यें.'

तें ऐकून समर्थ आश्चर्यानें म्हणाले, '**अरे, तुमच्या घरांत गाय असतांना तुम्ही दुधासाठीं बाहेर जातां याला काय म्हणावें ?**

कडेवर मूल असतां तें हरवलें म्हणून गांवभर शोधण्यासारखाच हा प्रकार आहे !'

त्यावर गीताबाई नम्रपणें हात जोडून समर्थांना म्हणाली, 'महाराज, घरांत गाय आहे खरी, परंतु गेल्या चार वर्षांपासून ती दुधाचा एक थेंबहि देत नाहीं.'

तें ऐकून समर्थ उठले आणि तडक त्या गाईजवळ गेले व तिच्या अंगावरून वत्सलतेनें हात फिरवीत म्हणाले,

'म्हणती माते गायत्री । ब्राह्मण असे बहु दरिद्री । कुटुंब-वत्सल सदाचारी । दुग्ध तयासी द्यावें कीं ॥'

एवढें म्हणून श्रीसमर्थांनीं त्या ब्राह्मणास दूध काढण्याची आज्ञा केली. ते म्हणाले, 'हिचें दूध काढ व चांगलीशी दशमी तयार कर. ती खाण्यासाठीं आम्ही आजच रात्रीं येऊ.'

इतकें सांगून समर्थ दुसऱ्याच क्षणीं झपाझप पावलें टाकीत तेथून निघून गेले.

इकडे त्या ब्राह्मणानें समर्थांच्या शब्दांवर पूर्ण विश्वास ठेवून गोमातेला एकवार भक्तिभावानें वन्दन केलें व दुधाची चरवी लावून तो तिचे दोहन करूं लागला. त्याबरोबर त्या भाकड गाईलाहि पान्हा फुटून तिच्या सडांतून पांढऱ्याशुभ्र क्षीरधारा वाहूं लागल्या !

हा चमत्कार आसपासच्या लोकांना समजावयास किती उशीर ! दूध पिळतांना होणारा 'चुर्रऽचुर्रऽ' असा आवाज ऐकूनच प्रत्येकाचे कान कृष्णंभटाच्या घराकडे लागले. जो तो डोळे फाडून तें अभूतपूर्व दृश्य आश्चर्यानें पाहूं लागला !

मग गीताबाईनें श्रीसमर्थांसाठीं उत्तम प्रकारची दशमी तयार केली व तें दांपत्य समर्थांची वाट पहात दारांतच बसून राहिले.

आले ! समर्थ आले !! दोघांनींहि पळतच पुढें जाऊन

श्रीसमर्थांच्या पायांवर लोटांगण घातलें आणि मग मोठ्या भक्तिभावानें त्यांची पूजा करून त्यांना दशमीचा नैवेद्य अर्पण केला.

श्रीसमर्थांनीं तो नैवेद्य मोठ्या आनंदानें ग्रहण करून त्या उभयतांना अनेक शुभाशीर्वाद दिले.

## बसाप्पा तेल्यास धनप्राप्ति

मंगळवेढ्यास बसाप्पा नांवाचा एक तेली होता. एक दिवस तो गांवानजीकच्या अरण्यांतून फिरत असतां त्यास एक मोठेंच आश्चर्यकारक दृश्य पहावयास मिळालें !

मार्गांत एके ठिकाणीं चक्क एका कंटकशय्येवर स्वामीसमर्थांची दिव्य मूर्ति निजानंदीं निमग्न होऊन शांतपणें पहुडली होती ! ते धारदार कांटे त्यांच्या मृदुमृदुल शरीराला जरासुद्धां टोंचत नव्हते ! स्वामीसमर्थांची चर्या उग्र असली तरी त्यांचें शरीर अक्षरशः पारिजातकाच्या फुलासारखें कोमल होतें. इतर अनेक वैशिष्ट्यांप्रमाणें कोमल शरीर हादेखील सत्पुरुषांचा एक विशेष असावा. असो. परंतु आज तेंच नाजुक शरीर कंटकशय्येवर विराजमान झालेलें पाहून बसाप्पाच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं !

त्याच्या मनांत साहजिकच विचार आला कीं, 'स्वामीसमर्थ हे निश्चितच कुणीतरी अवतारी पुरुष असले पाहिजेत. त्याशिवाय...'

परंतु त्याची ही विचारमालिका पूर्ण होण्यापूर्वीच समर्थ कंटकशय्येवरूनच बसाप्पाला उद्देशून म्हणाले, 'आम्ही कुणीहि असूं. तुला त्याच्याशीं काय करावयाचें आहे ?

आपल्या मनांतील विचारहि श्रीसमर्थांनीं असे अचूक ताड-

लेले पाहून तर बसाप्पाच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं! त्यानें पुढें येऊन समर्थांचे चरण धरले व तो त्यांना शरण गेला.

त्या दिवसापासून आपला कामधंदा सोडून आपलें जीवन-पुष्प त्यानें समर्थसेवेलाच वाहून टाकलें. सदासर्वकाळ तो समर्थां-बरोबरच राहूं लागला!

त्याची बायको मात्र या प्रकारानें अतिशय वैतागून गेली. कारण आधींच घरीं अठराविसें दारिद्र्य आणि त्यांत नवरा काम-धंदा सोडून असा एका वेड्याचे मागें लागलेला! त्यामुळें त्या बिचारीला ब्रह्माण्ड आठवलें!

'नसे आंथराया नसे पांघराया...नसे अन्न खाया...' अशी समर्थ रामदासांनीं वर्णिल्याप्रमाणें तिच्या घराला अवकळा प्राप्त झाली होती. परंतु नवरा आतां कामांतूनच गेला होता! त्यामुळें तिनें स्वतःच मोलमजुरी करून संसारशकट कसाबसा पुढें ढकलला. आपल्या ताटांतील घांस मुलांच्या पोटांत घालून आणि स्वतः उपवास काढून तिनें कशीबशी दुपारची वेळ भागविली.

बसाप्पानें समर्थभक्तीचाच ध्यास घेतला होता. बायका-पोरांनाहि तो जणूं विसरला होता.

'देवाच्या सख्यत्वासाठीं। पडाव्या जिवलगांसी तुटी॥

या रामदासस्वामींच्या शिकवणीप्रमाणेंच जणूं तो वागत होता.

समर्थभक्तीची इतकी कळकळ, इतका ध्यास घेतल्यावर श्रीसमर्थ तरी भक्तावर कां कृपा करणार नाहींत?

एक दिवस समर्थ एकाएकीं उठले आणि झपाझप लांब लांब ढांगा टाकीत चालूं लागले. समर्थांची नेहमींची चालहि इतकी झपाट्याची, कीं सर्वसामान्य मनुष्याला त्यांच्याबरोबर चालतांना अक्षरशः पळावें लागे! बसाप्पाहि त्यांचे पाठोपाठ पळतच निघाला!

फिरत फिरत समर्थांची स्वारी 'काठवण' नांवाच्या एका

घनदाट जंगलांत शिरली. तें जंगल हिंस्र पशुपक्ष्यांनीं व्याप्त असून तेथील घनदाट वृक्षांमुळें सूर्यकिरणांचा भर दुपारीदेखील आंत शिरकाव होत नसे ! बसाप्पाहि समर्थांच्या पाठोपाठ त्या जंगलांत शिरला. तेवढ्यांत व्याघ्र सिंहांच्या भयानक गर्जनांनीं जंगल दणा-णून गेलें !

परंतु बसाप्पाच्या मनांत भीतीचा लवलेशहि नव्हता ! श्रीं-वर अढळ श्रद्धा ठेवून तो त्यांच्याच पाठोपाठ चालला होता. गुरु-लीलामृतकारांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ माता बरोबर असल्यावर लेक-राला भीति कशाची ?’

परंतु तेवढ्यांत हजारों काळे पिवळे सर्प अचानक प्रकट झाले व बसाप्पाच्या दिशेनें येऊं लागले. तेव्हां मात्र बसाप्पाचा धीर सुटला ! त्याच्या सर्वांगांतून घामाच्या सहस्रधारा वाहूं लागल्या. तो लटलटां कांपूं लागला ! त्यानें स्वामीसमर्थांचे चरण घट्ट धरले व तो त्यांची करुणा भाकूं लागला.

तेवढ्यांत प्रसन्न स्मित करीत समर्थांनीं बसाप्पाला अभय दिलें व म्हटलें, ‘ **बसाप्पा, तुला यांतलें हवे असतील तेवढे सर्प घे. पुन्हां अशी संधि येणार नाहीं !**’

परंतु ही गोष्ट तर आणखीनच भयंकर होती ! तथापि स्वामीसमर्थांच्या ठायीं बसाप्पाची इतकी अनन्यसाधारण श्रद्धा होती कीं, त्यांची कोणतीहि आज्ञा त्यानें क्षणांत अंमलांत आणली असती. त्यानें मनाचा हिय्या करून अंगावरील वस्त्र एका दीड हात लांबीच्या अक्राळविक्राळ सर्पावर टाकलें व तो साप कसाबसा पकडला आणि गांठोडें कांखेंत ठेवून तो घरीं गेला.

आपला नवरा बऱ्याच दिवसांनीं घरीं परत आलेला पाहून बसाप्पाच्या बायकोला विलक्षण आनंद झाला ! तेवढ्यांत बसा-प्पाला कांखेतील सर्पाची आठवण झाली व त्यानें घाबरून तें

गांठोडें जमिनीवर टाकलें. परंतु समर्थांची लीला किती अगाध पहा ! त्या गांठोड्यांतून सापाऐवजीं बावनकशी सोन्याची लखलखीत, पिवळीजर्द लगड बाहेर पडली...!

तें विस्मयकारक दृश्य पाहून त्या दांपत्याच्या आश्चर्याला पारावारच राहिला नाहीं ! स्वामीसमर्थांची अगाध लीला आठवून त्यांनीं सद्गदित अंतःकरणानें त्यांना मनोमन वंदन केलें. बसाप्पाच्या बायकोलाहि आपला नवरा वेड्याबरोबर हिंडत नव्हता याची खात्री पटली व तिनें मनांतल्या मनांत स्वामीसमर्थांची क्षमा मागून आपले अपराध पोटांत घालण्याची प्रार्थना केली !

थोड्याच वेळांत तीं दोघें पंचारतीची तयारी करून स्वामीसमर्थांच्या दर्शनास गेलीं व त्यांच्या दर्शनानें पुनीत होऊन आनंदानें कालक्रमणा करूं लागलीं.

श्रीगुरुचरित्रकारांनीं १८ व्या अध्यायांत गुरुभक्तीचें एक फळ पुढीलप्रमाणें सांगितलें आहे–

**जो कोण भजेल श्रीगुरु ।**
**त्यासी लाधेल इह–परु ।**
**अखंड लक्ष्मी त्याचे घरीं ।**
**अष्टैश्वर्यें नांदती ॥**

श्रीनृसिंहसरस्वतींनीं आपल्या एका भक्ताच्या दारांतील घेवड्याचा वेल तोडून टाकला. नंतर त्या वेलाचीं मुळें काढून टाकतांना त्या भक्ताला त्याखालीं धनाचा हंडा सांपडला. असे कित्येक चमत्कार श्रीस्वामीसमर्थांच्या अवतारकार्यांत घडले आहेत. याबाबतची अधिक हकीकत पुढें येणारच आहे.

# कोरड्या आडांत विपुल पाणी !

मंगळवेढ्यास बाबाजी भट या नांवाचा एक सात्विक ब्राह्मण रहात असे. स्वामी समर्थांची त्याच्यावर बहाल मर्जी होती. एकदां श्रीसमर्थांची स्वारी भर दुपारच्या प्रहरीं बाबाजी भटांकडे अकस्मात् आली. त्यावेळीं बाबाजी भट घरीं नसल्यामुळें त्यांच्या पत्नीनें घाईगडबडीनें उठून समर्थांना बसण्यासाठीं उत्तमासन दिलें व त्यांच्या आज्ञेची वाट पहात ती हात जोडून विनम्रपणें उभी राहिली.

श्रीसमर्थ उन्हांतून तापून आले होते. म्हणून त्यांनीं प्यावयास पाणी मागितलें.

परंतु तें ऐकून त्या द्विजपत्नीच्या डोळ्यांतच पाणी उभें राहिलें. कारण घरांत आड असूनहि तो कोरडा ठणठणीत होता व त्यामुळें समर्थांना बाहेरून आणलेलें कोमट, मचूळ पाणीच द्यावें लागणार या विचारानें ती बिचारी दुःखीकष्टी झाली.

तरीपण डोळ्यांतले अश्रु पदरानें पुशीत ती म्हणाली, ‘ महाराज ! आपण बसावें. मी बाहेरून आपणांसाठीं थंडगार पाणी आणविण्याची व्यवस्था करत्यें.’

तें ऐकून समर्थ हंसून म्हणाले, ‘ घरांत आड असतांना तुम्ही बाहेर कां जातां ?’

त्यावर ती स्त्री ओशाळून म्हणाली, ‘ गुरुमहाराज ! घरांत आड आहे खरा, परंतु त्यांत एक थेंबदेखील पाणी नाहीं हो !’

तें ऐकतांच समर्थ नेहमींच्या संवयीप्रमाणें पोटावर हात ठेवून ‘ खो खो ’ करून हंसूं लागले.

तें पाहून तर ती स्त्री अधिकच ओशाळली !

तेव्हां समर्थ आपलें हंसें आवरीत म्हणाले, ‘ अहो, आडांत

पुष्कळ पाणी आहे. चला, मीच तुम्हांला दाखवितों.'

असें म्हणून समर्थ आडाकडे गेले व त्यांनीं आडाजवळच लघुशंका केली. आणि त्याचवेळीं तो आड थंडगार, मधुर पाण्यानें कांठोकांठ भरून गेला !

तो विस्मयकारक चमत्कार पाहून त्या ब्राह्मण स्त्रीला व आजूबाजूच्या लोकांना स्वामी समर्थांच्या अगाध लीलेचें विलक्षण कौतुक वाटलें व त्यांनीं स्वामीसमर्थांचा त्रिवार जयजयकार केला !

## गरीब साळ्यास द्रव्यप्राप्ति

मंगळवेढें गांवांत एक गरीब साळी रहात असे. रोज दुपारीं गांवांत भिक्षा मागून तो आपला उदरनिर्वाह करीत असे.

श्रीस्वामीसमर्थांची कीर्ति ऐकून तो हळूहळू स्वामींचा एकनिष्ठ भक्त बनला.

एक दिवस त्याच्या भक्तीवर प्रसन्न होऊन समर्थांनीं त्याचें दारिद्र्य दूर करण्याचें ठरविलें. व त्याच रात्रीं समर्थांनीं त्याला स्वप्नांत दर्शन देऊन सांगितलें, 'तुझ्या वडिलांनीं तुलसी वृंदावनाखालीं पुष्कळ द्रव्य पुरून ठेविलें आहे. तें तूं काढून घे.'

हें चमत्कारिक स्वप्न पाहून तो साळी झोपेंतून खडबडून जागा झाला व श्रीसमर्थ वचनावर पूर्ण विश्वास ठेवून त्यानें तुलसी वृंदावनाखालीं खणून पाहिलें तों द्रव्यानें कांठोकांठ भरलेला एक हंडा खरोखरच त्यास त्या ठिकाणीं मिळाला, आणि त्याचें जन्माचें दारिद्र्य दूर झालें !

## शूद्र स्त्रीस पुत्रप्राप्ति

मंगळवेढें गांवांत एक शूद्र दांपत्य रहात असे. दोघांचेंहि वय पन्नाशीच्या पुढें गेलेलें होतें. परंतु घरांत अजूनहि पाळणा

हालत नव्हता. त्यामुळें तीं दोघेहि मनांतून अत्यंत कष्टी होतीं.

एक दिवस योगायोगानें त्यांची व बसाप्पाची गांठ पडली. त्यांची कर्मकहाणी ऐकून घेतल्यावर बसाप्पानें त्या शूद्र स्त्रीस समर्थांची सेवा करण्याचा उपदेश केला.

त्या दिवसापासून त्या स्त्रीनें समर्थांची अनन्यभावानें भक्ति सुरू केली. समर्थांचें दर्शन घेतल्याशिवाय ती अन्नप्राशनदेखील करीत नसे !

एक दिवस ती दर्शनास आली असतां तिच्या शुद्ध भक्तीवर प्रसन्न होऊन श्रीसमर्थांनीं तिच्यावर कृपा करण्याचें ठरविलें व ते तिला म्हणाले, '**तो समोर शिरसाचा वृक्ष दिसतो आहे, त्याचा डिक काढून साखरेबरोबर खा, म्हणजे तुझी इच्छा पूर्ण होईल.**'

त्या स्त्रीनें तसें करतांच थोड्याच दिवसांत ती गर्भवती झाली व तिला एक सुलक्षणी असा सुंदर पुत्र झाला !

## आपणांसारिखें करिती तत्काळ !

मंगळवेढ्यास असतांना स्वामीसमर्थांचा मुक्काम बहुतेक वेळां अरण्यांतच होत असे हें वर सांगितलेंच. त्या ठिकाणीं एक यवन रोज येऊन समर्थांना चिलीम भरून देत असे. समर्थसेवेशिवाय तो अन्य कोणताच कामधंदा करीत नसे.

त्याची वागणूक एखाद्या भ्रमिष्टासारखी दिसे. रोज गांवांत जाऊन कुणी भाकर तुकडा दिल्यास तेवढा खाऊन तो आपला उदरनिर्वाह करीत असे.

अशाप्रकारें त्याची बरेच दिवस सेवा घेतल्यानंतर श्रीसमर्थांनीं एका शुभदिवशीं त्याला जवळ बोलावून त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला. त्याबरोबर त्यास आत्मज्ञान प्राप्त झालें!

पुढें तो यवन एक अवलिया म्हणून प्रसिद्धीस आला. बरेच

दिवस तो कृष्णातटाकीं पिशाच्च वृत्तीनें भ्रमण करीत होता. त्याची लवकरच एक महान् योगी व ज्ञानी अशी प्रसिद्धी होऊन शेंकडों लोक त्याच्या दर्शनास येऊं लागले.

परंतु लोकांनीं फार जवळ येऊं नये म्हणन तो त्यांना दगड फेकून मारीत असे. हे दगड सहसा कुणाला लागत नसत. परंतु ज्यास दगड लागे, त्याची मनोकामना हमखास पूर्ण होत असे !

## रामदासीबुवांचें गर्वहरण

श्रीस्वामीसमर्थ मंगळवेढयास असतांना लहर लागेल तेव्हां पंढरपूर, बेगमपूर, चळअंबे इत्यादि गांवींहि जात असत. चळअंबे हा संस्थानिक पटवर्धनांचा गांव ! या गांवावर श्रीसमर्थांचें विशेषच प्रेम असे !

असेच एक दिवस ते चळअंब्यास आले होते. या गांवांत एक रामदासीबुवा होते. स्वारी जरा गर्विष्ठ नि अहंमन्यच होती!

ह्या रामदासीबुवांचा गर्वपरिहार करण्याचें ठरवूनच कीं काय, श्रीसमर्थ एक दिवस त्यांचे मठांत गेले व रामदासीबुवांशीं कांहींहि भाषण न करतां मठांतच झोंपून राहिले.

स्वामी समर्थ आतां उठतील, मग उठतील म्हणून रामदासबुवांनीं पुष्कळ वेळ वाट पाहिली. परंतु महाराज जागे होण्याचें चिन्ह दिसेना. शेवटीं बुवा कंटाळले व मठाला बाहेरून कुलूप ठोकून कांहींशा रागानेंच गांवांत निघून गेले.

संध्याकाळपर्यंत त्यांना श्रींची आठवणहि झाली नाहीं. परंतु सूर्यास्ताचे वेळीं त्यांना एकाएकीं आपण महाराजांना मठांतच कोंडून ठेवल्याची आठवण झाली व ते घाईघाईनें मठाकडे निघाले.

परंतु नदी किनारीं येतांच वाळवंटांतच श्रीसमर्थांची मूर्ति बालक्रीडा करीत बसलेली पाहून त्यांचा स्वतःच्या डोळ्यांवरच

विश्वास बसेना ! आपण श्रीसमर्थ मठाचे आंत झोंपलेले असतांना बाहेरून कुलूप घालून गांवांत आलों, असें असतांना स्वामीसमर्थ मठाच्या बाहेर आले तरी कसे ? बरें, मठाला दुसरा दरवाजाहि नाहीं, व मठाची किल्लीहि दुसऱ्या कुणाजवळ नाहीं ! अशा परिस्थितींत महाराज मठाबाहेर पडलेच कसे ?

रामदासीबुवांनीं आपल्या विचारशक्तीला पुष्कळ ताण देऊन पाहिला, परंतु त्यांच्या डोक्यांत कांहींच प्रकाश पडेना !

शेवटीं मठांत जाऊनच वस्तुस्थितीची खात्री करून घ्यावी असें ठरवून ते लगबगीनें मठाकडे आले, तों मठाला अजूनहि कुलूपच होतें ! त्यांनीं गडबडीनें कुलूप काढलें व आंत पाहिलें तों स्वामीसमर्थांचा कुठेंच पत्ता नाहीं !

महाराजांच्या या अगम्य लीलेचें परमाश्चर्य वाटून ते पुन्हां पळतच वाळवंटाकडे आले व त्यांनीं श्रींच्या पायांवर लोटांगण घातलें.

वे. शा. परशुरामभट गोरे या नांवाचे एक गृहस्थ सोलापुरास रहात होते. त्यांनीं हा चमत्कार समक्ष पाहिला आहे.

अशाच प्रकारची विलक्षण हकीकत श्री टेंबेस्वामींच्या चरित्रांतहि वाचावयास मिळते. ती हकीकत ओघानेंच आली म्हणून येथें थोडक्यांत सांगतों–

शके १८४३ चा चातुर्मास टेंबेस्वामींनीं इंदूर संस्थानांतील चिखलदा या गांवीं केला. तेथें येण्यापूर्वीं त्यांचा मुक्काम धर्मपुरीस बिल्वामृतेश्वराच्या देवालयांत पडला. तो दिवस आषाढ शुद्ध द्वादशी हा होता. तेथें रात्रीं अकरा वाजेपर्यंत महाराजांचें मंडळींबरोबर बोलणें झालें. नंतर सर्व मंडळी देवालयास बाहेरून कुलूप लावून आपापले घरीं गेली. स्वामीमहाराज आंतमध्यें एकटेच होते.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सर्व मंडळी महाराजांचे दर्शनास

म्हणून आली. परंतु देवालयाचें कुलूप उघडून आंत पहातात तों महाराजांचा कुठेंच पत्ता नाहीं! दाराला भक्कम कुलूप बाहेरून लावलेलें असतांना स्वामी महाराज बाहेर कसे पडले या गोष्टीचें सर्वांनाच अतिशय आश्चर्य वाटलें. त्यामुळें सर्व मंडळी महाराजांचा शोध करीत निघाली. तेव्हां त्यांना वाटेंतच बातमी लागली कीं, महाराजांची स्वारी धर्मपुरीपासून पन्नास मैलांवर असलेल्या चिखलदा या गांवीं जाऊन पोंचली आहे!

योग्याला अनेक विलक्षण सिद्धींची प्राप्ति झालेली असल्या-मुळें त्याला असे अनेक चमत्कार सहज घडवितां येतात.

श्रीसमर्थ रामदासस्वामींचीदेखील अशीच एक आश्चर्यकारक गोष्ट प्रसिद्ध आहे. ती थोडक्यांत सांगतों.

एक गृहस्थ 'मला देव दाखवा' असा श्रीरामदासस्वामीं-जवळ हट्ट धरून बसला. समर्थांनीं त्याला पुष्कळ समजावून सांगितलें कीं, 'अरे बाबा, देवाचें दर्शन कांहीं इतकें सहजसाध्य नाहीं, तूं हा भलताच हट्ट सोडून दे.' परंतु तो गृहस्थ कांहींहि केल्या समर्थांची पाठ सोडीना!

शेवटीं एक दिवस समर्थ त्याला म्हणाले, 'चल बाबा, तुला देव बघायचाच आहे तर माझ्या पाठोपाठ चल.'

तो गृहस्थ हुरळून गेला व नाचतच समर्थांच्या पाठोपाठ निघाला. तेव्हां समर्थ एका देवळांत शिरले आणि एका वीतभर झरोक्यांतून बाहेर पडले व बाहेरून त्यास बोलावूं लागलें.

परंतु त्या गृहस्थास त्या वीतभर झरोक्यांतून बाहेर पडणें कसें जमणार? समर्थ मुद्दामच त्यास लवकर बाहेर येण्याचा आग्रह करूं लागले व त्या गृहस्थानें आपली असमर्थता प्रकट कर-तांच समर्थ झरोक्यांतून पुन्हां आंत येत म्हणाले, 'तुला ज्या वेळेस हें जमेल तेव्हां तुला देव आपोआप भेटेल!'

महाभारतांत भीमालाहि अणिमा लघिमा वगैरे सिद्धि प्राप्त असल्याचा उल्लेख मुक्तेश्वराच्या काव्यांत आढळतो. अस्तु.

## देव मामलेदार

मंगळवेढ्याच्या मुक्कामांत आणखी एक विशेष गोष्ट घडली. ती म्हणजे भोसें गांवाहून श्री. यशवंतराव महादेव हे मुद्दाम श्रीसमर्थांच्या भेटीस आले. त्यांनीं कांहीं दिवस श्रींची एकनिष्ठपणें सेवा केली व समर्थांची कृपा संपादून ते परस गांवीं निघून गेले. या भेटींत स्वामीसमर्थांनीं त्यांना एक शाळिग्राम देऊन त्यांच्या भक्तिमार्गांतील अडचणी दूर केल्या.

हेच यशवंतराव महादेव पुढें '**देव मामलेदार**' म्हणून प्रसिद्धीस आले. परमार्थ क्षेत्रांत ते फारच वरच्या पायरीला पोहोंचले होते. अत्यंत दानशूर म्हणूनहि त्यांची ख्याति होती. त्यांच्या दानशूरपणाची हकीकत थेट दामाजीपंतांसारखी आहे. ती अशी–

त्या काळांत ठाणें जिल्ह्यांत भयंकर दुष्काळ पडला होता. लोकांना बेकारीमुळें काम नसल्यानें पैसे देऊन सरकारी गुदामांत सांठवून ठेवलेलें धान्य विकत घेणें अशक्य झालें. अनेक लोक उपाशी मरूं लागले. सरकार दरबारीं याची दाद लागेना.

एके दिवशीं भुकेनें व्याकुळ झालेले शेंकडों लोक देव मामलेदारांची कीर्ति ऐकून अन्न मागण्यासाठीं त्यांच्या कचेरीसमोर गोळा झाले.

त्या उपाशी पोटीं लोकांना व त्यांच्या भुकेमुळें व्याकुळ होऊन आक्रोश करणाऱ्या अर्भकांना पाहून देव मामलेदारांचें कोमल हृदय शतशः विदीर्ण झालें! त्यांनीं क्षणाचाहि विलंब न लावतां सरकारी गुदामांतील दहा हजार रुपयांचें धान्य त्या शेंकडों लोकांना वांटून टाकलें! त्या लोकांना साक्षात् देव भेटल्याचा

आनंद झाला व ते त्यांना दुवा देत आपापल्या घरीं निघून गेले.

परंतु हा प्रकार पाहून प्रभु नांवाच्या एका कारकुनानें ठाण्याच्या कलेक्टरांकडे हें वृत्त लागलीच कळविलें. तें वाचून कलेक्टर व डी. एस्. पी. आपल्या फौजफाटयासह तांतडीनें भिवंडीला आले. देव मामलेदारांना घरून बोलावण्यांत आलें व गुदाम उघडण्यास सांगितलें. देवांनीं आपण धान्य वाटल्याचें कबूल केलें. ते नम्रपणें म्हणाले, 'सरकारी नियम हे लोक-रक्षणासाठींच असतात. त्यामुळें सरकारी नियम गुंडाळून लोकांचे जीव वांचविणें अगत्याचें होतें.'

परंतु कलेक्टरसाहेबांना हें तत्त्वज्ञान नको होतें. त्यांनीं चिरुटाचा धूर सोडीत तिजोरींतील पैसे मोजण्याची हाताखालील अधिकाऱ्यास आज्ञा केली. पै न् पैचा हिशेब झाला आणि आश्चर्य असें कीं, लुटलेल्या धान्याचे दहा हजार रुपये त्यांत जमा होते !

कलेक्टरसाहेबांचा चिरूट देव मामलेदारांच्या पायाशीं गळून पडला !

परंतु ईश्वरानें हें संकट निभावलें तरी ही निर्जीव कठोर यंत्रणा आपल्या परमार्थमार्गाला पोषक नव्हे हें देवांना समजून चुकलें. त्यांनीं राजीनामा लिहून साहेबांच्या पुढयांत ठेवला. कलेक्टरसाहेब युरोपियन होते. देव मामलेदारांच्या पाठीशीं परमेश्वर उभा आहे हें त्यांनीं ओळखलें आणि 'तुमच्यासारखीं देवमाणसें हेंच देशाचें भूषण आहे' असें प्रशंसोद्गार काढून देवांचें कौतुक केलें.'

याच देव मामलेदारांनीं एकदां तहानेनें व्याकुळ झालेल्या गाढवाला स्वतः विहिरींतून पाणी काढून पाजलें.

नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर देव मामलेदार आपल्या पत्नी गोपिकाबाई व घागस्वामी यांना घेऊन नासिकला गेले.

वाटेंत आपल्या दिव्यदृष्टीनें त्यांनीं एका महारोग्याला मुक्त केलें. नंतर थोड्याच दिवसांत देवमामलेदार व त्यांच्या साध्वी पत्नी गोपिकाबाई यांनीं एकाच वेळीं नासिक येथें महासमाधि घेतली.

देव मामलेदारांप्रमाणेंच आळंदीचे नृसिंहसरस्वती, पुण्याचे बीडकर महाराज, कोल्हापूरचे कुंभारस्वामी, मंगळवेढ्याचे सीताराममहाराज अशा किती तरी विभूति स्वामीसमर्थांनीं निर्माण करून आपल्या अवतारकार्याची महान् परंपरा पुढें चालविली. या विभूतींचा विस्तृत परिचय पुढें येणारच आहे. स्वामीसमर्थांच्या चरित्राचें परिशीलन करतांना त्यांनीं निर्माण केलेली महान् शिष्यांची ही परंपरा लक्षांत घेतली पाहिजे. एका दिव्यानें दुसरा दिवा लागावा त्याप्रमाणें ही परंपरा पुढें चालू राहिली व भक्तिमार्ग अशा सहस्र दीपांनीं उजळून जाऊन अंधारांत चांचपडणाऱ्या मुमुक्षूंना आत्मोद्धाराची वाट गवसली !

## त्रयमूर्तींची भेट

श्रीस्वामीसमर्थ मंगळवेढ्यास असतांना एकदां एक मोठीच विस्मयकारक घटना घडून आली !

मंगळवेढ्याजवळ नदीकांठीं वनश्रीनें फुललेलें एक मोठें नितांतरम्य स्थान आहे. तेथेंच जवळ एक लहानसा डोंगर असून त्यावर वृक्षलतांच्या रंगीबेरंगी फुलांचा मांडव पसरलेला आहे.

एक दिवस स्वामीसमर्थांची स्वारी या निसर्गरम्य स्थळीं येऊन मोठ्या आनंदांत बसली असतां पलीकडच्या तीरावरून समर्थांसारखे दिसणारे दोन अतिभव्य तेजस्वी पुरुष त्या ठिकाणीं आले. त्यावेळीं त्या तिघांचीं जीं भाषणें झालीं तीं इतरांना समजण्यासारखीं नव्हतीं. त्यापैकीं एक यति म्हणाला, 'कां रडतो कां?' दुसरा लगेच म्हणाला, 'हांका कां मारतो?' तिसरा

त्यावर म्हणाला, ‘ असें कां करतो ?’ ह्याप्रमाणें मनःपूत बडबड करून ते तिघेहि डोंगरावर गेले. वर गेल्यावर त्यांचें एकमेकांत काय संभाषण झालें तें ज्ञात नाहीं, परंतु कांहीं वेळानें स्वामी-समर्थ एकटेच खालीं परत आले.

श्रीसमर्थ रामदासांना भेटण्यासाठीं असेच एक संत आले होते. दोघांनीं एकमेकांशीं कांहींहि भाषण केलें नाही. फक्त पांच-जन्य केला व दोघेहि चालते झाले. कोल्हापूरचे कुंभारगल्लीचे स्वामी व धोपेश्वरचे श्रीसद्गुरु काका पुराणिक हे असेच एकदां एकमेकांना भेटण्यासाठीं आले असतां जवळ आल्यावर परस्परांशीं कांहीं एक न बोलतां एकमेकांकडे पाठी फिरवून चालते झाले. ही संतभेटीची पारख त्यांची तीच जाणोत !

## मंगळवेढ्याचा निरोप

श्रीस्वामीसमर्थांचा वास मंगळवेढ्यास एकंदर बारा वर्षें झाला. त्यानंतर इ. स. १८५० मध्यें ते मंगळवेढ्याहून निघून पंढरपूरमार्गें मोहोळास आले. वाटेंत एक मोठीच चमत्कारिक घटना घडून आली !

या वाटेवर करमरकर नांवाच्या एका गृहस्थाचें एक शेत होतें. प्रस्तुतचें शेत पंढरीनाथ व एकनाथ या दोघां गृहस्थांनीं वांट्यानें घेतलें होतें.

ऐन दुपारची वेळ. कडक उन्ह पडलेलें. त्यामुळें श्रीसमर्थांच्या अनवाणी पायांना चटके बसत होते. तेव्हां समर्थांनीं पंढरीनाथाकडे वळून त्याचे जोडे मागितले. पंढरीनाथानें चटकन त्याप्रमाणें आपले जोडे काढून महाराजांपुढें ठेवले. श्रीसमर्थांनीं ते जोडे घातले नि ते झपाझप रणरणत्या उन्हांतून चालूं लागले. पंढरीनाथ व एकनाथ दोघेहि समर्थांच्या बरोबरच चालत होते.

परंतु समर्थ लांब लांब टांगा टाकीत केव्हांच पुढें निघून गेले. ते आतां त्या दोघांच्या दृष्टीच्या टप्प्यांतूनदेखील बाहेर गेले होते.

तें पाहून एकनाथ पंढरीनाथाला म्हणतो, ‘ अरे, तूं तुझा जोडा त्या वेड्याला देऊन टाकलास आणि तो तर दिसेनासा झाला. आतां तुझे काका रागावतील ना ?’

तें ऐकून पंढरीनाथालाहि त्याबाबत काळजी उत्पन्न झाली.

परंतु तेवढ्यांत समर्थ अचानक पुढें येऊन म्हणाले,

‘ हे घे तुझे जोडे ! आतां तुझे काका रागावणार नाहींत. ’

एवढें बोलून ते क्षणार्धांत झपाझप पावलें टाकीत पुन्हां अदृश्य झाले.

तें पाहून त्या दोघांना वाटलें कीं हा वेडा येथेंच जवळपास कोठेंतरी झाडाआड लपला असावा व त्यानें आपलें संभाषण चोरून ऐकलें असावें. असा विचार करीत ते दोघे चालत पुढें निघाले. वाटेंत सोलापुराकडून येणारी कांहीं मंडळी त्यांना भेटली. तेव्हां त्यांनीं तो वेडा आपल्याला शेतापासून जवळजवळ दोन मैलांवर भेटल्याचें सांगितलें. तें ऐकून पंढरीनाथ व एकनाथ यांच्या मनांतील शंका दूर झाली व आपण समजतों तसा तो गृहस्थ वेडा नसून दुसऱ्याला वेडा करील इतका शहाणा आहे याबद्दल त्यांची खात्री झाली !

त्यादिवशीं स्वामीसमर्थ मंगळवेढ्याहून जे गेले ते पुन्हां कधींच मंगळवेढ्यास आले नाहींत.

———

प्रकरण ५ वें

# मोहोळ येथील वास्तव्य

श्रीस्वामीसमर्थांची स्वारी मंगळवेढ्याहून निघाली ती पंढरपूरमार्गें मोहोळास आली. वाटेंत दुथडी भरून वाहणारी भीमा नदी त्यांना आडवी आली. पुराचें पाणी धों धों वहात होतें. नदीचें पात्र आधींच विशाल व त्यांत पूर आलेला ! त्यामुळें पाण्यावर नजर ठरत नव्हती !

या महापुरामुळें नावा बंद होत्या. स्वामीसमर्थांनीं नावाड्यांना आपणांस पलीकडे पोंचविण्यास सांगितलें, परंतु कुणाचीहि त्या प्रचंड पुरांतून पलीकडे जाण्याची छाती होईना. सर्वांनीं स्वामीसमर्थांना नकार दिला !

परंतु–

'आकाशें सर्वत्र वसावें। वायूनें नावभरी उगे नसावें॥ पावकें दाहावें। वर्षावें जळें॥ पर्वतीं बैसका न संडावी। समुद्रीं रेखा नोलांडावी। पृथ्वीया भूतें वाहावीं। हे आज्ञा माझी॥ म्यां बोलविल्या वेद बोले। म्यां चालविल्या सूर्य चाले। म्यां हालविल्या प्राण हाले। जो जगातें चाळितां।' अशी ज्यांची भूतमात्रांवर अनिर्बंध सत्ता चालते, त्या दत्तावधूत श्रीस्वामीसमर्थांना तो यःकश्चित् महापूर काय प्रतिबंध करूं शकणार !

नावाड्यांनीं पलीकडे घेऊन जाण्यास नकार दिल्यावर श्रीस्वामीसमर्थ त्यांचेकडे पाहून हंसले असतील. (त्यांपैकीं एखाद्यानें धाडस करून श्रीसमर्थांना त्या महापुरांतून पलीकडे नेलें असतें तर समर्थांनीं त्याचेवर कृपा करून त्याला 'भवसागरांतून' तारून नेलें असतें ! परंतु स्वामीसमर्थांची योग्यता जाणण्यासदेखील तशीच पात्रता पाहिजे. ती त्या नावाड्यांजवळ कोठून असणार ?)

म्हणूनच स्वामीसमर्थ किंचित् हंसले व त्यांनीं आपलीं मृदुमृदुल पावलें पाण्यांत टाकलीं आणि ते त्या प्रचंड पुरांतून सरळ चालत पलीकडे गेले ! ज्या पाण्यांतून मोठमोठ्या नावा जाऊं शकल्या नाहींत त्या प्रचंड वेगानें धों धों वाहणाऱ्या पाण्याच्या लोंढ्यांतून स्वामीसमर्थ सहज लीलेनें पलीकडे गेले ! केवढें हें आश्चर्य !

सर्वसामान्य मनुष्याला ही गोष्ट अनाकलनीय आहे. मोठमोठ्या योग्यांना योगसिद्धीच्या द्वारें अशा गोष्टी साध्य होऊं शकतात. परंतु जे महापुरुष परमात्म्याचे पूर्णावतार किंवा अंशावतार असतात त्यांचेपुढें पंचमहाभूतें लीन होतात व त्यांतूनच अनेक चमत्कारांचा उदय होतो !

श्री टेंबेस्वामींच्या चरित्रांत एकदां असाच एक चमत्कार झाल्याची नोंद आहे ! श्री. मध्वाचार्यांनींहि दुथडी भरून वाहणाऱ्या नदींत केवळ आपली छाटी टाकून आपल्या शिष्यपरिवारासह नदीचें पैलतीर गांठलें होतें !

योगी लोक योगसिद्धीच्या द्वारें अशा गोष्टी करूं शकतात. या संदर्भात श्री तुकाराम महाराज म्हणतात–

साधुनी बचनाग खाती तोळा तोळा ।
आणिकाते डोळां न पाहावे ॥

साधुनी भुजंग धरितील हातीं ।
आणिके कांपती देखोनिया ।।
असाध्य ते साधे ।
करितां सायास कारण अभ्यास तुका म्हणे ।।

श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पुढील ओव्याहि या संदर्भांत लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत-

पै अभ्यासाचेनि बळें । एका गति अंतराळें । व्याघ्र सर्प प्रांजळे । केलें एकी ।। विष कीं आहारीं पडे । समुद्री पायवाट जोडे । एकी वाग्ब्रह्म थोकडें अभ्यासें केलें ।।

## गवेस्वामी

मोहोळास आल्यावर श्रीस्वामीमहाराजांनीं आपला मुक्काम श्री. गणेश हरि सोहोनी मामलेदार यांचेकडे ठेविला होता. मोहोळांत गवेस्वामी या नांवाचे एक महान् लिंगायत साधु होते. योगविद्येंत त्यांची विलक्षण प्रगति होती. एकांतांत एका खोलींत बसून हे गवेस्वामी योगधारणा करीत असत. त्यांच्या रूपानें जणूं साक्षात योगविद्याच मोहोळांत नांदत होती. त्यांचें वय त्यावेळीं सुमारें सव्वाशें वर्षांचें होतें असें सांगतात. त्यांचें आसन जमिनी-पासून दोन हात वर अधांतरीं रहात असे ! योगाभ्यासामुळें त्यांना त्रिकाल ज्ञान प्राप्त झालेलें होतें !

मोहोळच्या मुक्कामांत श्रीस्वामीसमर्थांची या गवेस्वामींशीं एकांतांत गांठ पडली. बराच वेळ त्या उभयतांचें बोलणें झालें. त्यानंतर गवेस्वामींनीं आपलें आसन विसर्जित करून योगाभ्यासहि बंद केला. कारण- श्रीगुरुलीलामृतकार म्हणतात-

जया कारणें खटपट ।
हटयोगादि मार्ग दुर्घट ।
तेंचि होतां सद्‌गुरु भेट ।
प्राप्त सहज जाहलें ।।
मग कासया व्यर्थ शीण ।
करतील योगीराज आपण ।
अंतर्बाह्य सच्चिद्‌घन ।
गेला भरोनि गुरुकृपे ।।

पुढें स्वामीसमर्थ अक्कलकोटास गेल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं गवेस्वामी समाधिस्थ झाले.

## ‘मला ब्रह्म दाखवा !’

मोहोळास असतांना एक कोष्टी इसम रोज श्रीसमर्थांकडे येऊन ‘मला ब्रह्म दाखवा’ असा हट्ट धरून बसत असे ! श्रींनीं त्यास पुष्कळ सांगून पाहिलें, परंतु तो कांहीं आपला हेका सोडीना !

एक दिवस श्रींची स्वारी नागनाथाच्या देवळाजवळ बसली असतां तो कोष्टी त्यांचेजवळ आला व त्यानें स्वामीमहाराजांकडे ‘मला ब्रह्म दाखवा’ असा हट्ट पुन्हां सुरू केला !

तेव्हां समर्थ म्हणाले, ‘**ठीक आहे. तुला ब्रह्मच पहावयाचें आहे ना, मग हें बघ.**’

असें म्हणून स्वामीसमर्थांनीं समोर बोट दाखविलें. कोष्टी समोर पाहतो तों हजारों अक्राळ-विक्राळ नाग त्याला दिसूं लागले, व तो भीतीनें भ्रमिष्ट बनला ! पुढें बरेच दिवस तो वेड्यासारखा गांवांतून हिंडत असे. त्याची ही दुर्दशा पाहून गवेस्वामींना त्याची करुणा आली व त्यांनीं स्वामीमहाराजांची प्रार्थना करून त्यास पूर्वस्थितीवर आणलें !

एखाद्या गोष्टीची पात्रता नसतांना त्या गोष्टीचा जर कुणी उगाच वेड्यासारखा हट्ट धरून बसला तर त्याची काय गत होते हें वरील उदाहरणावरून वाचकांस कळून येईल. यापूर्वी सांगितलेली श्रीसमर्थ रामदासांची कथाहि याच गोष्टीचा प्रत्यय आणून देणारी आहे !

## सोहोनींनीं अंगवस्त्र सोडलें !

स्वामीसमर्थांचा मुक्काम मोहोळास असतांना त्यांनीं मोठ्या युक्तीनें सोहोनी मामलेदारांना आपलें अंगवस्त्र सोडावयास लावलें ! ती हकीकत अशी-

एक दिवस गणपति उत्सवानिमित्त सोहोनींकडे रात्रीच्या वेळीं कीर्तन चालूं होतें. मध्यरात्रीच्या वेळीं कीर्तन अगदीं रंगांत आलें असतांनाच श्रीस्वामीसमर्थ मधेंच उठून बाहेर जाऊं लागले. रात्र काळोखी आणि त्यांत विजांचा लखलखाट सुरूं असून पाऊसहि सुरूं झाला होता. अशावेळीं श्रीसमर्थ दरवाजा उघडून बाहेर जाऊं लागलेले पाहून सोहोनींची एकच धांवपळ उडाली ! ते तसेच लगबगीनें पळत दारापाशीं आले व त्यांनीं स्वामीसमर्थांना त्रिवार वंदन करून घरांत येण्याबद्दल नम्र विनवणी केली.

परंतु श्रीसमर्थ घरांत येईनात. ते म्हणाले, '**तुझे घरीं आम्हांस विटाळ होतो. यास्तव आम्ही परत जातों.**'

तेव्हां समर्थांजवळ सेवेसाठीं एक मनुष्य ठेवून निघतांना सोहोनींनीं पुन्हां विचारलें,

'महाराज, आपण परत कधीं येणार ?'

'**आंब्याचे दिवसांत येऊं.**' श्रीसमर्थ उत्तरले.

सोहोनी हे महाराजांचे एकनिष्ठ भक्त असले तरी त्यांचें वर्तन शुद्ध नव्हतें. त्यांनीं एक रखेली बाळगली होती. आणि म्हणू-

ग्रा. क्र. ७६०४२

नच, ‘आपणांस तुझ्या घरीं विटाळ होतो.’ असें श्रीसमर्थ म्हणाले. परंतु सोहोनींच्या डोक्यांत त्यावेळीं याचा प्रकाश पडला नाहीं. आणि मौज अशी कीं, रखेलीला सोडीपर्यंत त्यांनीं चांगले दिवस कसे ते आलेच नाहींत !

पुढें इ. स. १८५१ चे सुमारास जिल्ह्याचे कलेक्टर जमाबंदीसाठीं मोहोळास आले असतां त्यांना ही गोष्ट समजली. तेव्हां त्यांनीं सोहोनींना एकांतांत बोलावून म्हटलें, ‘आपण सदाचारानें वागण्याचें सोडून रखेली ठेवून राहतां. ही गोष्ट तुमच्यासारख्या अंमलदारास कमीपणा आणणारी आहे.’

त्यावर सोहोनी चिडून ताड्कन म्हणाले, ‘माझ्या खासगी बाबतींत लक्ष घालण्याचें आपणांला कांहींच कारण नाहीं.’

तें उर्मट उत्तर ऐकून कलेक्टरसाहेबांच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन पोहोंचली व त्यांनीं लवकरच सोहोनींना कामावरून बडतर्फ केलें.

त्यानंतर निर्वाहाचें कांहींच साधन न उरल्यामुळें सोहोनी नोकरीच्या शोधार्थ आपल्या रखेलीस घेऊन पुण्यास गेले. त्यावेळीं बडोद्यास श्रीमंत गणपतरावमहाराज गादीवर होते. त्यांचे पदरीं गणेशशास्त्री म्हणून एक गृहस्थ होते. ते राजांच्या खास मर्जींतील असल्यामुळें त्यांच्यामार्फत बडोद्यास आपल्या नोकरीचें जमेल असें वाटून सोहोनी त्यांना जाऊन भेटले. तेव्हां गणेशशास्त्री म्हणाले, ‘मी तुमच्या नोकरीसाठीं जरूर ती खटपट करीन. पण—’

‘पण काय?’ सोहोनींनीं डोळे विस्फारून विचारलें.

‘पण तुमची ती रखेली सुटली पाहिजे.’ शास्त्रीबुवा ठाम स्वरांत म्हणाले, ‘गायकवाड सरकारांस या गोष्टीची फार चीड आहे!’

तें ऐकून सोहोनी यांनीं निरुपायास्तव रखेली सोडली.

पुढें श्रीसमर्थांच्या कृपेनें बडोदें संस्थानांतील देगांव तालुक्याची मामलत सोहोनींना मिळाली व त्यांना सोन्याचे दिवसहि पहावयास मिळाले !

मोठमोठ्या सत्पुरुषांनीं साधकांना स्त्रियांपासून दूर राहण्याचाच उपदेश केलेला दिसून येतो. श्रीनाथमहाराज '**चिरंजीवपदांत**' म्हणतात–

**' नको नको स्त्रियांचा सांगात ।**
**नको नको स्त्रियांचा एकांत ।**
**नको नको स्त्रियांचा परमार्थ ।**
**करिती आघात पुरुषासी ।।**

अर्थात् याचा अर्थ साधकांनीं स्वस्त्रीचासुद्धां त्याग करावा असा मुळींच नाहीं ! श्रीनाथांनीं याबाबत केलेलें मार्गदर्शन फार महत्त्वाचें आहे.

ते म्हणतात–

'**तरी स्वस्त्रीवांचोनी । नातळावी अन्य कामिनी । कोणे स्त्रियें सन्निध वाणी । आश्रयो झणीं नेदावा ।।**'

हेंच एकनाथ स्वस्त्रीशीं कसें वागावें तें आपल्या 'चिरंजीवपदांत' पुढीलप्रमाणें सांगत आहेत–

'**स्वास्त्रियेसहि कार्यापुरतें । बोलावें स्पर्शावें निरुतें । परी आसक्त होऊनि तेथें । सर्वथा चित्तें न गुंतावें ।।**

ज्याला साधनमार्गांत कांहीं प्रगति करून घ्यावयाची आहे त्यानें विषयाधीन होऊन चालणार नाहीं.

'**जे रंगले भगवत्पथा । त्यांचें चित्त विसरलें विषयावस्था ।।**' **अशी त्यांची अवस्था झाली पाहिजे.**

हीच गोष्ट सोहोनी मामलेदारांच्या उदाहरणावरून स्वामी-

समर्थांनीं आपल्या भक्तांपुढें मांडली आहे. मनुष्यानें दहाहि इंद्रियांचे विषय कसे सेवन करावेत याबद्दलची माहिती एकनाथी भागवताच्या अकराव्या अध्यायांत फारच उत्तम प्रकारें दिलेली आहे. ती वाचकांनीं मुळांतून वाचणेंच योग्य ठरेल !

---

प्रकरण ६ वें

# सोलापूर येथील हकीकत

श्रीसमर्थांचा निवास मोहोळास सुमारें पांच वर्षें झाला. त्यानंतर त्यांची स्वारी फिरत फिरत सोलापुरास आली.

एक दिवस मोठीच मजेदार घटना घडली !

श्रींची स्वारी तेथील श्रीदत्तमंदिरांत बसली होती. मंदिर भक्तांनीं नुसतें फुलून गेले होतें. 'श्रीगुरुदेऽव दत्त' असा गुरुदेवांचा जयजयकार मधूनच खड्या सुरांत ऐकूं येत होता. श्रीसमर्थ एका कोपऱ्यांत बालक्रीडा करण्यांत रंगून गेले होते.

दत्तदर्शनासाठीं आलेल्या मंडळींना श्रींची कीर्ति ठाऊक नसल्यामुळें कुणाचेंहि लक्ष त्यांचेकडे गेलें नाहीं.

त्या मंडळींत श्री. चिंतोपंत टोळ या नांवाचे एक भाविक गृहस्थ होते. मंदिरांत प्रदक्षिणा घालतांना त्यांचें लक्ष श्रींच्या दिव्य मूर्तीकडे गेलें. त्यांच्या मुखमण्डलावरील तेज पाहून 'हे कुणीतरी सिद्ध पुरुष असावेत' असा विचार त्यांचे मनांत आला.

तेवढ्यांत श्रीसमर्थ पलीकडून म्हणाले, '**आम्ही सिद्धपुरुष असो कीं आणखी कुणी असो, तुला काय पंचाईत ?**'

ते शब्द ऐकतांच टोळ प्रदक्षिणा घालतां घालतां एकदम थबकले ! '**हे कुणी मनकवडे दिसतात**' असा विचार त्यांच्या मनांत आला.

तोंच श्रीसमर्थ पलीकडून मोठ्यानें म्हणाले, '**आम्ही मन-**

कवडे असूं नाहींतर आणखी कुणी असूं !'

श्रींचे हे शब्द कानांवर पडतांच टोळांची पूर्ण खात्री झाली कीं हे यतिराज कांहीं कुणी सामान्य नव्हेत ! त्यामुळें श्री. टोळांनीं त्यांच्याजवळ येऊन पाय धरले व त्यांना आपल्या घरीं येण्याचें आमंत्रण दिलें.

चिंतोपंतांचा उत्कट भाव पाहून श्रीसमर्थांनीं त्यांच्या आमंत्रणाचा आनंदानें स्वीकार केला व त्याप्रमाणें ते श्री. टोळांकडे गेलेहि !

पुढें एक दिवस श्रीसमर्थांनीं आपल्याकडे भोजनास यावें अशी इच्छा टोळांच्या भाविक मनांत निर्माण झाली व त्यांनीं तसें श्रींना सुचवितांच श्रींनींहि त्या गोष्टीस आनंदानें रुकार दिला.

त्याप्रमाणें पुढें लवकरच श्रीसमर्थांची स्वारी भोजनासाठीं म्हणून श्री. टोळांकडे आली. श्रीसमर्थांच्या आगमनानें टोळांच्या आनंदाला सीमाच उरली नाहीं. त्यांनीं श्रीसमर्थांच्या चरणांवर अत्यंत भक्तिभावानें मस्तक ठेवलें व त्यांना ओसरीवरील उच्चासनावर बसण्याची विनंति करून टोळ स्नानासाठीं मागल्या दारीं गेले.

तेवढ्यांत दाजीबा सोहोनी या नांवाचे एक गृहस्थ टोळांना भेटण्यासाठीं तेथें आले. टोळांची आंघोळ नुकतीच उरकली होती व पंचानें जानवें कोरडें करीत अन् तोंडानें कांहीं श्लोक पुटपुटत ते पुढल्या दारीं येऊं लागले होते. तेवढ्यांत दाजीबांनीं त्यांना मधेंच गांठून आजूबाजूचा कानोसा घेत हलक्या आवाजांत म्हटलें, 'अहो चिंतोपंत, या स्वामींना म्हणे तुम्हीं जेवायला बोलावलें आहे ?'

'होय ! कां ? काय झालं ?' चिंतोपंत धोतराच्या निऱ्या सारख्या करीत भुंवया विस्फारून म्हणाले.

त्यावर दाजीबा चिंतोपंतांच्या कानाशीं लागून इकडे तिकडे कानोसा घेत म्हणाले, 'अहो, काय झालं ? अहो, तुम्हांला ठाऊक नाहीं हे स्वामी पाहिजे त्याच्याकडे जेवतात म्हणे. त्यांना सोंवळ्या-ओंवळ्याचा एवढादेखील विधिनिषेध नाहीं ! तेव्हां ऽऽ तुम्हीं त्यांच्या पंक्तींत बसणें शास्त्रनिषिद्ध आहे !'

टोळांनीं याबाबत थोडा विचार केला व त्यांनाहि ती गोष्ट पटली आणि त्यांनीं श्रीसमर्थांचें पान आडव्या पंक्तींत वाढावयाचें ठरविलें.

हा विचार करीतच ते ओसरीवर आले. तेवढ्यांत श्रीसमर्थ उठून दाराकडे जात म्हणाले, '**तुझ्या मनांत विकल्प आला. आतां आम्ही जेवत नाहीं.**'

श्रींच्या अंतर्साक्षित्वाचे ते शब्द ऐकतांच टोळांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. त्यांनीं श्रींची कशीबशी समजूत काढली व चुकीची क्षमा असावी असें म्हणून त्यांना कसेंबसें भोजनासाठीं पाटावर बसविलें !

तात्पर्य, शुद्ध, विकल्परहित भावाला महत्त्व आहे. '**भाव-बळें आकळे येऱ्हवीं ना कळे**' असें त्या 'हरी' चें वर्णन श्री ज्ञाने-श्वरमहाराज करतात. गोपींच्या ठिकाणीं कृष्ण परमात्म्याविषयीं किती शुद्ध भाव होता !

'**विश्वव्यापक कमळापती । त्यासी गौळणी कडिये घेती ।। नवल केव्हडें केव्हडें । न कळे कोन्होबाचें कोडें ।**' असें तुकाराम महाराज म्हणतात.

परमेश्वरप्राप्तीसाठीं तपेंच्या तपें प्रयत्न करणारांना कांहीं वेळां परमेश्वर भेटतहि नाहीं ! उलट, परमेश्वराप्रीत्यर्थ कांहींहि सायास न करणाऱ्याला परमेश्वर भेटतो. हें दिसण्यास विसंगत दिसतें, परंतु भावरहित अशा अहंताबुद्धीनें केलेली सेवा परमे-

श्वराच्या दरबारांत केव्हांहि रुजू होत नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे! असो.

दुसऱ्या एका प्रसंगीं श्रीसमर्थ असेच चितोपंतांकडे भोजनास आले होते. चितोपंतांनीं श्रीसमर्थांना स्नान घालून त्यांच्या भालप्रदेशावर कस्तुरीचें गंध लावलें आणि त्यांची षोडशोपचारें पूजा करून त्यांना भोजनास उठण्याची विनंति केली.

परंतु श्रीसमर्थ जागचे हालेनात! दहा वाजून गेले तरी श्रीसमर्थ भोजनास सुरुवात करण्याचें चिन्ह दिसेना! तेव्हां चितोपंत काळजींत पडले. भिंतीवरच्या घड्याळाचा कांटा द्रुतगतीनें पुढें धांवत होता. चितोपंतांना वाटलें कीं, आपल्या मुलाला ऑफिसांत जावयास आतां चांगलाच उशीर होणार व साहेबाचीं उगाचच बोलणीं खावीं लागणार!

त्यांचा मुलगा विष्णुपंत ऊर्फ दाजीबा सोलापूरच्या कलेक्टर ऑफिसांत लेखनिक होता. त्यावेळीं गोल्डफिंच म्हणून एक कलेक्टर होते आणि हणमंतराव पितांबर हे दफ्तरदार होते हे दोघेहि अंमलदार स्वभावानें तापट असून कडक शिस्तीचे भोक्ते होते. सर्व कारकुनांनीं बरोबर दहाच्या ठोक्याला कामावर हजर असलेंच पाहिजे असा त्यांचा सक्त कायदा होता, व त्याची अंमलबजावणी अतिशय कांटेकोरपणें होत असे.

ही गोष्ट चितोपंतांना ठाऊक असल्यामुळें ते दाजीबाला म्हणाले, 'तूं हवें तर जेवून घे. तुला कचेरींत जावयास उशीर होईल.'

परंतु दाजीबा हादेखील श्रीसमर्थांचा परमभक्त असल्यामुळें तो या गोष्टीस कबूल होईना. तो म्हणाला, 'मला उशीर झाला तरी चालेल. परंतु महाराज जेवल्याशिवाय मी मुळींच जेवणार नाहीं. मग काय व्हायचें असेल तें होवो!'

अकरा वाजेपर्यंत श्रीसमर्थांची स्वारी स्वस्थ बसून होती. परंतु अकरा वाजतां ते भोजनास उठले. तें पाहून चिंतोपंत आणि दाजीबा यांना मनस्वीं आनंद झाला. भोजन उरकल्यावर दाजीबा श्रींना वंदन करून लगबगीनें कचेरीकडे निघाले.

ते कचेरींत पोंचले त्यावेळीं कचेरीच्या घड्याळांत साडे-अकरा वाजून गेले होते. त्यामुळें दाजीबांचें हृदय धडधडूं लागलें! ते अतिशय ओशाळून बिचकतच आपल्या खुर्चीजवळ आले व त्यांनीं आपला कोट कसाबसा खुर्चीच्या पाठीवर अडकविला आणि उशीर झाल्याबद्दल क्षमा मागण्यासाठीं ते हेडक्लार्क बाळकृष्ण देवराव यांच्याकडे निघाले.

त्यांनीं भीतभीत आपली हकीकत त्यांना सांगितली व एक-वार क्षमा करण्याची विनंति केली, परंतु त्यांची हकीकत ऐकून देवरावांना विलक्षण आश्चर्य वाटलें. त्यांनीं हजेरीबुक उघडून तें दाजीबांसमोर धरीत म्हटलें, ‘अहो, तुम्हीं तर माझ्या आधीं येऊन आज सही केली आहे. आणि क्षमा कशाची मागतां ?’

दाजीबांच्या भुंवया विस्फारल्या गेल्या ! त्यांनीं हजेरी-बुकांत पाहिलें तों त्यांच्या नांवासमोर दहाच्या वेळेखालीं त्यांची सही त्यांना आढळून आली ! ही स्वामीसमर्थांचीच लीला याबद्दल त्यांची पूर्ण खात्री झाली व त्यांच्या डोळ्यांत अश्रूंनी गर्दी केली.

त्यानंतर त्यांनीं सत्य परिस्थिति सर्वांना निवेदन केली. ती ऐकून सर्वजण आश्चर्यचकित झाले व श्रीसमर्थांच्या अगाध लीलेचें कौतुक वाटून त्यांचे मनांत त्यांचेविषयीं पूज्य भाव निर्माण झाला.

ही विलक्षण घटना इ. स. १८५६ च्या सुमाराची आहे.

## सरकारी गॅझेटमधील विलक्षण गोष्ट

याच संदर्भात कांहीं वर्षामागें ‘पुरुषार्थ’ मासिकांत प्रसिद्ध

झालेली एक विलक्षण आश्चर्यकारक सत्यकथा आठवते. वाचकांच्या माहितीसाठीं ती कथा थोडक्यांत येथें देतों. ही कथा दक्षिण-भारता-मधील एका जिल्हयाच्या सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालेली असल्यामुळें तिच्या सत्यतेविषयीं संशय घेण्याचें कारण नाहीं.

एक यात्रेकरू एका प्रतिष्ठित इसमाकडे आपली सर्व पुंजी विश्वासानें ठेवून यात्रेस निघून गेला. ती पुंजी ठेवतांना त्यानें कोणत्याहि प्रकारची लेखी चिठ्ठीचपाटी त्या प्रतिष्ठित गृहस्था-कडून घेतलेली नव्हती. तीर्थयात्रेहून परत आल्यावर त्या यात्रे-करूनें आपली पुंजी त्या गृहस्थाजवळ मागितली, परंतु त्या ' प्रति-ष्ठित ' गृहस्थानें कांखा वर केल्या व पुंजी ठेवून घेतल्याची गोष्टच नाकबूल केली. तेव्हां यात्रेकरूनें न्यायालय गांठलें, पण साक्षीदार कोठून आणावा ? कारण ती पुंजी ठेंवतांना कुणीच साक्षीदार हजर नव्हता.

शेवटीं त्या भोळ्या यात्रेकरूनें मनामध्यें प्रभु रामचंद्राचें स्मरण केलें आणि त्याला म्हटलें, ' हे देवा ! हे करुणा सिंधो ! आतां तूंच माझा साक्षीदार. तूंच साक्षीदाराचें रूप घेऊन मला वांचव ! '

' तूं सागर करुणेचा देवा ।
तुजलाचि दु:ख सांगावें ।
तुजवांचुनि इतरांतें ।
दिनमुख पसरोनि काय मागावें ?॥'

अशी त्या दाशरथी रामाची मन:पूर्वक प्रार्थना करून त्यानें साक्षीदार म्हणून ' कोदंडपाणि ' या गृहस्थाचें कोर्टाला नांव सांगितलें. हें एखाद्या व्यक्तीचें नांव असावें असें वाटून कोर्टानें कोदंडपाणीला समन्स काढलें !

खटला उभा राहिला. तेव्हां शिपायानें उच्चरवानें कोदंडपाणीचें नांव तीन वेळां पुकारलें.

आपल्याला खरें वाटो कीं खोटें, परंतु 'गॅझेट' सांगतें कीं, नांव पुकारतांच खरोखरीच एक सांवळ्या वर्णाचा सुंदर पुरुष न्यायालयांत उपस्थित झाला व त्यानें आपलें नांव सांगितलें, 'कोदंडपाणी.' असल्याचें सांगून कायद्याप्रमाणें शपथहि घेतली. नंतर त्यानें साक्षींत सांगितलें कीं, 'त्या प्रतिष्ठित गृहस्थाकडे आणखी एक हिशेबवही असून त्यांत त्यानें यात्रेकरूंच्या ठेवीची नोंद केलेली आहे.'

या माहितीनुसार कोर्टानें ती वही मिळवली. तेव्हां तींत खरोखरच तशी नोंद आढळली ! तेव्हां त्या प्रतिष्ठित गृहस्थाचें पाप उघडें होऊन त्याला सर्व पुंजी त्या यात्रेकरूला परत करावी लागली व खोट्या व्यवहाराबद्दल भरपूर दंडहि भरावा लागला !

त्या यात्रेकरूनें त्यानंतर कोदंडपाणीचा पुष्कळ शोध केला, परंतु तो पुन्हां कधींच दिसला नाहीं.

या कलियुगांत असले चमत्कार सर्वसामान्य मनुष्याला खोटे वाटतात, परंतु परमेश्वरावर प्रखर निष्ठा ठेवून वागणाऱ्या सदाचारसंपन्न मनुष्याला परमेश्वर संकटकाळीं नेहमींच सहाय्यकर्ता होत असतो या गोष्टीवर ज्यांचा विश्वास नसेल त्यांनीं तितकी निष्ठा ठेवून व पात्रता संपादून त्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचाच प्रयत्न कां करूं नये ? असो.

त्यानंतर थोड्याच दिवसांत चिंतोपंत सेवानिवृत्त झाले. परंतु त्यांचा अनुभव, प्रामाणिकपणा व कामांतील उरक पाहून श्रीमंत शहाजीराजे भोसले यांनीं त्यांना आपल्या संस्थानांत कारभाऱ्याच्या जागेवर काम करण्यासाठीं बोलावून घेतलें. ही नोकरी मानाची असल्यामुळें व पगारहि भरपूर असल्यामुळें चिंतोपंतांनीं

अक्कलकोट येथें जाण्याचें निश्चित केलें.

त्यावेळीं श्रीसमर्थांनींहि आपल्याबरोबर अक्कलकोटास यावें अशी टोळांची तीव्र इच्छा होती. त्यानुसार टोळांनीं श्रींना तशी विनंति केली.

परंतु श्रीसमर्थ चटकन् म्हणाले, '**अक्कलकोटास उन्हाळा आहे. आपण येत नाहीं.**'

त्यावर चितोपंतांनीं पुन्हां प्रश्न केला, 'मग महाराज, आपण केव्हां याल ?'

'**पाऊस पडल्यावर येऊं.**' श्रींनीं उत्तर दिलें.

तेव्हां टोळ नाइलाजानें श्रीसमर्थांचा निरोप घेऊन एकटेच अक्कलकोटास गेले.

पुढें लवकरच श्रीमंत शहाजीराजे यांची प्रकृति बिघडून त्यांचा अंत झाला व श्रीमंत मालोजीराव हे गादीवर बसले. 'अक्कलकोटास सध्यां उन्हाळा आहे' असें सांगून श्रीसमर्थांनीं शहाजीराजांचा मृत्यूच जणूं सूचित केला होता !

त्यावर्षीं दिवाळी होऊन गेल्यानंतर अक्कलकोटास भरपूर पाऊस पडून पीकपाणी छान झालें व सर्वत्र आनंदीआनंद झाला !

—आणि श्रीसमर्थांचें आगमन ओळखूनच कीं काय, सृष्टि-देवतेनें हिरव्यागार शेतांचे मखमली गालिचे अक्कलकोटच्या भूमीवर पसरून ठेवले. वाऱ्यावर डुलणारीं शेतें श्रींच्या आगमनाची वार्ताच एकमेकांच्या कानांत सांगत आहेत कीं काय असें पाह-णाराला वाटत होतें ! अक्कलकोटची भूमि श्रींच्या पदस्पर्शासाठीं आतुरली होती.

------

प्रकरण ७ वें

# अक्कलकोट येथें आगमन

इ. स. १८५६ चे सुमारास चिंतोपंत टोळांनीं श्रीसमर्थांना पुन्हां एकदां अक्कलकोटास येण्याचा आग्रह केला. श्रीसमर्थांनीं टोळांची ही विनंति मोठ्या आनंदानें मान्य केली. कारण श्रींचें महत्त्वाचें अवतारकार्य या प्रज्ञापुरींच व्हावयाचें होतें.

चिंतोपंत श्रीसमर्थांना घेऊन घोड्यावरून अक्कलकोटकडे निघाले, परंतु त्यांना वाटेंतच सोलापूरच्या कलेक्टरसाहेबांचें तांतडीचें बोलावणें आलें. त्यामुळें श्रीसमर्थांना एका घनदाट वृक्षाखालीं बसण्याची विनंति करून व त्यांचे दिमतीस एक गडी ठेवून श्री. चिंतोपंत घाईघाईनें घोड्यावरून परत सोलापुरास गेले.

नंतर बऱ्याच वेळानें आपलें काम संपवून त्यांनीं घोड्यावर टांग मारली व अक्कलकोटच्या दिशेनें घोडा भरधांव फेंकला व थोड्याच वेळांत ते त्या विवक्षित घनदाट वृक्षानजिक आले. परंतु श्रींची दिव्य मूर्ति तेथें कोठेंच दिसेना! त्यामुळें त्यांनीं गड्यास हांक मारून त्याबाबत विचारलें. तेव्हां तो गडी थरथर कांपत दोन्ही हात जोडून म्हणाला, 'साहेब, स्वामींनीं न जावें म्हणून मीं त्यांची अनेक प्रकारें विनवणी केली. परंतु 'हम किसीके ताबेदार नहीं' असें उत्तर देऊन ते पांच दहा पावलें पुढें गेले व दिसेनासे झाले!'

ही हकीकत ऐकून चिंतोपंतांना विलक्षण दुःख झालें व ते

निराश मनानें एकटेच अक्कलकोटाकडे यावयास निघाले. आतां श्रींची पुनर्भेट होते किंवा नाहीं ही एकच काळजी त्यांना त्रस्त करीत होती.

श्रीसमर्थ त्या घनदाट वृक्षाजवळून अंतर्धान पावून मनोवेगानें जे निघाले ते एकदम अक्कलकोट गांवाजवळील श्रीखंडोबाच्या देवळांत प्रकट झाले !

बऱ्याच वेळानें चिंतोपंतहि त्या देवळाजवळ आले. ते भाविक असल्यामुळें गांवांत जाण्यापूर्वीं खंडोबाचें दर्शन घ्यावें अशी इच्छा उत्पन्न होऊन त्यांनीं घोडा उभा केला व खालीं उतरून ते देवळांत शिरले.

देवळांत शिरतांच त्यांच्या आनंदाला सीमाच राहिली नाहीं. कारण समोरच श्रींची मनोहर मूर्ति बालक्रीडा करीत बसलेली त्यांना आढळली ! त्यांनीं धांवतच पुढें जाऊन श्रींच्या पायांवर डोकें ठेवलें. श्रींनींच खंडोबाच्या दर्शनाची प्रेरणा आपल्या मनांत उत्पन्न केली असें त्यांना वाटल्यावांचून राहिलें नाहीं !

त्यानंतर चिंतोपंतांनीं श्रीसमर्थांना हात जोडून म्हटलें, ‘ गुरुमहाराज ! आपण आतां आमचें घरीं चलावें.’

परंतु समर्थ तिकडे दुर्लक्ष करून म्हणाले, **‘ आमचें घर वेगळे आहे. ’**

पूर्वयोजनेनुसार श्रीसमर्थांचा वास चोळप्पाचें घरींच व्हावयाचा होता व त्यामुळेंच श्रीसमर्थांनीं चिंतोपंतांना असें फटकळ उत्तर दिलें असावें.

चिंतोपंतांनीं श्रीसमर्थांना पुष्कळ आग्रह केला. परंतु समर्थांनीं आपलें म्हणणें सोडलें नाहीं. त्यामुळें ‘ जशी महाराजांची इच्छा ’ असें म्हणून चिंतोपंत श्रीसमर्थांना नमस्कार करून तेथून

निघून गेले. श्रींची स्वारी मात्र खंडोबाच्या देवळांतच राहिली.

परंतु लवकरच तेथून श्रीसमर्थ गांववेशीसमोर 'फाटक' म्हणून एक निशाण ठेवण्याची जागा आहे तेथें गेले व तीन दिवस निराहारी राहिले.

## अग्नि ठेवोनि रित्या चिलमींत

चौथ्या दिवशीं तेथील अहमद अल्ली खाँ या नांवाच्या एका रिसालदाराचें लक्ष त्यांचेकडे गेलें. परंतु त्यांच्या 'बालोन्मत्त पिशाच्चवत्' वृत्तीमुळें हे कोणी वेडे इसम असावेत असें अहमद खाँला वाटलें व त्यानें त्यांची चेष्टा करण्याच्या उद्देशानें एका रिकाम्या चिलमींत विस्तव घालून ती चिलीम त्यांचे पुढें धरीत विचारलें, 'क्यों महाराज, हुक्का पीते हो ?'

श्रीसमर्थ त्यावर कांहीं बोलले नाहींत. त्यांनीं निमूटपणें ती चिलीम हातांत घेतली व मोठ्या आनंदानें ओढावयास सुरुवात केली. त्याबरोबर त्या रिकाम्या चिलमींतून काळा निळा धूर बाहेर पडूं लागला ! तें विलक्षण दृश्य पाहून अहमदा खाँ हंसता हंसतां थांबला. हंसण्यासाठीं उघडलेलें त्यांचे तोंड तसेंच उघडें राहिलें व डोळे विस्फारून तो यतिरायांची ती अगम्यलीला आश्चर्यानें व कौतुकानें पाहूं लागला ! चिलीम ओढतां ओढतां श्रीसमर्थांची तंद्री लागली.

आतां अहमद खाँची खात्री झाली कीं, हे कोणी वेडे नसून मोठे अवलिया असले पाहिजेत. म्हणून त्यानें मोठ्या अगत्यानें त्यांची चौकशी केली. ते तीन दिवस निराहारी आहेत असें समजल्यावर त्याला फार दुःख झालें व त्यानें शेजारच्याच चोळप्पा ब्राह्मणाकडे त्यांची जेवणाची व्यवस्था केली.

'चमत्कारावांचून नमस्कार नाहीं' असें म्हणतात तें कांहीं

खोटें नव्हे !

श्रीसमर्थांची स्वारी त्या रिसालदारास घेऊन चोळप्पाकडे आली. चोळप्पानें श्रीसमर्थांपुढें भोजनाचें ताट ठेवतांच श्रीसमर्थांनीं त्या मुसलमान रिसालदारास बोलावून त्या ताटास हात लावण्यास सांगितलें, परंतु तो तसें करण्यास कचरूं लागला.

तेव्हां समर्थ हंसून म्हणाले, 'अरे **मत डरो. पकडो हाथमें**'

तेव्हां त्यानें मोठ्या नाइलाजानें ताटास हात लावला. तें पाहून यतिरायांना आनंद झाला व त्यांनीं मोठ्या आनंदानें भोजन करून तीन दिवसांचा उपवास सोडला.

श्रीसमर्थांनीं हिंदु–मुसलमान असा भेदभाव कधींच केला नाहीं. ते हिंदूंच्या मंदिरांप्रमाणेंच मुसलमानांच्या दर्ग्यांत व मशिदींतहि तितक्याच प्रेमानें जात. श्रीनृसिंहसरस्वतींनीं वैदिक धर्माचें यावनी जुलुमांपासून रक्षण करण्यासाठीं हिंदूंच्या मनांत आत्मविश्वास व धैर्य उत्पन्न केलें. परंतु त्यांनींच या अवतारांत मुसलमानांवर प्रेम करावें या गोष्टीचें कुणाला आश्चर्य वाटेल ! परतु देश–काल-परिस्थितीनुसार हा बदल आवश्यकच होता. कारण श्रीसमर्थांच्या अवतारकाळीं भारतीयांचा इंग्रजांविरुद्ध सामना चालू होता. नाना तऱ्हेचे बरेवाईट जुलुमी उपाय योजून डलहौसीसारख्यांनीं संपूर्ण भारत इंग्रजांच्या एकछत्री अंमलाखालीं आणण्याचा प्रयत्न चालविला होता. व त्यांतूनच पुढें १८५७ चा प्रक्षोभ उसळला. अशावेळीं सर्व भारतीयांनीं संघटित होणें आवश्यक होतें. इंग्रजांच्या अनिर्बंत अत्याचारांमुळें मनानें खचून गेलेल्या भारतवासीयांना परमेश्वरी अस्तित्वाची चुणूक दाखवून त्यांच्या पिचलेल्या, खंगलेल्या दुर्बल मनांत धैर्य व आत्मविश्वास निर्माण करणें अत्यावश्यक होतें. श्रीसमर्थांनीं हेंच कार्य पडद्याआडून केलें असें आम्हांस वाटतें ! असो.

त्या दिवसापासून चोळप्पाचें घर हेंच श्रीयतिरायांचें निवासस्थान बनलें. हा चोळप्पा पुढें श्रीसमर्थांचा एकनिष्ठ सेवक बनला. त्याची विस्तृत हकीकत पुढील प्रकरणांत येणारच आहे.

श्रीस्वामीसमर्थांचे चरण अक्कलकोटच्या पुण्यभूस ज्या दिवशीं प्रथम लागले तो दिवस आश्विन शुद्ध पंचमी शके १७७९ हा होता. श्रींचें प्रमुख अवतारकार्य याच पवित्र भूमींत झालें व अक्कलकोटला '**तीर्थराज अक्कलकोट**' अशी संज्ञा प्राप्त झाली. श्रीसमर्थहि त्या दिवसापासून '**श्रीअक्कलकोटचे स्वामी महाराज**' या नांवानें प्रसिद्धीस आले. शकें १७७९ ते शके १८०० या एकवीस वर्षांत श्रींनीं अक्कलकोटांत वास्तव्य करून अनंतलीलांच्या द्वारें लोकोद्धाराचें कार्य करून दत्तसंप्रदायाची परंपरा पुढें चालू ठेविली.

– आणि, 'कस्तुरीचा परिमळ कळवाया शपथ वाहणें न लगे' या कविवर्य मोरोपंतांच्या उक्तीनुसार त्यांच्या कीर्तीचा परिमल दशदिशांत पसरला व लोकमानसांत त्यांचेविषयीं पूज्यबुद्धि निर्माण होऊन लोकगंगेचा प्रवाह अक्कलकोटच्या ज्ञानसागराकडे वेगानें वाहूं लागला !

## १८५७ च्या बंडाचें भाकित

अक्कलकोटास आल्यानंतर थोड्याच दिवसांत श्रीसमर्थांनीं एका विलक्षण खेळाला सुरुवात केली. रोज गांवाबाहेरच्या जंगलांत जाऊन ते एरंडीचीं लांकडें आणीत व त्यांचे वीत वीत लांबीचे तुकडे करून ते पलटणींतील शिपायांच्या रांकेप्रमाणें रचून ठेवीत व घोंगडीच्या दशा काढून त्याहि एका रांकेंत लावून ठेवीत.

श्रींच्या या विलक्षण कृतीचा अर्थ न कळून कांहींजण उत्सुकतेनें त्यांना विचारीत, 'महाराज, आपण हें काय करतां ?'

त्यावर, ‘पलटणी तयार करतों’ एवढेंच उत्तर श्रीसमर्थ देत. परंतु हें उत्तर ऐकून प्रश्नकर्ते अधिकच कोडयांत पडत! तथापि अवतारी विभूतींच्या प्रत्येक कृतींत महान् अर्थ असतो मात्र त्यावरून योग्य तो बोध घेणें सामान्यजनांच्या कुवतीपलीकडचें असतें. असो. पुढें थोडयाच दिवसांत इंग्रजांच्या, भारतीय संस्थानें खालसा करण्याच्या पाताळयंत्री कारवायांमुळें लोकमानसांत प्रक्षोभ निर्माण होऊन इंग्रजांविरुद्ध क्रांतीचा झेंडा उभारण्यांत आला व नानासाहेब पेशवे व इंग्रज यांच्या पलटणी एकमेकांना भिडून युद्धाची धुमश्चक्री सुरूं झाली. व तेव्हां कुठें श्रींच्या पलटणी करण्याच्या कृतीचा अर्थ लोकांना समजला!

त्यानंतर श्रीसमर्थांनीं एक नवाच खेळ शोधून काढला! अक्कलकोटास ‘लक्ष्मी’ नांवाची एक मोठी तोफ आहे. त्या तोफेंत तोंड खुपसून बसण्याचा खेळ श्रींनीं सुरूं केला. पूर्वीच्या उदाहरणावरून श्रीसमर्थांच्या याहि कृतींत कांहीं तसाच खोल अर्थ असला पाहिजे असें भोंवतालच्या मंडळींना वाटूं लागलें. परंतु त्या कृतींतून नेमका अर्थ मात्र कुणालाच काढतां आला नाहीं.

तथापि, पुढें काळानेंच त्या कृतीचा अर्थ उघड करून दाखविला!

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत दुर्दैवानें भारतीय क्रांतिकारकांचा पराभव होऊन इंग्रजांची सरशी झाली व त्यांनीं स्वातंत्र्ययुद्धांत सामील झालेल्या हजारों भारतीय वीरांना तोफेच्या तोंडीं देऊन निष्ठुरपणाची परिसीमा केली! पुढें जेव्हां श्रीसमर्थांनीं आपला हा विलक्षण खेळ थांबविला तेव्हां इंग्रजांनीं सुरूं केलेलें हें संहारसत्रहि थांबलें!

या स्वातंत्र्ययुद्धाविषयीं लिहितांना श्री. स. कृ. फडके आपल्या ‘दत्तभक्ति रहस्य’ या पुस्तकातील, ‘श्रीअक्कलकोटचे

स्वामी ' या प्रकरणांत लिहितात-

" स्वामींनीं हिंदुस्थानांतील अभूतपूर्व अशी क्रांति पाहिली. या नवयुगाच्या आरंभकालीं राममोहन प्रभृति कित्येक समाज-सुधारक निर्माण झाले. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं अनेक संतहि प्रकट झाले व त्यांनीं १८५७ सालच्या बंडाचा पूर्वोत्तर कालहि निर्विकार मनानें पाहिला. हें कित्येकांस चमत्कारिक वाटेल व ते अनुकूल क्रांति घडवून आणणाऱ्या जयिष्णु समर्थ रामदासांचें उदाहरण पुढें करतील. पण कोणीहि संत ईश्वरी योजनेंत फार करून ढवळाढवळ करीत नाहींत. हें समर्थांच्या देखतच संभाजीची जी कारकीर्द झाली, त्यावरून उघड दिसून येतें....

...नास्तिकवाद व अज्ञेयवाद यांनीं उडविलेल्या धुराळ्यांनें भाविकांची नजरबंदी होऊं नये व संतरूपानें ईश्वरी तेज आजहि प्रत्यक्ष आहे ही चुणूक त्यांस दाखवावी, इतकेंच संतांचें कार्य मर्यादित दिसतें. कालाचा ओघ फिरवावा हें संतांचें कार्य नव्हे. "

श्री. स. कृ. फडके यांचा हा विचार कुणालाहि पटण्यासारखा आहे. संत महात्मे किंवा श्रीसमर्थांसारख्या महान् अवतारी विभूति आपल्या अंगभूत सामर्थ्यानें ईश्वरी योजनेंत प्रत्येक वेळीं ढवळाढवळ करूं लागल्या तर जगरहाटीच थांबेल. कारण त्यांचें कार्य ईश्वरीयोजनेंत ढवळाढवळ करण्याचें नसून त्या योजनेला पुढें रेटणारें किंवा पूरक असें आहे. संत-सत्पुरुष हीं ईश्वराचींच रूपें असतात. त्यामुळें ईश्वरी नियम मोडणें म्हणजे स्वतः केलेले नियम स्वतःच मोडण्यासारखें तें हास्यास्पद होईल !

श्रीसमर्थांनादेखील भारतीयांचें पारतंत्र्य दिसत नव्हतें का? परंतु ' प्राप्तकाल घडी ' अद्याप आलेली नव्हती. ती येईपर्यंत लोकमानसांत श्रद्धायुक्त भक्तीच्या द्वारें खंबीर बैठक निर्माण करणें व संकल्पित कार्यासाठीं ' भगवंतांचें अधिष्ठान ' प्राप्त

करून देणें आवश्यक होतें, व तेंच कार्य श्रीसमर्थांनीं केलेलें आहे. किंबहुना त्या काळांत निर्माण झालेल्या सर्वच महान् विभूतींनीं प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें या कार्यास हातभार लावलेला आहे.

श्रीसमर्थांच्या अवतारकार्याचा महत्त्वाचा भाग श्रींच्या अक्कलकोट येथील आगमनानंतरच सुरूं होतो. त्या काळांत व्हिक्टोरिया राणीचें भारतावर राज्य होतें. हिंदुस्थानचा पहिला व्हाईसरॉय म्हणून लॉर्ड कॅनिंग हा इ. स. १८५८ मध्यें भारतांत आला. त्याची कारकीर्द इ. स. १८६२ पर्यंत झाली. त्यानंतर १८६२ ते १८८० या काळांत लॉर्ड मेयो, लॉर्ड नॉर्थब्रुक, लॉर्ड लिटन इत्यादि लोक व्हाइसरॉय म्हणून भारतांत येऊन गेले.

श्रीसमर्थांच्या अवतारकालांत भारतांतील राजकीय परिस्थिति अतिशय संघर्षमय होती. देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं अनेक लहान मोठीं बण्डें या काळांत झालीं. त्यांपैकीं १८५७ सालचें बंड प्रसिद्धच आहे. त्यानंतरचें, वासुदेव बळवंत फडके यांचें तेजस्वी क्रांतिकार्य सर्वश्रुत आहे. त्याची हकीकत पुढें येणारच आहे. असो.

## श्रीनृसिंहसरस्वती व श्रीस्वामी समर्थ

श्री स्वामी महाराजांनी केलेल्या पुष्कळशा चमत्कारांचें श्रीनृसिंहसरस्वतींच्या चमत्कारांशीं साम्य आहे, असें बारकाईनें पाहिल्यास दिसून येतें. उदाहरणार्थ, ' गुरुचरित्राच्या अडतिसाव्या अध्यायांत भास्कर नांवाच्या एका गरीब ब्राह्मणाची कथा विस्तारानें आलेली आहे. त्या ब्राह्मणाजवळ तीन माणसांना पुरेल इतकीच अन्नसामुग्री असतांना श्रीनृसिंहसरस्वतींनीं त्याच्या मनांतील भाव ओळखून त्या अन्नावर आपलें वस्त्र झांकून ठेवण्यास सांगून त्यावर आपल्या कमडलूंतील उदक शिंपडलें व भोजनास बसलेल्या

हजारों ब्राह्मणांना अन्न वाढण्याची आज्ञा केली. त्यावेळीं '**भरोनि नेती जितुकें अन्न पुनः मागुती परिपूर्ण**' असा चमत्कार घडला! हजारों ब्राह्मण, शूद्र, अंत्यज जेवून तृप्त झाले. जलचर आणि वनचर यांनादेखील त्या अन्नाचा लाभ मिळाला. आणि अशाप्रकारें त्या गरीब ब्राह्मणाची सामाराधना गुरुकृपेनें पूर्ण झाली.

अगदीं थेट अशाच प्रकारची चमत्कृतिपूर्ण हकीकत श्रीस्वामी समर्थांच्या अलौकिक चरित्रांत पहावयास मिळते.

## 'स्वामी सेवेलागी उभी अन्नपूर्णा'

सोलापूर जिल्ह्यांत रामपूर नांवाचें एक गांव आहे. तेथें रावजी पाटील या नांवाचा एक ब्राह्मण रहात असे. तो व त्याची एक जवळची नातलग स्त्री विठाबाई या दोघांची स्वामीसेवा मोठ्या निष्ठेनें चालू होती. या आपल्या प्रेमळ भक्तांना दर्शन देण्यासाठीं श्रीसमर्थ एखादेवेळीं रामपुरास येत.

एकदां श्रींची स्वारी अशीच रामपुरास आली होती. त्यांचे समवेत चोळप्पा, गणपतराव वगैरे निवडक सेवेकरी होते. त्यापूर्वी रावजी पाटलानें स्वामीमहाराजांप्रीत्यर्थ चाळीस ब्राह्मणांना भोजन घालण्याचा नवस केला होता. हें ब्राह्मणभोजन आतां श्रींच्या उपस्थितींतच पार पाडावें व नवसाची सांगता करावी असें ठरवून रावजी आणि विठाबाई यांनीं अन्नसामुग्री जमवून चाळीस माणसांना पुरेल इतका स्वयंपाक तयार केला व श्रीसमर्थांना मंगलस्नान घालून त्यांची षोडशोपचारें पूजा केली.

श्रींची स्वारी रामपुरास आल्याचें समजल्यामुळें आजूबाजूच्या गांवांतील हजारों लोक श्रींच्या दर्शनासाठीं आले होते. त्यादिवशीं रामपुरास खरोखरच एखाद्या जत्रेचें स्वरूप प्राप्त झालें होतें.

रावजी आणि विठाबाई या दोघांनीं पानें मांडून श्रींना भोजनासाठीं उठण्याची विनंति केली. परंतु श्रींची स्वारी कांहीं केल्या उठेना. त्यामुळें रावजी आणि विठाबाई यांना मोठी चिंता पडली. तेवढ्यांत आपलें हुक्कापान थांबवून श्रींनी रावजीला म्हटलें, '**सर्वांचीं भोजनें होऊं द्यात. मग आम्ही जेवूं.**'

परंतु इतक्या सर्व हजारों लोकांना चाळीस माणसांचा स्वयंपाक कसा पुरणार ? रावजीला पुन्हां चिंता पडली.

परंतु त्याच्या मनांतील ही चिंता ओळखून स्वामीमहाराजांनीं रावजीला बोलावून एक मोठी टोपली आणावयास सांगितली. रावजीनें पळतच जाऊन बाजारांतून एक मोठी टोपली विकत आणली. नंतर श्रींनीं तींत पोळ्या, भात वगैरे भोजनाचे सर्व पदार्थ ठेवण्यास सांगून त्यावर देव्हाऱ्यांतील देवी, खंडोबा वगैरे देवतांचे टांक ठेवले आणि त्यावर पुन्हां पोळ्यांची चवड रचली. नंतर रावजी व विठाबाई या दोघांकडून अन्नपूर्णेची यथाशास्त्र पूजा करवून घेऊन व ती टोपली विठाबाईच्या डोक्यावर देऊन तिला तुळशीला तीन प्रदक्षिणा घालण्यास सांगितलें. विठाबाईनें त्याप्रमाणें प्रदक्षिणा घातल्यावर श्रींनीं ती टोपली स्वतःचे पलंगाजवळ ठेवण्यास सांगून मंडळींचीं पानें वाढण्याची आज्ञा केली. फक्त स्वयंपाकघरांतून अन्न घेऊन बाहेर आल्यावर पुन्हां मागें वळून पहावयाचें नाहीं एवढा एकच नियम श्रींनीं त्या दोघांना कटाक्षानें पाळण्यास सांगितला.

त्या दिवशीं हजारों पानांच्या पंगती उठल्या, परंतु टोपलींत मात्र पूर्वीइतकेंच अन्न शिल्लक राहिलें ! अशाप्रकारें रात्रीपर्यंत भोजनाचा कार्यक्रम अविरत सुरू होता. परंतु श्रींनीं अद्याप भोजन केलें नव्हतें. श्रींची स्वारी अजूनहि उपाशी आहे हें पाहून रावजी भाटलाच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. त्यानें श्रींच्या चरणीं लोटा-

गण घालून 'आतां तरी कृपावंत होऊन भोजनास उठावें' अशी त्यांना कळवळून प्रार्थना केली.

परंतु श्रीसमर्थ हंसून म्हणाले, 'अजून आमचे बाप-आजे आले नाहींत. ते जेवल्यावर आम्ही भोजन करूं.'

श्रींच्या या असंबद्ध भाषणाचा अर्थ कुणालाच समजला नाहीं. परंतु तितक्यांत सोलापुराकडील कांहीं सरकारी कारकून मंडळी श्रींच्या दर्शनार्थ आली. तेव्हां त्यांनाहि भोजनाचा प्रसाद मिळाला. अशाप्रकारें हजारों भक्तांचे आत्मे सुग्रास भोजनानें तृप्त झाल्यानंतरच श्रींची स्वारी भोजनास उठली.

दुसरे दिवशीं सेवेकऱ्यांनीं श्रींच्या पलंगाखालीं ठेवलेली टोपली उघडून पाहिली तेव्हां तींत पूर्वीइतकेंच अन्न आढळून आलें! तो प्रकार पाहून सर्वांनाच श्रीसमर्थांच्या अगाध लीलेचें परमकौतुक वाटलें.

## श्रीवामनबुवा लिहितात-

'स्वामी सवेंच अन्नपूर्णा। एकहीपदार्थ नसे उणा। सिद्धि तयांचे पादसेवना। तत्पर असती रात्रंदिन॥' (गु. १४-५१)

भगवान् श्रीकृष्णांनीं श्रीमद्भागवताच्या अकराव्या स्कंधांत वर्णन केलेल्या सर्व अष्ट महासिद्धि श्रीसमर्थांच्या दरबारांत अष्टौप्रहर राबत होत्या. त्यांचा उपयोग स्वतःचें अलौकिकत्व सिद्ध करण्यासाठीं नव्हे तर अश्रद्धांच्या मनांत ईश्वराविषयीं श्रद्धा निर्माण करून त्यांना **भक्तिमार्गाकडे** वळविण्यासाठीं ते करीत असत. श्रीसमर्थांच्या अलौकिक चमत्कारांकडे पाहतांना याच भूमिकेंतून पाहिलें पाहिजे असें आमचें मत आहे.

## सद्भक्तांना प्राणदान

श्रीनृसिंहसरस्वतींप्रमाणेंच श्रीसमर्थांनींदेखील आपल्या कांहीं सद्भक्तांना प्राणदान केल्याची आश्चर्यकारक नोंद श्रींच्या दिव्य चरित्रांत आढळते.

अक्कलकोट संस्थानांत बाबासाहेब जाधव म्हणून एक मानकरी होते. त्यांचा मृत्युकाळ जवळ आल्याचें ओळखून श्रीसमर्थ एक दिवस त्यांना जवळ बोलावून म्हणाले, 'अरे कुंभार, तुझ्या नांवाचीं चिठ्ठी आली आहे.'

श्रींच्या भाषणावरून बाबासाहेबांनीं ओळखलें कीं आतां आपण कांहीं फार दिवस वांचत नाहीं ! त्यामुळें घाबरून जाऊन बाबासाहेबांना रडें कोसळलें. व श्रींच्या चरणांना घट्ट मिठी मारून ते कळवळून म्हणाले, 'महाराज ! अजून स्वामीसेवा करण्याची इच्छा आहे.'

श्रींच्या दयेचा मेघ सद्भक्तांवर नेहमींच वर्षत असे. बाबासाहेबांचे ते शब्द ऐकून श्रींना त्यांची दया आली व त्यांनीं समोरच्या बैलाकडे हात करून 'जा बैलाकडे' असे शब्द उच्चारले. त्याबरोबर समोर उभा असलेला तो दांडगा बैल धाडकन् भूमीवर पडून गतप्राण झाला.

अशाप्रकारें श्रीसमर्थांनीं भक्ताचें मरण पुढें ढकलून त्या बैलाला कष्टदायकहि अशा वृषभ योनींतून मुक्ति दिली !

अशीच दुसरी एक विलक्षण हकीकत रावण्णा नांवाच्या एका स्वामीभक्ताबाबत सांगितली जाते.

एकदां श्रींची स्वारी फिरत फिरत इटगी नांवाच्या गांवास

गेली. श्रींच्या समवेत अनेक सेवेकरी मंडळी होती. त्यामधेंच वर उल्लेखिलेले श्री. बाबासाहेब जाधवहि होते.

त्यादिवशीं इटगी गांवाचा रावण्णा वाणी नेहमींप्रमाणें आपल्या शेतांत नांगर हांकीत असतां, त्यास सर्पदंश होऊन तो भयंकर वेदनांमुळें कासावीस होऊन धरणीवर गडबडां लोळूं लागला. त्याची ही स्थिति पाहून त्याच्या आप्त मंडळींनीं त्याला एका कांबळ्यांत गुंडाळून मारुतीच्या देवळांत नेऊन ठेवलें. त्याचें शरीर हळूंहळूं थंडगार पडत होतें व तो आतां वांचत नाहीं अशी सर्वांची खात्री होऊन चुकली.

ही गोष्ट बाबासाहेब जाधव यांना समजतांच त्यांना रावण्णाची दया येऊन रावण्णास गुण पडावा म्हणून त्यांनीं श्रीसमर्थांच्या चर्मपादुका आणून त्या रावण्णाचे डोकीवर ठेवल्या. त्यावेळीं श्रीसमर्थ निद्रिस्तावस्थेंत होते.

परंतु बाबासाहेबांनीं ही कृति करतांच श्रीसमर्थ ताड्कन उठून बसले आणि त्यांनीं रुद्रावतार धारण करून बाबासाहेबांना शिव्या देण्यास सुरुवात केली. श्रींची स्वारी क्रोधाविष्ट झालेली पाहून सर्व सेवेकरी दूर जाऊन लपून बसले.

तेवढ्यांत श्रींनीं बाबासाहेबांना हांक मारून संतप्त मुद्रेनें म्हटलें, 'अरे, मुर्द्याच्या डोकीवर जोडा कशाला ठेवलास ?'

श्रीसमर्थांच्या उग्र मुद्रेकडे बाबासाहेबांना एक सेकंदहि टक लावून पाहणें शक्य नव्हतें. या रागाच्या भरांत ते काय करतील कुणास ठाऊक, त्यापेक्षां आपणहि येथून पळून जावें असें ठरवून बाबासाहेबहि दूर जाऊन लपून बसले.

इकडे समर्थांनीं रागाच्या भरांत आपली टोपी काढून जमिनीवर जोरांत आपटली. त्यानंतर क्रमाक्रमानें सर्वच कपडे काढून ते पूर्ण दिगंबर बनले. मग त्यांनीं कोपऱ्यांत लपून बसलेल्या

बाबासाहेबांना मोठ्यानें हांक मारून म्हटलें, ‘ए भोसडीच्या, ए चोदीच्या, मुर्द्याच्या डोकीवर जोडा ठेवण्यास तुला कुणीं सांगितलें ?’

बाबासाहेबांचें सर्व शरीर भीतीनें थरथरत होतें. त्यांना पुढें बोलावून समर्थांनीं रावण्णाच्या कानांत जोरानें हांक मारण्याची आज्ञा केली. बिचारे बाबासाहेब लटपटत्या पायांनीं कसेबसे रावण्णाच्या मृतवत् देहाजवळ गेले व त्यांनीं त्याचे कानांत हांक मारली. असें एक दोन वेळां झालें, परंतु उपयोग होईना. तेव्हां समर्थ ओरडले, ‘अरे, दोन्ही कानांत मोठ्यानें हांक मार.’

तेव्हां बाबासाहेबांनीं होतें नव्हतें तेवढें अवसान आणून ‘रावण्णा ऽ रावण्णा ऽऽ’ अशा हांका रावण्णाच्या कानाशीं लागून मारल्या.

आणि थोड्याच वेळांत रावण्णा शुद्धीवर येऊन त्यानें डोळे उघडले व तो आश्चर्यचकित परंतु भयभीत नजरेनें आजूबाजूच्या लोकांकडे पाहूं लागला.

रावण्णा जिवंत झालेला पाहून सर्वांनीं स्वामीसमर्थांच्या नांवाचा जयजयकार केला.

या हकीकतीवरून असें वाटतें कीं, आपल्या चर्मपादुकांचें सत्व राखण्यासाठींच श्रीसमर्थांना प्राणदानाचें हें निसर्गनियमाविरुद्ध असलेलें कार्य करावें लागलें असलें पाहिजे. नृसिंहसरस्वती, श्रीपादश्रीवल्लभ, श्रीवासुदेवानंद सरस्वती, चिंचवडचे श्रीचिंतामण देव इत्यादींच्या अलौकिक चरित्रांत अशाच प्रकारचे चमत्कार घडल्याची नोंद आहे. अनंताच्या निदिध्यासानें अनंताची किल्ली या महापुरुषांना सांपडलेली असते व त्यायोगें ‘कर्तुमकर्तुंअन्यथा कर्तुम्’ असें लोकविलक्षण सामर्थ्य त्यांना प्राप्त होतें असतें. परंतु तसाच प्रसंग आल्याशिवाय हे महापुरुष आपल्या या अधिकाराचा वापर करीत नाहींत. श्रीनृसिंहसरस्वतींनीं एका सती

जाण्यास निघालेल्या स्त्रीला चुकून 'अष्टपुत्रा भव' असा आशीर्वाद दिला. तेव्हां ती स्त्री सती जाण्यास निघाली आहे असें लोकांनीं त्यांना सांगितलें. तेव्हां त्याप्रसंगीं दिलेला आशीर्वाद परत घेणें तर शक्यच नव्हतें. त्यामुळें तिच्या पतीला जिवंत करणें हा एकच पर्याय श्रीनृसिंहसरस्वतींसमोर होता. कारण ते तसें न करते तर त्यांचेविषयीं लोकमानसांत अश्रद्धा निर्माण होऊन त्यांच्या अंगीकृत कार्याला तें बाधक ठरलें असतें व म्हणून त्या स्त्रीच्या पतीचे पुढील जन्माचें आयुष्य विधात्याकडून मागून घेऊन श्रीगुरूंनीं त्या स्त्रीच्या पतीस जिवंत केलें !

हा अधिकार फार मोठा आहे व तो विधात्यानें तशाच जबाबदार व्यक्तींच्या हातीं सोंपविलेला असतो. एखादेवेळीं भलत्याच मनुष्याच्या हातीं हा अधिकार दैववशेंकरून आला तर काय अनवस्था प्रसंग ओढवतो हें श्रीएकनाथ महाराजांच्या चरित्रांतील पुढील एका हकीकतीवरून वाचकांना समजून येईल.

मृत्युंजयाचें अनुष्ठान सिद्ध होऊन आपणांला प्रेतें उठवितां यावींत असा हेतु मनांत धरून एक स्वार्थी व लबाड ब्राह्मण कित्येक दिवस श्रीनाथांची सेवा करीत होता. एक दिवस त्याच्या सेवेचें फळ त्याच्या पदरांत टाकावें असा विचार करून नाथांनीं त्याला बोलावून त्याच्या सेवेचा हेतु त्यास विचारला. त्यावर आनंदित होऊन तो ब्राह्मण म्हणाला, 'मला संजीवनी विद्येची प्राप्ति करून द्या '

त्याचें तें अजब मागणें ऐकून नाथांना वाईट वाटलें. ते त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणाले, 'बाबारे, या मंत्रानें तुझें मुळींच हित होणार नाहीं, त्यापेक्षां तूं दुसरें कांहीं मागून घे.' परंतु तो लबाड ब्राह्मण आपला हट्ट सोडीना. तेव्हां नाथांनीं निरुपायानें त्याची ती अजब इच्छा पुरी केली.

या मंत्रसिद्धीमुळें तो मूळचाच गर्विष्ठ असलेला ब्राह्मण

अधिकच बेभान झाला. एकदां तो रस्त्यानें जात असतां त्याला एक गाढव मरून पडलेलें दिसलें. तेव्हां त्यानें मंत्राचा उपयोग करून तें गाढव ताबडतोब जिवंत केलें !

ही गोष्ट जेव्हां नाथांना समजली तेव्हां त्यांना कल्पनातीत दुःख झालें गर्दभयोनीसारख्या कष्टप्रद योनींतून मुक्त झालेल्या त्या गरीब, दुर्दैवी जिवाला जिवंत करून पुन्हां त्या योनींत ढकलणें हें किती अविचाराचें कृत्य होतें बरें ? अशा अविचारी माणसाच्या हातीं ही ईश्वरी सत्ता ठेविल्यास तो किती अनवस्था प्रसंग निर्माण करील याचा विचारच त्यांना करवला नाहीं व त्यांनीं त्या मूर्ख मनुष्याला जिवंत समाधि दिली !

**सारांश – मूर्ख मनुष्याला मोठी विद्या प्राप्त झाली तरी ती जगाला उपकारक ठरत नाहीं. म्हणूनच ईश्वरी सत्तेचा उपयोग करण्याची पात्रता व अधिकार कांहीं मोजक्याच अधिकारी पुरुषांना दिल्याचें या जगांत आढळून येतें !**

## समंधबाधेंतून मुक्तता

अक्कलकोटपासून पांच–सहा मैलांचे अंतरावर बसलगांव म्हणून एक गांव आहे. एकदां श्रीसमर्थांची स्वारी फिरत फिरत या गांवास आली. श्रीसमर्थ जेथें जेथें जात तेथें तेथें त्यांच्या दर्शना-साठीं हजारों लोक गर्दी करीत !

बसलगांवास आल्यावर श्रीसमर्थांनीं माळावरील देवीच्या मंदिरांत आपला मुक्काम ठेवला. बसलगांवांत देवीचें आणखी एक स्थान आहे. स्थानापन्न झाल्यावर श्रीसमर्थांनीं सोबत आलेल्या काशिनाथपंत सेवेकऱ्यास आज्ञा केली, 'काशिनाथपंत, गांवांत नथनीस ( भवानीदेवीस ) मी आलों म्हणून सांग.'

त्याप्रमाणें काशिनाथपंत श्रींचा निरोप देवीला पोहोंचविण्या-

साठीं निघून गले.

श्रींचा मुक्काम बसलगांवास होणार असें समजल्यावरून सोलापूरचा एक शिंपी सहकुटुंब बसलगांवास आला होता. त्याला समंधबाधेमुळें जीवन नकोसें झालें होतें. श्रीसमर्थांच्या कृपेनें यावर कांहीं इलाज होतो का हें पाहण्यासाठीं तो मुद्दामच आला होता. त्यानें श्रींचें दर्शन घेऊन त्यांचेजवळ नैवेद्य करण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्याचा भक्तिभाव पाहून श्रींनीं त्यास तशी परवानगी दिली. त्यामुळें त्याच्या आनंदास पारावारच राहिला नाहीं! त्यानें ताबडतोब पन्नास पात्रांचा स्वयंपाक तयार केला व श्रींना मंगलस्नान घालून त्यांची षोडशोपचारें पूजा केली व आरती करून भोजनाचीं पानें मांडलीं. यावेळींहि श्रीसमर्थमाऊलींनीं 'अगोदर सर्वांना भोजन घाला मग आम्हीं जेवूं' असें सांगितलें. त्याप्रमाणें पांचशें पान झाले. स्वयंपाक फक्त पन्नास पानांचाच केलेला होता. परंतु येथेंहि रामपूरसारखाच चमत्कार घडला. त्यानंतर श्रीसमर्थांनींहि मोठ्या आनंदानें भोजन उरकलें.

भोजनोत्तर तो शिंपी श्रींच्या जवळ येऊन नम्रपणें हात जोडून बसला. त्याबरोबर त्याच्या शरीरांत पिशाच्चानें संचार केला आणि तो शिंपी मोठमोठ्यानें ओरडत समर्थांपुढें नाचूं लागला.

श्रीसमर्थ हा प्रकार शांतपणें पहात होते. त्यांचें हुक्कापान मोठ्या मजेंत सुरू होतें. असा बराच वेळ गेल्यावर तो समंध समर्थांच्या पाया पडून गती मागूं लागला. तेव्हां श्रींनीं कृपाळूपणें त्याची इच्छा पूर्ण केली. अशाप्रकारें पिशाच्चबाधेंतून मुक्त होऊन तो शिंपी मोठ्या आनंदानें आपल्या गांवीं निघून गेला.

## चुला फेकून प्रदीप्त केलेला अग्नि ! —

शिर्डीच्या साईबाबांनीं पणत्यांत पाणी टाकून पणत्या

पेटविल्या. कांहींशी अशाच प्रकारची एक विलक्षण हकीकत श्री-समर्थांच्या दिव्य चरित्रांत वाचावयास मिळते.

अक्कलकोटास भगवंत अप्पा सुतार या नांवाचा एक मनुष्य होता. तो समर्थांचा अनन्य उपासक होता. श्रींच्या कृपेनें त्याच्या शेतांतील विहिरीस भरपूर पाणी लागल्यामुळें एकदां श्रींना भोजनासाठीं आपल्या शेतांत बोलवावें असें वाटून त्यानें एक दिवस स्वामीसमर्थांना मोठ्या आग्रहानें आपल्या शेतांत नेलें.

भोजनोत्तर सायंकाळच्या सुमारास मंडळींनीं हुरडा भाजण्यासाठीं एक आगटी तयार केली. श्रींची स्वारीहि थोड्या वेळानें आगटीजवळ येऊन बसली. तेथें जवळच पाण्याची एक भरलेली घागर होती. श्रीसमर्थांच्या मनांत काय आलें कुणास ठाऊक, ते एकदम उठले व घागरींतील पाणी ओंजळींत घेऊन भराभर आगटीवर चुळा फेकूं लागले. त्यामुळें वास्तविक आगटी विझावयाची. परंतु समर्थ जसजसे त्या आगटीवर चुळा फेकूं लागले तसतशी ती आगटी अधिकच प्रदीप्त होऊन तेजस्वी दिसूं लागली. होमकुंडांत तुपाची आहुति दिल्यावर ज्याप्रमाणें अग्नीच्या ज्वाळा अधिकच भडकून तेजस्वी दिसूं लागतात त्याप्रमाणें प्रकार होऊं लागला. घागरींतील सर्व पाणी संपेपर्यंत श्रींचा हा विचित्र खेळ चालूं होता. तो चमत्कार पाहून श्रींच्या अगाध लीलेचें परमकौतुक वाटून सर्व मंडळी श्रींना शरण गेली.

## युरोपियन इंजिनियरला पुत्रप्राप्ति

सोलापुरास एक युरोपियन गृहस्थ होता. तो रेल्वेखात्यांत डिस्ट्रिक्ट इंजिनियरच्या हुद्द्यावर होता. एकदां मनांत कांहीं हेतु धरून तो स्वामीसमर्थांच्या दर्शनासाठीं अक्कलकोटास आला.

त्याच्याकडे पाहतांच श्रीसमर्थ एकदम म्हणाले, ‘ क्या

तेरेकू बेटा होना ? हो जायगा एक बरस दिनमें. '

तो युरोपियन गृहस्थ पुत्रप्राप्तीची इच्छा मनांत धरूनच तेथें आला होता. श्रीसमर्थांनीं आपल्या मनांतील हेतु बरोबर ओळखून तसाच आशीर्वाद दिल्याचें पाहून तो कमालीचा आश्चर्यचकित झाला व श्रींच्या कुसुमकोमल चरणांवर विनम्रपणें मस्तक ठेवून आनंदानें सोलापुरास निघून गेला.

पुढें एक वर्षाचे आंतच त्याला श्रींच्या आशीर्वादाप्रमाणें पुत्ररत्नाचा अमोल लाभ झाला व तो श्रींचा परमभक्त बनला.

## ' क्यों, कितने हजार आँख तुमने फोडे ?'

एकदां सर जमशेटजी जिजीभाईचे दवाखान्यांतील डोळ्यांचे एक इस्रायली जातीचे डॉक्टर नाताळच्या सुटींत सहज गंमतीखातर अक्कलकोटास आले. सहलीबरोबरच एका दिव्य विभूतीच्या दर्शनाचा योगहि त्यांनीं साधला होता.

ते स्वामी समर्थांच्या दर्शनासाठीं येतांच श्रीसमर्थ त्यांच्याकडे पाहून सहज म्हणाले, '**क्यों, कितने हजार आँख तुमने फोडे?**'

आपली कांहींच माहिती नसतांना श्रीसमर्थांनीं आपला पेशा कसा काय अचूक ओळखला याचें त्यांना त्यावेळीं विलक्षण आश्चर्य वाटलें. व स्वामीमहाराजांविषयीं भक्तिभाव उत्पन्न होऊन ते थोड्याच दिवसांत सहकुटुंब अक्कलकोटास आले व उर्वरित आयुष्य त्यांनीं स्वामीसेवेसाठींच वाहून टाकलें !

स्वामीमहाराजांच्या अंतरसाक्षित्वाच्या अशा किती म्हणून गोष्टी सांगाव्यात ? पुढील एक छोटीशीच गोष्ट पहा–

## ' लखो गूळ खातो, माका देत नाय-'

स्वामीसमर्थ एखाद्या वेदांती गृहस्थाबरोबर ज्याप्रमाणें वेदांतांतील गुह्य गोष्टींवर बोलत, त्याचप्रमाणें एखाद्या अशिक्षित

माणसाशीं बोलण्याचा प्रसंग आला तर त्याला समजेल अशा त्याच्या भाषेंतहि तितक्याच सहजपणें बोलून त्याच्याशींहि चटकन् समरस होऊन जात.

एकदां मोठीच गंमत झाली. १८७० सालीं मुंबईहून ‘स्वामीसुतां’ चे मठांतून श्रीब्रह्मचारीबाबा हे कांहीं बालू लोकांना बरोबर घेऊन महाराजांचे दर्शनासाठीं अक्कलकोटास आले होते.

दर्शन घेऊन ब्रह्मचारीबाबा स्वयंपाकास लागले. त्यावेळीं श्रींची स्वारी चोळप्पाच्या मठांत होती. स्वयंपाक करतां करतां डब्यांत गूळ नाहीं हें लक्षांत येतांच ब्रह्मचारीबाबांनी लखू नांवाच्या बाल्यास एक दिडकी देऊन बाजारांतून गूळ आणण्यास पाठविलें.

त्यावेळीं कांहीं बालू मंडळी चोळप्पाच्या मठांतच श्रींच्या सन्निध बसलेली होती. थोड्यावेळानें श्रीसमर्थ त्यांच्या भाषेंत त्यांना म्हणाले, ‘**लखो, भोसडींचा गूळ खाता, माका देत नाय.**’ असें म्हणून ते ‘हूं हूं हूं’ करून मोठ्यानें रडूं लागले. त्यावर त्या बालू लोकांतील भगवान येशी मांजरेकर हा बाल्या चटकन् उठून बाजाराकडे गेला. तेव्हां त्यास वाटेंतच लख्या भेटला. त्याच्या तोंडांत गुळाचा एक मोठा खडा दिसत होता. तें पाहून भगवान त्याच्यावर ओरडून म्हणाला, ‘अरे मूर्खा, महाराजांकरितां आणलेला गूळ तूं कां खातोस ? तिकडे महाराज तुझ्या नांवानें ओरडत आहेत ना ?’

लखू बिचारा घाबरून गेला व पळत येऊन महाराजांच्या चरणीं लागला.

सर्वसाक्षी समर्थांनीं लखूचा खादाडपणा उघडकीस आणला यांत विशेष आश्चर्य नाहीं परंतु कोंकणांतील बालू लोकांची भाषा ते केव्हां शिकले तें त्यांचें त्यांनाच ठाऊक !

श्रीस्वामीसमर्थांची लीला अशी अगम्य होती !

## बंबसाहेब

अक्कलकोटच्या राजेसाहेबांच्या पदरीं कोंडूनाना वाकनीस नांवाचे एक गृहस्थ होते. हे कोंडूनाना स्वामीसमर्थांचे एकनिष्ठ भक्त होते.

एक दिवस सकाळीं कोंडूनाना बर्हिर्विधि उरकून खासबागेचे विहिरीवर मुखमार्जन करण्यासाठीं आले. ते विहिरींत उतरून हातपाय धूत आहेत ही गोष्ट त्याचवेळीं खासबागेंत फिरावयास आलेल्या बंबसाहेब या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेस आली. तेव्हां त्यांचें पित्त खवळून त्यांनीं करड्या स्वरांत कोंडूनानांना वर येण्यास फर्माविलें व त्यानुसार कोंडूनाना घावरतच वर आले.

तेव्हां बंबसाहेबांनीं त्यांच्यावर शिव्यांचा वर्षाव करून पेकाटांत बुटाच्या दोन–तीन लाथा मारल्या व शिपायांकडून त्यांस धक्के मारवून दूर हांकून दिलें !

बंबसाहेब अक्कलकोट संस्थानचे वरिष्ठ अधिकारी असल्यामुळें कोंडूनानास हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार निमूटपणें सहन करावा लागला. परंतु मनांतून त्यांना मरणप्राय दुःख झालें होतें. हें दुःख ते श्रीसमर्थांशिवाय दुसऱ्या कुणाला सांगणार ?

कोंडूनानांची हृदयद्रावक हकीकत ऐकून श्रीसमर्थांचें कोमल अंतःकरण द्रवलें ! परंतु ते त्यावेळीं कांहीं बोलले नाहींत.

पुढें एक दिवस स्वामीमहाराज सहज फिरत फिरत बंबसाहेबांच्या अलिशान बंगल्यावर गेले. त्यांना आलेलें पाहून बंबसाहेबांनीं गडबडीनें धांवत येऊन त्यांचें आगतस्वागत केलें व त्यांना बसण्यासाठी आसन मांडलें. परंतु श्रीस्वामीसमर्थ त्या आसनावर न बसतां बंबसाहेबाकडे पाहून म्हणाले, ‘ **तांदूळ धुतलेलें पाणी पिऊन बैस.** ’

श्रीसमर्थांनीं फक्त एवढेंच शब्द उच्चारले व ते रागारागानें तेथून निघून मठांत आले !

बंबसाहेबाला श्रींच्या या शब्दांचा कांहींच अर्थ समजला नाहीं. ते अवाक् होऊन श्रीसमर्थांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे वेड्या-सारखे पहातच राहिले.

परंतु पुढें लवकरच या शब्दांतील गूढार्थ त्यांना समजला.

त्याचें असें झालें—

एक दिवस बंबसाहेब बागेंतून फिरत असतां त्यांच्या पायास एक विषारी किरडूं चावलें व असह्य वेदना होऊं लागल्या. त्यांचा तो पाय जवळजवळ निकामीच झाला. त्यांना घरांतल्या घरांतहि कुबडी घेतल्याशिवाय फिरणें मुष्किल झालें ! एवढेंच काय परंतु घोड्यावर बसणेंहि अशक्य होऊन गेलें. त्यांनीं पायाचें हें दुखणें बरें होण्यासाठीं मोठमोठ्या नामांकित डॉक्टरांचे औषधोपचार सुरूं केले, परंतु कशानेंहि गुण येईना !

शेवटीं कांहीं डॉक्टरांनीं त्यांना शस्त्रक्रिया करून पाय काप-ण्याचा सल्ला दिला. परंतु बंबसाहेबांना तो विचार मानवला नाहीं. अशाप्रकारें सर्व मानवी उपाय हरल्यावर त्यांनीं दैवी उपाय कर-ण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें त्यांनीं मोरोपंत काशी नांवाच्या एका रिटायर्ड मामलेदारांमार्फत ही गोष्ट स्वामीमहाराजांकडे काढली.

तेव्हां बंबसाहेबास झाली ही शिक्षा पुरें असें वाटून श्रीसमर्थ मोरोपंतांस म्हणाले,

**‘ तांदूळ धुऊन त्या पाण्यांत अळूचे कांदे कुस्करून खावेत व ते पाणी प्यावें. ’**

मोरोपंतानें पळतच जाऊन हा उपाय बंबसाहेबांस कळविला व त्याप्रमाणें करतांच बंबसाहेबांचा पाय आठएक दिवसांतच खड-खडीत बरा झाला !

## 'बाई, तुझे हजार ब्राह्मण जेवले बरे !'

मुंबईच्या एका ब्राह्मण गृहस्थाला शेअर बाजारांतील व्यवहारांत अमाप पैसा मिळाला. परंतु मूलबाळ नसल्यामुळें तो व त्याची बायको नेहमीं खिन्न असत. त्यामुळें पुत्रप्राप्तीसाठीं कांहीं दैवी उपाय करून पहावेत असा विचार करून त्या ब्राह्मण दांपत्यानें गाणगापुरास जाऊन नवस केला कीं, 'आपणांस दत्तप्रभूच्या कृपेनें पुत्ररत्नाचा लाभ झाला तर आपण सहस्र ब्राह्मण भोजन घालूं.'

गाणगापूर हें स्थान अतिशय जागृत आहे. तेथें दत्तावतार श्रीनृसिंहसरस्वतींनीं शैल्यगमनापूर्वी आपल्या निर्गुण पादुका ठेविलेल्या आहेत. त्या पादुकांच्या रूपानें प्रत्यक्ष नृसिंहसरस्वतींचाच वास तेथें आहे.

श्रीशैल्यगमनापूर्वी श्रीनृसिंहसरस्वतींनीं आपल्या भक्तांना पुढीलप्रमाणें स्वच्छ सांगितलें आहे--

**'आम्हीं असतों याचि ग्रामीं । स्नानपान करूं अमरजा संगमीं ।**
**गौप्यरूपें राहातों नियमीं । चिंता कांहीं तुम्हीं न करावी ।।**

त्यामुळें गाणगापुरास दृढ श्रद्धा ठेवून जे नवस करतात त्यांच्या गाऱ्हाण्याची दाद परमेश्वराच्या दरबारांत लागल्याशिवाय कधींहि रहात नाहीं !

त्याप्रमाणें त्या श्रद्धावान् पुण्यशील ब्राह्मण दांपत्यानें केलेला नवस ईश्वराच्या दरबारीं रुजूं झाला व वर्षभरांतच त्यांच्या घरीं पाळणा हलूं लागला त्यामुळें त्या दोघांच्या आनंदास पारावारच राहिला नाहीं !

परंतु जीवनाचें महावस्त्र हें सुखदुःखाच्या तंतूंनीं विणलेलें आहे! हे तंतू इतक्या सफाईनें विणलेले आहेत कीं, सुखाचा तंतू कोठें संपला व दुःखाचा कोठें सुरूं झाला हें कोणासहि समजावयाचें

नाहीं ! त्यामुळेंच परम सुखाच्या क्षणींदेखील मनुष्यानें फार हुरळून जाऊं नये किंवा दुःखातिरेकानें निराश होऊं नये !

पुत्रजन्मामुळें हें दांपत्य सुखाच्या परमोच्च शिखरावर विराजमान झालेलें असतांनाच कालचक्र फिरलें आणि शेअर-बाजारांत विलक्षण फटका बसल्यामुळें त्या ब्राह्मणाला लक्षाधिशाचें भिक्षाधीश होण्याचें नशिबीं आलें ! आणि थोड्याच दिवसांत हाय खाऊन तो ब्राह्मण मृत्युमुखीं पडला !

अशाप्रकारें त्या ब्राह्मण स्त्रीवर एकापाठोपाठ एक संकटांच्या राशी येऊन कोसळल्या. तरीपण बिचारीनें आपल्या बाळाकडे पाहून त्या सर्व आपत्तींना निर्धारानें तोंड दिलें.

परंतु एका गोष्टीची रुखरुख तिला चैन पडूं देईना. आपण पुत्रलाभासाठीं गाणगापुरास जाऊन सहस्र ब्राह्मण भोजनाचा नवस केला आहे. त्याचें काय करायचें ?

घरची परिस्थिति तर मोठी बिकट झालेली ! स्वतःचें आणि आपल्या तान्हुल्याचें भागवितां भागवितांच नाकीं नऊ आलेले !

श्रीरामदासांनीं म्हटल्याप्रमाणें—

'**नसे अंथराया नसे पांघराया । नसे धाम ना दृढ छाया निजाया ।**' अशी तिच्या संसाराला अवकळा आलेली ! अशा परिस्थितींत ती बिचारी सहस्रभोजनाचा नवस कसा काय फेडणार ? तिची कांहींच मति चालेना ! म्हणून शेवटीं ती आपल्या शेजारणीकडे गेली. त्या शेजारणीच्या मुखानें जणूं दत्तप्रभूच बोलले ! ती शेजारीण म्हणाली, 'तूं तुझ्या पुत्रासह गाणगापुरास जा आणि तेथें दत्तपादुकांची सेवा कर. म्हणजे दत्तप्रभूच तुझा नवस फेडून घेतील !'

हा विचार तिच्या मनाला पटला आणि त्याप्रमाणें ती तान्हुल्याला घेऊन गाणगापूरास गेली व तिनें मनोभावें दत्तपादुकां-

वर अभिषेक केला. त्या निर्गुण, दिव्य पादुकांपुढें हात जोडून ती म्हणाली, 'हे देवाधिदेवा ! तूंच आतां माझा नवस फेडून घे !'

त्याच रात्रीं तिला दृष्टांत झाला. 'तूं अक्कलकोटास जाऊन स्वामीमहाराजांस भोजन घाल म्हणजे तुझा सहस्र भोजनाचा नवस फिटेल !'

त्या दृष्टांतामुळें तिच्या आनंदाला पारावारच राहिला नाहीं ! ती तशीच अक्कलकोटास आली. तेथें दत्तात्रेयस्वरूप स्वामीमहाराज बाललीला करीत आनंदांत बसले होते. बाईनें त्यांना दुरूनच प्रणिपात केला. त्या साक्षात् दत्तप्रभूंच्या अवतारी रूपाकडे पाहून तिच्या मनांत कदाचित् तुकोबांचा पुढील अभंग स्फुरला असेल का ? श्रीदत्तात्रेयाच्या अतिमनोहर षड्भुज मूर्तीकडे पाहून तुकोबा तन्मयतेनें प्रार्थना करतात–

**'नमन माझें गुरुराया । महाराजा दत्तात्रेया ॥ १ ॥**
**तुझी अवधूत मूर्ति । माझ्या जीवाची विश्रांति ॥ २ ॥**
**जीवीचें सांकडें । कोण उगवील कोडें ॥ ३ ॥**
**अनसूया सुता । तुका म्हणे पाव आतां ॥ ४ ॥**

स्वामीमहाराजांनीं तिचा भक्तिभाव ओळखला. तिला समोर बोलावून घेतलें व नैवेद्य दाखविण्याची आज्ञा केली. मग त्या बाईचा उत्साह काय विचारतां ! तिनें ताबडतोब गूळ, तूप, कणिक इत्यादि पदार्थांचा उपयोग करून नैवेद्य तयार केला. स्वामीमहाराजांनीं–समर्थांनीं–यथेच्छ भोजन केलें आणि ते प्रसन्नपणें हंसून म्हणाले, '**बाई, तुझे हजार ब्राह्मण जेवले बरें !**'

गुरुमाऊलींच्या तोंडून निघालेले ते अमृतमय शब्द ऐकून त्या बाईस किती बरें धन्यता वाटली असेल !

प्रस्तुत उदाहरणावरून स्वामीमहाराज हे साक्षात् दत्त-प्रभूच होते ही गोष्ट निश्चित ठरते. त्या दत्तप्रभूंच्या मानवरूपधारी दिव्य मूर्तीला शतशः प्रणाम असोत !

## ‘ बैठ, किधर जाता ?’

एकदां पोस्ट खात्यांत सुपरिंटेंडेंटच्या हुद्यावर असलेले श्री. बाबाजी सदोबा हे गृहस्थ शनिवार–रविवारची सुटी साधून श्रीसमर्थांच्या दर्शनासाठीं मुद्दाम अक्कलकोटास आले होते.

दर्शन घेऊन झाल्यावर त्यांनीं परत आपले गांवीं जाण्या-साठीं श्रीजवळ अनुज्ञा मागितली. परंतु समर्थ मोठ्यानें म्हणाले, ‘**बैठ; किधर जाता ?**’

त्यामुळें नाइलाज होऊन बाबाजीराव खालीं बसले. परंतु सोमवारीं कामावर हजर व्हावयाचें आहे, तेव्हां बसल्यास गाडी चुकेल अशी चुटपूट त्यांचे मनाला लागून राहिली होती. त्यामुळें पुन्हां थोड्यावेळानें त्यांनीं महाराजांची आज्ञा मागितली.

परंतु याहि खेपेस श्रींनीं त्यांस बसवून घेतलें ! तेव्हां पुन्हां थोडा वेळ थांबून बाबाजीरावांनीं तोच प्रश्न केला. श्रीसमर्थ बाबाजीरावांना पुन्हां जवळ बसवून घेऊन म्हणाले, ‘**नदी किनारे पार–**’

बिचाऱ्या बाबाजीरावांना श्रींच्या या उक्तींतील अर्थ सम-जला नाहीं ! आपणांस कामावर जाण्यास उशीर होणार ही चुट-पूट त्यांना एकसारखी अस्वस्थ करीत होती ! शेवटी महाराज जाण्याची अनुज्ञा देत नाहींत असें पाहून बाबाजीराव महाराजांचा डोळा चुकवून तेथून निसटले व कडबगांव स्टेशनावर आले.

परंतु गाडी कुठें आहे ? त्यादिवशीं कृष्णा नदीस महापूर येऊन कृष्णेचा पूल पडल्यामुळें गाडीच आली नव्हती !

त्यांची गाडी दुसऱ्या दिवशीं सकाळीं आली ! तोंवर त्यांना स्टेशनावरच कुडकुडत बसावें लागलें ! त्याऐवजी श्रींच्या सांगण्याप्रमाणें ते त्यांच्याजवळच बसून राहिले असते तर ?

श्रीसमर्थांच्या 'नदी किनारे पार' या शब्दांतील गूढार्थ बाबाजीरावांना त्यावेळीं उकलला आणि महाराजांच्या सर्वसाक्षित्वाची खात्री पटन त्यांना गहिंवरून आलें !

---

प्रकरण : आठवें

# श्रीस्वामीसमर्थांच्या लीला व चमत्कार

## राजा आणि रंक सारखेच !

'सर्वांभूतीं समभाव' हा स्वामीसमर्थांच्या स्वभावांतील एक विशेष गुण होता. राव आणि रंक त्यांच्या समदृष्टीला सारखेच होते. संत महात्म्यांना ओळखण्याची ही एक महत्त्वाची खूण आहे. त्यामुळेंच तहानेनें व्याकुळ झालेल्या गाढवाला पाणी पाजण्यासाठीं एकनाथ धांवून गेले. **सोनें आणि माती। आम्हां समान हें चित्तीं।।** या तुकोबांच्या ओळी या समभावनेंतूनच साकार झाल्या.

एकदां श्रीमंत मालोजीराजे भोसले हे श्रीस्वामीमहाराजांच्या दर्शनासाठीं मोठ्या डामडौलानें हत्तीवर बसून आले. त्यांच्या अंगावर हजारों रुपयांचे रत्नहार झळकत होते. शिरपेंचावर बसविलेले तेजस्वी मोतीं चांदण्याप्रमाणें चमचमत होते.

परंतु स्वामीसमर्थांना हा पोकळ डामडौल आवडला नाहीं. मालोजीराजे समर्थांच्या पायांवर डोकें ठेवूं लागतांच समर्थांनीं फाडकन् त्यांच्या श्रीमुखांत भडकावून दिली ! त्याबरोबर मालोजीराजांचा शिरपेंच दहा हात दूर उडून गेला नि ते गाल चोळीत उभे राहिले. त्यावेळीं समर्थ उग्रावतार धारण करून म्हणाले, **'अरे, तुझें मोठेंपण तुझ्या घरांत. तें येथें कशास पाहिजे ? ऐसे शतरंजके नवाब हम दररोज बनाते हैं.'**

श्रीस्वामीसमर्थांच्या प्रत्येक कृतींत, प्रत्येक शब्दांत ही निर्भयता दिसून येत असे. जणूं सर्वभूतीं समभाव या गुणाप्रमाणेंच आपल्या भक्तांनीं निर्भयहि तितकेंच बनलें पाहिजे असेंच जणूं त्यांना सुचवायचें होतें !

त्या प्रसंगानंतरहि मालोजीराजे दर गुरुवारीं श्रीस्वामीसमर्थांच्या दर्शनास जात असत. परंतु मागील अनुभवामुळें ते आपली पालखी समर्थांना न दिसेल अशा बेतानें फर्लांगभर अंतरावर दूर ठेवून तेथून पायींच पुढें येत. त्यावेळीं त्यांचा पोशाखहि अगदीं साधा असे !

परमेश्वराच्या दर्शनाला जातांना अत्यंत विनम्र होऊन गेलें पाहिजे. साष्टांग नमस्कार घालण्यामागें हीच भावना आहे. श्री. श्रीधरस्वामी म्हणतात, 'देवाची सेवा करतांना शरीर पोतेऱ्याप्रमाणें बनलें पाहिजे.' पोतेऱ्याकडून कांहीहि सेवा करून घ्या. त्याला घांसल्यामुळें कितीहि भोंकें पडूं द्या, कितीहि मळ चढूं द्या. त्याला काम झाल्यावर कुठेंहि फेका. त्याची तक्रार नाहीं. तें सदैव ओलेत्यानें तुमची सेवा करायला पुन्हां तयारच ! सेवा करतांना अशी भावना हवी !

## 'लगाव सरबत्तो !'

अक्कलकोटचे राजे मालोजीराव भोसले स्वामीसमर्थांची सेवा सकाम भावनेनेंच करीत होते असें दिसतें. अर्थात केवळ निष्काम भावनेनें भक्ति होणें अशक्य नसलें तरी अवघड आहे. सकाम भावनेनें भक्ति करणारेच फार असतात. संसारी जनांच्या दृष्टीनें पाहतां तें योग्यच आहे. तथापि केवळ सकाम भक्तीदेखील ठीक नव्हे !

मालोजीराजांना पुत्रप्राप्तीची इच्छा होती. राजे-महाराजांना

व मोठमोठ्या धनिक सावकारांना ही पुत्रचिंता नेहमींच सतावीत असते ! कदाचित् इतक्या ऐश्वर्यसंपन्न कुळांत जन्म घेण्यास योग्य असे पुण्यवान् आत्मेच परमेश्वराला सांपडत नसावेत !

मालोजीराजांनीं समर्थांची सेवा त्यासाठींच चालविली होती. कालांतरानें राणीसाहेबांना दिवस गेले. तेव्हां 'पुत्र होणार कीं कन्या' असा प्रश्न कारभाऱ्यांनीं साहजिकच समर्थांना विचारला. त्यावर '**बांगडी लाव**' एवढेंच उत्तर समर्थांनीं दिलें. व त्यानुसार कन्यारत्नच झालें. पुढील खेपेसहि चुलीजवळ बसून समर्थांनीं हेंच सूचित केलें. तिसऱ्या खेपेस मात्र '**लगाव सरबत्ती**' असे शब्द समर्थमुखांतून बाहेर पडले व मालोजीराजांना पुत्ररत्न लाभून त्या आनंदाप्रीत्यर्थ तोफा उडविण्यांत येऊन हत्तीवरून साखर वांटण्यांत आली.

श्रीस्वामीसमर्थांचें बोलणें नेहमींच संदिग्ध व ब्रह्मसूत्राप्रमाणें थोडक्यांत असे. तें 'समजावून घेणें' आवश्यक असे. कित्येकदां केवळ कृतीनेंच ते आपला उपदेश करीत. एकदां दोन सेवेकरी भांडत असतांना पाहून समर्थांनीं त्यांना जवळ बोलावून त्या प्रत्येकाच्या हातांत एकएक मुंगी दिली. त्याचा अर्थ इतकाच कीं, '**भांडूं नका. मुंगी होऊन साखर खा !**' किंवा 'भांडणांत वेळ घालवूं नका. मुंगीसारखें अविरत काम करा !' समर्थांच्या बोलण्यांतील अर्थ मंडळींना पुढें सरावानें जाणतां येऊं लागला !

## राजवाड्यांतील लीला !

एक दिवस स्वामीसमर्थांची स्वारी अचानक राजवाड्यांत आली. राजेसाहेबांना ही वार्ता कळतांच ते लगबगीनें समर्थांना सामोरे गेले व त्यांना घेऊन वाड्यांत आले. नंतर दोघेजण देवघरापुढील झोंपाळ्यावर बोलत बसले.

त्यावेळीं देवघरांतील पुजारीबुवा देवासाठीं गंध उगाळीत होते. तेवढ्यांत एक उंदीर येऊन फुलवातीच्या तुपाला तोंड लावूं लागला. तें पाहून पुजारीबुवांच्या तळपायाची आग मस्तकांत गेली व त्यांनीं हातांतील खोड फाडकन् त्या उंदरावर फेकून मारलें. त्या वर्मी बसलेल्या घावामुळें उंदीरमामा जागच्याजागींच गतप्राण होऊन पडले! तेव्हां 'बरी अद्दल घडली' असें म्हणत पुजारीबुवांनीं त्याची शेपटी चिमटींत पकडली व त्याला टाकण्यासाठीं ते बाहेर पडले.

तेवढ्यांत स्वामीसमर्थांनीं त्यांना हांक मारून त्यांच्या हातांतील उंदीर मागितला. पुजारीबुवांनीं त्याप्रमाणें तो उंदीर त्यांचेजवळ दिला. समर्थांनीं त्याला हातांत घेऊन त्याची झोंपाळ्याच्या कडींतून पांच-दहा वेळा इकडून तिकडे अशी काढ-घाल केली आणि त्याला तळहातावर ठेवून '**बच्चा, जाव**' असें म्हणतांच तो गतप्राण झालेला उंदीर टुणकन् उडी मारून पळून गेला!

हा चमत्कार सर्वजण 'आ' वासून पहातच राहिले!

दुसऱ्या एका प्रसंगीं श्रीसमर्थांची स्वारी अशीच राजवाड्यांतील अंगणांतून मोठ्या मजेंत फिरत होती. तेवढ्यांत त्यांचें लक्ष हुजऱ्याच्या हातांतील सोन्याच्या चौफुल्यावर गेलें. समर्थांनीं तो चौफुला त्याचे हातांतून हिसकावून घेतला व राजाकडे पहात विचारलें, '**कायरे, हा तुझा चौफुला विहिरींत टाकूं का?**

राजा म्हणाला, 'महाराज! चौफुला आपलाच आहे. आपल्या मनाला येईल तसें करावें.'

त्याबरोबर समर्थांनीं तो बावनकशी सुवर्णाचा लखलखीत चौफुला सर्वांदेखत विहिरींत फेकून दिला. त्यामुळें सर्वांनाच अतिशय खेद झाला.

परंतु दुसऱ्या दिवशीं समर्थ त्या ठिकाणीं येऊन राजाला

म्हणाले, ' पोहरा लाव ! '

राजानें ताबडतोब पोहरा मागवला आणि समर्थांच्या आज्ञेनुसार तो विहिरींत सोडला. तो वर काढतांच तो चौफुलाहि त्याबरोबर बाहेर आला !

परंतु खरें आश्चर्य यापुढेंच आहे ! त्या चौफुल्यांतील लवंग, वेलदोडे, सुपारी इ० वस्तु रात्रभर विहिरींत पडूनहि कोरड्याच होत्या !

## मालोजीराजांना तलवार व पिकदाणी !

एकदां मुंबईचे गव्हर्नर सोलापुरास आले असतां त्यांनीं मालोजीराजांना भेटीस येण्याची आज्ञा केली. राजेसाहेबांनीं आपले नवे कारभारी श्री. चिंतोपंत टोळ यांना बरोबर घेऊन जाण्याचें ठरविलें.

जाण्यापूर्वीं समर्थांचा आशीर्वाद घ्यावा म्हणून मालोजीराजे समर्थभेटीसाठीं निघाले. त्यावेळीं श्रीसमर्थांची स्वारी चोळप्पाच्या घरीं बाजेवर बसली होती. मालोजीराजे मेण्यांतून चोळप्पाच्या दाराशीं उतरले. परंतु बाहेरूनच समर्थांची उग्र मुद्रा पाहून त्यांना आंत जाण्याचें धाडस होईना ! म्हणून ते बाहेरच घुटमळत राहिले.

तेवढ्यांत समर्थ आंतून म्हणाले, ' अरे बाहेर, कां उभा ? इकडे ये.'

त्या शब्दांनीं धीर येऊन मालोजीराव आंत गेले व त्यांनीं समर्थांच्या चरण कमलावर डोकें ठेवून त्यांचा आशीर्वाद मागितला.

परंतु समर्थांनी कांहीं न बोलतां शिपायाच्या कमरेची तलवार व पिकदाणी काढून ती राजाच्या हातांत दिली व त्यास निरोप दिला.

श्रीसमर्थांच्या या कृतीचा अर्थ लवकरच स्पष्ट झाला !

त्यावेळीं गव्हर्नरसाहेब जाण्याच्या गडबडींत असल्यामुळें मालोजी-राजांना तोफांची सलामी व इतर मानपान मिळाला नाहीं. समर्थांनीं हातीं दिलेल्या पिकदाणीचा अर्थ हा होता !

परंतु या भेटींत एक महत्त्वाची गोष्ट घडली. अक्कलकोट संस्थानांत हत्यारें बाळगण्याची जी बंदी इतके दिवस होती ती गव्हर्नरानें उठवली. समर्थांनीं मालोजीराजांच्या हातीं दिलेली तलवार याच गोष्टीची सूचक होती !

## ' आम्हीं तिच्यासाठीं खंडया नेमला आहे. '

अक्कलकोटचे राजेसाहेब मालोजीराव यांचे मानकरी श्री. विश्वासराव उर्फ अप्पासाहेब माने यांची कन्या जमनाबाई ही लग्नास उपवर झाली. परंतु बरीच खटपट करूनहि तिच्यासाठीं योग्य स्थळ मिळेना. त्यामुळें अप्पासाहेबांना अतिशय चिंता निर्माण झाली व ते श्रींचा आशीर्वाद घेण्यासाठीं एक दिवस श्री-समर्थांकडे आले. श्रीसमर्थचरणीं मस्तक ठेवून ते म्हणाले, ' महाराज, मुलगी उपवर झाली आहे. परंतु तिच्यासाठीं चांगलें स्थळच मिळत नाहीं. आपण कृपा करावी. '

त्यावर समर्थ चटकन् म्हणाले, ' **अरे काळजी कां करतोस? आम्हीं तिच्यासाठीं खंडया नेमला आहे.** '

अप्पासाहेबांना श्रींच्या या संदिग्ध बोलण्याचा कांहींच अर्थ समजला नाहीं. परंतु श्रीकृपेनें सर्व कांहीं व्यवस्थित होईल असा निर्धार बाळगून ते स्वस्थ चित्तानें घरीं गेले.

पुढें योगायोग असा कीं, श्रीमंत खंडेराव गायकवाड यांना जमनाबाई पसंत पडून त्यांनीं तिच्याशीं लग्न केलें. त्यामुळें अप्पासाहेबांच्या आनंदाला कांहीं पारावारच राहिला नाहीं. आपल्या सारख्या यःकश्चित मानकऱ्याला एवढा मोठा श्रीमंत

संस्थानिक जांवई मिळेल असें त्यांना स्वप्नातहि वाटलें नव्हते. या लग्नामुळें माने मंडळींना मोठमोठ्या नेमणुका मिळाल्या व सरकार दरबारीं त्यांचे वजनहि वाढलें.

अशाप्रकारें श्रींचा शब्द खरा झाला व सर्वांनाच समर्थांच्या त्रिकाल ज्ञानाचें आश्चर्य व कौतुक वाटलें.

## पाय फिरवून आजार बरा केला

या हकिकतीमुळें अप्पासाहेब माने हे श्रीसमर्थांचे एकनिष्ठ सेवक बनले व समर्थांनींहि त्यांना अनेक संकटांतून निभावून नेलें.

एकदां अप्पासाहेब विषमज्वरानें आजारी पडले व त्यांची प्रकृति दिवसेंदिवस ढासळूं लागली त्यामुळें श्रींच्या नित्यदर्शनास जाण्याचा त्यांचा नेम चुकूं लागला.

परंतु भक्ताची ही अडचण ओळखून एक दिवस श्रीसमर्थांची स्वारी स्वतःच अप्पासाहेबांकडे येऊन अचानक उभी राहिली. परंतु त्यावेळीं अप्पासाहेब बेशुद्ध स्थितींत पडून होते. तें पाहून समर्थांनीं अप्पासाहेबांच्या अंगावरून तीन वेळां आपला पाय फिरविला व थोडावेळ बसून ते निघून गेले.

त्या दिवसापासून अप्पासाहेबांचें दुखणें हळुंहळूं कमी होत गेलें व दोन तीन दिवसांतच ते साफ बरे झाले !

## भाव तेथें देव !

श्रीस्वामी समर्थ कोणत्यावेळीं कोणाकडे येऊन 'दत्त' म्हणून उभे राहतील याचा नेम नसे. कधीं राजवाड्यांत तर कधीं मशिदींत, कधीं वेश्येच्या रंगमहालांत तर कधीं स्मशानांत. त्यांचा

संचार असा मुक्त होता, मनांत आल्यास भर पावसांतहि 'मेणा लाव' अशी आज्ञा सोडून ते हिंडण्यासाठीं बाहेर पडत !

एक दिवस प्रातःकाळच्या वेळीं दत्तावधूत श्रीसमर्थ गणपतराव जोशी नांवाच्या भटजीबुवांकडे अकस्मात् येऊन हजर झाले. तें पाहून जोशीबुवांना अतिशय आनंद झाला. जोशीबुवांनीं श्री समर्थांना स्नान घालून पिवळा मुकटा नेसावयास दिला व गंध लावून त्यांची षोडशोपाचारें पूजा केली. त्यांच्या पायांवर डोकें ठेवून त्यांच्यापुढें नैवेद्यहि ठेवला.

परंतु त्याचवेळीं त्यांच्या मनांत असा विचार आला कीं, 'महाराज येथून बाहेर गेल्यावर आपला नवा मुकटा कोणाला देऊन तर टाकणार नाहींत ना ?' श्री समर्थांनीं जोशीबुवांच्या मनांतील ही चलबिचल तत्काळ ओळखली व दुसऱ्याच क्षणीं कमरेचा मुकटा सोडून तो जोशीबुवांच्या पुढें ठेवीत ते म्हणाले, '**हा घे तुझा मुकटा**' आणि एवढें म्हणून स्वारी दिगंबरावस्थेंतच झपाझप पावलें टाकीत चालूं लागली. तें पाहून जोशीबुवा ओशाळले व त्यांनीं श्रींच्या पाठोपाठ पळत जाऊन त्यांना भोजनास थांबण्याची विनंति केली. परंतु समर्थ म्हणाले, 'अरे **तुझ्या मनांत विकल्प आला. आतां आम्हीं भोजन करणार नाहीं.**'

त्याचवेळीं तात्या वैद्य या गृहस्थांना ही हकीकत समजली व त्यांनी समर्थांना स्वतःच्या घरीं भोजनाचें आमंत्रण दिलें. वैद्यबुवांची निर्विकल्प भक्ति पाहून समर्थांनीं त्यांची इच्छा पूर्ण केली व त्यांचेकडे मोठ्या प्रेमानें भोजन उरकलें.

## ८ भीमरावांचें आवाळूं बरें केलें.

श्रीसमर्थांच्या सेवेकऱ्यांचे अनेक असाध्य रोग श्रीकृपेनें बरे झाल्याचे दाखले आहेत. भीमराव म्हणून श्रींचा एक सेवेकरी होता.

त्याच्या डोक्यास एक खूप मोठें आवाळू झालें होतें. त्यामुळें लोक त्याची नेहमीं चेष्टा करीत. आवाळूमुळें त्याचा चेहरा विद्रूप दिसत असे. त्यामुळें तो बिचारा नेहमीं त्याच काळजीत असे.

परंतु समर्थांची सेवा तो व त्याचा मुलगा दोघेहि अतिशय भक्तिभावानें करीत. रोज दोघेजण बागेंत जाऊन विविध प्रकारचीं रंगीबेरंगी सुवासिक फुलें श्रीसमर्थांच्या पूजेसाठीं घेऊन येत. कधीं चंपक बकुल, मोगरा, मालती, पारिजातक तर कधीं गुलाब, झेण्डू शेवंती कमळ. समर्थांना भगव्या रंगाचीं फुलें फार प्रिय असत. स्वामी सुतांनीं याबाबत स्पष्ट उल्लेख केलेला आहे. ते म्हणतात—

> **परि हो स्वामीसी आवडे भगवें फूल।**
> **नेम तो सकळ भगव्यांचा ॥**
> **भगव्या फुलांची माळ ती सगुण ।**
> **करोनिया तुम्हीं चरणीं अर्पा ॥**

अशीं भगव्या रंगाची झेंडू अन् अबोलीचीं ताजीं फुलें ते मुद्दाम तोडून आणीत. तीं फुलें समर्थचरणीं वाहतांना त्यांच्या आनंदाला सीमा रहात नसे.

एकदां भीमराव फुलांच्या परड्या घेऊन बागेंतून येत असतां समर्थांना त्याच्या आवाळूची थट्टा करण्याची लहर आली. ते भीमरावाकडे पाहून इतर सेवेकऱ्यांना म्हणाले, '**अरे तो पहा दोन डोक्यांचा माणूस आला.**'

तें ऐकून सेवेकरी कुचेष्टेनें खदखदा हंसू लागले.

भीमरावाच्या डोळ्यांत मात्र पाणी उभें राहिलें. आजवर इतर सेवेकरी चेष्टा करीत होते तेथवर ठीक होतें. परंतु आतां खुद्द समर्थच चेष्टेंत सहभागी होऊं लागल्यावर आपलें दुःख आतां कोणापुढे सांगावें असा विचार मनांत येऊन तो अतिशय कष्टी

झाला. 'महाराज ' तुम्ही करुणासागर आहांत. तुम्हीच जर माझी उपेक्षा केलीत तर मी आपलें गाऱ्हाणें कोणापुढें मांडावें ? महाराज, नका हो मला असें दूर लोटूं !' असे विचार एकीकडे डोळे पुसतां पुसतां भीमरावाच्या मनांत निर्माण होत होते.

अंतर्ज्ञानी यतिरायांना भीमरावाचे हे विचार समजल्याशिवाय कसे राहतील ?

त्याच दिवशीं भीमरावाला झोपेंतच एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत श्रीसमर्थांनीं येऊन भीमरावाच्या आवाळूवरून आपला हात फिरविला. भीमराव खडबडून जागा झाला. व पहातो तों डोकीचें आवाळू फुटलेलें असून त्याचें कातडें डोक्याखालीं लोंबतें आहे !

तो तसाच आनंदातिशयानें श्रींकडे पळत गेला. त्याला पाहून त्या करुणामूर्तीनें मंद स्मित केलें. भीमरावानें श्रीचरण घट्ट पकडले व तो म्हणाला, 'महाराज, या भक्ताला कधीं अंतर देऊं नका. हे चरण असेच निरंतर माझ्या हृदयांत स्थिरावूं देत !!'

श्रीसमर्थांनीं त्याला वर उठविलें व लोंबत असलेल्या कातडीला लावण्यासाठीं तीर्थ अंगारा दिला. त्यामुळें तें कातडें हळूहळूं सुकून नाहींसें झालें.

अशाप्रकारें भीमरावाची शरीरव्यथा श्रीसमर्थ कृपेनें कायमची नष्ट झाली.

## ' या निशा सर्व भूतानाम् –'

एक दिवस रात्रीं श्रीस्वामीराय झोंपेंत असतांना मोठमोठ्यानें घोरूं लागले. तें पाहून जवळच बसलेल्या गोविंदराव टोळ यांच्या मनांत विचार आला की, श्रीसमर्थ हे जर महान् योगी आहेत तर ते सामान्य माणसाप्रमाणें घोरतात कसे ?' त्याच वेळीं गीतेंतील

पुढील श्लोकाचें त्यांना स्मरण झालें– '**या निशा सर्व भूतानाम् तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥**

गोविंदरावांच्या डोक्यांत हें विचारचक्र चालू असतांनाच श्रीसमर्थ एकदम झोंपेंतच ओरडले, '**हां ए सोनार, नहीं नहीं.**' आणि पुन्हां पहिल्यासारखे घोरूं लागले.

श्रीसमर्थ गोविंदरावांना नेहमीं 'सोनार' म्हणून हांक मारीत. त्याच नांवानें गोविंदरावास संबोधून ' तुला आलेला संशय खरा नाहीं ' अशा अर्थी द्विवार ' नहीं नहीं ' असे उद्‌गार त्यांनीं काढले. अशाप्रकारें गोविंदरावांची कुशंका लागलीच दूर करून श्रीसमर्थांनीं गीतेंतील भगवंतांचें वचन खरें असल्याचा दाखलाच जणूं त्यांना दिला !

## ' ये संतनकी बानी– '

श्रीसमर्थांना ढोंगी लोकांची फार चीड असे. विशेषतः ढोंगी साधुसंत पाहिले कीं समर्थ त्यांचें ढोंग लागलीच उघड करून त्यांची फजिती करीत !

एकदां एक कबीरपंथी बुवा भिक्षा मागत अक्कलकोटास आला. कपाळाला भस्म आणि टिळे, गळ्यांत लांबरुंद माळा, डोकीला पटका व हातांत वीणा अशा थाटांत हा बुवा पदें आणि अभंग म्हणत गांवांतून फिरत असे. त्याच्या बाह्य वेषावरून हा कुणीतरी फार मोठा संत असावा अशी लोकांची साहजिकच कल्पना होत असे. परंतु सर्वज्ञानी महाराजांपुढें कुणाचें बिंग लपून राहणार ?

एक दिवस श्रींची स्वारी गणपतराव जोशी यांच्या देवडीवर बसली होती. त्याचवेळीं बुवांचीं शंभर वर्षें भरण्याचा योग

## काष्ठावर पादुका उमटल्या !

चितोपंत टोळ स्वामीसमर्थांचे एकनिष्ठ भक्त बनले होते. श्रीसमर्थ म्हणजे साक्षात् दत्तप्रभु अशा भावनेनेंच त्यांची सेवा चालली होती.

एकदां चितोपंतांनीं आपल्या पूजेंतील श्रीविष्णुमर्तीला एक कोटि तुलसीपत्रें वाहण्याचा संकल्प केला. त्याप्रमाणें ते दररोज नेमानें तुलसीपत्रें वहात होते. केव्हां केव्हां श्रीसमर्थ पूजेच्या वेळीं टोळांच्या घरीं येत. त्यावेळीं टोळ प्रसन्न चित्तानें भक्तिपूर्वक त्यांचीहि पूजा करीत. व त्यांच्या चरणीं तुलसीपत्रें वाहून त्यांच्या चरणांवर लोटांगण घालीत.

एक दिवस श्रीसमर्थांची स्वारी अशीच पूजेच्या वेळीं दत्त म्हणून टोळांच्या घरीं उपस्थित झाली. टोळांनीं त्यांची यथासांग पूजा केली. धूप-दीप–नैवेद्य दाखविला व त्यांच्या चरण कमलांवर पवित्र तुलसीपत्रें वाहिलीं. त्या दिवशीं श्रीसमर्थांची स्वारी विशे-षच प्रसन्न दिसत होती. त्यांच्या तेजोमय मुखमंडलाभोंवतीं चांदण्यासारखें आल्हादक आणि शांत तेज पसरलेलें दिसत होतें.

पाद्यपूजा आटोपल्यावर चितोपत डोळ्यांत आंसवें आणून म्हणाले, 'महाराज, आपले परमपवित्र चरण पूजेसाठीं निरंतर सन्निध असावेत अशी इच्छा आहे.'

श्रीसमर्थ पाटावरून उठत म्हणाले, 'ठीक आहे; तुझी मनोकामना पूर्ण होईल.'

एवढें आश्वासन देऊन समर्थ निघून गेले. कांहीं वेळानें चितोपंत पाटावर पाहतात तों पाटावर समर्थांचे दोन्ही चरण उमटलेले !

हा अत्यद्भुत चमत्कार पाहून चितोपंतांना विलक्षण आश्चर्य

वाटलें व त्यांनीं त्या चैतन्यमय पादुकांवर डोकें ठवून त्यांवर प्रेमाश्रूंचा अभिषेक केला. कुशल कारागीर अनेक हत्यारें उपयोगांत आणून काष्ठावर कोरीव काम करतो, परंतु समर्थांना हत्यारांची काय आवश्यकता ? संकल्प हेंच त्यांचें हत्यार !

हल्लीं सदरच्या प्रासादिक पादुका ज्या पाटावर उमटल्या आहेत तो पाट अक्कलकोटास जोशीबुवांच्या मठांत आहे.

## अलौकिक अंतर्ज्ञान

अक्कलकोटास जोशी नांवाचे गृहस्थांजवळ 'पंचदशी' नांवाचा एक वेदांतपर ग्रंथ होता. जोशीबुवांचे स्नेही त्यांचे घरीं जमून तो ग्रंथ रोज वाचीत असत.

एक दिवस सर्व मंडळी जोशीबुवांचे घरीं जमून त्या ग्रंथाचें वाचन व त्यावर चर्चा करीत होती मधेंच एक अतिशय अवघड श्लोक आला. त्याचा अर्थ लावण्याचा मंडळींनीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु कुणालाच तो लावतां येईना. शेवटीं तें काम उद्यांवर टाकून सर्व मंडळी श्रींच्या दर्शनार्थ चोळप्पाच्या घरीं गेली.

श्रीसमर्थांचें दर्शन घेऊन मंडळी खालीं जाजमावर बसतात तोंच समर्थांनीं वेदान्तावरील प्रवचनास सुरुवात केली. आश्चर्य असें, कीं ज्या श्लोकाचा अर्थ मंडळींना लागत नव्हता त्याच श्लोकाचें विवरण समर्थांच्या मुखांतून बाहेर पडत होतें ! तो चमत्कार पाहून सर्वांना समर्थांच्या अलौकिक अंतर्ज्ञान शक्तीची खात्री पटली व सर्वांनीं त्यांना पुन्हां एकदां भक्तिभावानें वन्दन करून त्यांच्या पवित्र नांवाचा त्रिवार जयजयकार केला.

'अनंतकोटि ब्रह्माण्डनायक राजाधिराज योगिराज श्री अक्कलकोटनिवासी श्रीस्वामीसमर्थ महाराज की जय ऽऽ'

## ह. भ. प. श्री. कृ. गो. जोशी यांनीं पाठविलेली माहिती :

ह. भ. प. कै. मोरेश्वरबुवा (उमराळे) यांचें चतुर्थाश्रमांतील नांव 'मयूरानंदसरस्वती' असें होतें. त्यांचा जन्म त्यांचे मामा वे. शा. सं. लक्ष्मणशास्त्री हें जोशी यांचे घरीं शके १७५९ मध्यें झाला श्री. लक्ष्मणशास्त्री हे ज्योतिषविद्येंत पारंगत होते. बाराव्या दिवशीं त्यांनीं मोरेश्वराची जन्मकुंडली तयार केली व त्यावरून हा मुलगा अष्टपैलू हिरा आहे, परंतु माता-पित्यांचें सुख त्यास बिलकुल मिळणार नाहीं असें भविष्य वर्तविलें. त्याप्रमाणें मोरेश्वराचे आई-वडील लवकरच इहलोक सोडून गेले. त्यानंतर मोरेश्वराच्या मामांनींच त्याचा प्रतिपाळ केला व त्यास ज्योतिष, याज्ञिकी इ० चें शिक्षण दिलें. पुढें मोरेश्वरबुवांचा विवाह पालघर तालुक्यांतील येडवण या गांवचे राजवैद्य श्री. बाबाजी घनश्याम पुरोहित यांचे कन्येबरोबर झाला. त्यानंतर गायनाचा अभ्यास करून मोरेश्रबुवांनीं ललित, पुराण व कीर्तन करावयास सुरुवात केली. वयाच्या पंचविसाव्या वर्षींच त्यांना अध्यात्माची गोडी निर्माण झाली व रामायण, भागवतादि अध्यात्मिक ग्रंथांचें वाचन, ध्यान-धारणा इत्यादींतच त्यांचें मन रमूं लागलें.

त्याच सुमारास श्रीअक्कलकोटच्या स्वामीमहाराजांची कीर्ति त्यांचे कानांवर आली व त्यांच्या भेटीचा एकच ध्यास त्यांना लागून राहिला. पुढें एक दिवस रात्रीं श्रीसमर्थांनीं मोरेश्वरबुवांना स्वप्नांत दर्शन दिलें. व त्यामुळें तर श्रींच्या भेटीसाठीं ते जास्तच आतुर झाले. त्यांनीं आपल्या पत्नी गोपिकाबाईस सांगितलें कीं, 'मीं आत्तांच श्रीक्षेत्र अक्कलकोट येथें जाण्याचें ठरविलें असून स्वामीरायांचें दर्शन झाल्यावांचून अन्नाला स्पर्शहि करणार

नाहीं.' एवढें सांगून ते रेल्वेमार्गानें अक्कलकोटाकडे निघाले. भर उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें व पोटांत अन्नाचा कणहि नसल्यामुळें मोरेश्वरबुवांचा प्रवास अतिशय खडतर झाला. परंतु परमअवधूत स्वामीसमर्थांच्या दर्शनाची इतकी आत्यंतिक ओढ त्यांना लागली होती कीं त्यामुळें हा त्रासदायक प्रवासहि त्यांनीं आनंदानें पार पाडला.

अक्कलकोटास आल्यानंतर श्रींची स्वारी डोंगरावर गेल्याचें त्यांना समजलें. मोरेश्वरबुवांचा जीव तहानेनें व्याकुळ झाला होता. परंतु एकदां निश्चय केला तो केला मग त्यापायीं प्राण गेला तरी बेहत्तर अशा निर्धारानें श्रींचें नामस्मरण करीत त्यांनीं डोंगराची वाट धरली.

मोरेश्वरबुवा डोंगरापासून ४–६ फर्लांगांवर असतांनाच तिकडे श्रीसमर्थांनीं अंतर्ज्ञानानें ते येत असल्याचें ओळखलें. व ते नेहमींप्रमाणें असंबद्ध भाषण करूं लागले. '**किती हा वेडा! सोपाऱ्याहून अन्नपाणी सोडून माझ्या भेटीसाठीं येतो अरे मी तुला रात्रीं भेटलों तरी पुन्हां माझ्या दर्शनासाठीं येतोस काय?**

श्रींच्या या स्वागत भाषणाचा कुणालाच अर्थबोध होईना.

इतक्यांत मोरेश्वरबुवांनीं डोंगर चढावयास सुरुवात केली. तेव्हां '**आला रे आला**' असे शब्द श्रीसमर्थांनीं मोठ्यानें उच्चारले. थोड्याच वेळांत मोरेश्वरबुवा डोंगर चढून श्रींच्या समोर येऊन हात जोडून राहिले.

त्याच्याकडे पाहून श्रीसमर्थ उद्गारले, 'अरे, इतका त्रास घेऊन कां आलास रे? मी तुला भेटण्यास आलों होतों ना? जा जा. असाच घरीं जा. तुझी स्त्री तूं गेल्यापासून अन्नपाणी वर्ज्य करून देवापुढें बसली आहे. तूं गेल्यावांचून ती कांहीं प्राशन करणार नाहीं!'

ते उद्गार ऐकून मोरेश्वरबुवांना फारच वाईट वाटलें. कारण स्वामींचा सहवास न होतांच स्वामी-आज्ञेनुसार आतां ताबडतोब निघावें लागणार होतें. तेव्हां मोरेश्वरबुवांनीं श्रींची पाद्यपूजा केली व ते परत आपल्या गांवाकडे निघण्यासाठीं श्रींची आज्ञा मागूं लागले.

इतक्यांत श्रीसमर्थ मोरेश्वरबुवांकडे पहात म्हणाले, 'अरे, **थांब ! हा माझा प्रसाद म्हणून दगडावर कोरलेल्या पादुका व त्या पितळी चौरंगावरील पादुका नित्य पूजेसाठीं घेऊन चल. तुझा संसार सुखाचा होईल. देवकार्य होऊन तूं संन्यास घेशील. तुझ्या समाधीवर ठेवण्यासाठीं हा दगडी पादुकांचा ठेवा जतन करून ठेव, आणि आतां हा लळिताचा व्यवसाय बंद करून हातीं वीणा घेऊन हरिकीर्तन सुरूं कर. तुझ्या वंशांत ही हरिकीर्तनाची परंपरा कायम राहील. जा.**'

श्रीसमर्थ आज्ञेप्रमाणें मोरेश्वरबुवा श्रींच्या प्रासादिक पादुका घेऊन घरीं परतले. त्यावेळीं त्यांची स्त्री खरोखरच अन्नपाणी वर्ज्य करून देवासमोर ध्यानस्थ बसलेली त्यांना आढळली. आपला पति आल्याचें समजतांच उठून तिनें पंचारतीनें पादुकांना व पतिदेवांना ओवाळलें.

पुढें श्रींच्या आज्ञेप्रमाणें मोरेश्वरबुवांनीं हातीं वीणा घेऊन हरिकीर्तनाला सुरुवात केली व एक उत्कृष्ट कीर्तनकार म्हणून अल्पावधींतच कीर्ति मिळविली. श्रींनीं मोरेश्वरबुवांना श्रीराम मंदिर बांधण्याचीहि आज्ञा केली होती. त्यानुसार बुवांनीं श्रीराम मंदिराची स्थापना करून पूजा-अर्चा सुरूं केली. चैत्र शुद्ध प्रतिपदा ते दशमी असा उत्सवहि अतिशय थाटांत सुरूं केला. ते सदासर्वकाळ श्रीराम व श्रीचक्रेश्वर महादेव यांच्या आराधनेंत मग्न असत. पत्नीच्या मृत्यूनंतर बुवांनीं चतुर्थाश्रमाचा स्वीकार केला.

त्यानंतर चैत्र कृष्ण अष्टमी शके १८३४ या दिवशीं गीतेचें पारायण करून आपण समाधिस्थ होणार असल्याचें त्यांनीं आपले चिरंजिवास सांगितलें. आणि नासाग्रीं दृष्टि लावून जप सुरू केला त्याच दिवशीं मध्यरात्रीं पद्मासन घालून ते स्वस्वरूपीं विलीन झाले. त्यावेळीं त्यांचें वय पंचाहत्तर वर्षांचें होतें. श्रींच्या आज्ञेप्रमाणें बुवांच्या समाधीवर श्रींच्या पादुकांची स्थापना करण्यांत आली. श्रींनी सांगितल्याप्रमाणें ही कीर्तत परंपरा आजहि त्यांचे घराण्यांत कायम आहे !

## भवसागरांतून कोणते चरण पार करतील ?

पुण्यास माटेबुवा म्हणून एक प्रख्यात वेदांती होते. ते अतिशय उत्कृष्ट कीर्तन करीत. आपल्या कीर्तनांतून ते वेदांतासारखा सर्वसामान्य क्लिष्ट वाटणारा विषयहि अतिशय सोप्या भाषेंत श्रोत्यांना समजावून देत. कीर्तनाप्रमाणेंच पुराण सांगतांना ते तितकेच तन्मय होत.

या माटेबुवांची स्वामीसमर्थांच्या ठायीं अनन्यसाधारण भक्ति होती. समर्थांनाहि त्यांच्या विद्वतेविषयीं आदर होता.

एकदां माटेबुवांनीं अक्कलकोटास श्रीमत् भागवताचा सप्ताह केला. त्यावेळीं स्वामीसमर्थ सातहि दिवस श्रोते म्हणून हजर होते. एकाद्या विद्वानाच्या पुराण—कीर्तनाला अशा प्रकारें लागोपाठ सात दिवस समर्थांनीं हजर रहाण्याचें एवढेंच एक दुर्मिळ उदाहरण आहे.

समर्थांनीं अहंकारी व दांभिक विद्वानांची नेहमींच टर उडवलेली दिसून येते. परंतु त्याच वेळीं निरहंकारी विद्वानांना त्यांनीं नेहमीं मानाची व प्रेमाचीच वागणूक दिलेली आहे हें विसरतां कामा नये.

एकदां अक्कलकोटच्या खासबागेंत माटेबुवांचें कीर्तन होतें. हजारों लोक या कीर्तनश्रवणाचा आनंद लुटण्यासाठीं जमले होते. प्रत्यक्ष स्वामीसमर्थांची स्वारीहि त्या ठिकाणीं उपस्थित होती. त्यांचेसाठीं एक सुंदर उच्चासन तयार करण्यांत आलें होतें.

पूर्वरंगांतच कीर्तनाला रंग चढूं लागला. सारी सभा चित्रा-सारखी तटस्थ होऊन कीर्तनप्रसंगाशीं एकरूप झाली होती.

मध्येंच निरूपण करतांना बुवा म्हणाले, ‘या भवसागरांतून कोणते चरण आम्हांला तारून नेण्यास समर्थ आहेत ?’

त्याबरोबर स्वामीसमर्थांनीं पटकन् आपला सव्यचरण खालीं सोडला. तें पाहून बुवा सद्‌गदित होऊन प्रेमभावानें धांव-तच समर्थांजवळ गेले व त्यांनीं तो चरण प्रेमातिशयानें आपल्या हृदयाशीं कवटाळून धरला व श्रोत्यांकडे पहात ते मोठ्यानें म्हणाले, ‘खरोखर हेच चरण भवसागरांतून तारून नेण्यास समर्थ आहेत.’

तेवढ्यांत समर्थांनीं आपला दुसरा चरणहि खालीं सोडला. तो बाळाप्पांनीं पुढें होऊन आपल्या हृदयाशीं घट्ट पकडला.

खऱ्या एकनिष्ठ भक्तांना समर्थांच्या समर्थ चरणीं नेहमींच स्थान असे !

अक्कलकोटचा मोरोबा कुलकर्णी हा स्वामीसमर्थांचा एक-निष्ठ भक्त होता. समर्थांचा मुक्काम केव्हां केव्हां त्याचे घरीं होत असे.

एकदां स्वामीसमर्थ त्याचें घरीं झोंपले होते. मध्यरात्रीं मोरोबाच्या बायकोचें पोट अतिशय दुखूं लागलें. या नित्याच्या पोटदुखीमुळें ती बिचारी जिवाला कंटाळून गेली होती. त्या रात्रीं तर पोटदुखी इतकी वाढली कीं तिनें आत्महत्या करण्याचाच निश्चय केला व ती विहिरीकडे निघाली.

तेवढ्यांत समर्थांनीं सेवेकऱ्याला उठवून विहिरीकडे जाण्यास सांगितलें. सेवेकऱ्यांना तशा मध्यरात्रीं झोंपमोड करून जाण्याचें म्हणजे खरें जिवावरच आलें होतें. परंतु समर्थांची आज्ञा मोडणेंहि त्यांना शक्य नव्हतें. ते तसेच डोळे चोळत विहिरीपाशीं गेले तों त्यांना मोरोबाची बायको विहिरींत उडी मारण्याच्या तयारींत विहिरीच्या कांठावर उभी असलेली दिसली. तेव्हां त्यांनीं पळतच पुढें जाऊन तिला पकडून बाजूला काढलें व समर्थांपुढें आणून उभें केलें.

समर्थांनीं तिला आत्महत्येचें कारण विचारतां तिनें आपल्या पोटदुखीची कथा समर्थांना ऐकविली. तेव्हां समर्थांनीं कृपादृष्टीनें तिच्याकडे पहातांच तिची पोटदुखी कायमची बरी झाली.

## ‘ चला, तुम्हांस मोठा मनुष्य दाखवतों ’

एकदां समर्थांची स्वारी अक्कलकोटच्या खासबागेंत बसली होती. आजूबाजूला पांच पन्नास सेवेकरी मंडळी उभी होती. एकाएकीं समर्थ उठले व म्हणाले, ‘ **चला, तुम्हांस मोठा मनुष्य दाखवतों.**’ तें ऐकून सर्व मंडळी समर्थांच्या पाठोपाठ ‘ मोठा मनुष्य ’ पहाण्यास निघाली.

श्रीसमर्थ पांच पन्नास पावलें चालून जाऊन एका वारुळाजवळ आले. तेवढ्यांत वारुळांतून एक भला मोठा नाग बाहेर आला व क्षणभर जागच्याजागीं उभा राहून श्रींना वंदन केल्यासारखें करून निघून जाऊं लागला. त्याला पोंचविण्यासाठीं महाराज समर्थ थोडे त्याच्याबरोबर चालत गेले व नंतर बरोबरच्या मंडळींकडे पाहून म्हणाले, ‘ **हा फार मोठा माणूस आहे बरें !**’

त्याबरोबर मंडळींनीं त्या नागाच्या दिशेनें हात जोडून त्याला नमस्कार केला व सर्वजण समर्थांचे बरोबर परत आले.

## इंद्रराज चले इदलमें !

श्रीसमर्थांना अशाप्रकारे बाहेर फिरण्याची लहर केव्हां येईल याचा नेम नसे. एकदां समर्थांची स्वारी रामाचें देवळांत बसली असतां आकाशांत विजांचा कडकडाट होऊन काळ्याकुट्ट ढगांनीं आकाश व्यापून गेलें आणि थोड्याच वेळांत मुसळधार पावसानें ताल धरला.

तें पाहून श्रींची स्वारी प्रसन्न होऊन हंसूं लागली. त्यांनीं ताबडतोब '**मेणा लाव**' अशी सेवेकऱ्यांना आज्ञा केली. तेव्हां महाराज भर पावसांत बाहेर पडणार व आपल्याला पावसांत भिजावें लागणार असें भय वाटून सेवेकरी हात जोडून श्रीसमर्थांना या विचारापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न करूं लागले. परंतु समर्थ कशाला कुणाचें ऐकतात ! ते एकटेच उठून चालूं लागले. तेव्हां मंडळींनीं धांवत जाऊन मेणा आणला व त्यांत महाराजांना बसवून मंडळी भर पावसांतून फिरावयास निघाली.

आकाशांतून धो धो पाऊस कोसळत होता. मंडळींची त्यामुळें त्रेधा उडत होती. तें पाहून समर्थ पोट धरून खो खो हंसूं लागले. नंतर त्यांनीं '**इंद्रमहाराज चले ईदलमें चमक रही बिजली बादलमें**' असें गाणें म्हणण्यास सुरुवात केली.

मेणा पुढें चालला होता. श्रीसमर्थ हंसत, गात मोठ्या मजेंत बसले होते. मंडळी पावसानें हैराण झाली होती आणि त्यांची गंमत पहाण्यांत श्रीसमर्थ रंगून गेले होते. शेवटीं चोळप्पाच्या घराजवळ स्वामीमहाराज उतरले व त्यांनीं ती रात्र मोठ्या आनंदांत घालविली. गुरुमहाराज गुरु ऽ जयजय परब्रह्म सद्‌गुरु ऽ ऽ ऽ

## कानफाटयाची विलक्षण हकीकत

श्रीस्वामीमहाराजांचे अनेक भक्त झाले, परंतु कानफाटयाची सर त्यांपैकीं कुणालाच आली नाहीं. स्वामीमहाराज म्हणजे साक्षात् परमेश्वर अशीच भावना सदैव मनांत ठेवून तो निष्ठापूर्वक त्यांच्या भक्तींत गढलेला असे.

हा कानफाटया नाथसंप्रदायी असून पूर्वी चेटुक वगैरे करीत असे. त्याच्याबरोबर नेहमीं तीनचार शिष्य असत. स्वारी उत्तमोत्तम वस्त्रें परिधान करून नेहमीं घोडयावरून फिरत असे. त्याच्या हातांत नेहमीं एक मोठा लोखंडी त्रिशूळ असे.

एकदां हा कानफाटया फिरत फिरत अक्कलकोटास आला व स्वामीसमर्थांचें दर्शन घेऊन त्यानें आपल्याजवळची तांबडी बनात त्यांचें अंगावर घातली. त्यासरशीं समर्थ ताड्कन् उठून म्हणाले, '**चेटुक करतो मादरचोद !**'

श्रीसमर्थांचा तो रुद्रावतार पाहून कानफाटयाचे पाय थरथरूं लागले ! परंतु त्याचवेळीं श्रीसमर्थांविषयीं त्याच्या मनांत भक्तिभाव उचंबळून आला व त्यानें श्रींची क्षमा मागितली आणि बरोबरच्या शिष्यांना परत पाठवून त्यानें स्वामीमहाराजांच्या सेवेलाच आपलें जीवनपुष्प वाहून टाकलें.

हा कानफाटया शरीरानें अतिशय अगडबंब होता. त्याच्या अंगांत इतकी प्रचंड ताकद होती कीं, दहा बारा गडयांनाहि तो एकटा भारी असे. भरधांव चाललेली धिप्पाड बैलांची गाडी तो मागच्या बाजूनें ओढून धरून जागच्याजागीं थांबवीत असे ! त्याच्या या अफाट ताकदीमुळें इतर सेवेकरी त्याला वचकून असत. आणि तोहि सेवेकऱ्यांवर नेहमीं करडी नजर ठेवीत असे. विशेषतः

चोळप्पा व सुंदराबाई यांच्यावर त्याचा विशेष राग असे. हीं दोघें समर्थांच्या जिवावर खाऊन मजा करतात, परंतु समर्थांची सेवा मात्र त्या मानानें करीत नाहींत अशी त्याची तक्रार असे. त्यामुळें 'एक दिवस तुमचा दोघांचा समाचार घेईन' असा त्या उभयतांना नेहमीं दम भरीत असे!

श्रींचें भजन सोडून कुणी इतर देवदेवतांचें भजन सुरूं केलें तर तें त्याला बिलकुल खपत नसे. मग अशा वेळीं तो भजन करणाऱ्याच्या श्रीमुखांतहि भडकावून देत असे! रागाच्या भरांत तो एखादेवेळीं दोन सेवेकऱ्यांच्या शेंड्या धरून एकमेकांच्या डोक्यावर डोकें आपटून त्यांना चांगला खरपूस मारहि देत असे!

एकदां रामकृष्णाचें भजन केल्याबद्दल त्यानें रागावून एका गृहस्थाचें असेंच डोकें फोडलें. तेव्हां त्यानें पोलिसांत वर्दी दिली. त्याबरोबर चीफ कॉन्स्टेबल तपासासाठीं आला. श्रीसमर्थांना ही हकीकत कळतांच त्यांनीं चिडून त्यास बोलावून म्हटलें, '**आमच्या दरबारांत तूं कोण ×××× तपास करणार?**'

श्रींची संतप्त मुद्रा पाहून चीफ कॉन्स्टेबलनें तपासाचे कागद खिशांत ठेवून महाराजांच्या चरणांवर लोटांगण घातलें व क्षमा मागून तेथून काढता पाय घेतला.

परंतु दुसऱ्या एका प्रसंगीं कानफाट्यावर गुन्हा शाबीत होऊन त्यास नानासाहेब बर्वे या न्यायाधिशांनीं सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा दिली व त्याप्रमाणें पोलिसांनीं कानफाट्यास तुरुंगांत नेऊन डांबलें.

परंतु कानफाट्या सक्तमजुरीचें काम मुळींच करीना. त्यानें श्रीसमर्थांचें दर्शन होईपर्यंत अन्नपाणीहि वर्ज्य केलें. त्यामुळें थोड्याच दिवसांत, 'त्याला रोज दोन हत्यारबंद पोलिसांच्या देखरेखीखालीं महाराजांच्या दर्शनासाठीं न्यावें' असा वरून हुकूम आला.

एकदां कानफाट्याला व त्याच्या बरोबरच्या इतर कैद्यांना घेऊन पोलीस जमादार रस्त्याच्या साफसुफीसाठीं धाकट्या वेशी-जवळ गेले असतां, 'स्वामीमहाराज की जय' असा गजर कानफाट्याच्या कानांवर आला. तो ऐकून त्याचें देहभान हरपलें व तो महाराजांच्या दर्शनासाठीं अत्यंत आतुर झाला. त्यानें 'आप-णांस महाराजांचे दर्शनासाठीं घेऊन जावें' अशी जमादारास विनंति केली. परंतु जमादार त्या गोष्टीस कबूल होईना.

तेव्हां जमादाराचा संताप येऊन कानफाट्यानें त्याच्या हातां-तील तलवार खस्कन हिसकावून घेतली व तो पायांतील शृंखलांची पर्वा न करतां समर्थांच्या दिशेनें पळत सुटला.

त्याचा तो भयंकर उग्र अवतार पाहून रस्त्यावरील लोकांना पळतां भुई थोडी झाली. कानफाट्या पोलिसांच्या हातावर तुरी देऊन जो सुंसाट निघाला तो थेट समर्थांसमोर येऊनच उभा राहिला.

त्याला पाहून इतर सेवेकरी घाबरून पळून गेले. त्याच्या-कडे एकवार दृष्टिक्षेप करून समर्थ मोठ्यानें म्हणाले, '**यहाँ क्या है ? मोटके पास बैल और टोणगा है उसके पास जाव**'

श्रीसमर्थांच्या आज्ञेप्रमाणें तो लगेच विहिरीकडे निघाला. त्या ठिकाणीं एक वृद्ध ब्राह्मण समर्थांचा जप करीत पाठमोरा बसला होता. त्याच्या काळ्या सांवळ्या वर्णावरून व बांध्याच्या ठेवणीवरून तो चोळप्पाच आहे असें कानफाट्यास वाटलें व त्याचा राग अनावर होऊन तो पुढें धांवत गेला व त्यानें त्या ब्राह्मणाच्या मानेवर तलवारीचे वार करण्यास सुरुवात केली त्या लखलखीत धारदार तलवारीचे त्यानें चांगले दहापंधरा वार मोठ्या त्वेषानें केले, परंतु शेवटीं तलवारीची मूठच गळून पडल्या-मुळें त्याचा नाइलाज झाला व त्यानें ती मोडकी तलवार उचलून

महाराजांपुढें आणून टाकली.

परंतु श्रीसमर्थांचें लक्ष त्यावेळीं कानफाटयाकडे मुळींच नव्हतें. ते मघापासून एकाग्र चित्तानें त्या ब्राह्मणाकडे टक लावून पहात होते.

तेवढयांत कानफाटयाला पकडण्यासाठीं पोलीस पुढें येऊं लागले. तेव्हां कानफाटयानें त्यांच्यावर मातीचीं ढेकळें फेंकून त्यांना चांगलाच प्रसाद दिला. त्यामुळें सर्वजण जीव मुठींत धरून तेथून पळून गेले. त्याच वेळीं एक विशालकाय धनगर तेथें आला. त्यानें पोलिसांच्या सांगण्यावरून कानफाटयाच्या मागून जाऊन त्याचे पाय पकडले व त्याला खालीं पाडलें आणि मग कुठें त्या 'शूर' पोलिसांनीं पुढें येऊन कानफाटयाला जेरबंद केलें !

कानफाटयानें ज्या ब्राह्मणाच्या मानेवर त्वेषानें तलवारीचे दहापंधरा वार केले होते तो ब्राह्मण वास्तविक दोन तीन वारांतच मरावयाचा. परंतु--

-- परंतु स्वामीमहाराजांची लीला अगाध होती ! त्या ब्राह्मणाला इजा होऊं नये म्हणूनच ते आपल्या अमृतदृष्टीनें एकटक त्याच्याकडे पहात होते. जणूं त्यांनीं त्या ब्राह्मणाच्या शरीराभोंवतीं आपल्या कृपादृष्टीनें एक भक्कम वलयच तयार केलें होतें. त्यामुळें त्या ब्राह्मणास मृत्यु येणें तर दूरच परंतु फारच थोडी इजा झाली व त्यामुळें चार आठ दिवस उपचार करतांच तो खडखडीत बरा झाला.

श्रीस्वामीमहाराजांची लीला अशी विचित्र होती. तिचा थांग सामान्यजनांस लागणें कदापि शक्य नाहीं.

हुमणाबादचे श्रीमन्माणिकप्रभु हे व्याधिपीडितांकडे केवळ अमृतदृष्टीनें पाहूनच त्यांची व्याधि दूर करीत असत, अशी हकीकत त्यांच्या अत्यद्भुत चरित्रांत वाचावयास मिळते. त्यांच्या

कृपाकटाक्षानें भक्तांच्या मनाला आनंद व अपार शांति यांचा लाभ होत असे असें म्हणतात.

## वानरीचा स्वभावपालट

एकदां एक वानरी अक्कलकोटच्या जनतेला अतिशय त्रास देऊं लागली. ती लोकांना चावत तर असेच परंतु त्यांच्या घरांत शिरून घरांतील वस्तूंची हवी तशी मोडतोड करीत असे. त्यामुळें लोकांनीं कंटाळून जाऊन त्या वानरीचा बंदोबस्त करण्याची विनंति सरकारी अधिकारी बंडगार्डन साहेब यांचेकडे केली. तेव्हां त्यांनीं त्या वानरीला ठार मारण्याचा हुकूम सोडला.

त्याप्रमाणें तिला ठार मारण्यासाठीं पकडून खंडोबाच्या देवळामागें नेण्यांत आलें. ही गोष्ट श्रीसमर्थांच्या सेवेकऱ्यांना समजतांच त्यांनीं ती धांवत येऊन समर्थांच्या कानांवर घातली. तेव्हां तिला आपल्यासमोर घेऊन येण्याची श्रींनीं आज्ञा केली. श्रीसमर्थांचा हुकूम मोडण्याची कुणाचीच प्राज्ञा नव्हती ! त्यामुळें तिला लागलीच श्रीसमर्थांपुढें आणण्यांत आलें.

श्रीसमर्थांनीं त्या मुक्या जनावराच्या अंगावरून वत्सलतेनें हात फिरवीत म्हटलें, ‘ अगं, यापुढें कुणाला त्रास देऊं नकोस हं. जा. ’

दोनच वाक्यं ! परंतु त्यामुळें त्या मुक्या प्राण्याच्या स्वभावांतहि कमालीचा बदल झाला. त्या दिवसापासून ती वानरी कमालीची शांत झाली व एखाद्या भाविक मनुष्याप्रमाणें रोज महाराजांच्या दर्शनासाठीं येऊं लागली. स्वामीसमर्थ एखाद्यावेळीं गंमतीखातर तिच्या डोक्यावर टोपी व माळ घालीत असत !

असाच एकदां ‘ जव्हार ’ नांवाचा एक हत्ती उन्मत्त होऊन नाना चाळे करूं लागला. एक दिवस तो सोंडेनें दगड फेकीत

असतां श्रीसमर्थ निर्भयपणें त्याच्यासमोर येऊन कमरेवर हात ठेवून उभे राहिले. त्याबरोबर तो कमालीचा शांत झाला.

श्रीसमर्थांपुढें कुणाची मात्रा चालणार ?

## श्रीसमर्थांना बडोद्यास नेण्याचा असफल प्रयत्न

अक्कलकोटच्या संस्थानिकांप्रमाणेंच शिंदे, होळकर वगैरे मोठमोठे संस्थानिकहि श्रीसमर्थांचे भक्त बनले होते.

त्यावेळीं बडोद्याचे गादीवर श्रीमंत मल्हारराव गायकवाड होते. श्रीसमर्थांसारख्या अवतारी विभूतीनें अक्कलकोट सोडून बडोद्यासच कायमचा निवास करावा अशी त्यांची इच्छा होती. परंतु हें जमावें कसें ? श्रीमंत मल्हारराव रात्रंदिवस याच गोष्टीचा विचार करीत होते.

अखेर शेवटीं त्यांनीं दरबार भरवून आपला हा विचार सर्वांपुढें समक्ष बोलून दाखविला व जो कोणी श्रीसमर्थांना अक्कल-कोटाहून बडोद्यास घेऊन येईल त्यास खूप मोठी जहागिरी व वाटखर्चीसाठीं पाहिजे तेवढें द्रव्य देण्याची तयारी दर्शविली.

परंतु हें काम वरवर दिसतें तितकें सोपें मुळींच नाहीं याची सर्वांना पूर्ण कल्पना असल्यामुळें ती जबाबदारी शिरावर घेण्यास कोणीच तयार होईना !

परंतु मल्हाररावांचा तात्यासाहेब नांवाचा एक महत्त्वाकांक्षी सरदार होता. त्यानें जहागिरीच्या आमिषाला भुलून त्या काम-गिरीचा विडा उचलला. तेव्हां मल्हाररावांचे डोळे आनंदानें चम-कले. त्यांनीं सर्वांसमक्ष तात्यासाहेबांना शाबासकी दिली व अनेक मौल्यवान दागिने व वाटखर्चीसाठीं हजारों रुपये देऊन त्यांना मोठ्या लवाजम्यानिशीं अक्कलकोटास रवाना केलें.

तात्यासाहेब मोठे धोरणी होते. अक्कलकोटास आल्यावर

त्यांनीं समर्थांच्या सेवेकऱ्यांचा कानोसा घेतला व सर्वांना खूष करण्यासाठीं मोतीचूर, जिलेबी, श्रीखण्ड अशा पक्वान्नांच्या पंगती उठविण्यास सुरुवात केली. त्या काळांत ‘ दक्षिणा द्यावी राजेरायरूनें व पक्वान्नें द्यावींत बडोदेकरानें ’ अशी एक म्हणच अक्कलकोटांत रूढ झाली होती !

पुढें चोळप्पा हा श्रीसमर्थांच्या विशेष प्रीतींतील आहे व तितकाच स्वभावानें लोभीहि हें ओळखून त्यांनीं एक दिवस चोळप्पाला एकांतांत बोलावून आपला विचार त्यास सांगितला व तो सिद्धीस गेल्यास दहा हजार रुपयांची जहागिरी देवविण्याचें वचन दिलें.

‘ द्रव्येण सर्वे वशः ’ ही म्हण प्रसिद्धच आहे ! तात्यासाहेबांनीं दहा हजार रुपयांची लाच दाखवितांच चोळप्पाच्या तोंडाला पाणी सुटलें व त्यानें ही गोष्ट कबूल केली !

त्याप्रमाणें एक दिवस श्रींची मर्जी सुप्रसन्न आहे असें पाहून त्यानें श्रीसमर्थांना म्हटलें, ‘ महाराज, आपण बडोद्यास आलांत तर मला दहा हजार रुपयांची जहागिरी मिळेल. ’

परंतु श्रीसमर्थ त्यावर हंसून म्हणाले, ‘ **अरे, त्याजजवळ भक्तीच नाहीं !** ’

तें ऐकून चोळप्पाचा चेहरा पडला. त्यानें ही हकीकत तात्यासाहेबांना सांगितली.

तेव्हां तात्यासाहेबांनीं आपला हेतु तडीस जावा म्हणून ब्राह्मणांकरवीं श्रीगुरुचरित्राचीं पारायणें सुरू केलीं. परंतु त्यानेंहि कार्यभाग होईना !

त्यामुळें धूर्त तात्यासाहेबांनीं एक नवेंच कारस्थान रचलें ! श्रीसमर्थांना मेण्यांत बसवून गुपचूप कडबगांवापर्यंत आणावयाचें व तेथून आगगाडींत बसवून रातोरात बडोद्यास पळवून न्यावयाचें

असें तें विलक्षण कारस्थान होतें !

त्याप्रमाणें श्रीसमर्थांना मेण्यांत बसविण्यांत त्यांनीं यश मिळविलें. तेव्हां आपलें काम फत्ते होणार असें वाटून तात्यासाहे॰ बांची कळी खुलली ! मेणा हळूंहळूं कडबगांवापर्यंत आला. बडोद्या-कडे जाणारी आगगाडी सज्ज होती.

तात्यासाहेब श्रींना उतरवून घेण्यासाठीं लगबगीनें पुढें आले. परंतु...भो आश्चर्यम् ! मेणा पूर्णपणें रिकामा होता ! तात्यासाहेबांचा कुटिल डाव ओळखून श्रीसमर्थ मध्येंच अंतर्धान पावले होते !!

त्यामुळें श्रीसमर्थांपुढें आपली डाळ शिजणार नाहीं हें ओळ-खून तात्यासाहेब लवाजम्यानिशीं बडोद्यास हात हलवीत परत गेले !

त्यानंतर ही अवघड कामगिरी यशवंतराव नांवाच्या एका मराठा मुत्सद्द्यानें शिरावर घेतली. परंतु तो अक्कलकोटास येऊन श्रीसमर्थांपुढें उभा राहतांच समर्थ ताड्कन म्हणाले. '**काय आहे ? बिडी ठोका**' हेंच वाक्य त्यांनीं तीन वेळां उच्चारलें.

पुढें एकदोन दिवसांतच मल्हाररावाकडून त्यास 'तत्काळ बडोद्यास परत यावें' असा तांतडीचा लखोटा मिळाला व त्या-नुसार तो लागलीच बडोद्यास परत गेला. पुढें लवकरच एका विषप्रयोगाच्या खटल्यांत पकडला जाऊन त्याच्या हातांत बिड्या पडल्या !

## संत चरणरज लागतां सहज....

अक्कलकोटास शेषाचार्य अग्निहोत्री या नांवाचे एक वृद्ध गृहस्थ होते. ते श्रीसमर्थांचे परमभक्त असून नेहमीं त्यांच्याच सेवेंत निमग्न असत. स्वामीमहाराजांचेंहि त्यांच्यावर नितान्त

प्रेम असे. त्यामुळेंच श्रीसमर्थ कितीहि रागावलेले असले तरी शेषाचार्य निर्भयतेनें पुढें जाऊन त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवीत आणि महाराजहि क्षणभर राग विसरून त्यांना मोठ्या आनंदानें दर्शन देत. हा अधिकार फक्त शेषाचार्यांचाच होता ! कारण महाराज रागावलेले असतांना शेषाचार्यांशिवाय इतर कुणाचीहि त्यांच्या समोर उभें राहण्याची प्राज्ञा नसे.

अशावेळीं शेषाचार्य पूर्वींच्याच निर्भयतेनें आपली तपकिरीची डबी त्यांचेसमोर धरीत व महाराजहि तिच्यांतील चिमूटभर तपकीर घेऊन ती मोठ्या मजेंत ओढीत.

या अग्निहोत्रीबुवांची महाराजांच्या ठायीं इतकी निस्सीम भक्ति होती कीं त्यांना ते त्यांच्या कुलदेवताच्या म्हणजे श्री व्यंकटेशाच्या ठिकाणींच समजत. त्यांचें घरीं अग्निहोत्र असून ते नित्य कोरान्न भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करीत.

असा क्रम बरेच दिवस चालू होता.

एक दिवस शेषाचार्य असेच श्रींच्या दर्शनास आले असतां महाराजांपुढें भक्तगणांनीं प्रसाददाखल ठेवलेलीं पेढे–बर्फीचीं ताटें पाहून त्यांच्या मनांत विचार आला, ' महाराज सर्व लोकांस पेढे बर्फी वांटतात परंतु आपल्याला देत नाहींत. महाराजांनीं आपल्यालाहि जर ताटभर बर्फी दिली तर आपण ती खाऊन तृप्त होऊं.'

शेषाचार्यांच्या मनांतील ही वासना अंतर्ज्ञानी श्रीसमर्थांना कळावयास किती उशीर. त्यांनीं शेषाचार्यांची खोड मोडण्याचेंच ठरविलें. त्या दिवसापासून शेषाचार्यांना स्वामींचें दर्शनच बंद झालें. जेव्हां दर्शनास यावें तेव्हां समर्थ निजलेले असावेत असें नित्य होऊं लागलें. असे कित्येक दिवस लोटले. अग्निहोत्रीबुवा आले आहेत व श्रीसमर्थ जागे आहेत असा प्रसंगच येईना ! महाराज जागृत होईपर्यंत वाट पहावी तर महाराजांनीं न उठतांच शेषा-

चार्यांना पांघरुणांतून शिव्यांची लाखोली वहावी !

हा प्रकार पाहून शेषाचार्य अस्वस्थ झाले. मायमाऊलीच लेकराला भेटेनाशी झाल्यावर बिचाऱ्या लेकरानें कुणाच्या तोंडाकडे पहावें ? नहमीं मातेच्या ममतेनें प्रेमाची पांखर घालणाऱ्या महाराजांनीं हा काय बरें नवा खेळ सुरू केला ?

विचार करतां करतां शेषाचार्यांना या प्रश्नाचें उत्तर अचानक गवसलें. आपल्या मनांत पेढे बर्फी खाण्याची वासना निर्माण झाल्यामुळें तर महाराजांनीं हा राग धरला नसेल ? हो. असेंच असणार. वासना हेंच दुःखाचें मूळ आहे. जन्ममरणाचा फेरा देखील या वासनेच्या पोटींच भोगावा लागतो. '**वासनेचें मूळ छेदिल्यावांचोनि । तरलेसें कोणी न म्हणावें**' असें संत शिरोमणि श्री तुकाराम महाराज म्हणतात.

हे विचार मनांत येऊन शेषाचार्यास फारच पश्चात्ताप झाला. त्याच दिवशीं अग्निकुण्डांत जाळण्यासाठीं शेणाचे गोळे करावयास ते खास बागेंत गेले होते. त्याहि वेळेस त्यांनीं पाहिलें तों श्रीसमर्थ झोपलेलेच आहेत. तें पाहून शेषाचार्यांना स्वतःचाच राग आला. आणि त्या भरांत त्यांनीं हातांतील शेण चक्क तोंडांत टाकलें आणि ते स्वतःशीं म्हणाले, 'मी जर आजपासून पेढे बर्फी मागेन तर असेंच शेण खाईन.'

त्यावेळीं शेषाचार्य मनांत म्हणाले, 'महाराज, मी तुमच्या बर्फीची वासना मनांत धरली ही माझी भयंकर चूक झाली. यापुढें तशी वासना झाली तर मी शेण खाईन.'

त्याबरोबर श्रीसमर्थ पोट धरधरून खदखदां हंसूं लागले.

आणि त्या दिवसापासून श्रीचें दर्शन शेषाचार्यांना दररोज घडूं लागलें.

शिष्याच्या मनांतील वासनेचें बीज जळून जावें अशीच

सद्गुरूची इच्छा असते. कारण वासनेच्या पोटींच 'पुनरपी जननं पुनरपी मरणम् पुनरपी जननी जठरे शयनम्' असें हें जन्ममरणाचें दुष्ट चक्र चालूं राहतें. यासाठींच सद्गुरु शिष्याच्या मस्तकावर हात ठेवतात. व त्यामुळें शिष्याच्या वासनांचा क्षय होतो.

यासाठींच संतांना शरण जा, त्यांच्या चरणांची धूळ भक्तिभावानें कपाळाला लावा असें श्री तुकाराम महाराज सांगतात. कारण–

**संत चरणरज लागतां सहज ।**
**वासनेचें बीज जळोन जाय ।।**

## अंध मुलास दृष्टिदान

एकदां श्रीसमर्थांची स्वारी अक्कलकोटास देशमुखांच्या वाड्यांत बसली असतां शिऊबाई एका लहान मुलाला पुढें करून म्हणाली, 'महाराज, या मुलाचें मौंजीबंधन झाल्यापासून यास बिलकुल दिसत नाहीं. पूर्वी चांगलें स्वच्छ दिसत होतें. तरी कृपा करून दृष्टिलाभाचा उपाय सांगावा.'

त्यावर श्रीसमर्थ म्हणाले, '**पांच राक्षस येत आहेत. आमची परीक्षा पहाणार आहेत. परीक्षेचे वेळीं हा पोरगा डोळे उघडील.**'

श्रीसमर्थ एवढें म्हणत आहेत तोंच पांच ढेरपोटे वैष्णव ब्राह्मण तेथें येऊन ठेपले! त्यांचा वर्ण काळाकुट्ट असून अंगावर शालजोड्या पांघरलेल्या होत्या. संस्कृत आणि कानडी भाषेंत त्यांचें आपसांत कांहीं संभाषण सुरू होतें. त्यांनीं श्रीसमर्थांना नमस्कार करतांच श्रीसमर्थ त्या आंधळ्या मुलास म्हणाले, '**अरे गणेशा, इकडे ये. या काळ्यांच्या मनांतील वाक्यें उत्तरासह त्यांना सांग.**'

त्यावर तो बिचारा अंध मुलगा हात जोडून श्रींना नम्रपणें म्हणाला, 'महाराज, मला कांहींदेखील येत नाहीं. मी काय सांगूं?'

तेव्हां श्रीसमर्थांनीं आपल्या गळ्यांतील माळ काढून त्याच्या गळ्यांत घातली व एक झेंडूचें फूल त्याचे डोळ्यास लावलें. त्याबरोबर अंगांत संचार व्हावा त्याप्रमाणें तो अंध मुलगा ताडकन् उठून उभा राहिला व त्या वैष्णव ब्राह्मणांच्या मनांतील वाक्यें जशींच्या तशीं म्हणूं लागला !

श्रीसमर्थांचें हें अद्‌भुत सामर्थ्य पाहून श्रींची परीक्षा घेण्यासाठीं आलेले ते ब्राह्मण खजील झाले व त्यांनीं श्रींपुढें साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां श्रीसमर्थ त्यांच्यांतील मुख्य आचार्यास म्हणाले, '**आम्ही पाहिजे त्या जातीच्या मनुष्याचें अन्न खातों म्हणून निंदा करून आमची परीक्षा पाहिलीत खरी, परंतु तुझ्या आईनें पुष्कळ मुसलमानांशीं व्यभिचारकर्म केलें असून तुझा जन्म इमामबक्ष मुसलमानापासून झाला आहे.**'

श्रींच्या मुखांतून बाहेर पडलेली ही सत्य हकीकत ऐकून तो आचार्य लज्जित झाला व क्षमा करण्याबद्दल वारंवार श्रींची विनवणी करूं लागला. त्याचप्रमाणें, आपल्यासारख्या महान् अवतारी विभूतीची परीक्षा पाहण्याचा जो महान् अपराध आपण केला आहे त्या पापांतून मुक्त होण्यास काय करावें असें श्रीसमर्थांना कळवळून विचारूं लागला.

पाप हें पश्चात्तापानेंच धुऊन जात असतें. श्रीसमर्थांना त्या मूढ ब्राह्मणांची दया आली व ते म्हणाले, '**गंगास्नान करून भागवत धर्माचें आचरण करा.**'

त्याच वेळीं त्यांनीं त्या अंध मुलाकडेहि कृपादृष्टीनें पाहतांच त्या मुलास दृष्टिलाभ होऊन तो पूर्ण विद्वान झाला !

हा सर्व चमत्कार ब्रह्मनिष्ठ वामनबुवा ब्रह्मचारी यांनीं समक्ष पाहिलेला आहे.

## ब्रह्मचारी विष्णुबुवा

ब्रह्मचारी विष्णुबुवा हे महान् वेदान्ती होते. त्याचप्रमाणें एक अत्यंत चिकित्सक विद्वान असाहि त्यांचा लौकिक होता. ते कट्टर सनातनी होते. त्यांच्या काळांत मुंबईस पाद्री लोकांचें प्रस्थ फार होतें. हिंदूंच्या पुराणांची मनसोक्त निंदा करून आपल्या ख्रिस्ती धर्माचा प्रचार करणें हेंच त्यांचें प्रमुख काय होतें. त्यांचा समाचार घेण्यास योग्य असा विद्वान पुरुष हिंदूंत नसल्यामुळें या पाद्री लोकांच्या हिंदु–धर्म–नालस्तीला मोठा ऊत आला होता ! परंतु ही परिस्थिति ब्रह्मचारी विष्णुबुवा वादविवादाच्या आखाड्यांत उतरतांच पार पालटली ! त्यांनीं असे कांहीं एक एक पुरावे या माजोरी ख्रिस्ती पाद्र्यांपुढें फेकले कीं त्यांची बोबडीच वळली !

विष्णुबुवा हे जसे महान् वेदान्ती होते, तसेच ते पट्टीचे वक्तेहि होते. वेदान्तासारखा सर्वसामान्य मनुष्याला क्लिष्ट असा विषय ते फार सोपा करून सांगत. त्यांची ही कीर्ति अक्कलकोटच्या राजेसाहेबांना समजल्यामुळें त्यांनीं विष्णुबुवांना मुद्दाम अक्कलकोटास आणविलें.

बुवांना नाहीं म्हटलें तरी विद्वत्तेचा थोडा गर्व होताच ! त्यांनीं एक दिवस श्रीसमर्थांना ‘ ब्रह्मतदाकारवृत्ति ’ म्हणजे काय असा प्रश्न केला.

श्रीसमर्थांनीं त्यांना त्यावेळीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. ते फक्त हंसले.

बुवांना वाटलें, श्रीसमर्थांचा महान अवतारी विभूति म्हणून जो लौकिक झाला आहे त्यांत कांहीं अर्थ नाहीं ! त्यांना ब्रह्म-

तदाकारवृत्ति म्हणजे काय हेंदेखील सांगतां येत नाहीं ! वेडे लोक त्यांच्यामागें उगाचच लागतात ! बुवांनीं ही गोष्ट बाहेरहि चार-चौघांत बोलून दाखविली !

तरीहि श्रीसमर्थ शांतच ! पुढें एक दिवस विष्णुबुवांना रात्रीं झोंपेत एक मोठें भयानक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत शेंकडों विंचू त्यांच्या अंगावर चढले व एकानें तर त्यांना दंशहि केला ! तेव्हां बुवांची त्रेधा उडाली व त्यांनीं 'मेलों मेलों' असें मोठमोठ्यानें ओरडावयास सुरुवात केली. तेव्हां त्यांच्याच शेजारीं झोपलेल्या एका पारशी मित्रानें त्यांच्या पाठीवर हात ठेवून 'काय झालें ?' असा प्रश्न केला. बुवांनीं स्वप्नाची इत्थंभूत हकीकत त्याला सांगितली.

त्यानंतर एक दिवस बुवा पुन्हां श्रीसमर्थांकडे गेले व त्यांनीं पूर्वींचाच प्रश्न त्यांना केला. तेव्हां श्रीसमर्थ ताड्कन् उत्तरले, '**हत् गाढवा ! स्वप्नांत हजारों इंगळ्या अंगावर चढल्या म्हणून तूं घाबरतोस आणि गोष्टी तर वेदान्ताच्या सांगतोस ! ब्रह्मतदा-कारवृत्ति अशी वाटेवर पडली आहे काय ? पुष्कळ वाचाळपणा करून ब्रह्मपदाच्या वल्गना करून, कोटयावर कोटया करून वेदा-न्ताची भाषा बोलूं लागलास म्हणून योगी झालास कीं काय ? ऊठ, चालता हो.**'

बुवा खजील होऊन बिन्हाडीं निघून गेले. त्यानंतर ते पुन्हां एकदां श्रीसमर्थांच्या दर्शनास आले व त्यांनीं श्रींपुढें साष्टांग नमस्कार घातला. त्या भेटींत श्रीसमर्थांनीं ब्रह्मतदाकारवृत्ति म्हणजे काय हें त्यांना स्पष्ट करून सांगितलें व योगमार्गाची दीक्षा देऊन अधिकारी केलें.

तेव्हां मात्र श्रीसमर्थ हे अवतारी आहेत ही गोष्ट बुवांनीं कबूल केली ! चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं हेंच खरें !

प्रकरण : नववें

# श्रीसमर्थांचे महान् शिष्य

श्रीस्वामीसमर्थांचें, अनंत चमत्कार व लीलांनीं नटलेलें अत्यद्भुत चरित्र वाचतांना 'स्वामी म्हणजे चमत्कार' असा कुणाचा ग्रह होणें साहजिक आहे. परंतु चमत्कार हें कांहीं श्रीस्वामींसारख्या अवतारी विभूतींचें अवतारकार्य नव्हे ! त्यांचा अवतार लोकोद्धारासाठीं वा धर्मरक्षणासाठीं आहे. या कार्याला त्यांचे चमत्कार किंवा त्यांच्या सहजलीला पोषक ठरत असतात इतकेंच ! सुवासिक फुलांच्या रंगीबेरंगी पाकळ्यांकडे आकृष्ट होऊन ज्याप्रमाणें कीटक–भृंग त्या फुलांभोंवतीं गर्दी करतात व फलधारणेच्या कार्याला नकळत हातभार लावतात, त्याचप्रमाणें या चमत्कारांमुळें आर्त, ज्ञानी, मुमुक्षु अशा सर्वच थरांतील लोक या अवतारी महात्म्यांकडे आकर्षिले जातात आणि त्यांचें मार्गदर्शन व कृपा होऊन आपापल्या योग्यतेनुसार प्रत्येकाचा उद्धार होतो. श्रीसमर्थांच्या किंवा अन्य कोणत्याहि महान् विभूतीच्या चमत्कारांकडे पाहतांना हाच दृष्टिकोन ठेवावयास हवा !

श्रीसमर्थांचें कार्य हें कांहीं इंद्रजाल करणाऱ्या गारुड्याप्रमाणें चमत्कार करून दाखविण्याचें नाहीं. तसें असतें तर प्रत्येक जादूगाराचे फोटो घरांघरांतून देवपूजेंत आढळले असते ! वर सांगितल्याप्रमाणें लोकोद्धार व धर्मरक्षण व जागृति यांना पोषक म्हणून हें चमत्कारांचें माध्यम आहे !

श्रींच्या अवतारकार्याला अनेक तेजस्वी पैलू आहेत. त्यांमध्यें त्यांनीं निर्माण केलेली 'तेजस्वी शिष्यपरंपरा' हा पैलू विशेषच देदिप्यमान आहे ! 'बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते' या भगवदुक्तीप्रमाणें हाच ज्यांचा अखेरचा जन्म आहे अशा कित्येक ज्ञानी योगभ्रष्टांवर अनुग्रह करून श्रीसमर्थांनीं त्यांना 'प्रतिसमर्थ' पदीं नेऊन बसविलेलें आढळतें !

श्रीसमर्थांच्या 'गुरु' भूमिकेकडे पाहतांना याच दृष्टिकोनांतून पाहिलें पाहिजे. गुरु-शिष्य संबंधांचा विचार करतांना आपण नेहमीं असें म्हणतों कीं, ज्याचा व्यासंग मोठा तोच कांहीं श्रेष्ठ गुरु नव्हे, तर त्यानें आपल्यासारखे, आपल्याच तोडीचे किती शिष्य तयार केले या निकषावर त्याचें मोठेंपण घांसून पाहिलें जातें !

या दृष्टिकोनांतून श्रीसमर्थांच्या 'गुरु' भूमिकेकडे पाहिलें तर त्यांचें श्रेष्ठत्व सहज ध्यानांत येतें

श्रीरामकृष्ण परमहंस यांनीं ज्याप्रमाणें नरेंद्रासारखा अद्वितीय शिष्य घडविला, त्याचप्रमाणें श्रीसमर्थांनीं एकापेक्षां एक अलौकिक शिष्य निर्माण केले. त्यांचें धगधगीत वैराग्य, खडतर तपश्चर्या, अपार गुरुभक्ति, उज्ज्वल चारित्र्य, ज्वलंत निष्ठा इत्यादींचें अवलोकन केल्यास त्या शिष्यवर्गाचें श्रेष्ठत्वहि सहज ध्यानांत येईल !

श्रीसमर्थांच्या या 'आदर्श' शिष्यवर्गाची संख्या सहज पंचविसाच्या घरांत जाईल—

श्रीबीडकरमहाराज व काळबोवा (पुणें), श्रीनृसिंहसरस्वती (आळंदी), श्रीसीतारामममहाराज (मंगळवेढें), श्रीदेवमामलेदार (नासिक), श्रीशिवराममहाराज ऊर्फ रांगोळीबोवा (मालवण), श्रीआनंदनाथमहाराज (वेंगुर्लें), श्रीआनंदभारती (समाधि, ठाणें), श्रीनानाजी रेखी (नगर), श्रीतातमहाराज

( मुंबई ), श्रीकृष्णसरस्वती दत्तमहाराज ऊर्फ कुंभारस्वामी (कोल्हापूर), सच्चिदानंद मुनिमहाराज (शिनोर), श्रीबाळप्पा महाराज ( अक्कलकोट ), हरिभाऊ ऊर्फ स्वामीसुत ( मुंबई ), श्री ब्रह्मनिष्ठ वामनबुवा ( बडोदें ), सच्चिदानंद स्वामीकुमार (चेंबूर), देशपांडे केजकरस्वामी ( केज ), श्री. केळकरमहाराज (चिपळूण), श्रीकैवल्याश्रम बोठेस्वामी (गुर्लेहोसूर), श्री शंकर महाराज (पुणें), धोंडिबा पलुस्कर (पलूस), श्री. दत्तंभटजी (भोर) मैंदर्गीचा यवन अवलिया इ. इ. ' पुष्पसंगें मातीस वास लागे ' या काव्योक्तीप्रमाणें श्रीसमर्थांच्या सान्निध्यांत आल्यामुळें या सर्वांचाच उद्धार झाला व ते ' प्रति समर्थ ' या योग्यतेप्रत पोंचले. या सर्व शिष्यवृंदांचीं चरित्रें साधकांना साधनामार्गावरील दीपस्तंभाप्रमाणें मार्गदर्शी ठरणारीं असून कोणत्याहि संप्रदायांतील साधकांना तीं सदैव स्फूर्ति देत राहतील यांत शंका नाहीं ! आणि याच दृष्टीनें त्यापैकीं कांहीं शिष्यवृंदांचीं चरित्रें आपण अभ्यासूं—

## आळंदीचे श्रीनृसिंहसरस्वती

आळंदीचे श्रीनृसिंहसरस्वती हे परमार्थ मार्गातील एक श्रेष्ठ दर्जाचे अधिकारी पुरुष होऊन गेले. ते चतुःशास्त्रप्रवीण असून महान् योगी होते. ते सदैव आत्मानंदांत रंगलेले असत.

सुरुवातीला ते पंढरपूर येथें रहात. तेथें ' विठ्ठलस्वामी ' या नांवानें ते प्रसिद्ध होते.

योगमार्गांतील कांहीं शंकांचें निराकरण करून घेण्यासाठीं ते स्वामीसमर्थांच्या भेटीसाठीं अक्कलकोटास आले. त्यावेळीं श्रीसमर्थांची स्वारी राजवाड्यानजीकच्या भंडारखान्यांत होती. श्रीनृसिंह सरस्वती आपल्या दर्शनासाठीं येत असल्याचें समर्थांनीं अंतर्ज्ञानानें

जाणलें व राजेसाहेबांना एक मृगाजीन रस्त्यावर अंथरून ठेवण्यास सांगितलें. यावरून एक महान् योगी येत आहेत असेंच जणूं श्रींना सुचवावयाचें होतें !

ऐन दुपारची वेळ. उन्ह रणरणत होतें. अशा वेळीं श्रींचा शोध करीत श्रीनृसिंहसरस्वती भंडारखान्याजवळ आले. ते येतांच समर्थांनीं योगशास्त्रांतील आज्ञाचक्रभेदाचा श्लोक म्हणून-त्यांच्या-कडे पाहिलें. त्याबरोबर श्रीनृसिंहसरस्वतींची समाधि लागली ! ब्रह्मतदाकार वृत्ति होऊन ते त्या अवस्थेंत जवळजवळ दोन तास सुख-दु:खापलीकडील शब्दातीत अशा आनंद-साम्राज्यांत विहरत होते.

ते अशा उन्मनीं अवस्थेंत असतांनाच श्रीसमर्थांनीं त्यांच्या-कडे पुन्हां एक कटाक्ष टाकला. त्याबरोबर त्यांची समाधि हळूंहळूं उतरूं लागून ते देहभानावर आले.

श्रीनृसिंहसरस्वतींना आजवर जें नाना प्रयत्नांनीं साधलें नव्हतें तें समर्थांनीं केवळ एका दृष्टिक्षेपानें निमिषार्धांत साधून दिलें !

त्यानंतर श्रींनीं त्यांना अलंकापुरीस (आळंदीस) जाऊन राहण्याचा आदेश दिला. तेथें त्यांनीं अखण्ड एकतप भजनाचीं व विठ्ठलनामाचीं सदावर्तें घातलीं.

## दोन विलक्षण आख्यायिका

श्रीनृसिंहसरस्वती आळंदीस आले त्यावेळीं कांहीं ब्राह्मण पुजारी लावण्या म्हणतांना त्यांना आढळले. वर्णाश्रम धर्माचें यथा-योग्य पालन न करतां ब्राह्मण वर्गानें शृंगारिक लावण्या म्हणण्यांत आयुष्याचा मौलिक वेळ दवडावा हें पाहून श्रीनृसिंहसरस्वतींना विषाद वाटला. परंतु त्या ब्राह्मणांना 'लावण्या म्हणूं नका' असें

सांगण्याचीहि सोय नव्हती ! तेव्हां श्रीनृसिंहसरस्वतींनीं एक युक्ति योजली !

त्यांनीं स्वत:ला प्राप्त झालेल्या सिद्धीच्या द्वारें पेढे–बर्फी निर्माण केली व ती खाण्यासाठीं त्या ब्राह्मणांना बोलावून घेतलें. पेढेबर्फीचें नांव काढतांच त्या ब्राह्मणांच्या तोंडाला पाणी सुटलें व ते धांवतच श्रीनृसिंहसरस्वतींकडे आले. त्यावेळीं श्रीनृसिंहसरस्वती त्यांना म्हणाले, 'तुम्ही रोज ज्ञानदेवांचे अभंग लावणीच्या चालीवर म्हणून दाखवाल तर मी रोज तुम्हांला अशीच पेढेबर्फी देईन.'

ब्राह्मणांनीं ती गोष्ट तत्काळ कबूल केली व ते रोज श्रीज्ञानदेवांचे अभंग लावणीच्या चालीवर खडचा सुरांत म्हणूं लागले. परंतु ज्ञानदेवांच्या प्रासादिक अभंगांचा प्रभावच असा कीं, हळंहळू शृंगारिक लावण्यांचा विसर पडून ते ब्राह्मण दिवसभर ते अभंगच म्हणूं लागले !

श्रीनृसिंहसरस्वती हे अर्जुनाचे अवतार समजले जातात. याबद्दलची प्रचीति त्यांच्याच मुखानें एकदां आळंदीस आली. ती विलक्षण घटना अशी–

श्रीनृसिंहसरस्वतींनीं श्रीज्ञानेश्वरांचा एक भला मोठा लांकडी रथ तयार केला होता. (सदरचा रथ अजूनहि आळंदीस पहावयास मिळतो.) हा रथ अत्यंत वजनदार आहे. एकदां श्रीज्ञानेश्वर माऊलींच्या पादुका आंत ठेवून तो रथ ओढून नेण्याचा प्रयत्न मरकळ, सोळव, तुळापूर येथील कांहीं नामांकित पहिलवान मंडळींनीं केला. परंतु त्या आडदांड गडयांना तो रथ तसूभरहि ओढून नेतां आला नाहीं. तेव्हां त्यांनीं महाराजांना हांक मारून बोलाविलें. त्यावेळीं श्रीनृसिंहसरस्वती समाधींत मग्न होते. परंतु भक्तांच्या हांका ऐकून ते अर्धवट जागृत होऊन स्वगत म्हणाले, "प्रभो ! मागील जन्मीं माझें सारथ्य केलेंत. यावेळीं मीं सारथ्य

करावें म्हणून हा हट्ट धरलांत कीं काय ? हा पहा मी आलोंच !" असें म्हणून ते त्वरेनें रथावर आरूढ झाले व सारथ्य करूं लागले. त्याबरोबर रथ हलला !

## 'क्यों ? रंडी नहीं छोडी ?'

पुढें एकदां श्रीनृसिंहसरस्वती समर्थांना भेटण्यासाठीं अक्कलकोटास आले. त्यावेळीं श्रींची स्वारी पश्चिमेकडील माळावर असलेल्या श्रीराम मंदिरांत होती. त्यांच्या अंवतींभोंवतीं सेवेकरी आणि दर्शनेच्छू लोकांची वरीच गर्दी होती.

श्रीनृसिंहसरस्वतींना पाहतांच श्रीसमर्थ चटकन् म्हणाले, 'क्यों ? रंडी नहीं छोडी ?'

त्यावर त्यांना विनम्रभावानें वंदन करून श्रीनृसिंहसरस्वती म्हणाले, 'महाराज, रंडी छोडने के वास्ते ही इलाज चला है. आप की कृपा चाहिये.'

या उत्तरावर श्रींनीं प्रसन्न हास्य केलें व त्यांचेसाठीं व्याघ्राजिन पसरण्याची सेवेकऱ्यांना आज्ञा केली.

याठिकाणीं 'रंडी' या शब्दाचा अर्थ वारांगना किंवा वेश्या असा नसून 'सिद्धि' असा होता व तो फक्त जाणत्यांनींच ओळखला !

श्रीनृसिंहसरस्वतींना योगाभ्यासामुळें अनेक सिद्धि प्राप्त झाल्या होत्या व त्यांचा ते उपयोगहि करीत असत. परंतु सिद्धि या परमार्थमार्गातील प्रगतीला बाधक असल्यामुळें श्रीसमर्थांनीं त्यांचा त्याग करण्याबद्दल त्यांना सुचविलें होतें. या संदर्भात 'सिद्धि सर्वथा बाधक' किंवा 'नाहीं परमार्थ सिद्धीमाजी' इत्यादि नाथांचीं वचनें प्रसिद्ध आहेत. बहुधा सर्वच साक्षात्कारी संतांनीं सिद्धींचा कडक शब्दांत निषेधच केलेला आढळून येतो !

तथापि या संदर्भांत 'रंडी' या शब्दाचा दुसराहि एक अर्थ एका विद्वान गृहस्थांनीं आम्हांला सांगितला. त्यांच्या मतें श्रीसमर्थांनीं 'रंडी' हा शब्द 'सिद्धि' या अर्थानें न वापरतां 'संस्कृत भाषा' या अर्थानेंच वापरला! कारण श्रीनृसिंहसरस्वती ज्ञानोबांच्या आळंदीस राहूनहि नेहमीं संस्कृतांत बोलत, त्यामुळें त्यांच्या ज्ञानाचा फायदा सामान्य जनांना मिळणार नाहीं असें वाटूनच 'अजून संस्कृत भाषा सोडली नाहीं का' असेंच श्रीसमर्थांनीं श्रीनृसिंह-सरस्वतींना विचारलें असावें. 'रंडी' या शब्दाचा हा अर्थ स्वतः श्रीनृसिंहसरस्वतींनींच आपल्या एका शिष्याला सांगितला होता असेंहि त्या गृहस्थांनीं आम्हांला सांगितलें. श्रीनृसिंहसरस्वतींनीं या घटनेनंतरहि सिद्धींचा उपयोग करण्याचें सोडलें नव्हतें या वस्तु-स्थितीवरून रंडी म्हणजे संस्कृत भाषा हा अर्थ अगदींच चुकीचा असेल असें वाटत नाहीं! असो.

श्रीनृसिंहसरस्वतींचा दैनंदिन कार्यक्रम अतिशय आंखीव आणि आदर्श होता. ते रोज पंचपंच उषःकालीं उठून प्रातर्विधि उरकून माध्यान्हकालापर्यंत योगाभ्यास करीत. नंतर भिक्षा, भोजन व थोडी विश्रांति घेतल्यावर श्रीसमर्थांचें चिंतन, जप, शिष्यवर्गाचा अभ्यास इत्यादि कार्यक्रम होत. श्रीज्ञानेश्वर माऊलींचा रथ, इंद्रायणीचा घाट, धर्मशाळा इत्यादि अनेक समाजसेवेचीं कामें त्यांनीं पार पाडलीं. त्यांनीं आळंदीस नित्य ब्राह्मण भोजनहि सुरू केलें. ते बोलतील तें सत्य होत असे. त्यांच्या दर्शनासाठीं हजारों लोक येत व तृप्त होऊन परत जात!

श्रीनृसिंहसरस्वती महाराजांचें वास्तव्य आळंदीस सुमारें बारा वर्षें झालें. त्यांचें अद्भुत चरित्र नागपूरचे गुरुभक्त श्री. पाळे-कर यांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. तें जिज्ञासूंनीं अवश्य वाचावें.

## श्रीरामानंद बीडकर

श्रीरामानंद बीडकर यांचें सर्वच जीवनचरित्र एखाद्या कादंबरींत शोभतील अशा अद्‌भुत व नवलपूर्ण घटनांनीं भरलेलें आहे ! त्यांचा पिंड परमार्थाचा असला तरी किमयेच्या नादीं लागल्यामुळें त्यांची जीवननौका भलत्याच दिशेनें वाहूं लागली होती. परंतु पूर्वसुकृतामुळें श्रीसमर्थांसारखी महान् विभूति त्यांना भेटली व किमयाकार बीडकर–'बीडकरमहाराज' या श्रेष्ठ पदाला जाऊन पोहोंचले !

श्रीबीडकर हे पार्थगोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. त्यांचा जन्म माघ शुद्ध अष्टमी शके १७६० या दिवशीं झाला. त्यांना पितृसुख फार काळ लाभलें नाहीं.

लहानपणापासूनच त्यांना परमेश्वरभक्तीचें वेड होतें; त्यामुळें पंढरपूर, सप्तशृंगी इत्यादि यात्रा त्यांनीं लहानपणींच उरकल्या.

पुढें गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतर त्यांनीं पुण्यास सराफीचा आणि गंध्याचा व्यवसाय सुरू केला. या दोन्ही व्यवसायांत ते निष्णात होते, परंतु त्याच सुमारास त्यांच्या डोक्यांत किमयेचें वेड शिरलें ! हलक्या धातूपासून किमयेच्या सहाय्यानें सोनें तयार करावें व ऐषआरामांत राजासारखें रहावें असें त्यांना वाटूं लागलें. मनुष्याचा पिंड परमार्थाचा असला तरी पूर्वजन्मींच्या वासना समूळ नष्ट न झाल्यामुळें परमार्थमार्गांत व्हावी तशी प्रगति होऊं शकत नाहीं. असा मनुष्य लोकेषणा, दारेषणा, वित्तेषणा यांच्या वलयांतच फिरत राहतो आणि सद्‌गुरूची भेट होईपर्यंत वासनेचें बीज जळून जात नाहीं ! 'संतचरण रज लागतां सहज । वासनेचें बीज जळोनि जाय' ही संतोक्ती प्रसिद्धच आहे.

श्रीबीडकरांनीं बहुत्प्रयासानें किमयेचें ज्ञान प्राप्त करून घेतलें व ते राजेशाही थाटांत राहूं लागले ! त्याच्या जोडीला अत्तर विकण्याचा मूळ धंदा सुरूच होता. परंतु त्याला जणूं आतां जोडधंद्याचेंच स्वरूप आलें होतें ! या धंद्यामुळें त्यांचा संबंध अनेक धनिक व विलासी लोकांशीं आला. आणि त्यांच्या संगतीमुळें बीडकरांना कांहीं व्यसनेंहि चिकटलीं ! एकदां ते धंद्यानिमित्त ग्वाल्हेर येथें गेले असतां एका स्त्रीच्या प्रेमपाशांत अडकले व ' मी तुला मरेपर्यंत सांभाळीन ' असें वचन तिला देऊन बसले ! परंतु प्रेमाच्या भरांत दिलेल्या वचनाची परिपूर्तता कशी करावी हें त्यांना समजेना. ते तसे पापभीरू होते. त्यामुळें वचनभंगाचें पाप लागणार कीं काय या चिंतेनें त्यांची झोंपच उडाली ! परंतु पुढें लवकरच त्या स्त्रीनें परलोकचा रस्ता धरला व बीडकरांच्या डोक्यावरचें फार मोठें ओझें खालीं उतरलें !

तथापि, कामवासनेपासून मन विटेना ! काम, क्रोध, मद, मत्सर इत्यादि षड्रिपु परमार्थ मार्गांतील अडसर आहेत व भगवंताला शरण गेल्याशिवाय हे अडसर दूर होणें कदापि शक्य नाहीं. या संदर्भांत, ' जे रंगले भगवत्पथा । त्यांचें चित्त विसरलें विषयावस्था ' हें नाथांचें वचन प्रसिद्ध आहे.

श्रीबीडकरांच्या मनांत आतां द्वंद्व सुरू झालें ! क्षणैक सुख देणारे विषयभोग कीं...अविनाशी सुख देणारा परमार्थ ?

पुढें एक दिवस त्यांची एक साधूशी गांठ पडली. त्यावेळीं परमार्थ मार्गांत पडण्याची आपली इच्छा त्यांनीं त्या साधूजवळ बोलून दाखविली. परंतु तो साधु हंसला ! त्याला बीडकरांचा पूर्वेतिहास ठाऊक होता. तो निंदायुक्त स्वरांत बीडकरांना म्हणाला, ' आपण नुसता ऐषआराम करावा. आपल्या हातून परमार्थ होणें नाहीं. वैराग्याशिवाय सर्व व्यर्थ आहे.'

चार लोकांदेखत त्या साधूनें बीडकरांना हा शेरा मारला. त्यामुळें बीडकरांचें अंतःकरण व्यथित झालें. परंतु त्याच क्षणीं त्यांच्या शरीरांत जणू चैतन्य संचारलें ! त्या भरांत त्यांनीं भीष्मप्रतिज्ञा केली, 'यांच्याकडून परमार्थाला लायक म्हणवून घेईन तरच नांवाचा बीडकर !'

तो क्षण बीडकरांच्या आयुष्यांत क्रांतीचा ठरला ! एखादी भरकटत जाणारी कागदी नांव वाटेंत दगडाची ठोकर बसून प्रवाहांत मार्गी व्हावी त्याप्रमाणें बीडकरांची जीवननौका अपमानाची ठोकर बसून नेमकी परमार्थमार्गाला लागली !

बीडकर तसे जिद्दी होते. प्रतिज्ञापूर्तीसाठीं लागणारा मनाचा कणखरपणा त्यांच्याजवळ होता. ते तडक मारुतीच्या मंदिरांत गेले. कारण मारुती हें त्यांचें आराध्य दैवत. आतां वायुसुत मारुतीरायच आपली प्रतिज्ञा तडीस नेतील असा दृढविश्वास बाळगून त्यांनीं रात्रंदिवस हनुमान कवचाचे पाठ सुरूं केले. त्याच्याच जोडीला त्यांनीं कडक उपोषणहि आरंभिलें. रात्रंदिवस मारुतरायांची कडक उपासना करावी व त्यांना शरण जाऊन प्रतिज्ञापूर्तीसाठीं सहाय्यभूत होण्याबद्दल कळवळून प्रार्थना करावी असा बीडकरांचा कार्यक्रम सुरूं झाला.

आणि थोड्याच दिवसांत मारुतीराय बीडकरांची निष्ठा व उत्कट भक्तिभाव पाहून त्यांच्या हांकेला धांवून आले. त्यांनीं बीडकरांना 'अक्कलकोटास जाण्याबद्दल' दृष्टान्त दिला. आणि बीडकरांनीं त्याच पावलीं अक्कलकोट गांठलें !

अक्कलकोटास ते श्री. अप्पासाहेब शेरखाने यांच्याकडे उतरले. त्यादिवशीं श्रीसमर्थांची स्वारी राजवाड्यांत होती. त्यामुळें त्यांचें दर्शन होणार नाहीं असें सेवेकऱ्यांनीं बीडकरांना सांगितलें. परंतु बीडकर आतां पूर्वीचे बीडकर राहिले नव्हते. मारुतीरायांच्या

कडक उपासनेमुळें त्यांचें मनोबल शतपटीनें वाढलें होतें. त्यांनीं मारुतीरायांचें स्मरण करून तेथल्या तेथें प्रतिज्ञा केली, 'श्रीसमर्थांचें दर्शन होईपर्यंत मी अन्नग्रहण करणार नाहीं !'

अशाच दोन रात्री गेल्या. पोटांत अन्नाचा कण नाहीं, परंतु ओंठांत मात्र एकसारखें स्वामींचें नांव ! सारखा त्यांचा ध्यास. सारखें त्यांचें चिंतन ! बीडकरांच्या मनोनिग्रहाची, भक्तिभावाच्या उत्कटतेची ती जणूं परीक्षा होती.

श्रीसमर्थांनीं बीडकरांची तळमळ ओखळली आणि राजवाड्याच्या भिंतीवरून उडी मारून त्यांनी बीडकरांना दर्शन दिलें. त्या क्षणानें बीडकरांचें जीवन उजळून टाकलें. बीडकरांनीं श्रींच्या कुसुमकोमल चरणांवर डोकें टेकलें.

त्याप्रसंगीं '**कायकू पाया पडते**' असें खड्या आवाजांत समर्थांनीं विचारलें.

'पाया मजबूत पाहिजे.' बीडकर तत्काळ उत्तरले.

त्यावर '**उधर देख उधर देख**' असें म्हणून समर्थांनीं खुंटीला अडकविलेल्या मृगाजिनाकडे बोट दाखविलें.

'मृगाजिनावर बसून योगाभ्यास कर' असेंच जणूं श्रींना सुचवावयाचें होतें. परंतु श्रीसमर्थांना निश्चित हेंच सुचवावयाचें आहे कीं कांहीं दुसरें, अशी शंका मनांत येऊन बीडकर नम्रस्वरांत म्हणाले, 'अज्ञानी आहें.'

त्यावर '**कायका अज्ञान**' असें म्हणून श्रीसमर्थांनीं बीडकरांना शिक्षा देण्यास सुरुवात केली.

तें पाहून जवळच उभ्या राहिलेल्या चोळप्पा आणि सुंदराबाई यांनीं बीडकरांना बाजूला घेऊन म्हटलें, 'आपण संसारी आहांत. स्वामींचा कोप झाला तर सर्वनाश होईल.'

परंतु बीडकर पुन्हां श्रीसन्निध येऊन उभे राहिले. 'स्वामी

महाराज, तुमच्या चरणाशीं आलों आहें. आतां तारा किंवा मारा. तुमच्या शिव्याहि मला ओंव्याप्रमाणेंच आहेत ' असेच विचार त्यांच्या मनांत त्यावेळीं घोळत असतील का ?

पुढें थोडया वेळानें श्रींच्या तोंडून बाहेर पडणारा शिव्यांचा भडिमार बंद झाला व, 'अभी यहांसे चले जाव। तुम्हारा काम हो गया है।' असा श्रींचा एकाएकीं हुकूम झाला. त्या शब्दांनीं बीडकरांचें सर्वांग पुलकित झालें. श्रींनीं त्यावेळीं जणूं दृष्टिकटाक्षानें एक प्रकारचा शक्तिपातच केला. परंतु ही केवळ सुरुवात होती.

श्रींच्या आज्ञेप्रमाणें बीडकर श्रींपुढें साष्टांग नमस्कार घालून व त्यांचा सद्गदित अंतःकरणानें निरोप घेऊन पुण्यास निघून गेले.

श्रीसमर्थांच्या या प्रथम भेटीतच बीडकरांची वृत्ति अंतर्मुख बनली. शक्तिपात दीक्षेचें हें एक महत्त्वाचें कार्य आहे. ज्ञानवैराग्याचा उदय करून जी पशुवासनांचा क्षय करते ती दीक्षा त्या दिवसापासून 'श्रीसद्गुरुराय माऊली ' हा जप बीडकरांच्या तोंडांतून एकसारखा, आपोआप बाहेर पडूं लागला. रात्रंदिवस एकच नाद, एकच चाळा. 'श्रीसद्गुरुराय माऊली ', 'श्रीसद्गुरुराय माऊली.' नामसुद्धां तोंडांत विडयासारखेंच रंगावें लागतें. चिमड (जि. बेळगांव) येथें इ. स. १८९१ मध्यें समाधिस्थ झालेले ब्रह्मीभूत श्री. रामचंद्रराव यरगट्टीकर हे एक फार मोठे अधिकारी सत्पुरुष होऊन गेले. एकदां आपल्या शिष्याला बोलावून ते म्हणाले, 'नामस्मरण पुष्कळजण करतात. परंतु नाम तोंडांत कसं रंगतं तें पहायचं आहे का ? ' एवढें बोलून यरगट्टीकरांनीं आपलें तोंड उघडलें. त्यावेळीं त्यांच्या तोंडाच्या आंतील भाग त्या शिष्याला एखाद्या गुलाबाच्या फुलासारखा कोमल व गुलाबी रंगाचा दिसला. नामस्मरण असें हवें ! मनाबरोबर देहहि रंगून गेला पाहिजे.

बीडकरांचें नामस्मरण असेंच चालले होतें. असें वर्ष उलटलें. बीडकरांना श्रीगुरुभेटीचा पुन्हा ध्यास लागला. ती तळमळ असह्य झाली. आणि माघ शुद्ध पौर्णिमेस बीडकर पुन्हां अक्कलकोटास आले. त्यावेळीं, '**आंबेका पाड लगा है, पूरा होयगा तो काम हो जायगा ।**' असे शब्द श्रींच्या मुखांतून बाहेर पडले.

त्यानंतर तिसऱ्या वर्षींहि बीडकर श्रींच्या दर्शनास अक्कलकोटास आले. त्यावेळीं उपदेश होईपर्यंत श्रीसेवाच करीत राहण्याचा त्यांनीं दृढनिश्चय केला.

एक दिवस रात्रीं बीडकर श्रींचे पाय चेपीत बसले होते. मध्यरात्र व्हायची वेळ आली तरी समर्थ ' पुरे ' म्हणेनात तथापि बीडकरांना तरी तेंच हवें होतें. हजारोंचा उद्धार करणाऱ्या त्या कुसुमकोमल परमपवित्र चरणांची सेवा, त्यांचा तो दुर्लभ स्पर्श कोणता सूज्ञ व निष्ठावंत सेवक नाकारील ? या मुक्कामांत श्रींची घडेल तितकी सेवा करण्याचा बीडकरांनीं दृढनिश्चयच केला होता. पहांट झाली तरी श्रीसमर्थांच्या तोंडून ' पुरे ' हा शब्द नाहीं !

पहांटेच्या वेळीं एक भयानक व बीडकरांच्या स्वामीनिष्ठेची अंतिम कसोटी ठरेल अशी घटना घडली., अर्थात् ती समर्थांचीच लीला होती.

एकाएकीं श्रीसमर्थांच्या दोन पायांमधून एक भला मोठा नाग बाहेर आला व फणा काढून बीडकरांच्या अंगावर फुत्कार सोडूं लागला. तो क्षण कसोटीचा होता. त्या परीक्षेंत उत्तीर्ण होणें तितकें सोपें नव्हतें. परंतु बीडकर घाबरले नाहींत. स्वामीसेवा करतांना मरण आलें तर त्यासारखें सुंदर मरण नाहीं. बीडकर श्रीसमर्थांचा जप करीत स्वामींची सेवा करीतच राहिले.

तें पाहून श्रीसमर्थ एकाएकीं ताडकन् उठले व रागानें म्हणाले, '**तू बडा राक्षस जिद है.**' आणि एवढें म्हणून त्यांनीं बीड-

करांना फाडकन् एक जोराची थप्पड मारली. आणि '**जिद राक्षस निकल जाव यहांसे**' असे उद्गार काढले. त्याबरोबर बीडकर गुंगी येऊन खालीं पडले.

स्वामींचे एक शिष्य सदानंद म्हणून होते. त्यांनीं बीडकरांना उचलून आपल्या खोलींत नेलें. दुसऱ्या दिवशीं पहांटें बीडकर सावध झाले त्यावेळचा त्यांचा आनंद अवर्णनीय होता. ते आत्मानंदांत रंगून गेले होते. 'जेथ मौन पडिलें वेदां। वृत्ति तत्पदा पावली' असें या अवस्थेचें वर्णन नाथ करतात

त्यानंतर प्रातःकाळीं बीडकर श्रींच्या दर्शनासाठीं गेले. त्यांना पाहून समर्थ म्हणाले, '**अभी क्या तेरे बापका लेना देना है? सेवा बनाव**' असें म्हणून श्रीसमर्थांनीं बीडकरांचा कार्यभाग झाल्याचेंच जणूं सूचित केलें. आणि त्यांना सहस्रभोजन घालण्याची आज्ञा केली. त्यानंतर पैशांची व्यवस्था करण्यासाठीं बीडकर पुण्यास आले व हजार रुपये किमतीचीं अत्तरें घेऊन अक्कलकोटाकडे निघाले. परंतु वाटेंत कुर्डूवाडी स्टेशनावरून घोड्यावर बसून अक्कलकोटाकडे जातांना त्यांचा घोडा एकाएकीं बुजला व अत्तरांची पेटी खालीं पडून सर्व अत्तरांची नासधूस झाली.

तथापि त्याबद्दलचा शोक आंवरून बीडकर स्वामीनामाचा जप करीत तसेच अक्कलकोटास जाऊन पोंचले.

## अष्टगंध विकून सहस्रभोजन

परंतु पैशाअभावीं आतां सहस्रभोजन कसें घालावें अशी मोठी चिंता बीडकरांना पडली. त्यांनीं आपली ही अडचण अक्कलकोट संस्थानच्या कारभाऱ्यांना कळविली. कारभारी समजूतदार होते त्यांनीं बीडकरांना जरूर ती मदत केली. बीडकरांनीं त्यांच्या ओळखीनें सर्व माल वाण्याकडून उधार आणला व सहस्रभोजन

घातलें.

त्यानंतर अत्तराच्या फुटलेल्या कुप्यांतून अत्तर काढून बीडकरांनीं उत्कृष्टपैकीं अष्टगंध तयार केलें. तें अष्टगंध राजेसाहेबांना इतकें आवडलें कीं, त्यांनीं तें सर्व खरेदी केलें. त्या पैशांतून बीडकरांनीं वाण्याची उधारी भागवली.

## 'बच्चा, अबी कित्ती गुरुदच्छिना देगा ?'

भोजन आटोपल्यावर श्रीसमर्थांनीं हंसून बीडकरांना म्हटलें, '**भोजन तो दिया, लेकिन दच्छिना नहीं दिया. बच्चा, अबी कित्ती गुरुदच्छिना देगा ? बहोत देगा ?**'

बीडकर 'आज्ञा प्रमाण' असें म्हणून स्वामींसमोर हात जोडून नम्रपणें उभे राहिले.

त्यावर समर्थ डोळे किलकिले करीत म्हणाले, '**तेरेसे दच्छिना नहीं दी जायेगी, देना है तो वचन देव**' असें म्हणून श्रींनीं आपला हात पुढें केला.

तेव्हां श्रींच्या हातावर तीन वेळां हात ठेवून बीडकरांनीं वचन देण्याचें कबूल केलें. परंतु स्वामी आतां कोणती दक्षिणा मागतात याचा अंदाज बीडकरांना येईना.

श्रीसमर्थ लगेच म्हणाले, '**बच्चा, तुम जो जडीबुटी का धंदा करते हो वह बंद करो.**'

बीडकरांवर जणूं वज्राघात झाला ! ते चपापले. गोंधळले ! श्रीसमर्थ असें कांहीं अजब वचन मागतील असें त्यांना स्वप्नांतहि वाटलें नव्हतें ! आजवर ज्या किमयेच्या धंद्यानें त्यांना हजारों रुपये मिळवून दिले होते व ज्याच्या जोरावर बीडकरांनीं राजैश्वर्य भोगलें तो धंदा आतां बंद करावा लागणार होता ! क्षणभर त्यांच्या डोळ्यांपुढें अंधेरी आली.

परंतु क्षणभरच !

दुसऱ्याच क्षणीं त्यांनीं मनाची तयारी केली आणि श्रींना तसें वचन दिलें. श्रींच्या चेहऱ्यावर प्रसन्न हास्य झळकलें.

बीडकर सर्व कसोटयांतून पार पडले होते !

त्यानंतर चौथ्या खेपेस बीडकर पुन्हां सद्गुरूंच्या दर्शनासाठीं अक्कलकोट येथें गेले. त्यावेळीं, 'पुन्हां अक्कलकोटास येऊं नये. नर्मदाप्रदक्षिणा करावी ' अशी श्रींची आज्ञा झाली.

त्यानुसार बीडकरांनीं नर्मदामातेची प्रदक्षिणा सुरू केली. त्या प्रवासांत त्यांच्यावर नानातऱ्हेचीं घोर संकटें आलीं. एकदां तर वाघोबांनीं दर्शन देऊन त्यांना घाबरवून सोडलें ! दुसऱ्या वेळीं ते एका अजगराच्या तडाख्यांत सांपडले ! परंतु आतां त्यांची काळजी समर्थांना होती. त्यांनीं सर्व प्रसंगांतून त्यांना सुखरूप निभावून नेलें. वाटेमध्यें प्रत्यक्ष नर्मदामातेनें त्यांना दर्शन देऊन कृतार्थ केलें. नर्मदामातेनें टेंबेस्वामी, तसेंच स्वामीसमर्थांचेच शिष्य स्वामी सच्चिदानंद ऊर्फ मुनीबाबा (शिनोर) यांनाहि दर्शन दिल्याचा उल्लेख त्यांच्या चरित्रांत पहावयास मिळतो.

वाटेंत महेश्वर गांवीं बीडकरांचा मुक्काम असतांना श्रीसमर्थ समाधिस्थ झाल्याची दुःखदायक वार्ता बीडकरांना समजली. तें दुःख बीडकरांसारख्या सद्भक्ताला असह्य झालें. त्यांच्या डोळयांतून अश्रूंचे पूर वाहूं लागले. आपला आधार तुटल्याची जाणीव होऊन ते ओक्साबोक्शी रडूं लागलें.

परंतु त्याच रात्रीं गुरुमाउलींनीं बीडकरांना स्वप्नांत येऊन सांगितलें—'हम गया नहीं, जिंदा है.' बीडकरांच्या व्यथित मनाला दिलासा मिळाला. श्रींचें कृपाछत्र अजूनहि अदृश्यपणें आपल्या डोक्यावर आहे या जाणीवेनें त्यांना हायसें वाटलें !

त्याचवेळीं आपल्या पतीचा शोध करीत बीडकरांचें कुटुंब

ओंकारेश्वरीं आलें. बीडकरांची गांठ योगायोगानें तेथेंच पडली.

पुढें कुटुंबांत मुलीचें बाळंतपणासाठीं रावेर येथें पोहोंचवून बीडकरांनीं नर्मदा प्रदक्षिणा सुरूं केली. ओंकारेश्वराहून निघतांना एका ब्रह्मचाऱ्याकडे त्यांनीं आपला अंगरखा, पागोटें, बंडी, धोतर, जोडा व दहा रुपये इत्यादि वस्तु ठेवल्या व 'आम्ही जिवंत परत आल्यास आम्हांस द्याव्यात' असें सांगून ते निघाले. त्यावेळीं 'पंचकोश काढूं नयेत, गुडघाभर पाण्याचेवर जाऊं नये, नर्मदा-कांठ सोडूं नये व नर्मदामातेचें पाणी दिवसांतून एकदां तरी भरपूर घ्यावें' इत्यादि नर्मदाप्रदक्षिणेचे नियम त्यांनी त्याच्याकडून सम-जावून घेतले.

नर्मदा प्रदक्षिणा सुखरूपपणें पार पडल्यावर त्यांनीं थोड्याच दिवसांत काशी, प्रयाग, औदुंबर, वाडी, देहू, आळंदी, चिंचवड इत्यादि यात्रा केल्या व पुण्यास ओंकारेश्वर रस्त्यावर मठाची स्थापना केली.

पुढें ते मूळव्याधीनें आजारी पडले. कांहीं काळ त्या दुख-ण्यांत काढून ४ एप्रिल १९१३ रोजीं ते स्वस्वरूपीं लीन झाले.

त्यांचा शिष्यपरिवार फार मोठा होता. रावसाहेब ऊर्फ आबामहाराज सहस्रबुद्धे हे त्यांचेच शिष्य होत.

बीडकर महाराजांची भाषणशैली अतिशय तर्कशुद्ध असे. त्यांचें सर्व बोलणें आत्मानुभवाच्या शुद्ध पायावर उभारलेलें असे. **'प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ जयानें केला, तो नर भलारे भला'** अशी त्यांची आवडती शिकवण होती. त्यांचे मौलिक विचार त्यांचे चरित्रकार श्री. ल. ग. बापट यांनीं 'विचार जागृति' या पुस्त-कांत ग्रथित केले असून ते प्रत्येकानें एकवार अवश्य मनन करण्या-सारखे आहेत.

## श्रीसीताराममहाराज

श्रीसमर्थांच्या शिष्यवर्गांतील जे शिष्य पुढें महान् अधिकारी पुरुष बनले त्यांत श्रीसीताराममहाराज यांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. त्यांचें सर्वच चरित्र अतिशय अद्भुत आहे !

श्रीसीताराममहाराज हे स्वतःला 'वेडा सीताराम' असें म्हणवून घेत ! ते महान् योगी असून सदा सर्वकाळ जीवनमुक्ता-प्रमाणें रहात. त्यांनीं कोठेंहि विद्याभ्यास केल्याचा पुरावा नाहीं. त्याचप्रमाणें चरितार्थासाठीं नोकरी केल्याचीहि नोंद नाहीं. संसाराच्या जाळ्यांत तर ते कधींच अडकले नाहींत !

त्यांचे वडील बापूराव विनायक सुभेदार हे साताऱ्यास नोकरी करीत होते. सावत्र आईच्या छळामुळें त्रासून बाल सीताराम वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षीं फक्त एका लंगोटीनिशीं घराबाहेर पडला व त्यानें अक्कलकोटास जाऊन स्वामीमहाराजांनाच आई-बाप मानून त्यांची निष्ठापूर्वक सेवा सुरूं केली. श्रीसमर्थांनीं सीतारामाची योग्यता ओळखून त्याच्या मस्तकावर कृपाहस्त ठेवला आणि तेव्हांपासून सीतारामाची योगाभ्यासांत प्रगति होऊं लागली. अवघ्या सहा वर्षांत ते महासिद्ध बनले.

तेव्हां श्रीसमर्थांनीं त्यांस पूर्ण आशीर्वाद देऊन आज्ञा केली, 'जेथून आलास तेथें जा !'

त्याप्रमाणें सीतारामबुवा मंगळवेढें येथें जाऊन राहिले. त्यांचा अधिकार जाणून लोक त्यांना सीताराममहाराज असें आदरार्थी संबोधूं लागले.

ते निरंतर निजानंदीं निमग्न असत. त्यांच्या दर्शनानें भक्तजनांच्या मनाला सुखशांतीचा लाभ होत असे. माध्यान्हकाळीं ते कुणाच्याहि दाराशीं जाऊन, 'आई, भाकरी दे' असें म्हणत. जें

मिळेल तें हातावर घेऊन थोडेंबहुत उभ्याउभ्याच कसेंतरी खात व पाणी पिऊन स्मशानांत जाऊन बसत. त्यांच्या चेहऱ्यावर निरंतर बालभाव दृग्गोचर होत असे.

कधीं लहर लागली तर ते लोकांना थोडा बहुत उपदेश पुढीलप्रमाणें करीत असत––

'रामनामाचें निरंतर स्मरण करा. पांडित्याच्या मागें लागूं नका. प्राणिमात्रांत ईश्वर पहा.'

त्यांनीं मंगळवेढयास ४० वर्षें वास्तव्य केलें. आपला अंतकाल त्यांना अगोदरच समजला होता. स्वतःच्या महाप्रयाणापूर्वीं पंधरा दिवस ते लोकांना म्हणूं लागले, 'आतां वेडा सीताराम जाईल.' व त्याप्रमाणेंच झालें ! पंढरपुरापासून नऊ मैलांवर खर्डी येथें त्यांची सुंदर समाधि आहे.

या सीताराममहाराजांबद्दल एक मोठी गंमतीदार आठवण नुकतीच समजली.

एकदां आंब्याचे दिवसांत सीताराममहाराज बाजारांतून फिरत होते. तेवढयांत त्यांचें लक्ष एका आंबेवालीच्या पाटीकडे गेलें. पाटींत पिवळेजर्द, रसरशीत आंबे होते. आंबेवाली कुठें मोड आणण्यासाठीं बाजूला गेली होती. सीतारामबुवांनीं तिथेंच आसन ठोकलें व पाटींतील एक आंबा घेऊन खाण्यास सुरुवात केली. ही गोष्ट त्यांच्या बाल-स्वभावाला अनुसरूनच घडली होती.

परंतु तेवढयांत ती आंबेवाली तिथें आली आणि वेडया सीतारामाला चोरून आंबा खातांना पाहून तिच्या मुठी आंवळल्या गेल्या व तिनें काठीनें त्यांना झोडपून काढलें. सीतारामबुवा शांतपणें तो मार सहन करीत होते. त्यांच्या पाठीवर माराचे वळ दिसूं लागले. परंतु हूं नाहीं कां चूं नाहीं ! उलट ते हंसून स्वतःशीं

म्हणाले, 'सीत्या, तुला फक्त आंबे खायला हवेत. मार नको नाहीं का ?'

तेथून ते तसेच फिरत फिरत पुढें गेले. वाटेंत त्यांना एक पोलीस पाटील भेटला. तो सीतारामबुवांची योग्यता ओळखून होता. त्यानें सीतारामबुवांना पाहतांच आदरानें नमस्कार केला. तेवढ्यांत त्याचें लक्ष त्यांच्या पाठीकडे गेलें. पाठीवरचे माराचे वळ पाहून त्यानें कळवळून विचारलें, 'बुवा, आपणांला कुणींतरी मारलेलें दिसतें. मला त्या दुष्ट पाप्याचें नांव सांगा, म्हणजे मी त्याची तंगडीच मोडून टाकतों !'

सीतारामबुवांनीं सर्व सत्य परिस्थिति सांगून 'आपणच दोषी आहोंत, तेव्हां कुणाला शिक्षा करण्याची आवश्यकता नाहीं' असें त्या पोलीस पाटलास सांगितलें.

परंतु तो पोलीस पाटील गप्प बसेना. शेवटीं नाइलाजानें त्याला घेऊन सीतारामबुवा त्या आंबेवालीजवळ आले. तिला पाहून पोलीस पाटलाच्या रागाचा पारा चढला व हंटर घेऊन तो तिला मारण्यास सिद्ध झाला !

परंतु सीतारामबुवा त्याचा हात धरीत म्हणाले, 'हिनें मला मारलें, तेव्हां हिला शिक्षा ही व्हायलाच पाहिजे.'

तें ऐकून ती बाई कमालीची घाबरून गेली. आधींच पाटलाच्या दमानें ती जवळजवळ अर्धमेली झाली होती. ( त्या काळांत पोलीस पाटलाचा वचक भयंकर असे. ) ती दोघांच्या हातांपायां पडूं लागली.

तेवढ्यांत सीतारामबुवांनीं पाटलाकरवीं साडी-चोळी मागवली आणि स्वहस्तें तें सौभाग्यवायन तिला दिलें !

तो प्रकार पाहून बाईच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहूं

लागला. सीतारामबुवांचें मोठें मन ओळखून तिनें त्यांचे पाय धरले. त्या दिवसापासून ती सीतारामबुवांच्या दर्शनास रोज जाऊं लागली.

## मैंदर्गीचा मुसलमान जमादार

अक्कलकोटानजीक मैंदर्गी नांवाचें एक खेडें आहे. तेथील मुसलमान जमादाराकडे तुरुंगांतील कैद्यांवर देखरेख करण्याचें काम होतें.

एक दिवस संध्याकाळीं सर्व कैद्यांचें बाहेरचें काम आटोप-ल्यावर त्यांना पुन्हां कोठडींत बंद करण्यांत आलें. परंतु एक कैदी जमादाराचा डोळा चुकवून खंदकांतच लपून बसला. जमादारानें सर्व कैदी पुन्हां मोजले तेव्हां ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली. त्यामुळें त्याच्या पोटांत भीतीचा गोळाच उठला! कारण तो बिचारा आतां लवकरच नोकरींतून मुक्त होऊन पेन्शनींत निघणार होता. अशा अखेरच्या दिवसांत ही भलतीच तोहमत त्याच्या अंगावर आली होती. आतां कसचें पेन्शन अन् कसचें काय! स्वत:च्याच हातांत बेड्या पडल्या नाहींत म्हणजे मिळविली!

जमादाराच्या मनांत अशा प्रकारचे विचार चालूं असतांनाच त्याला स्वामीसमर्थांची आठवण झाली. अशा संकटाच्या वेळीं त्यांच्याशिवाय दुसरें कोण धांवून येणार बरें?

त्यानें स्वामीसमर्थांची दिव्य मूर्ति मन:चक्षंपुढें आणून, हात जोडून नवस केला कीं, जर हा कैदी आपणांस सांपडेल तर आपण लगेच नोकरीचा राजीनामा देऊन आपलें उर्वरित आयुष्य समर्थसेवेलाच वाहून टाकूं.

इतकें बोलून त्यानें मनांतल्या मनांत स्वामीसमर्थांचा जप सुरूं केला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं एक घोडेस्वार त्या खंदकाजवळून

जात असतां त्याला तो लपून बसलेला कैदी दिसला. त्यानें तावडतोब त्याला पकडून जमादाराच्या स्वाधीन केलें. जमादारानें त्याला मामलेदारापुढें हजर केलें. मामलेदारानें त्याची चौकशी सुरू केली, तेव्हां तो कैदी म्हणाला, 'साहेब, मी खंदकांतून त्याच रात्रीं पळून जाणार होतों, परंतु मला तशी संधीच मिळाली नाहीं. कारण एक संन्यासी बाहेर उभा राहून मला एकसारखा भेडसावीत होता."

ही हकीकत ऐकतांच जमादाराच्या डोळ्यांतून घळघळां अश्रु वाहूं लागले. स्वामीसमर्थांनींच हा चमत्कार घडवून आणला याची खात्री होऊन त्यानें ताबडतोब राजीनामा लिहून साहेबांपुढें ठेवला व आपलें जीवनपुष्प समर्थसेवेलाच वाहून टाकलें. अक्कलकोटास येऊन तो समर्थांची सेवा करूं लागला.

पुढें एक दिवस समर्थांनीं आपला जोडा त्याच्या अंगावर फेकून त्यास परत गांवीं जाण्याची आज्ञा केली.

त्याप्रमाणें स्वामीसमर्थांचा निरोप घेऊन तो गांवाकडे निघाला. निघतेवेळीं त्यानें समर्थांनीं फेकून मारलेला जोडा (पादुका) प्रसाद म्हणून आपलेबरोबर नेला व गांवीं पोंचल्यावर त्याची स्थापना करून तो रोज मनोभावें त्याची पूजा करूं लागला.

परंतु ही गोष्ट त्याच्या बायका-मुलांस व नातलगांस पटेना. कारण हिंदु साधूच्या जोडयाची मुसलमानानें पूजा करणें ही गोष्ट त्यांना अपमानकारक वाटली. त्यांनीं त्याला परोपरीनें तसें न करण्याबद्दल समजावून सांगितलें, परंतु व्यर्थ !

शेवटीं अखेरचा उपाय म्हणून त्यांनीं त्याला घराबाहेर हांकून दिलें ! तरीपण त्याबद्दल जरासुद्धां खेद न मानतां पूर्वीप्रमाणेंच पादुकांची सेवा करीत तो एका पडक्या घरांत जाऊन राहिला. श्रीस्वामीकृपेनें त्याची रोजची जेवणाची सोयहि झाली.

हळूहळू त्याची कीर्ति इतकी वाढत गेली कीं, आधी-व्याधींनीं

पीडलेले लोक त्याच्याकडे अंगारा मागण्यासाठीं येऊं लागले. अशा वेळीं तो पादुकांखालची मातीच अंगारा म्हणून देत असे. आणि आश्चर्य असें कीं, लोकांना त्यामुळें ताबडतोब आराम वाटत असे. त्यामुळें लोक त्याला ‘ सिद्धपुरुष ’ समजूं लागले. खूप लांबून लांबून हजारों लोक त्याच्या दर्शनास येऊं लागले.

आतां तो ‘ महाराज पीरसाहेब ’ या नांवानें ओळखला जाऊं लागला ! मुसलमानांप्रमाणेंच ब्राह्मण लोकहि त्याच्या भजनीं लागले. रोज त्याच्यापुढें पैशांचा व नारळ–मिठाईचा ढीग जमूं लागला !

हें पाहून त्याच्या घरच्या लोकांनीं त्यास पुन्हां बहुमानानें घरांत नेलें. (‘ मिळती शृंगार–भूषणें । कांता लवे बहुमानें ।’ ही म्हण कांहीं खोटी नाहीं.) असो !

पुढें या ‘ महाराज पीरसाहेबां ’ नीं मेंदर्गी येथेंच स्वामीसमर्थांचें एक सुंदर मंदिर उभारलें व दरसाल तेथें मोठा उत्सव होऊं लागला.

अशा रीतीनें स्वामीसमर्थांच्या कृपाकटाक्षानें एक सामान्य जमादार परमार्थमार्गांतील केवढा मोठा अधिकारी पुरुष बनला !

आपणांसारिखे करिती तत्काळ ।
नाहीं काळ वेळ तया लागी ।।

## श्रीआनंद भारती

आनंद भारती हे जातीनें कोळी होते. त्यांचा मासे विकण्याचा धंदा होता. त्यांचें पूर्वाश्रमींचें नांव लक्ष्मण असें होतें. स्वामीसमर्थांकडे त्यांचें नेहमीं येणें-जाणें असे. समर्थांवर त्यांची पूर्ण श्रद्धा होती.

एकदां ते समुद्रांतून नाव चालवीत असतांना वादळामुळें नाव समुद्रांत बुडण्याचा प्रसंग आला. परंतु त्या कठीण प्रसंगींहि धैर्य ठेवून त्यांनीं स्वामीसमर्थांचा मोठमोठ्यानें धांवा सुरू केला.

त्या वेळीं समर्थांची स्वारी अक्कलकोटास चोळप्पाच्या घरीं सोंगट्या खेळत होती. मध्येंच थांबून, 'लक्ष्मण बुडाला-लक्ष्मण बुडाला' असें मोठ्यानें ओरडून समर्थांनीं ओढून वर काढल्यासारखे आपले दोन्ही हात वर केले, तों त्यांतून खारें पाणी गळूं लागलें. तें पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले ! हें पाणी सुमारें एक घटकाभर तसेंच गळत होतें !

लक्ष्मण कोळी आठ दिवसांनीं धांवतच समर्थांकडे आला व समर्थांचे चरणांना घट्ट मिठी मारून तो रडूं लागला व 'महाराज, आपणच मला वांचविलें, नाहीं तर मी बुडून मेलों असतों. आतां संसार पुरे. यापुढें हा देह आपल्या सेवेसाठींच अर्पण केला आहे.' असें म्हणन त्यानें सर्वसंग परित्याग केला व उर्वरित आयुष्य केवळ समर्थसेवेलाच वाहून टाकलें. त्यांची सुंदर समाधि ठाणें येथील दत्तमंदिराजवळ आहे.

## श्रीआनंदनाथ महाराज (वेंगुर्ले)

श्रीआनंदनाथ महाराज हे मूळचे वालावलचे राहाणारे असून त्याचें उपनांवहि वालावलकर असेंच होतें. ते कुडाळ देशकर ब्राह्मण असन हरड्याचा व्यापार करीत. ते मुंबईस असतांना श्री. भेंडे यांचे पेढीवर त्यांना अक्कलकोटच्या स्वामीसमर्थांची माहिती समजली व त्यांच्या दर्शनाची एकच तळमळ लागून राहिली.

ही तळमळ इतकी वाढली कीं, ते तसेच मुंबईहून अक्कलकोटास आले. अक्कलकोटास ते सुप्रसिद्ध वडाच्या झाडाखालील तळ्यांत पाय धूत असतां एक डहाळीचा तुकडा अचानक त्यांच्या

मस्तकावर पडला. त्यांनीं वर पाहिलें तों त्यांस श्रीसमर्थांची दिव्य मूर्ति दिसली व त्याचवेळीं समर्थांनीं आपला कृपाहस्त त्यांच्या शिरावर ठेवला.

आनंदनाथ तेथेंच बैरागी बनले. पुढें अक्कलकोटास त्यांनीं सुमारें सहा वर्षें वास्तव्य केलें. ते नेहमीं दिगंबर अवस्थेंत रहात. अक्कलकोटच्या वास्तव्यांत व पुढें गांवीं परत गेल्यावर भक्तिप्रेमानें ओथंबलेले शेंकडों रसाळ अभंग त्यांनीं केले. स्वामीसमर्थांपुढें ते पुष्कळवेळां आपले हे अभंग म्हणून दाखवीत व भजनहि करीत.

पुढें समर्थांनीं त्यांना बाहेर जाऊन मठ स्थापण्याचा आदेश दिला व आपल्या मुखांतून लहानशा आत्मपादुका काढून दिल्या. त्या पादुका कोणत्या धातूच्या बनविलेल्या आहेत हें कुणासहि ओळखतां येत नाहीं. त्या अत्यंत लहान म्हणजे अर्ध्या इंचापेक्षांहि कमी आकाराच्या असल्या तरी समर्थांच्या चरणांवरील लहान-सहान रेषाहि त्यावर स्पष्ट उमटलेल्या दिसून येतात !

आनंदनाथ महाराजांनीं येवलें, होडावडे ( सावंतवाडी संस्थान) व धावडें (वेंगुर्लें कँपांत) या तीन ठिकाणीं समर्थांचे मठ स्थापन केले. पैकीं स्वामी समर्थांनीं दिलेल्या प्रासादिक पादुका धावडें येथील मठांत आहेत.

श्रीआनंदनाथ महाराजांनीं समर्थांवर अनेक श्लोक, आरत्या, अभंग, ललकाऱ्या, हुक्का, भालदार, चोपदार वगैरे साहित्य निर्माण केलें आहे.

त्यांची रहाणी मोठ्या इतमामाची असे. समर्थांच्या कृपेनें त्यांना कांहीं सिद्धींचीहि प्राप्ति झाली होती. त्यांच्या उपयोग करून त्यांनीं अनेक आर्त पीडितांचीं दु:खें दूर केलीं.

ज्येष्ठ शुद्ध ६ शके १८२५ या दिवशीं त्यांनीं वेंगुर्लें येथें समाधि घेतली. त्या ठिकाणीं त्यांच्या भक्तांनीं त्यांच्या पादुकांची

स्थापना केली असून वेंगुर्लें येथील मठांत दत्तजयंती, स्वामींची पुण्यतिथी, जयंती व गुरुद्वादशी हे उत्सव आजहि मोठ्या थाटांत साजरे केले जातात.

## श्रीतातमहाराज

तातमहाराजांचें संपूर्ण नांव रामचंद्र व्यंकटेश बरडकर. हे जातीचे गौड सारस्वत. यांचे वडील मुंबईच्या धोबी तलावानजीक असलेल्या जांबुळवाडींत रहात. ते हरड्याचा व इतर वस्तूंचा व्यापार करीत.

वयाच्या तिसऱ्या वर्षापासूनच तातमहाराजांना शंकर भक्तीचा ध्यास लागला. शंकराची पूजा करण्यासाठीं ते रोज बाबुलनाथाच्या देवळांत जात. पुढें कांही वर्षांनीं श्रीसांबसिवानें दृष्टान्त देऊन, 'आम्ही सगुण रूपानें अक्कलकोटास आहोंत, तिथें दर्शनास ये.' असें सांगितल्यावरून तातमहाराज अक्कलकोटास गेले. तेथें स्वामीसमर्थांनीं तातमहाराजांना वरील दृष्टान्ताची आठवण दिली. तातमहाराज म्हणतात, 'ही आठवण देऊन स्वामीसमर्थांनीं मला साक्षात शंकर स्वरूपांत दर्शन दिलें. तें उग्र रूप पाहून माझ्या सर्वांगास घाम फुटून रोमांच उभे राहिले. परंतु दुसऱ्याच क्षणीं स्वामीमहाराज मला अत्यंत मोहक अशा विष्णु स्वरूपांत दिसूं लागले. त्यांनीं ब्रह्माच्या स्वरूपांतहि नंतर दर्शन दिलें. त्यावेळीं मी त्यांचे पाय घट्ट धरून म्हणालों कीं, 'हें ईश्वररूप दर्शन मला नको. मला आपण यती स्वरूपांत दर्शन द्या ! तेव्हां स्वामीमहाराज म्हणाले, 'देखता है क्या ? हम तुम्हारेमें आ जायेंगे' असें म्हणून त्यांनीं माझ्या छातीवर हात ठेवला. त्याबरोबर मला समाधि लागली.'

अशाप्रकारें श्रीस्वामीसमर्थांची तातमहाराजांवर पूर्ण

कृपा झाली. त्यांना स्वामीकृपेनें अनेक सिद्धि प्राप्त झाल्या होत्या. त्याद्वारें त्यांनीं अनंत चमत्कार घडवून भक्तांच्या मनोकामना पूर्ण केल्या. शरीरव्याधींनीं पीडलेल्या भक्तांच्या हातांत ते स्वामीतीर्थ देत व नंतर तें आपणच प्राशन करीत. अनेक भक्तांच्या व्याधी त्यांनीं अशाप्रकारें दूर केल्या.

'जगांत श्रीस्वामी सदैव आहेत आणि मी त्यांना दाखवूं शकतों' असें ते आत्मविश्वासानें नेहमीं म्हणत. पुढें बाळकृष्ण-बुवा सुरतकर या नांवानें प्रसिद्धीस आलेले स्वामीभक्त प्रथम स्वामी दयानंदांचीं भाषणें ऐकून कट्टर नास्तिक बनले होते. परंतु तातमहाराजांनीं त्यांना स्वामीसमर्थांचा महिमा ऐकविला व अन्नपाण्यावांचून आठ दिवस समाधिसुखांत निमग्न ठेवून व नंतर जरूर तें मार्गदर्शन करून त्यांना अध्यात्मिक मार्गांतला एक महान् अधिकारी पुरुष बनविलें.

**'श्रीस्वामीसमर्थांच्या परंपरेंतील एक विलक्षण देदीप्यमान अज्ञात हिरा, असेंच श्रीतातमहाराजांचें सार्थ वर्णन करतां येईल.'**

## श्रीरांगोळीमहाराज

श्रीरांगोळीमहाराज यांचें खरें नांव शिवराम बावडेकर. हे जातीनें सोनार. कोल्हापूरच्या छत्रपति घराण्याचे दागदागिने तयार करण्याचें काम यांच्या वाडवडिलांकडे होतें. छत्रपतींकडे त्यांची बरीच जा-ये होती.

श्रीशिवराम ऊर्फ रांगोळीमहाराज हे आठ नऊ वर्षांचे असतांना त्यांची चुलती त्यांना घेऊन श्रीस्वामीसमर्थांच्या दर्शनास गेली. त्यावेळीं त्यांच्याकडे पहात समर्थ म्हणाले, 'हा मुलगा आम्हांस देतां का ?' ह्यावर त्याची चुलती कांहीं बोलण्यापूर्वीच

समर्थांनीं त्याला आपल्या मांडीवर बसवून त्याला 'रांगोळीमहाराज' असें नांव ठेवून कोल्हापूरच्या कुंभार गल्लींतील सिद्धपुरुष कुंभारस्वामी यांची सेवा करण्याची आज्ञा केली. त्याचप्रमाणें आजन्म ब्रह्मचारी राहून आसेतुहिमाचल तीर्थाटण कर असें सांगून काव घातलेली भगवी कफनी अंगावर फेकली.

समर्थांच्या आज्ञेनुसार रांगोळीमहाराज कोल्हापुरास जाऊन श्रीकृष्ण सरस्वती ऊर्फ कुंभारस्वामी यांना येऊन भेटले व त्यांनीं त्यांची सेवा सुरू केली. इ. स. १९२४ चे सुमारास रांगोळीमहाराज शिरोडा येथें आले होते. तेथें लोक त्यांना 'डिटेक्टिव्ह' समजत होते. शिरोड्यास ते श्री. रा. द. प्रभु आजगांवकर यांच्या कापड दुकानीं नेहमीं येऊन बसत. रांगोळीमहाराजांना विडीचें व्यसन दांडगें होतें. चहाहि बराच लागे. परंतु त्यासाठीं ते कुणाजवळहि पैसे मागत नसत. ते विडी पेटवून आगपेटीची काडी न विझवतांच दुकानांत फेकून देत. हें पाहून प्रभु आजगांवकरांनीं दुकान कापडाचें असल्यामुळें तसें न करण्याची विनंति केली. तेव्हां महाराज चटकन् म्हणाले, 'रामा, अरे मारुती तुला लवकरच टोला हाणणार आहे. तुझें दुकान राहणार नाहीं.' त्याच्यानंतर एकच वर्षांत आजगांवकरांचें दुकान बंद पडलें !

नयनमनोहर रांगोळी काढण्याबद्दल रांगोळीमहाराजांची प्रसिद्धि होती. त्यांच्या या कौसल्यांत ईश्वरी प्रसादाचाच भाग अधिक होता. त्यामुळें त्यांनीं काढलेली रांगोळी तासन्तास पहात बसावीशी वाटे !

१९४१–४२ चे सुमारास मालवण येथें येऊन त्यांनीं आपला देह विसर्जित केला. आज त्यांची समाधि अशी कुठेंच नाहीं, परंतु मालवण–भरडरोडच्या भागांत त्यांची भगवी कफनी, भगवा फेटा, त्यांनीं स्थापन केलेले श्रीअक्कलकोट स्वामीमहाराज व श्री-

कुंभारस्वामी यांचे पुतळे व रामलिंगादि अनुग्रहित वस्तु दर्शनासाठीं ठेवलेल्या असून दर आठवड्यास त्यांचें भजन होतें. त्यांची पुण्यतिथी, दत्तजयंती वगैरे समारंभ त्यांचे भक्तगण आजहि मोठ्या प्रेमानें साजरे करतात.

## श्री. काळबुवा

श्रीक्षेत्र पंढरपूर येथें एक महान् साक्षात्कारी सत्पुरुष रहात असत. त्यांचें नांव विष्णुबुवा नारायण. त्यांच्या बोलण्यांत नेहमीं 'काळ हा सर्वांचा बाप आहे' अशा अर्थाचें वाक्य असे. त्यामुळें लोक त्यांना 'काळबुवा' म्हणूनच ओळखीत.

हे काळबुवा नेहमीं पिशाच्चवृत्तीनें राहात. कुणाची उपाधि होऊं नये यासाठींच त्यांनीं ही जगावेगळी वृत्ति धारण केली होती. परंतु त्यामुळें ते वेडे असावेत असाच सार्वत्रिक समज झाला होता!

एकदां मोठी गंमत झाली. या काळबुवांनीं दोघां ब्राह्मणांच्या मुलांना मारहाण केली. तेव्हां ती तक्रार रानडे नांवाच्या मामलेदारांकडे आली. काळबुवांना त्यांच्यासमोर उभें करण्यांत आलें. तेव्हां काळबुवा नेहमींप्रमाणें ओरडले, 'काळ बाप सर्वांना ग्रासतो. रांडेचा रक्त–दगड खातो, ओकतो. काळ ! काळ ! ...'

त्यांच्या ह्या चमत्कारिक बडबडण्यामुळें रानडे मामलेदारांनीं काळबुवांची रवानगी पुण्याच्या ससून हॉस्पिटलमधें केली. त्याठिकाणीं योगायोगानें त्यांची व ब्रह्मनिष्ठ वामनबुवांची गांठ पडली. काळबुवांच्या बोलण्यावरून ते वेडे असावेत असें वामनबुवांना मात्र मुळींच वाटलें नाहीं. उलट हे कुणीतरी अधिकारी सत्पुरुष असावेत अशी त्यांची खात्री झाली व त्यांनीं श्री. सदाशिवराव गोडे यांच्या मदतीनें काळबुवांची दवाखान्यांतून मुक्तता केली. नंतर ब्रह्मनिष्ठ वामनबुवांनीं त्यांना नम्रपणें विचारलें, 'महाराज ! आपण कुणी

सत्पुरुष दिसतां. तेव्हा आपले गुरु कोणत्या संप्रदायाचे आहेत हें कळण्याचें भाग्य मला मिळेल का ?'

तेव्हां काळबुवा म्हणाले, 'आम्ही दत्तसेवक आहोंत. तुम्हीहि आमचेच आहांत.' पुढें आश्चर्य असें कीं, ज्या ब्राह्मणानें मुलांना मारलें या नांवाखालीं काळबुवांना त्रास दिला तो ब्राह्मण पुढें अक्कलकोटास समर्थांच्या दर्शनासाठीं आला असतां समर्थ चटकन् म्हणाले, 'आमच्याशीं इतकें वैर कशासाठीं ?'

ब्राह्मणानें या वाक्याचा संदर्भ तत्काळ ओळखला व काळबुवांना त्रास दिल्याबद्दल समर्थांची क्षमा मागितली.

**श्रीसमर्थ आणि काळबुवा शरीरानें भिन्न असले तरी अंतर्यामीं एकच होते ही गोष्ट यावरून पटते !**

## भक्त चोळाप्पा

स्वामीसमर्थ अक्कलकोटास आल्यानंतर त्यांची अहर्निश सेवा करण्याचें सद्‌भाग्य जर कुणाला मिळालें असेल तर तें फक्त चोळाप्पाला ! स्वामीसमर्थ अक्कलकोटास आले तेव्हां चोळाप्पानेंच त्यांना जेवूं घातलें. समर्थांचें सुरुवातीचें जास्तींत जास्त वास्तव्य चोळाप्पाच्याच घरीं झालें. त्यावेळीं चोळाप्पा आपली बायको येसूबाई हिच्यासह बुधवार पेठेंत राहात असे. त्यास कृष्णाप्पा व अप्पा अशीं दोन मुलें होतीं.

समर्थ चोळाप्पाच्या घरीं राहूं लागले खरें, परंतु त्यांच्या 'बालोन्मत्त पिशाच्चवत्' वृत्तीमुळें ते वेडे असावेत अशीच चोळाप्पाच्या कुटुंबियांची प्रथम समजूत झाली व एका वेड्यास घरांत आश्रय दिल्याबद्दल त्यांनीं चोळाप्पालाच दूषणें द्यावयास सुरुवात केली. इकडे समर्थांनींहि चोळाप्पाची परीक्षा घेण्याचा सपाटा चालू केला. घरांतील धान्य गाईस खाऊं घालावें, हवा तो जिन्नस भिका-

त्रास देऊन टाकावा, घरांत कोठेंहि बसून लघुशंका करावी असा क्रम समर्थांनीं सुरूं केला. त्यामुळें घरांतील मंडळी वैतागून गेली. परंतु चोळाप्पाची समर्थांच्या ठायीं पूर्ण निष्ठा होती. त्यानें समर्थांवरील आपलें प्रेम यत्किंचितहि आटूं दिलें नाहीं.

एकदां चोळाप्पाच्या बायकोनें पुरण–पोळीसाठीं रांजणांत हरभऱ्याची उत्तम डाळ भरून ठेवली होती. समर्थांना तें ठाऊक होतांच त्यांनीं कुणाच्या न कळत रोज त्यांतली थोडी थोडी डाळ गाईला खायला देण्यास सुरुवात केली. त्यामुळें थोड्याच दिवसांत रांजण साफ झाला ! पुढें सणाच्या दिवशीं येसूबाई रांजणांतील डाळ काढावयास गेली तों तिचा हात पार रांजणाच्या तळाशीं गेला ! हें समर्थांचेंच कृत्य असावें याबद्दल तिच्या मनांत थोडी देखील शंका राहिली नाहीं. तिनें ही हकीकत चोळाप्पाला सांगितली. त्यानें समर्थांना विचारलें. तेव्हां समर्थ हंसून म्हणाले, ' हमकू क्या मालूम ? तुम्हारी गउ दाल खा गई. उनकू पूछ जा.'

चोळप्पा यावर काय बोलणार ! तो घरचा दरिद्री होता. परंतु स्वामीसमर्थ हे साक्षात् दत्तप्रभू आहेत याबद्दल त्याची पुरेपूर खात्री होती. त्यामुळें त्यांच्या बाललीलांचा त्याला त्रास होत असूनहि त्यानें त्याकडे रागापेक्षा नेहमीं कौतुकानेंच पाहिलें! त्याच्या बायकोला मात्र स्वामीमहाराजांची ओळख पटली नसल्यानें ती त्यांना चारचौघांप्रमाणें सामान्य मनुष्यच समजे !

प्रथम दोन महिने समर्थांनीं चोळाप्पाची कठीण परीक्षा घेतली. एक दिवस समर्थ चोळाप्पाच्या घरांतून निघून एकाएकीं झपाझप हासापूर गांवाकडे निघाले. चोळाप्पा पाठोपाठ होताच. त्याच्याकडे पाहून समर्थ रागावून म्हणाले, 'आम्ही संन्यासी. तुम्ही आमच्यामागें लागूं नये. घरीं जाऊन प्रपंच करावा.' परंतु चोळाप्पा कांहीं त्यांची पाठ सोडीना. तेव्हां समर्थांनीं त्याला नाहीं नाहीं त्या

शिव्या देण्यास सुरुवात केली. तेव्हां चोळाप्पा डोळ्यांतील आंसवें पुसून हात जोडून म्हणाला, 'महाराज! मी घरदार सोडीन, परंतु श्रीचरण सोडणार नाहीं.' त्याची ही दृढ भक्ति पाहून समर्थ प्रसन्न झाले. त्यांनीं आपल्या पायांतील खडावा चोळाप्पाच्या अंगावर फेकून त्यास त्यांची पूजा करण्याची आज्ञा केली. चोळाप्पाच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. त्यानें त्या प्रासादिक पादुकांची रोज भक्तिभावानें पूजा सुरूं केली. पुढें गांवांतील आजारी, व्याधिग्रस्त लोकांना 'चोळाप्पाच्या घरीं पादुका आहेत, त्यांचें दर्शन घ्या म्हणजे व्याधी निरसन होतील' असे दृष्टान्त होऊं लागले व त्याप्रमाणें लोकांना अनुभवहि येऊं लागले. सदरच्या पादुका आज अक्कलकोट येथें चोळाप्पाच्या मठांत आहेत व त्यांची पूजाअर्चा चोळाप्पाच्या वंशजांकडे चालू आहे.

त्यानंतर स्वामीसमर्थ हे चोळाप्पाच्या कुटुंबियांतीलच एक व्यक्ति होऊन बसले. पुढें अक्कलकोटचे राजे समर्थांचे एकनिष्ठ भक्त बनल्यावर त्यांनीं दरिद्री चोळाप्पाच्या घरीं समर्थांसाठीं रोज शिधा पाठविण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणें चोळाप्पासाठीं दरमहा पांच रुपये मंजूर केले. त्यानंतर समर्थ चोळाप्पाच्या घरीं क्वचितच जेवूं लागले. तरीपण चोळाप्पाची कसोटी पहाणें चालूंच होतें.

ज्या अंथरुणावर चोळाप्पाचीं मुलें–बाळें निजत त्यावरच समर्थ अगोदर जाऊन निजत. चुलीवरचा तवा काढून चुलींत मलोत्सर्ग करावा, पेटलेली चूल पाणी टाकून विझवावी, ओंवळ्यानें स्वयंपाकास शिवून तो विटाळावा, सोंवळ्यानें अन्न वाढतों असें सांगून नग्न होऊन वाढूं लागावें इत्यादि अनेक प्रकारांनीं स्वामीमहाराज चोळाप्पाची सत्त्वपरीक्षा पहात होते. एकदां तर समर्थांनीं मोठीच गंमत केली ! एक दिवस चोळाप्पाच्या बायकोनें परातभर पुरण-

पोळया करून ठेविल्या होत्या. तेवढयांत दाराशीं एक बैरागी भिक्षेसाठीं आला. त्यानें 'अल्लख' पुकारतांच समर्थांनीं पोळयांची परात उचलली व ते धांवत धांवत बैराग्याकडे गेले. तें पाहून येसूबाई घाबरून दुप्पट वेगानें पळत त्यांच्या पाठोपाठ गेली व तिनें बैराग्यास एक पोळी वाढून ती परात ताब्यांत घेतली ! नाहींतर त्या दिवशीं सर्व पोळया बैरागीबुवांच्या झोळींत पडण्याचाच योग आला होता ! पुढें एकदां चोळाप्पा बाहेर गांवीं गेला होता. त्या दिवशीं सकाळींच महाराजांनीं चोळाप्पाच्या बायको-मुलांना घराबाहेर काढलें व ते एक भली मोठी काठी घेऊन दारांत बसून राहिले. त्यामुळें चोळाप्पाचीं बायको-मुलें घाबरून गेलीं. दुपारीं भुकेमुळें त्यांचे प्राण कासावीस झाले. परंतु समर्थ कुणालाच घरांत सोडीनात ! शेवटीं चोळाप्पा आल्यावर त्यानें समर्थांची लहान मुलाप्रमाणें समजूत काढली व त्यांना दारांतून घरांत नेलें.

एकदां चोळाप्पाच्या बायकोचा प्रसूतिसमय नजीक आला होता. तिचें पोट दुखूं लागल्यामुळें ती बाजेवर झोंपून राहिली. परंतु समर्थ खोलीचें दार कुणालाच लावूं देईनात. उलट त्यांनीं घरांतील मडक्यांच्या उतरंडी उतरून घरभर पसारा करून ठेवला. त्यामुळें सर्वजण चिंतेंत पडले. समर्थांना कांहीं बोलण्याची सोयच न्व्हती. परंतु येसूबाई प्रसूत होण्याची वेळ येऊन ठेपतांच समर्थांनीं दार लावून घेऊन उतरंडी रचून ठेवण्याची आज्ञा केली. इतक्यांत येसूबाई प्रसूत होऊन तिनें कन्यारत्नाला जन्म दिला. जणूं समर्थांनीं आपल्या कृतींतूनच कन्यारत्नाची प्रसूति सूचित केली होती!

पुढें एकदां चोळाप्पाच्या बायकोच्या हातास विंचू चावल्यामुळें ती मोठमोठ्यानें ओरडूं लागली. तें ऐकून समर्थांनीं चटकन आपला जोडा तिच्याकडे फेकून त्यांत हात घालून ठेवण्यास तिला सांगितलें. तिनें त्याप्रमाणें करतांच वेदना कमी होऊं लागल्या.

तेव्हां तिला वाटलें कीं, हात बरा झाला. म्हणून तिनें तो जोड्या- बाहेर काढला त्याबरोबर पुन्हां असह्य वेदना होऊं लागल्या. तेव्हां पुन्हा तिनें हात जोड्यांत घातला. त्यासरशीं वेदना कमी कमी होऊं लागल्या. शेवटीं ती बिचारी आपला हात जोड्यांत ठेवूनच शांतपणें झोंपीं गेली !

चोळाप्पा समर्थांचा एवढा एकनिष्ठ भक्त होता, परंतु समर्थ त्याच्या यत्किंचितहि आधीन नव्हते. त्यांची वागणूक सर्वांशीं समान होती. पुढेंपुढें चोळाप्पाला पैशाचा लोभ उत्पन्न झाला व तो समर्थांना अंतरला. मौज याची वाटते कीं, सर्व तीर्थें ज्यांच्या चरणांपासून उत्पन्न होतात ते अनंतकोटि ब्रह्माण्डनायक चोळा- प्पाच्या घरीं राहिले असतांहि चोळाप्पाच्या तीर्थयात्रा चालूंच होत्या ! त्याचप्रमाणें प्रत्यक्ष कल्पवृक्ष समर्थांच्या रूपानें घरांत असूनहि चोळाप्पाचें पिरांना नवस करणें बंद झालें नव्हतें !

चोळाप्पाचा द्रव्यलोभ वाढत चाललेला पाहून त्याला उद्दे- शून 'माझें खाऊन माझ्यावर फिरला' असा समर्थ पुष्कळ वेळां शेरा मारीत असत. पुढें सुंदराबाईच्या कारकीर्दींत चोळाप्पाचें वजन पुष्कळच कमी झालें. सुंदराबाईनें अक्कलकोटच्या राणी- साहेबांना चोळाप्पाविषयीं उलटसुलट सांगून त्यांचें मन त्याच्या- विषयीं कलुषित करून ठेवलें व त्यामुळें समर्थांच्या सेवेंतून चोळाप्पाला दूर व्हावें लागलें.

त्याच्या अंतकाळींहि समर्थांनीं त्याला दर्शन दिलें नाहीं. फक्त समर्थांचें चरणतीर्थ मोठ्या कष्टानें त्याच्या मुखांत पडलें.

चोळाप्पानें समर्थांची सेवा अनन्यभावानें केली. त्यांच्या कसोटीस तो प्रत्येक वेळीं उतरला. परंतु द्रव्यलोभ व सुंदराबाईचीं कारस्थानें यामुळें त्याच्या समर्थसेवेंत दुर्दैवानें अंतर पडलें. एरव्हीं

त्याच्याइतका समर्थांचा एकनिष्ठ भक्त दुसरा क्वचितच झाला असेल !

चोळाप्पाबद्दल समर्थांच्या मनांत केवढी प्रीति होती त्याचें प्रत्यंतर चोळाप्पाच्या मृत्यूनंतर आलें. समर्थांची पुष्पासारखी प्रसन्न मुद्रा चोळाप्पाच्या मृत्युवार्तेनें कोमेजून गेली. राजपत्नीनें याबाबत समर्थांना विचारलें असतां समर्थ म्हणाले,

'सप्तजन्मींचा पितापुत्र संबंध ज्या रीतीं । तद्वत् चोळाप्पाची तुटली संगती । तो वियोग सहन होत नसे । यास्तव आम्हीही लौकर जाऊं । कोणी कोणाचें नाहीं सखेसोयरे भाऊ । चोळाप्पा-विण कोठें धांवूं । लीला दावूं कोणाला ।'

चोळाप्पावरील समर्थांच्या महान् प्रेमाला यापेक्षां दुसऱ्या शिफारसपत्राची गरजच नाहीं !

## नगरचे श्री. नाना रेखी

नगरचे स्वामिभक्त श्री. नानाजी रेखी यांना समाधिस्थ होऊन पंचावन्न वर्षें झालीं. श्री. रेखी हे अत्यंत निष्णात ज्योतिषी होते. त्यांना ' पिंगळा ज्योतिषी ' म्हणत. कारण पिंगळचाची भाषा त्यांना समजत असे. त्यांना वाक्‌सिद्धीहि प्राप्त होती. भाऊ जोशी या अंध ज्योतिषांकडे त्यांनीं विद्याध्ययन केलें होतें.

एकदां एका मामलेदारांनीं श्री. नाना रेखींना आपली कुंडली दाखविली. ती पाहून नाना म्हणाले, 'तुम्हांला सहा महिन्यांत नर्कवास योग आहे.' त्याप्रमाणें सहा महिन्यांनंतर एक दिवस मामलेदारसाहेब घोडचावर बसून बुरुडगांवचे रस्त्यानें चालले असतां घोडचासकट एका मोठचा चरांत पडले. त्या चरांत म्युनि-सिपालिटीचा मैला टाकीत असत ! त्या चरांतून मामलेदार-

साहेबांना अजिबात बाहेर पडतां येईना ! त्यांची फजिती पाहून आजूबाजूचे लोक मदतीला धांवून आले व त्यांनीं मामलेदारांना घोड्यासकट बाहेर काढलें ! अशाप्रकारें नानाजी रेखींचें भविष्य तंतोतंत खरें ठरल्याबद्दल मामलेदारसाहेबांनीं नानाजींना योग्य तें बक्षीस दिलें.

एकदां नानाजी रेखी मुंबईला गेले असतां त्यांची व स्वामी-सुतांची भेट झाली आणि त्याच दिवशीं नानाजींचें भाग्य उजळून निघालें ! स्वामीसुत त्यांना घेऊन अक्कलकोटास गेले. तेथें नाना-जींनीं श्रीसमर्थांची जन्मपत्रिका करून दिली. ती पत्रिका श्रीसम-र्थांच्या पसंतीस उतरली व 'नौबत बजाव' असे शब्द त्यांचे मुखांतून बाहेर पडले. श्री. नानाजींच्या ज्योतिषज्ञानाचा तो फार मोठा बहुमान होता व त्याबद्दल दक्षिणा म्हणून समर्थांनीं नाना-जींच्या उजव्या हातावर आत्मलिंगाचा प्रसाद दिला ! त्यांच्या हातावर नीलवर्णाचें लहानसें विष्णुपद उमटलें ! हें विष्णुपद त्यांच्या हातावर मरेपर्यंत होतें !

'नगरला तुमच्याकडे श्रीसमर्थांचा मठ होईल' असें स्वामी-सुतांनीं नानाजींना पूर्वींच सांगितलें होतें. त्याप्रमाणें श्रींकडून नानाजींना चर्मपादुकांची प्राप्ति झाली व त्यांची स्थापना नगरला होऊन श्रींचा मठ नगर येथें स्थापन झाला.

पुढें श्रीसमर्थसेवेंतच नानाजींनीं आपलें उर्वरित आयुष्य कारणीं लावलें. वयाच्या चौऱ्यांयशीव्या वर्षीं त्यांनीं संन्यास घेतला व लवकरच नगर मठाचे जवळच समाधि घेऊन ते श्रीस्वरूपीं विलीन झाले.

त्यानंतर त्यांचे चिरंजीव कै. दत्तोपंत रेखी यांनींहि मठाची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेविली. श्री. दत्तोपंत हे वैद्यकी, मंत्रशास्त्र व याज्ञिकी या तिन्ही विद्येंत अतिशय प्रवीण होते. मृदंग वाजवि-

ण्यांतहि त्यांचा हातखंडा होता. ते उत्तम ज्योतिषीहि होते. पहांटे पांच वाजल्यापासून रात्रीं नऊ वाजेपर्यंत ते स्वामीसेवेंतच रंगलेले असत. १९५८ सालीं वयाच्या ८४ व्या वर्षीं ते स्वामीरूप झाले.

हल्लीं नगर मठाची व्यवस्था त्यांचे चिरंजीव श्री. कृ. द. रेखी पहात असून त्यांचीहि स्वामीसेवा अखंड चालू आहे. हा नगर मठ ज्या ठिकाणीं आहे त्या रस्त्याला अहमदनगर म्युनिसिपालिटीनें 'श्रीअक्कलकोट स्वामी पथ' असें नांव दिलें आहे. या एकाच गोष्टीवरून नगर मठांतील सेवाकार्याची वाचकांना कल्पना येईल.

(श्री. नानाजी रेखी यांनीं तयार केलेली श्रींची जन्मपत्रिका परिशिष्टांत दिली आहे.)

## श्रीबाळप्पामहाराज

श्रीसमर्थांच्या शिष्यवर्गांत श्री बाळप्पामहाराजांची योग्यता फार मोठी होती. आपल्या प्रखर वैराग्यानें, जाज्वल्य निष्ठेनें व उग्र तपस्येनें ते 'प्रति समर्थ' पदाला जाऊन पोहोंचले ! त्यांचें सर्वच चरित्र साधकांना एखाद्या दीपस्तंभाप्रमाणें साधनामार्गांत मार्गदर्शक ठरणारें आहे. **श्रीसमर्थ शिष्यांच्या मांदियाळीतील एक 'महान् स्वयंप्रकाशी तारा' असेंच श्री बाळप्पांचें वर्णन करावें लागेल !**

श्री बाळप्पा हे हवेरी (ता. करजगी, जि. धारवाड) येथील एक यजुर्वेदी ब्राह्मण. सावकारी आणि सराफी या अमाप पैसे मिळवून देणाऱ्या व्यवसायावर त्यांना गजान्तलक्ष्मीची प्राप्ति झाली. परंतु सर्व सुखें हात जोडून समोर सिद्ध असतांहि वयाच्या तिसाव्या वर्षींच त्यांना वैराग्य उत्पन्न झालें व सद्गुरूच्या भेटी-साठीं त्यांचा अंतरात्मा आतुर झाला. आणि एक दिवस ही आतु-रता पराकोटीला पोहोंचून त्यांनीं घरादारावर तुलसीपत्रें ठेवलीं व

सद्गुरूच्या शोधार्थ ते घराबाहेर पडले.

सर्व सुखसाधनांची अनुकूलता असतांना सद्गुरु भेटीसाठीं सर्वस्वाचा त्याग करणें ही गोष्ट या कलियुगांत तरी फार फार अवघड आहे. एखाद्याला प्रपंचाचा फोलपणा पटला तरी हातून कृति होणें कठीण आहे.

म्हणूनच नाथ म्हणतात–

सगुण सुंदर पतिव्रता । अनुकूल मिळालिया कांता ।
जो विसबेना भगवत्पथा । भागवत मुख्य या नांव ।।

बाळप्पा असे भागवतोत्तम होते !

प्रथम ते धारवाड जिल्ह्यांतील मुरगोड या गांवीं आले. मुरगोड हें प्रख्यात शिवावतारी महापुरुष श्रीचिदंबर दीक्षित यांचें गांव. ( ‘याच चिदंबरस्वामींच्या यज्ञांत आम्ही तूप वाढावयास होतों’ असें श्रीसमर्थ सांगत. )

मुरगोडच्या पुण्यभूमींत तीन रात्री राहून बाळप्पांनीं गाणगापूरचा रस्ता धरला. तेथें पोंचल्यावर त्यांनीं कडक अनुष्ठान सुरूं केलें. ते त्रिकाल स्नान करीत. पहांटेपासून माध्यान्ह काळापर्यंत त्यांचें एकसारखें अनुष्ठानच सुरूं असे. त्यानंतर मधुकरी मागून आणावी व नदींत बुचकळून ती केवळ देह जगविण्यासाठीं खावी, रात्रीं झोपण्यापुरतें गाणगापुरांत जावें व भल्या पहांटे उठून संगमाकडे धांव घ्यावी व अनुष्ठान कर्मांत बुडून जावें असा त्यांचा दैनिक कार्यक्रम सुरूं झाला. श्री नृसिंहसरस्वतींच्या निर्गुण पादुकांची अशाप्रकारें दोन महिने एकाग्रतेनें सेवा केल्यावर एक ब्राह्मण आला व त्यानें ‘अक्कलकोटास जाऊन श्रीसमर्थसेवा करा’ असें सांगितलें. श्रीसमर्थांचें नांव समर्थशिष्य श्रीपाद भट याचेकडून श्री बाळप्पांना पूर्वींच समजलें होतें.

या विलक्षण स्वप्नानें बाळप्पा खडबडून जागे झाले. परंतु त्याचवेळीं अंथरुणाखालीं त्यांना एक अपरिचित चिठ्ठी दिसली. त्यांनीं ती चिठ्ठी उघडून वाचली तेव्हा तींत 'उतावीळ करूं नये' असा मजकूर आढळला. त्यामुळें आणखी कांहीं दिवस श्रीदत्तात्रेयांची सेवा करण्याचें ठरवून त्यांनीं पुन्हां उग्र अनुष्ठान सुरूं केलें. अशा प्रकारें दोन महिने त्यांची तपश्चर्या सुरूं होती.

एक दिवस त्यांना स्वतःच्या धोतराखालीं एक तांबडालाल भयानक विंचू दिसला. परंतु आतां त्यांची वृत्ति 'जें जें दिसे भूत तें तें मानी भगवंत' अशा कोटीला पोहोंचली असल्यामुळें त्यांनीं त्या विंचवाला थोडीसुद्धां इजा केली नाहीं. त्याच रात्रीं श्रीस्वामी समर्थांनीं त्यांना स्वप्नांत दिगंबररूपांत दर्शन दिलें.

दुसरे दिवशीं बाळप्पा नित्याप्रमाणें दोन प्रहरीं मधुकरीस गेले. रोज त्यांच्या झोळींत मधुकरी म्हणून शिळ्या भाकरीचे तुकडे पडत. परंतु त्या दिवशीं सर्व ठिकाणीं त्यांना पोळी मिळाली. हा त्यांना मोठाच शुभशकून वाटला व त्यांनीं पूर्वदृष्टान्ताप्रमाणें अक्कलकोटचा रस्ता धरला. प्रयाणास सुरुवात करतांच समोरून दोन सुवासिनी, भरलेल्या घागरींसह त्यांना सामोऱ्या आल्या. त्यामुळें आपण फारच चांगल्या शुभमुहूर्तावर बाहेर पडत आहों असें वाटून त्यांना आनंद झाला व नामस्मरण करीत ते झपाझप अक्कलकोटाकडे निघाले.

परंतु कांहीं अंतर चालून गेल्यावर त्यांचे पाय एकाएकीं जड होऊन त्यांना चालणेंहि अशक्य होऊन बसलें. तेव्हां त्यांनीं श्रीस्वामीसमर्थांचा धांवा सुरूं केला आणि आश्चर्य असें कीं, त्यांचे पाय फुलांसारखे हलके झाले !

त्यानंतर वाटेंत एक रात्र दुधनीस मुक्काम करून ते रामनवमीच्या दिवशीं अक्कलकोटास जाऊन पोंचले. त्यांनीं प्रसाद

म्हणून एक दिडकीची खडीसाखर घेतली व श्रीसमर्थांचा शोध सुरूं केला. त्यावेळीं श्रींची स्वारी खासबागेंत होती. बाळप्पा लगबगीनें त्या ठिकाणीं गेले व पूर्वीं स्वप्नांत पाहिलेल्या मूर्तीप्रमाणेंच श्रींची दिव्य, अजानुबाहू मूर्ति पाहून त्यांनीं त्यांच्या पायांना घट्ट मिठी मारली.

आपल्या प्रिय शिष्याच्या भेटीनें समर्थांनाहि इतका अपार आनंद झाला कीं, ते जवळच्या झाडांनाच भराभर मिठ्या मारूं लागले. तें पाहून हा नवा शिष्य फार मोठ्या योग्यतेचा असला पाहिजे याबद्दल सर्वांची खात्री झाली.

त्यानंतर बाळप्पांनीं आपला मुक्काम मुरलीधराचे देवळांत ठेवला. श्रीसमर्थहि त्याचवेळीं राजवाड्यांत रहावयास गेले. त्यांच्या दर्शनासाठीं दिवसांतून फक्त एकदांच दरवाजा उघडण्यांत येई. तेवढ्यांत बाळप्पा दर्शन घेऊन येत.

श्रीसमर्थांकडे येणाऱ्या बहुतेक सर्वांनाच कांहींना कांहीं प्रसाद मिळे. परंतु बाळप्पांना समर्थांनीं एकदांहि प्रसाद दिला नाहीं. त्यामुळें बाळप्पा हिरमुसले झाले. ज्यांना सेवेसाठीं ठेवून घ्यावयाचें असेल त्यांना समर्थ प्रसाद देत नसत. परंतु ही गोष्ट बाळप्पांना ठाऊक नव्हती !

एकदां फुलें तोडतांना बाळप्पांच्या बोटांत कांटा घुसला व बोट सुजून ठणका सुरूं झाला. तो त्रास असह्य होऊन बाळप्पांनीं समर्थांना त्यावर उपाय विचारला. तेव्हां समर्थ म्हणाले, 'म्हशीचें मूत लाव.' त्याप्रमाणें उपचार करतां बाळप्पांचें बोट लवकर पूर्ववत् झालें !

परंतु पुढें थोड्याच दिवसांत बाळप्पांच्या बेंबींतून रक्तस्राव सुरूं झाला व त्यांतून एक लहानशी पुडी बाहेर आली. ती उघडून पाहतां तींत विष आढळलें ! सुमारें तीन वर्षांपूर्वीं कोणा हित-

शत्रूनें बाळप्पांवर कानवल्यांतून विषप्रयोग केला होता. परंतु समर्थांची लीला इतकी अगाध कीं, तें विष तीन वर्षें पोटांत राहूनहि बाळप्पांना कोणतीच इजा झाली नाहीं !

पुढें बाळप्पांना श्रीसमर्थांची प्रत्यक्ष सेवा करण्याचें महद्भाग्य लाभलें. सुंदराबाईनें त्यांना प्रथम तस्त व पिकदाणी स्वच्छ करण्याचें काम दिलें. तें काम हलकें असूनहि बाळप्पांनीं मन लावून व आनंदानें केलें. त्यानंतर समर्थांचें अंथरूण झटकून घालणें, पाणी तापविणें, गंध उगाळणें, स्वयंपाक करणें अशीं कामें त्यांच्यावर सोपविण्यांत आलीं.

एकदां समर्थांनीं सर्वांस प्रसादाच्या खारका वाटल्या. परंतु बाळप्पांना मुद्दामच वगळलें. तें पाहून त्यांचा चेहरा उतरला. तेव्हां चोळप्पानें पुढें होऊन बाळप्पांच्या हातावर दोन खारका ठेवल्या. बाळप्पांना थोडें बरें वाटलें. परंतु तेवढ्यांत समर्थांनीं मागें वळून त्यांच्या हातांतील खारका काढून घेण्यास चोळप्पाला सांगितलें. त्यामुळें बाळप्पांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. परंतु त्यानंतर बाळप्पांची निष्काम भक्ति पाहून समर्थांनीं एक दिवस आपल्या तोंडांतील खडीसाखरेचा खडा अचानक त्यांच्या हातावर ठेवला. तो खडा समर्थ पुन्हां उचलून घेतील या भयानें बाळप्पांनीं दुसऱ्याच क्षणीं पट्कन् आपल्या तोंडांत टाकला. तें पाहून समर्थ पोट धरून हंसूं लागले !

बाळप्पांचें सोंवळें ओंवळें जरा कडकच असे. तें पाहून एक दिवस बाळप्पांचें स्नान झाल्यानंतर समर्थांनीं त्यांना मुद्दामच एका सुतक्याच्या घरून पाणी आणण्याची आज्ञा केली. चित्त शुद्ध असल्यावर बाह्य सोंवळें ओंवळें इतक्या कडकपणें पाळण्याची आवश्यकता नाहीं असेंच जणूं या कृतीनें श्रीसमर्थांना सुचवावयाचें होतें !

श्रीसमर्थांनीं बाळप्पांची योग्यता ओळखून त्यांस नेहमींच

मानानें वागविलें. एकदां मात्र त्यांची एकाग्रता साधून देण्यासाठीं त्यांनीं पायांवर डोकें ठेवतांच त्यांच्या पाठीवर पांच बोटें उमटतील इतक्या जोरांत थाप मारली. त्यायोगें बाळप्पांच्या मनांतील विकल्प दूर होऊन मन उपासनेशीं तद्रूप झालें. बाळप्पांची साधनमार्गांत प्रगति व्हावी यासाठीं समर्थांचें त्यांचेकडे जातीनें लक्ष असे. कारण आपल्या गादीचा अनमोल वारसा त्यांना पुढें बाळप्पांनाच द्यावयाचा होता. व त्याच्या खुणा ते अधूनमधून दाखवीत असत. एकदां त्यांनीं आपल्या गळ्यांतील तुळशीची प्रासादिक माळहि बाळप्पांच्या गळ्यांत घातली.

परंतु समर्थांचें बाळप्पांवरील अपार प्रेम पाहून इतर सेवेकरी व विशेषत: सुंदराबाई बाळप्पांचा मत्सर करूं लागली. एकदां तर सुंदराबाईनें बाळप्पांना उगाचच शिवीगाळ केली. त्यामुळें बाळप्पा वैतागून गेले. परंतु समर्थांना ही हकीकत कळतांच त्यांनीं बाळप्पांच्या छातीवर आपला भव्य कर ठेवीत म्हटलें, 'आम्ही तुझी खबर घेतों.'

वास्तविक सेवेकऱ्यांच्या त्या नित्याच्या त्रासामुळें बाळप्पा परत गांवीं जाण्याचाच विचार करूं लागले होते. परंतु त्यांचा हा विचार अंतर्ज्ञानानें ताडून समर्थांनीं सेवेकऱ्यांकडून त्यांना आसन देवविलें. त्यावरून श्रींची इच्छा आपण महामूल मंत्राचें अनुष्ठान करावें अशी आहे हें बाळप्पांनीं ओळखलें. मात्र त्यासाठीं निवांत जागेची आवश्यकता होती.

परंतु तोहि प्रश्न समर्थांनींच सोडविला! त्याच रात्रीं बाळप्पांना स्वप्नांत मारुतीचें मंदिर दिसलें व हीच जागा अनुष्ठानाला योग्य वाटून बाळप्पांनीं तेथेंच आसन मांडलें. तत्पूर्वीं समर्थांच्या आशीर्वादासाठीं ते गेले असतां 'हिशेब असूं दे' असे शब्द श्रींच्या मुखांतून बाहेर पडले.

त्यानंतर बाळप्पांचा सर्व वेळ अनुष्ठानांतच जाऊं लागला.

एक दिवस सेवेकऱ्यांनीं समर्थांना म्हटलें, 'महाराज, बाळप्पा आपणांस सोडून दूर जप करीत कां बसले ?'

त्यावर समर्थ हंसून म्हणाले, 'अरे, आपले लोक कितीहि दूर असले तरी नित्य जवळच असतात.'

बाळप्पांनीं अनुष्ठान सुरूं केलें खरें परंतु त्यापूर्वी दिग्बंधन ठीक न झाल्यानें त्यांना त्रास होऊं लागला. समर्थांना ही हकीकत समजतांच ते मोठ्या पहांटेसच मारुतीच्या मंदिराकडे गेले व त्यांनीं बाळप्पांचें आसन हातीं घेऊन चारी दिशेनें फिरवून दिग्बंधन करून दिलें. अशाप्रकारें समर्थच पाठीशीं उभे राहिल्यावर अनुष्ठान पूर्ण होण्यास काय अडचण !

त्यानंतर बाळप्पा पुन्हां समर्थ सेवेसाठीं रुजू झाले. श्रींना जाग येतांच आपल्यालाहि जाग यावी म्हणून ते आपली शेंडी श्रींच्या मंचकासच बांधून ठेवीत ! अशा प्रकारें एका सद्गुरूवांचून इतर सर्व गोष्टींचा विसर पडून बाळप्पा समर्थ सेवेंत रंगून गेले होते. अगदीं एकरूप झाले होते !

श्रीसमर्थांचा निर्याणकाळ जवळ आल्यावर त्यांनीं आपल्या या प्रिय शिष्याला जवळ बोलावून आपल्या हातांतील 'श्रीस्वामी समर्थ' हीं अक्षरें कोरलेली अंगठी त्याचे बोटांत घातली व मस्तकावर वरदहस्त ठेवीत म्हटलें, 'माझें शिक्कामोर्तब तुला देत आहे. माझा शिक्का यावच्चंद्रदिवाकरौ तूं पुढें चालव.'

इतकें बोलून श्रीसमर्थांनीं आपल्या कंठांतील रुद्राक्ष त्यांच्या कंठांत बांधला. अंगावर छाटी घातली. हातांत निशाण दिलें व प्राणपादुका देऊन त्यांची मठांत स्थापना करण्याची आज्ञा केली. शेवटीं समर्थ उद्‌गारले, 'औदुंबर छायेंत बैस.'

त्या आज्ञेनुसार बाळप्पांनीं श्रींच्या पादुकांची स्थापना करून

मठ बांधला. श्रीसमर्थांच्या निर्याणानंतर ते ३२ वर्षें हयात होते. त्या काळचें त्यांचें कार्य खरोखरच अलौकिक आहे !

वरील हकीकत वाचून कुणाला श्रीरामकृष्ण व नरेंद्र (विवेकानंद) या गुरु-शिष्यांची आठवण झाल्यास आश्चर्य नाहीं. श्रीरामकृष्णांनीं महासमाधीपूर्वी आपलें सर्वस्व नरेंद्राला देऊन आपला वारसा पुढें चालविण्यास सांगितलें. तद्वत्च श्रीसमर्थांनीं बाळप्पांना आपलें सर्वस्व दिलें व आपला शिक्का यावच्चंद्र दिवाकरौ पुढें चालविण्याची आज्ञा केली. रामकृष्णांचा जसा नरेंद्र तसाच श्रीसमर्थांचा बाळप्पा !

## श्रीहरिभाऊ ऊर्फ स्वामीसुत

'तूं संसार लुटवून माझा सुत हो.' या श्रीसमर्थांच्या आज्ञेनुसार ज्यांनीं खरोखरच आपला संसार लुटवून हातीं तंबोरी घेऊन फक्त स्वामीरायांचेंच गायन करण्यांत आपलें सर्व आयुष्य व्यतीत केलें त्या श्रीस्वामीसुतांचें सर्वच जीवन-चरित्र एखाद्या कादंबरीप्रमाणें अद्‌भुत रसानें ओतप्रोत भरलेलें असून मनाला चटका लावणारें आहे !

रत्नागिरी जिल्ह्यांतील इटिया हें स्वामीसुतांचें मूळ गांव. त्या गांवचे हे खोत. हे जातीनें मराठा असून त्यांचें घराणें कुलीन व नामांकित होतें. त्यांच्या वडिलांचें नांव दाजीसाहेब व आईचें नांव काकूबाई. स्वामीसुतांना आठ भाऊ व चार बहिणी होत्या. आठव्या वर्षीं शिक्षणासाठीं ते मुंबईस आले. थोडेंबहुत इंग्रजी शिक्षण झाल्यावर ते दरमहा वीस रुपयांवर मुंबईच्या म्युनिसिपालिटींत नोकरीस राहिले. ही नोकरी त्यांनीं चार पांच वर्षें केली. त्यानंतर त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या कांहीं घटना घडून आल्या व स्वामीसुतांनीं नोकरीवर पाणी सोडून श्रीसमर्थ

सेवेंतच आपलें उर्वरित आयुष्य सत्कारणीं लावलें !

इ. स. १८६८ च्या सुमारास गोविंदराव माधवजी या नांवाचे एक धनिक परंतु तितकेच भाविक गृहस्थ मुंबईस रहात होते. एका कनोजी ब्राह्मणाला बरोबर घेऊन ते एकदां यात्रेला निघाले. पुढें गाणगापुरास येऊन त्यांनीं कडक उपोषण करून श्री-दत्तात्रेयांची सेवा सुरू केली. त्यानंतर त्यांना दत्तप्रभूंचा असा दृष्टांत झाला कीं, आम्हीं प्रत्यक्ष रूपानें अक्कलकोटास अवतरलों असून तेथें गेल्यास तुझी मनोकामना पूर्ण होईल.

या दृष्टान्तानुसार गोविंदराव त्या कनोजी ब्राह्मणासह अक्कलकोटास आले व दत्तरूप श्रीसमर्थांची मनोभावें सेवा करूं लागले. तो कनोजी ब्राह्मण रोज स्वयंपाक करीत असे व गोविंद-राव श्रीसमर्थांना नित्यनेमानें नैवेद्य अर्पण करीत असत.

एक दिवस ते दोघेजण नैवेद्य घेऊन समर्थांकडे आले असतां समर्थ मोठ्यानें म्हणाले, ‘ जाव, गांवके बाहर मस्जीदमें फकीर और कुत्ता है उनको खिलाव ! ’

त्याप्रमाणें फकीर आणि कुत्र्याला नैवेद्य घालून ते दोघे ताट घेऊन परत समर्थांकडे आले. ताटांत थोडासा वडा व खीर शिल्लक होती. समर्थांनीं तें उच्छिष्ट त्या दोघांना खाण्याची आज्ञा केली. परंतु गोविंदरावांचे मनांत विकल्प येऊन त्यांनीं तो प्रसाद खाल्ला नाहीं. तेव्हां श्रीसमर्थ रागावून गोविंदरावास म्हणाले, ‘ तुझी भक्ति अद्याप कच्ची आहे, यास्तव तूं या पादुका घेऊन त्यांची सेवा करीत बैस.’

गोविंदरावांच्या सोबत आलेल्या त्या कनोजी ब्राह्मणानें मात्र तो प्रसाद भक्तिभावानें खाऊन टाकला. त्यामुळें संतुष्ट होऊन समर्थ त्याला म्हणाले, ‘ जाव, बम्बईमें दस हजार तुमको मिलेंगे.’

नंतर गोविंदरावांनीं श्रीसमर्थांच्या प्रासादिक पादुकांची घरीं स्थापना केली. तो कनोजी ब्राह्मण मात्र दहा हजार रुपये मिळणार हें ऐकल्यापासून भ्रमिष्टासारखें करूं लागला. उकिरडयांतले कागद तो दिवसभर चिवडीत बसे. परंतु दहा हजार रुपये तेथें कोठून सांपडणार? तथापि श्रीसमर्थ वचनावर त्याचा पूर्ण विश्वास होता. एक दिवस प्रातःकाळीं तो असाच भ्रमिष्टाप्रमाणें रस्त्यानें हिंडत असतां एका हवेलीच्या दारांत उभ्या असलेल्या एका स्त्रीनें त्याला हांक मारून नमस्कार केला व दहा हजार रुपयांचें कोऱ्या करकरीत नोटांचें बंडल त्याच्या हातांत ठेवलें!

त्यापूर्वी एक भाटिया शेठजी मरण पावला होता व त्यानिमित्तानें त्याच्या बायकोनें गुप्तदान करण्याचें ठरवून सकाळीं दाराशीं प्रथम दिसणाऱ्या ब्राह्मणाला दहा हजार रुपये देण्याचा संकल्प सोडला होता. त्यानुसार तिला त्या कनोजी ब्राह्मणाचें प्रथम दर्शन झाल्यामुळें तिनें तें दहा हजारांच्या नोटांचें पुडकें त्याच्या स्वाधीन केलें होतें! अशाप्रकारें श्रीसमर्थांचें वचन खरें ठरलें व त्या कनोजी ब्राह्मणाच्या आनंदाला सीमाच राहिली नाहीं!

ही सर्व विलक्षण हकीकत गोविंदरावांच्या आश्रयाला असलेल्या लक्ष्मण पंडित या भिक्षुकाला समजली व स्वामीसमर्थांच्या दर्शनाचा त्यालाहि एकच ध्यास लागून राहिला. परंतु त्याला कांहीं कर्ज असल्यामुळें त्यानें असा नवस केला कीं, श्रीस्वामींनीं आपणांस आठ दिवसांचें आंत कर्जमुक्त केल्यास आपण लगेच अक्कलकोटास जाऊन श्रीसमर्थांचें दर्शन घेऊं.

श्री हरिभाऊ ऊर्फ स्वामीसुत जेथें नोकरीला होते त्याच म्युनिसिपालिटींत गजानन खत्री नांवाचे एक गृहस्थ होते. खत्री व

हरिभाऊ या दोघांनीं त्याच सुमारास अफूच्या सट्टयाचा एक व्यवहार केला होता व तो अंगाशीं आला होता. तेव्हां यांतून मार्ग काढण्यासाठीं ते पंडितांकडे गेले ! म्हणजे एकादशीच्या घरीं शिवरात्र ! परंतु पंडितांनीं त्या उभयतांच्या कर्जाची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली. त्यामुळें खत्री व हरिभाऊ यांनीं सुटकेचा निःश्वास टाकला !

इकडे पंडितांची स्थिति मात्र चमत्कारिक झाली. कारण अगोदरच ते कर्जबाजारी झाले होते व त्यांत भावनेच्या भरांत त्यांनीं हें नवीन कर्ज डोक्यावर घेतलें ! परंतु श्रीस्वामीनामाचा श्रद्धापूर्वक जप करीत ते स्वस्थ बसले !

पुढें चमत्कार असा झाला कीं, भावांत चढउतार होऊन पंडितांना दोन हजार रुपयांचा फायदा झाला व ते आठ दिवसाचे आंत कर्जमुक्त झाले ! (पंडित हे बळवंत सखाराम कंपनीत भागीदार होते.) त्यांनीं ही नवसाची हकीकत खत्री व हरिभाऊ यांना सांगितली. ती ऐकून त्या दोघांच्या मनांत स्वामीदर्शनाची विलक्षण ओढ निर्माण झाली. व त्या तिघांनींहि अशी प्रतिज्ञा केली कीं, दत्तावतारी स्वामी समर्थांचें दर्शन घेतल्याशिवाय आतां अन्नग्रहण करावयाचें नाहीं. अशा प्रकारें ठरवून ते तिघेहि अक्कलकोटास आले.

त्यावेळीं श्रीसमर्थांची स्वारी राजवाड्यांत होती. त्यामुळें हे तिघेजण राजवाड्याच्या दाराजवळ जाऊन बसले. समर्थ नुकतेच भोजन आटोपून आडवे झाले होते.

त्यांच्या दर्शनासाठीं कोणी लोक बाहेर उभे आहेत का हें पाहण्यासाठीं चोळप्पाचे जांवई श्रीपादभट दाराशीं येऊन पाहूं लागले. तेथें त्या तिघांना दर्शनासाठीं उभें असलेलें पाहून श्रीपादभटजींनीं त्यांची विचारपूस केली व त्यांना घेऊन ते राजवाड्यांत

निघाले. वाटेंत त्यांना चोळप्पा भेटला. त्याच्या हातांत एक ताट होतें. त्या ताटांतील उच्छिष्ट पाहून हरिभाऊंनीं चोळप्पाला थांबवून म्हटलें, 'हें उच्छिष्ट कुणाचें आहे तेवढें मला सांगा. हें समर्थांचें असेल तर कृपा करून मला द्या.'

चोळप्पानें त्यांचा भक्तिभाव पाहून तें उच्छिष्ट प्रसाद म्हणून हरिभाऊंना दिलें. हरिभाऊंनीं तो प्रसाद अत्यंत आनंदानें ग्रहण केला व ते समर्थांच्या दर्शनासाठीं निघाले.

त्या परब्रह्म मूर्तीकडे पाहतांच हरिभाऊंचें देहभान हरपून गेलें व अष्टसात्त्विक भाव जागृत होऊन त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले !

तेवढ्यांत समर्थ म्हणाले,

**'व्यापार केला तोटा झाला, नवस केला लाभ झाला. अबी जाव साले तेरी माकी...'**

स्वामीसमर्थांच्या मुखांतून बाहेर पडलेले हे शब्द ऐकून त्या तिघांनाहि श्रीसमर्थांच्या अंतर्साक्षित्वाची खूण पटली व गहिंवरून आलें !

त्यानंतर पुढच्या भेटींत समर्थ पंडितांकडे पाहून म्हणाले, 'तूं डोकीस रुमाल बांध.' खत्रींना म्हणाले, 'तूं बाजारांत जाऊन डोकीस धोतर बांध.' परंतु हरिभाऊंना जवळ ओढून म्हणाले, **'कुळावर पाणी सोडून तूं माझा सुत हो. आणि सफेत सफेत घेऊन ये.'**

परंतु 'सफेत सफेत' म्हणजे काय हें हरिभाऊंना समजेना. म्हणून त्यांनीं समर्थांना त्याबद्दल विचारलें त्यावर समर्थांनीं आपणांस चांदीच्या पादुका आणण्याची आज्ञा केली आहे ही गोष्ट हरिभाऊंनीं ताडली. नंतर दुसऱ्या दिवशीं द्वादशीनिमित्त त्यांनीं बेसनाचे लाडू, खीर, भजीं वगैरे समर्थांना आवडणाऱ्या गोष्टींचा महाप्रसाद तयार केला व श्रीसमर्थांना भोजन घातलें.

त्यानंतर स्वामी समर्थांची आज्ञा घेऊन ते तिघेहि मुंबईस गेले. परंतु तेथें गेल्यावर हरिभाऊंना संसाराचा वीट आला व नोकरी–धंदाहि नकोसा होऊन त्यांना ध्यानीं मनीं स्वप्नीं अक्कलकोटास पाहिलेली समर्थांची ती परब्रह्ममूर्तीच दिसूं लागली ! त्या साक्षात् दत्तावताराकडून अनुग्रह मिळावा अशी तीव्र इच्छा व तळमळ त्यांच्या मनास लागून राहिली. ती तळमळ इतकी तीव्र होती, कीं हरिभाऊंना अन्न-पाणीदेखील गोड लागेनासें झालें !

त्यांनीं श्रीसमर्थांच्या आज्ञेनुसार छान वेलबुट्टी काढलेल्या चकचकीत रौप्य पादुका तयार करवून घेतल्या व ते ताबडतोब अक्कलकोटास आले. त्यांनीं त्या पादुका श्रीसमर्थांपुढें ठेवून त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवलें. सद्गुरुरायांनीं उठून त्या पादुका स्वतःच्या पायांत घातल्या. त्यानंतर सतत चौदा दिवस त्या त्यांच्याच पायांत होत्या.

त्या पादुका आपणांस मिळाव्यात म्हणून सेवेकऱ्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ‘ हें माझें आत्मलिंग आहे, तें मी कोणास देणार नाहीं.’ असें समर्थ म्हणत.

पंधराव्या दिवशीं समर्थांनीं हरिभाऊंना अवचित जवळ बोलाविलें व त्यांचा हात धरून म्हटलें, ‘ तूं तुझा रोजगार, धंदा सोडून माझा सुत हो आणि दर्याकिनारीं मोठा किल्ला बांधून माझी ध्वजा उभी कर.’

असें बोलून समर्थांनीं हरिभाऊंना तीन उठवशा काढण्यास सांगितल्या आणि त्या पादुका स्वतःच्या हस्त–पादादि अवयवांस लावून त्यांची किल्ल्यांत (मठांत) स्थापना करण्यास सांगितलें.

तत्पूर्वी एका रात्रीं एक विलक्षण हकीकत घडली. मध्यरात्रीच्या सुमारास सर्व मंडळी निजलेली असतां श्रीसमर्थ एकाएकीं

उठले व हातांत काठी घेऊन एका झाडाजवळ जाऊन मोठ्यानें म्हणाले,

**'तूं साले यहांसे निकल जा. नीचे हमारे बालगोविंद सोये है.'**

याप्रमाणें तीन वेळां म्हणूनच त्यांनीं झाडावर काठी उगारतांच तें झाड गदगदां हलूं लागलें व त्यांतून एक तेजस्वी गोळा निघून गेल्याप्रमाणें दिसलें!

नंतर थोड्याच वेळांत हरिभाऊंना जाग आली व ते श्रीसमर्थांजवळ जाऊन त्यांचे चरण रगडीत बसले. त्यावेळीं समर्थ आणि हरिभाऊ यांच्या एकमेकांत बऱ्याच गुप्त गोष्टी झाल्या. नंतर श्रीसमर्थांनीं आपल्या उशालगतचे कपडे, छाटी, कफनी वगैरे वस्तु हरिभाऊंच्या अंगावर फेकून देऊन म्हटलें, **'आपला सर्व संसार लुटवून टाक.'**

अशाप्रकारें श्रीसमर्थांची कृपा झाल्यामुळें हरिभाऊंच्या आनंद-सागराला उधाण आलें आणि ते भगवीं वस्त्रें घालून व रौप्य पादुका हृदयाशीं कवटाळून दुसरे दिवशीं मुंबईस निघून गेले.

मुंबईस आल्यावर त्यांनीं समर्थांची आज्ञा शिरसावंद्य मानून आपला सर्व संसार लुटवून टाकला. त्यांच्या घरांत ८४ तोळे सोनें होतें. तें सर्व विकून त्यांनीं त्याचे पैसे केले व ब्राह्मणांना वांटून टाकले. आपल्या पत्नीचें—ताराबाईचें— मणिमंगळसूत्रहि त्यांनीं शिल्लक ठेविलें नाहीं. त्यामुळें ताराबाईनें रडून रडून आकान्त केला. कारण हरिभाऊंप्रमाणें ती विरक्त झाली नव्हती. तिचें अपरिपक्व मन अजूनहि संसारी वस्तूंतच घोटाळत होतें.

हरिभाऊंनीं ताराबाईसाठीं एक पांढरें पातळ व स्वत:साठीं एक कफनी एवढ्याच वस्तु जवळ ठेवल्या व हातीं टाळ-वीणा घेऊन ते आपल्या आकान्त करणाऱ्या पत्नीला उद्देशून म्हणाले—

तारके आतां हेचि करीं । हातीं घ्यावी ही तंबुरी ।
स्वामी रायाचें गायन । करी चरणीं ठेवुनि मन ।
धन्य तूंचि होसी जगीं । भज भज माझा योगी ।
स्वामी रायाच्या नौबदी । तूंच पाहशील आधीं ।
त्या सांगतील गांवोगांव । माझ्या बापाचें तें नांव ।
स्वामीसुत म्हणे तारके । स्वामीनाम घ्यावें मुखें ।

स्वामीसुतांनीं मुंबईतील कामाठीपुऱ्यांत श्रीसमर्थांचा मठ स्थापन केला व देहभान विसरून ते समर्थभजनांत तल्लीन होऊन गेले. ताराबाईचा आकान्त एकसारखा सुरूच होता. परंतु स्वामीसुतांनीं मनाची शांती तिळमात्र ढळूं दिली नाहीं. ते समर्थस्तुतिपर अभंग, पद्यें व भजनें करण्यांतच रंगून गेले. त्यांचें भजन ऐकण्यासाठीं लोकांची तोबा गर्दी होऊं लागली. चारी वर्णांचे लोक सकाळ-संध्याकाळ मठांत येऊं लागले. स्वामीसुत भजन करतांना इतके तल्लीन होत कीं, त्यांना त्यावेळीं देहाचीहि शुद्ध नसे ! शके १७९३ मध्यें त्यांनीं स्वामी जयंतीचा उत्सव प्रथमच सुरू केला. त्याचवेळीं चर्चन, नगर, पुणें, ठाणें, वसई, रत्नागिरी, चिपळूण या ठिकाणींहि स्वामीसमर्थांचे मठ स्थापन झाले.

अक्कलकोटास येणाऱ्या भक्तांना श्रीसमर्थ दर्याकिनारीं असलेल्या स्वामीसुतांच्या मठांत जाण्यास सांगत. तेथील प्रसादतीर्थानें आर्तपीडितांचीं दुःखें दूर होत.

## माझी माता तुमचे घरीं '

एकदां स्वामीसुत समर्थदर्शनासाठीं अक्कलकोटास आले असतां समर्थांची स्वारी राजवाड्यांत होती. त्यामुळें समर्थांचें दर्शन होणें मुष्किल झालें. तेव्हां स्वामीदर्शन होईपर्यंत अन्नग्रहण न

करण्याचें ठरवून स्वामीसुत समर्थांचें नामस्मरण करीत बसले. चौथ्या दिवशीं मात्र समर्थदर्शनाशिवाय त्यांना क्षणभरहि जगणें अशक्य वाटूं लागलें व ते हातीं टाळवीणा घेऊन राजवाड्यासमोर जाऊन उभे राहिले. व त्यांनीं पुढील प्रेमळ अभंग गोड आवाजांत म्हणावयास सुरुवात केली–

**माझी माता तुमचे घरीं। म्हणूनि आलों मी हो द्वारीं ॥**
**आम्हां नको तुमचें कांहीं। स्वामी चरण दावा बाई ॥ १ ॥**
**स्वामी चरणाचें रज। देऊन तृप्त करा मज।**
**माझी माय आहे आंत। मज दाखवा त्वरित ॥ २ ॥**
**माय सोडुनियां बाळ। कैसा घालविल काळ।**
**आम्ही जाउनियां आंत। तुमचें कांहीं नाहीं नेत ॥ ३ ॥**
**प्रेम पान्हा घेऊनि झोडा। गात येऊं हो पवाडा।**
**स्वामी सुत म्हणे आई। बाळा भेटवावें बाई ॥४॥**

हा प्रेमळ व भक्तिपूर्ण अभंग ऐकून राणीसाहेबांचें मन द्रवलें, त्यांच्या नेत्रांतून घळघळां अश्रु वाहूं लागले व त्यांच्या मनांत स्वामीसुतांविषयीं आदरभाव उत्पन्न होऊन त्यांनीं कारकुना-करवीं स्वामीसुतांना मोठ्या आदरानें वाड्यांत आणलें व त्यांच्या आईचें ( समर्थांचें ) दर्शन घडविलें. त्याचप्रमाणें स्वामीसुतांना समर्थदर्शनासाठीं केव्हांहि वाड्यांत मज्जाव करूं नये असा सर्व पहारेकऱ्यांस सक्त हुकूम सोडला.

स्वामीसुत वर्षांतून दोन तीन वेळां तरी मुंबईहून अक्कल-कोटास येत. एकदां रात्रीच्या वेळीं ते मुरलीधराचे देवळांत समर्थांचा जप करीत बसले असतां द्वारकानाथ अप्पाजी नांवाचे एक वकील समर्थांच्या दर्शनास आले. त्यावेळीं स्वामीसमर्थांची स्वारी खोजाच्या दर्ग्यापुढील चिंचेच्या ओटयावर पहुडली होती. वकील

साहेबांनीं समर्थांचें दर्शन घेऊन आपल्याजवळचा कापूर समर्थां-पुढें जाळला तेवढ्यांत समर्थ एकाएकीं उठून मोठ्यानें म्हणाले, '**बेटा मंगनेकू आया है, हमारे हनुमान अंधेरेमें बैठे है, उनके तरफ देखता नहीं.**'

समर्थांच्या तोंडचीं हीं अनपेक्षित वाक्यें ऐकून वकीलसाहेब चपापले परंतु त्यांना समर्थांच्या बोलण्याचा अर्थ न समजल्यामुळें ते समर्थांकडे नुसतेच पहात राहिले परंतु भुजंगाला समर्थांच्या या असंबद्ध वाणीचा अर्थ कळून त्यानें वकीलसाहेबांना जवळच्याच मुरलीधराचें मंदिरांत नेलें. त्या ठिकाणीं पाहतात तों स्वामीसुत अंधारांत जप करीत बसले आहेत.

तें दृश्य पाहतांच वकीलसाहेबांना समर्थांच्या बोलण्यातील आशय ध्यानांत आला व स्वामीसुतांविषयीं परम आदराची भावना त्यांचें मनांत निर्माण होऊन त्यांनीं त्यांचेसमोर दिव्यांची आरास केली व ते पुन्हां समर्थांकडे आले

त्यावेळीं समर्थांनीं त्यांची पुत्रसंततीची इच्छा ओळखून त्यांना चणे आणण्यास सांगितलें वकिलांनीं चणे आणून देतांच समर्थ त्या चण्यांबरोबर खेळूं लागले. सुमारें एक तासभर त्यांचा हा विलक्षण खेळ सुरूं होता. त्यानंतर समर्थांनीं तेच चणे वकिलांना प्रसाद म्हणून दिले व त्यायोगें त्यांची मनोकामना पूर्ण झाली !

अशा प्रकारें निजभक्ताविषयीं समर्थांना विलक्षण अभिमान होता व त्यांची महती वाढविण्याचा ते नेहमींच प्रयत्न करीत

त्यानंतर पुढें तीन चार वर्षांनीं स्वामीसुत अक्कलकोटास आले असतां समर्थांनीं त्यांना, 'आपण लवकरच अवतारसमाप्ति करणार असून तुम्हीं ध्वजा उभारून आमची गादी चालवावी' असें सांगितलें.

तें ऐकून स्वामीसुतांचें मन खचलें आपल्यां आधी समर्थांनीं

जाणें त्यांना योग्य वाटलें नाहीं. ते तसाच निराश मनानें मुंबईस परत आले व आजारी पडले

समर्थांना ही बातमी समजतांच त्यांनीं स्वामीसुतांना अक्कलकोटीं घेऊन येण्यासाठीं शिऊबाईला मुंबईस पाठविलें. परंतु ते आले नाहींत. त्यानंतर त्यांची समजूत काढण्यासाठीं समर्थांनीं श्रीपादभट व कृष्णाप्पा यांनाहि पाठवून पाहिलें. परंतु तरीहि स्वामीसुत आले नाहींत. शेवटीं समर्थांनीं देवाजी माळी यास आज्ञा केली कीं, त्यास बांधून घेऊन ये. परंतु स्वामीसुत कसचे येतात ? सर्वजण स्वामीसुतांची मार्गप्रतीक्षा करीत होते. समर्थांचेहि डोळे स्वामीसुतांच्या आगमनाकडे लागले होते. परंतु ते येण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां समर्थ म्हणाले, '**कोणी त्यास पेटींत घालून तरी आणा !**'

स्वामीसुतांना अक्कलकोटीं आणण्याचे सर्व उपाय हरल्यावर समर्थ म्हणाले, '**तो एवढ्यांत आला नाहीं तर झोंपडें उडवून टाकूं. तोफ लावून ठेवली आहे.**'

पण स्वामीसुत कधींच आले नाहींत. श्रावण वद्य प्रतिपदेस त्यांनीं देहत्याग केला ! ती दुःखद वार्ता वाऱ्यासारखी चौफेर पसरली व हजारों लोक त्या महान् स्वामीभक्ताच्या अंत्यदर्शनासाठीं मठांत जमा झाले. सर्वत्र एकच हाहाःकार उडाला !

ही अशुभ वार्ता तारेनें तावडतोब अक्कलकोटास कळविण्यांत आली. परतु तार येण्यापूर्वींच समर्थांनीं अंतर्ज्ञानानें हा प्रकार ओळखून पलंगावरून धाडकन् जमिनीवर अंग टाकलें व ते कपाळाला हात लावून बसले !

स्वामीसुतांची आई काकूबाई त्यावेळीं अक्कलकोटास समर्थाजवळच होती. समर्थांच्या कृतीवरून तार वाचून पाहण्याची कुणालाच आवश्यकता वाटली नाहीं !

काकूबाईंनीं रडून रडून आकांत केला. परंतु **‘मी तुमचा लेक आहें ना, रडूं नका. त्यास चांगल्या जागीं पाठविलें आहे.’** असें सांगून समर्थांनीं काकूबाईची कशीबशी समजूत घातली.

**‘मोरपांखरा ऽ मोरपांखरा…’**

त्यानंतर समर्थांनीं रोज ‘मोरपांखरा ! मोरपांखरा !’ असें ओरडावयास सुरुवात केली. कांहीं सेवेकऱ्यांनीं खासबागेतील एक सुंदर मोर समर्थांपुढें आणून ठेवला. परंतु समर्थांनीं तिकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं. त्यानंतर त्यांनीं काकूबाईंना एक पाऱ्याची वीट घेऊन येण्यास सांगितलें परंतु पाऱ्याची वीट म्हणजे काय हें काकूबाईंना समजलें नाहीं. समर्थांचा तगादा मात्र एकसारखा सुरूच होता !

त्याचवेळीं स्वामीसुतांचे गादीवर कोणास बसवावें हें विचारण्यासाठीं कांहीं मंडळी मुंबईहून अक्कलकोटास आली. त्यांना ब्रह्मचारीबुवा, बाबा शेणवई, केरोबा यांपैकीं कुणाला तरी गादीवर बसण्याची समर्थ आज्ञा करतील असें वाटत होतें. परंतु यांपैकीं कुणीच समर्थांच्या मर्जीस उतरला नाहीं. ते एकसारखे ‘मला पाऱ्याची वीट आणून द्या’ असा तगादा काकूबाईस लावीत होते. परंतु त्याचा अर्थ कुणालाच समजत नव्हता !

परंतु त्यानंतर थोड्याच दिवसांत तो अर्थ स्पष्ट झाला !

## सच्चिदानंद स्वामीकुमार

काकूबाईंचा दादा ऊर्फ बाबू नांवाचा एक आठ-नऊ वर्षें वयाचा मुलगा कोंकणांत होता. तो आपल्या आईला भेटण्यासाठीं कोंकणांतून अक्कलकोटास आला. त्याला काकूबाईंनीं मोठ्या प्रेमानें समर्थांच्या पायावर घातला. त्याला पाहून भिंतीकडे तोंड करून समर्थ बराच वेळ मोठमोठ्यानें हंसत होते. नंतर त्यांनीं

प्रेमभरानें त्याला जवळ बसवून कुरवाळलें.

त्याच सुमारास समर्थांनीं नानासाहेब केजकरांना केज येथें मठ स्थापन करण्याची आज्ञा केली होती. नानासाहेब दादाला घेऊन केजला गेले व त्यांनी मोठ्या समारंभानें केज येथें समर्थांचा मठ स्थापन केला. त्यानंतर दादास घेऊन ते पुन्हां अक्कलकोटास आले. तेव्हां समर्थांनीं दादास जवळ घेऊन सेवेकऱ्यांना सांगितलें **'यास मुंबईस नेऊन गादीचा धनी करा.'**

तें ऐकून समर्थ यालाहि हरिभाऊप्रमाणेंच बैरागी करणार असें वाटून काकूबाई शोक करूं लागल्या.

परंतु मुंबईस नेल्यावर दादा दीक्षा घेईना. तेव्हां मंडळींनीं त्यास पुन्हां अक्कलकोटास आणून समर्थांसमोर उभें केलें. तेव्हां समर्थांनीं भुजंगास हांक मारून म्हटलें, **'फिरंगो वाघाचें कांतड्यावर त्यास उभा कर. त्याचे गळ्यांत माळ घाल. हें खेटर घेऊन त्याचें डोकीवर ठेव.'** असें म्हणून समर्थांनीं आपल्या पायांतील जोडे भुजंगासमोर फेकले.

नंतर भुजंगानें समर्थांचे आज्ञेप्रमाणें सर्व करतांच स्वतः समर्थ चवऱ्या घेऊन दादावर वारूं लागले. तेव्हां काकूबाईंना रडें अनावर झालें व त्या डोळ्याला पदर लावीत म्हणाल्या, 'पायांतील खेटर पैजार उचलणार असा हा दादा असून असें उफराटें कसें करतां ?'

समर्थ म्हणाले, 'तुला बघवत नाहीं. घाला रे हिला कोंडून ! तिला खोड्यांत टाका. तिला बिड्या ठोका !'

श्रीसमर्थांच्या दिव्य पादुकांचा डोक्यास स्पर्श झाल्यामुळें दादाच्या मनांतहि वैराग्य उत्पन्न झालें होतें. त्यामुळें तोहि समर्थांचीच बाजू घेऊं लागला. त्यामुळें काकूबाईंनीं डोकें बडवून घेतलें. त्यांच्या नाका-तोंडांतून रक्त वाहूं लागलें.

परंतु समर्थांचा हट्ट कायम ! ते एकसारखे म्हणूं लागले, ‘ झाली गोष्ट फिरायची नाहीं. धोंड्यावर रेघ मारून ठेव ! ’

त्यानंतर समर्थांनीं दादास मांडीवर घेऊन कुरवाळलें, त्यास कौपीन नेसविली व त्याचे कान फुंकले व त्यास म्हटलें, ‘ काकूबाई तुझी आई नव्हे. तूं तिचा मुलगा नव्हेस. तूं आतां माझा आहेस. ’

असें म्हणून त्यांनीं दादाचे मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला व त्यानंतर ‘ सच्चिदानंद स्वामीकुमार ’ हें नांव धारण करून दादाबुवा स्वामीसुतांच्या गादीवर बसले. हल्लीं त्यांच्याच वंशजांकडे आत्मलिंगाची पूजाअर्चा व सेवा चालू आहे.

## ब्रह्मनिष्ठ श्रीवामनबुवा ब्रह्मचारी

श्रीवामनबुवा ब्रह्मचारी हे अहमदनगर जिल्ह्यांतील वांबोरी गांवचे राहणारे. लहानपणासूनच त्यांना दत्तभक्तीचें विलक्षण वेड. त्यांनीं कांहीं दिवस सरकारी शाळाखात्यांत नोकरी केली. धुळ्याच्या कलेक्टर ऑफिसमध्येंहि ते कांहीं दिवस होते. त्यानंतर नगरच्या ‘ वृत्तवैभव ’ छापखान्यांत नोकरी करून त्यांनीं संस्कृत व इंग्रजी भाषेचा अभ्यासहि केला. मन:शांतीसाठीं त्यांनीं अनेक साधु, गोसावी, फकीर इत्यादींची भेट घेतली. परंतु त्यांच्या चित्ताला त्यामुळें यत्किंचितहि समाधान मिळालें नाहीं !

त्यानंतर ते आपल्या मातोश्रींसह पुण्यास आले. एकदिवस ते गोपाळदादा नातू, व्यंकय्या तेलंग इत्यादींशीं अध्यात्म विषयावर चर्चा करीत असतां एकाएकीं एक तेजस्वी ब्राह्मण तेथें आला व म्हणाला, ‘ सद्‌गुरु कृपेवांचून सर्व व्यर्थ आहे.’

त्यावर वामनबुवा म्हणाले, ‘ असा कुणी सद्‌गुरु आपल्या पाहण्यांत आहे का ? ’

ब्राह्मण म्हणाला, ‘ तुम्ही त्वरित अक्कलकोटास जा व

तेथें दत्तात्रेयस्वरूप स्वामी महाराजांचें दर्शन घ्या'

एवढें सांगून तो ब्राह्मण एकाएकीं कोठें निघून गेला हें कुणालाच समजलें नाहीं. वामनबुवांना मात्र त्यामुळें अक्कलकोटास जाण्याची तीव्र तळमळ लागून राहिली व ते शके १७८२ मध्यें पुण्याहून रेल्वेनें सोलापुरास गेले व पुढें तेथून पायीं अक्कलकोटास पोहोंचले. (कारण त्याकाळांत रेल्वे सोलापूरपर्यंतच होती.)

परंतु त्यावेळीं श्रीसमर्थांची स्वारी हद्रें नांवाच्या गांवीं गेल्याचें त्यांना समजलें. त्यामुळें ते तिकडे जाण्यास निघाले. वाटेंत रोडगी व मिरगी या दोन गांवांच्या मधील एका नदीजवळ ते येतांच श्रीसमर्थांची स्वारीहि पलीकडून येतांना त्यांना दिसली. श्रीसमर्थांनीं वामनबुवांकडे पाहून जें पहिलेंच वाक्य उच्चारलें तें ऐकून श्रीसमर्थांच्या अंतर्साक्षित्वाची ओळख वामनबुवांना पटली.

श्रीसमर्थ वामनबुवांकडे पहात म्हणाले, '**कां रे आमच्या ब्राह्मणाची थट्टा केलीस?**'

ही खूण मिळतांच वामनबुवांनीं समर्थांपुढें दण्डवतच घातलें!

तितक्यांत समर्थ म्हणाले, **आमची नोकरी कर म्हणजे ब्रह्मनिष्ठ होशील. तुझें गाठोडें आम्हांस दे**' तेव्हां वामन बुवांनीं लंगोटी घातली व सर्व सामान स्वामीरायांपुढें ठेवलें. त्यापैकीं पाणी भरलेला तांब्या समर्थांनीं वामनबुवांस परत दिला, व सांभाळून ठेवण्यास सांगितलें त्यावेळेंपासून वामनबुवा श्रीसमर्थांचे एकनिष्ठ सेवक बनले. त्यानंतर वर्षांतून दोन-तीन वेळां ते समर्थांच्या दर्शनासाठीं अक्कलकोटास जात असत.

शके १७९३ च्या फाल्गुनांत सिंहस्थ असतां श्रीवामनबुवा नासिक त्र्यंबकच्या यात्रेस गेले होते. गंगास्नान वगैरे आटोपून ते नंतर वणीच्या सप्तशृंगी देवीच्या दर्शनास गेले. हें वामनबुवांचें कुलदैवत असल्यामुळें त्यांनीं देवीचें यथासांग पूजन वगैरे केलें. व

नंतर ब्राह्मणांना भोजन दिलें. सप्तशृंगी देवींचें हें स्थान अत्यंत जागृत असून तिच्या दर्शनासाठीं हजारों लोक प्रतिवर्षी तेथें येत असतात. या देवीला अठरा हात असून तिचें स्वरूप विक्राळ आहे परंतु देवीच्या मुखावर मात्र सदैव प्रसन्न भाव दिसतो. तिच्या पुजाऱ्यांना भोपे असें म्हणतात. पूजेच्या वेळीं देवीच्या मुखांत तांबुल ठेवतात. वामनबुवांनीं आदिमायेच्या मुखांतील तो तांबुल आपणांस मिळावा अशी इच्छा भोप्यांजवळ प्रकट केली. परंतु पुजारी त्या गोष्टीस अजिबात कबूल होईनात!

तेव्हां वामनबुवांना वाईट वाटलें व त्यांनीं आदिमायेपुढें हात जोडून म्हटलें, 'हे जगन्माते, तूं जर आमच्या कुळावर प्रसन्न असशील व तुझी आमचेवर पूर्ण कृपा असेल तर तुझ्या मुखांतील तांबुल माझ्या हातांत पडेल.'

वामनबुवांनीं अशी प्रार्थना करतांच जगन्मातेच्या मुखांतील तांबूल टपकन् वामनबुवांच्या हातांत पडला! तें पाहून भोप्यांना अतिशय नवल वाटलें!

त्यानंतर वामनबुवा सटाण्याचे सत्पुरुष श्री. देव मामलेदार यांच्या दर्शनासाठीं सटाण्यास गेले. त्यांनीं आपणहि अक्कलकोट स्वामींचे भक्त असून स्वामीरायांना आपला साष्टांग दंडवत सांगा असें वामनबुवांना सांगितलें. त्यांचा निरोप घेऊन वामनबुवा नासिकला आले. तेथें भागीरथीचें जळ भरून घेऊन त्यांनीं पंढरपुरास जाऊन पांडुरंगाच्या चरणांवर त्याचा अभिषेक केला. त्यावेळीं पांडुरंगाचे ठिकाणीं वामनबुवांना श्रीसमर्थ उभे असलेले दिसले!

त्यानंतर वामनबुवा अक्कलकोटास आले व त्यांनीं स्वामी समर्थांचें दर्शन घेतलें. त्यावेळीं समर्थ एकदम मोठ्यानें म्हणाले, '**सप्तशृंगीस जाऊन शंख केलात परंतु विडा आम्हांस द्यावा लागला आणि पंढरीनाथांची गंगा आम्हींच ग्रहण केली बरें!**'

ते पुढें म्हणाले, '**मडकें भाजलें तरी अजून कच्चेंच आहे. उगाच सर्वत्र फिरून कां शिणतोस ? परमानंदांत स्वस्थ रहा.**'

श्रीसमर्थांचें हें भाषण ऐकतांच साक्षात् परब्रह्मच समर्थरूपानें प्रज्ञापुरीं अवतरलें आहे या गोष्टीची वामनबुवांना पूर्ण खात्री पटली.

त्यानंतरहि वामनबुवांना श्रीसमर्थांचा दिव्य सहवास बऱ्याच वेळां घडला. त्यांनीं त्या दिव्य सहवासांतील विशेष अनुभव आपल्या '**श्रीगुरुलीलामृतांत** अत्यंत रसाळ भाषेंत लिहून ठेविले आहेत.

शके १७९८ मध्यें वामनबुवांची प्रकृति एकाएकी खालावली. खोकला, आमांश, मूळव्याध, संधिवात इत्यादि अनेक रोगांनीं त्यांना हैराण करून सोडलें. पुष्कळ डॉक्टर वैद्यांचीं औषधें झालीं. परंतु गुण येईना. उलट रोग वाढतच चालले. शेवटीं त्यांनीं अक्कलकोटास पत्र लिहून ही हकीकत गुरुमाऊलीला कळविली व आशीर्वाद मागितले. परंतु तिकडूनहि उत्तर येण्याचें चिन्ह दिसेना.

त्यामुळें जीवाला कंटाळून अत्यंत निराश मनानें वामनबुवांनीं आत्महत्त्या करण्याचा निर्णय घेतला व एक दिवस रात्रीं उठून कुणाच्या नकळत तें सुरसागरांत प्राणत्याग करण्यास सज्ज झाले. परंतु त उडी मारणार तोंच कुणींतरी पाठीमागून त्यांचा हात घट्ट धरला. वामनबुवांनीं चमकून मागें पाहिलें. तों श्रीसमर्थांची अजानुबाहू मूर्ति ! त्यांनीं क्षणभर वामनबुवांकडे रागानें पाहून त्यांच्या दोन श्रीमुखांत मारून म्हटलें, '**अरे, देहारब्ध कर्माचा क्षय होईपर्यंत जातोस कोठें ? आणि आम्हांवर त्रागा करितोस काय ? सहज समाधि सोडून प्राणत्यागरूप जलसमाधि कशाची बोडक्याची घेतोस ?**' असें म्हणून त्यांनीं वामनबुवांचा हात धरून त्यांना घरांत नेलें. त्यावेळीं वामनबुवांच्या मातोश्रीस व बंधूसहि

श्रीसमर्थांचें दिव्य दर्शन घडलें !

नंतर वामनबुवांच्या उरावरून हात फिरवीत समर्थ म्हणाले, ‘ बरें होईल, उगाच बैस. चेष्टा करूं नकोस. पायपोस खाशील. ’ एवढें बोलून ते एकाएकीं अदृश्य झाले !

त्यानंतर वामनबुवांची प्रकृति झपाटयानें सुधारत गेली. स्वामीरायांची अमृतदृष्टि पडल्यावर गुण येण्यास विलंब का ?

नंतर समर्थदर्शनासाठीं वामनबुवा काठी टेकीत टेकीत लवकरच अक्कलकोटास आले त्यावेळीं समर्थांची स्वारी पेठेंतील मठांत येऊन पलंगावर पहुडली होती. हजारों लोक दर्शनासाठीं जमले होते. फुलें, उदबत्त्या, अत्तरें यांचा प्रसन्न सुगंध सर्वत्र दरवळत होता. वामनबुवांना पाहतांच समर्थ चटकन् म्हणाले, ‘ का हो बुवा, कुव्यांत जीव देत होतां ते तुम्हीच काय ? तुमचा सुखसागर कोरडा होता ना ?’ असें म्हणून ते पोट धरून हंसूं लागले. त्यावेळीं त्यांच्या कानांचीं पाळीं जोरजोरानें मागेंपुढें हालत होतीं.

वामनबुवांना गहिंवरून आलें. त्यांनीं हातांतली काठी बाजूला टाकली व समर्थांचे चरण हृदयाशीं घट्ट कवटाळून धरले !

श्रीवामनबुवा हे समर्थांचे अत्यंत एकनिष्ठ भक्त होते. त्यांचें धगधगीत वैराग्य, आश्रमोक्त स्वधर्माचें आचरण करण्याची तीव्र आवड, अलोट स्वामीप्रेम व गंगोदकाप्रमाणें अत्यंत शुद्ध व पवित्र आचरण इत्यादी गुण स्वामीभक्तांनीं आत्मसात करण्यासारखे आहेत. त्यांचें हस्ताक्षर दृष्ट लागण्याइतकें सुबक आणि सुंदर होतें. ‘ गुरुलीलामृत ’ हा त्यांनीं लिहिलेला ओवीबद्ध ग्रंथ समर्थांचे उपासक आजहि अत्यंत प्रेमानें वाचतांना आढळून येतात. त्या ग्रंथानें वामनबुवांची कीर्ति अजरामर झाली आहे.

शके १८२३ मध्यें वामनबुवांनीं आपला निर्याणसमय जवळ आल्याचें ओळखून विधिपूर्वक संन्यास—दीक्षा घेतली. आपल्या

शिष्यवृंदांकरवीं 'गुरुलीलामृत' या ग्रंथाची मुद्रण व्यवस्था करविली व स्वामीसमर्थांचें स्मरण करीत करीत नश्वर देहाचा त्याग केला. चैत्र शुक्ल पंचमी शके १८२३ या दिवशीं ही दुःखद घटना घडली !

## श्रीकृष्णसरस्वती ऊर्फ कुंभारस्वामी

कोल्हापूरचे श्रीकृष्णसरस्वती हे एक 'जीवन्मुक्त महापुरुष' होते. '**देहीं असून विदेहीं**' अशी त्यांची अवस्था होती. ते कोल्हापूरच्या कुंभार गल्लींत रहात असल्यामुळें '**कुंभारस्वामी**' या नांवानेंहि ओळखले जात. 'श्रीकृष्ण–विजय' या श्री ग. ना. मुजुमदार, कोल्हापूर यांनीं लिहिलेल्या ओवीबद्ध चरित्रांत श्रीकृष्णसरस्वतीसंबंधीं पुढील माहिती मिळते :–

कोल्हापूरच्या पूर्वेस दोन योजनें अंतरावर 'नांदणी' नांवाचें एक लहानसें गांव असून तेथें अप्पाभट जोशी या नांवाचे एक भारद्वाज गोत्री ब्राह्मण रहात असत. ते व त्यांच्या पत्नी अन्नपूर्णाबाई या दोघांचीहि परमेश्वरावर नितांत श्रद्धा असून त्यांची दत्तात्रेयाची सेवा अतिशय कडक होती. अप्पाभट हे ग्रामजोशी होते व त्यापासून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नावर त्यांनीं आपला संसार सुखासमाधानानें चालविला होता !

परंतु या त्यांच्या आनंदांत एकच उणीव होती व ती म्हणजे घरांत दुडुदुडु धांवणारा कृष्णकन्हैय्यासारखा गोजिरवाणा पुत्र त्यांना नव्हता ! आणि अन्नपूर्णाबाईंना हें दुःख विशेषच जाणवत होतें. त्यामुळें त्या अप्पाभटांच्या मागें नेहमीं लकडा लावीत कीं, तुम्ही परमेश्वराजवळ तरी याबाबत गाऱ्हाणें मांडा ! परंतु अप्पाभट हे, 'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें. या विचारसरणीचे असल्यामुळें अन्नपूर्णाबाईंनीं नेहमीं हट्ट धरावा आणि अप्पाभटांनीं नुसतें

हंसण्यावारीं न्यावें असा प्रकार होत असे. शेवटीं आपल्या पत्नीचा फारच आग्रह पाहून अप्पाभटांनीं दत्तात्रेयाजवळ पुत्राची मागणी केली.

त्याच रात्रीं प्रभु दत्तात्रेयांनीं अप्पाभटांना स्वप्नांत दर्शन देऊन सांगितलें कीं, 'आपण लवकरच तुझ्या घरीं तुझ्या पत्नीचे पोटीं जन्म घेत आहों.'

त्याप्रमाणें अन्नपूर्णाबाईंना दिवस गेले व माघ कृष्ण पंचमी, शके १७५७ या शुभदिनीं त्यांच्या उदरीं एका सुलक्षणी पुत्रानें जन्म घेतला हेच श्रीकृष्णसरस्वती.

त्यांची जन्मपत्रिका पाहून ते जीवन्मुक्त महापुरुष असल्याचें ज्योतिषांनीं अप्पाभटांना सांगितलें ★ व त्याबद्दलचीं लक्षणें श्रीकृष्णसरस्वती बालपणापासूनच दाखवूं लागले होते. पूर्ववयांतच त्यांना सद्‌गुरूचा ध्यास लागला व ते अक्कलकोटास श्रीसमर्थांकडे येऊन ठेपले. समर्थांनीं प्रथमदर्शनींच त्यांची महान् योग्यता ओळखली. त्यावेळीं समर्थांच्या सोबत इतर अनेक सेवेकरी व भक्त मंडळी होती. त्यांना टाळण्यासाठीं समर्थांनीं श्रीकृष्णसरस्वतींचा सव्य कर पकडला व त्यांना घेऊन ते नेहमींप्रमाणें झपाझप पावलें टाकीत एका घनदाट अरण्यांत गेले. त्या हिरव्यागार पर्णराजींनीं सुशोभित अशा रम्य वनांत गेल्यांवर श्रीसमर्थांची स्वारी एका शिळेवर बसली. त्यावेळीं श्रीकृष्णसरस्वती दोन्ही हात जोडून समर्थांपुढें नम्रपणें बसले व त्यांनीं स्वामीरायांच्या स्तुतिपर स्तोत्रें म्हणावयास सुरुवात केली. त्यावेळीं स्वामीमाऊलींनीं हंसून म्हटलें, '**अरे, तूं माझाच अंश आहेस. जगाचा उद्धार व्हावा यासाठींच तुझा अवतार आहे.**'

★ श्रीकृष्णसरस्वती यांची जन्मपत्रिका पुढीलप्रमाणें आहे– लग्न मकर, लग्नीं रवि–मंगळ, कुंभेंत बुध–शुक्र, वृषभेंत राहू, मिथुनेचा गुरु, कन्येचा चंद्र, तुळेंत शनि, वृश्चिकेंत केतु.

एवढें सांगून श्रीसमर्थांनीं आपला दिव्य कृपाहस्त त्यांच्या मस्तकावर ठेवला. त्याबरोबर श्रीकृष्णसरस्वतींना समाधि लागली व ते निजानंदांत मग्न झाले. पुढें सात दिवसपर्यंत समाधिसुखांतच डुंबत होते. नंतर श्रीसमर्थांनीं त्यांच्या पाठीवर हात फिरवून त्यांना सावध केलें व उपदेश करून कोल्हापुरास जाऊन 'बालोन्मत्त-पिशाच्चवत्' वृत्तीनें राहण्याची आज्ञा केली आणि त्यांना घेऊन ते गांवांत आले.

त्यावेळीं कांहीं भक्तांनीं श्रीसमर्थांच्या भोजनासाठीं दूध-भात आणला होता. तें पाहून श्रीसमर्थ यावनी भाषेंत म्हणाले, '**दूध-भात कायकू होना, आज चुरमालड्डू लावो.**' त्याप्रमाणें भक्तांनीं त्वरित जाऊन उत्तम लाडू आणून स्वामीरायांपुढें ठेविले. समर्थांनीं तो प्रसाद श्रीकृष्णसरस्वतींना दिला.

त्यानंतर श्रीकृष्णसरस्वती कांहीं दिवस स्वामीरायाच्याच सेवेंत होते. त्या काळांत, 'अजून आमचा ब्राह्मण कां येत नाहीं' असे असंबद्ध उद्गार श्रीसमर्थांच्या मुखांतून नेहमीं बाहेर पडत. त्यांचा अर्थ कुणालाच लागत नसे. परंतु त्या उद्गारांचा उलगडा लवकरच झाला.

एक दिवस एक कुष्ठी ब्राह्मण श्रीसमर्थांचा शोध करीत अक्कलकोटास आला. त्यानें आपल्या व्याधींच्या निरसनार्थ गाणगापुरास राहून निर्गुण पादुकांची बरीच सेवा केली होती. पुढें त्यास श्री-दत्तात्रेयांचा असा दृष्टांत झाला कीं, 'आपण अक्कलकोटास प्रकट झालों असून तेथें गेल्यास तुझी मनोकामना पूर्ण होईल.' या दृष्टान्तानुसार तो ब्राह्मण अक्कलकोटास आला होता. त्यानें स्वामी-रायांच्या अजानुबाहु भव्य मूर्तीपुढें हात जोडून आपली कर्मकथा ऐकविली व आपणांस व्याधीमुक्त करण्याची प्रार्थना केली.

त्याची कर्मकथा ऐकून श्रीसमर्थ म्हणाले, 'श्रीकृष्णसरस्वती

बरोबर करवीरास जाऊन त्यांची सेवा कर. म्हणजे तुझें काम होईल.'

त्याप्रमाणें तो ब्राह्मण श्रीकृष्णसरस्वतींबरोबर कोल्हापुरास गेला व त्यांची मनोभावें सेवा करूं लागला. श्रीकृष्णसरस्वतींनीं त्याची अनेकप्रकारें परीक्षा घेतली व शेवटीं त्याची नितांत श्रद्धा व भक्ति पाहून त्यास व्याधीमुक्त केलें. श्रीकृष्णसरस्वतींनीं अशा प्रकारें अनेक सद्भक्तांना व्याधीमुक्त केलें आहे. कित्येकांची पिशाच्चबाधा दूर केली आहे. अनंत चमत्कारांच्या द्वारें अश्रद्धांच्या मनांत परमेश्वराविषयीं अपार श्रद्धा निर्माण करून त्यांना भक्तिमार्गाची, योगाची शिकवण दिली आहे. त्यांचें जीवनचरित्र अनंत लीलांनीं नटलेलें असून त्यावरून ते 'प्रति समर्थ' या दर्जाला जाऊन पोहोंचलेले होते ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. याबाबत पुढील एक हकीकत वाचकांनीं मनन करण्यासारखी आहे.

एकदां एका ब्राह्मणानें, 'आपणांस पुत्रलाभ झाल्यास आपण श्रीसमर्थांपुढें पेढ्यांचा प्रसाद ठेवूं' असा अक्कलकोटास जाऊन नवस केला. त्याप्रमाणें त्याला यथाकाल पुत्रलाभ झाला. परंतु नवस फेडण्यासाठीं अक्कलकोटास जाणें कांहीं कारणानें लांबणीवर पडलें व दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, तेवढ्या काळांत श्रीसमर्थ समाधिस्थ झाले. त्यामुळें ब्राह्मणास नवसाविषयीं एकच हुरहूर लागून राहिली. समर्थांच्या समाधीपुढें पेढ्यांचा प्रसाद ठेवणें त्यास पटेना. त्याची इच्छा स्वतःच्या हातानें श्रींच्या मुखांत पेढा घालण्याची होती. परंतु हें जमावें कसें ?

तो ब्राह्मण याच चिंतेंत असतां एक दिवस रात्रीं श्रीसमर्थांनीं त्यास स्वप्नांत येऊन सांगितलें की, 'आम्ही हनुमान रूपानें कोल्हापुरास असून तेथें श्रीकृष्णसरस्वतीं या नांवानें कुंभारगल्लींत वास करून आहों. तेथें जाऊन नवस फेडावा.'

त्याप्रमाणें तो ब्राह्मण मोठ्या आनंदानें कोल्हापुरास येऊन श्रीकृष्णसरस्वतींना भेटला व त्यानें आपला नवस फेडला. परंतु समर्थांनीं आपण 'हनुमानरूपानें आहोंत' असें जें स्वप्नांत सांगितलें होतें, तें कसें काय याचा उलगडा त्यास होईना. परंतु त्याच्या मनांतील ही शंका ओळखून श्रीकृष्णसरस्वतींनीं लगेच आपली पाठ फिरविली व हनुमंताची खूण म्हणून आपली लहानशी शेपटी त्यास दाखविली ! तो चमत्कार पाहून ब्राह्मण चकित झाला व स्वामीसमर्थ आणि श्रीकृष्णसरस्वती हे एकरूपच आहेत याबद्दल त्याची खात्री झाली व तो त्यांचा भक्त बनला.

श्रीकृष्णसरस्वतींनीं श्रीसमर्थांच्या महानिर्याणानंतर जवळ जवळ बावीस वर्षें अनंतलीला केल्या. त्यांच्या दर्शनासाठीं रोज शेंकडों लोक येत. त्यांची मूर्ति लहान व चेहऱ्यावरील भाव वेड-सर माणसाप्रमाणें दिसत. परंतु ते महान् अवतारी सत्पुरुष होते यांत शंका नाहीं. श्रावण वद्य १० शके १८२२ हा त्यांचा निर्याण-दिन असून त्या दिवशीं त्यांचा मोठा उत्सव कोल्हापूर येथें साजरा होतो

श्रीकृष्णसरस्वती हे मुक्त पुरुष होते हें वर सांगितलेंच. अशा मुक्त पुरुषांचीं लक्षणें 'श्रीमद्भागवतां'त विस्तारानें वर्णिलेलीं आहेत. त्याचाहि येथें थोडक्यांत परामर्ष घेऊं.

'मी म्हणजे देह नव्हे तर मी म्हणजे तो अविनाशी आत्मा, अशी एकदां निःसंशय खात्री झाली म्हणजे देहांत असूनहि अलिप्त-पणा साधूं शकतो. असा मुक्तपुरुष प्रारब्ध भोगासाठीं संसारांत चार–चौघांप्रमाणें रहात असला तरी कर्तेपणाचा अभिमान त्याचे ठिकाणीं नसल्यामुळें त्याला संसाराचा यत्किंचितहि दोष लागत नाहीं. जगांतील सर्व घटनांकडे, तसेंच स्वतःच्या देहाकडेहि तो केवळ साक्षित्वानें पहातो. त्याच्या वासनांचा पूर्णपणें लय झालेला

असतो. त्याचप्रमाणें समाजांतील भेदाभेद, स्तुति-निंदा, मानापमान यांच्या पलीकडे जाऊन दृश्य जगाकडे तो परमात्मा म्हणूनच पहातो.

संत एकनाथ म्हणतात कीं, आत्मस्वरूपाला विसरून मीपणानें देहांत रहाणें यालाच 'बंधन' असें म्हणतात. आपली छाया विष्ठेवर पडली किंवा पालखींत बसली तरी त्याचें सुखदुःख आपल्याला होत नाहीं. तद्वतच देहाचें सुख-दुःख किंवा मानापमान मुक्त पुरुषाचा आनंद बिघडवूं शकत नाहीं. स्वतःच्या देहाकडे असा मुक्तपुरुष नेहमीं तिऱ्हाइताच्या दृष्टीनेंच पहात असतो. आकाश आणि सूर्य ज्याप्रमाणें सर्व पदार्थांशीं संबंध येऊनहि शेवटीं सर्वांपासून अलिप्तच रहातात, त्याचप्रमाणें जीवनमुक्त पुरुष संसारांत राहूनहि सर्व सांसारिक वस्तूंपासून पूर्णतः अलिप्त रहातो. श्रीएकनाथ थोडक्यांत सांगतात कीं, **ज्या पुरुषाला देहांत राहून यत्किंचितहि देहबुद्धि उरत नाहीं, तोच जीवनमुक्त होय.** असा जीवनमुक्त आपलें शरीर छायेप्रमाणें आपल्याबरोबर वागवितो. सारें विश्व परमात्मास्वरूप आहे असा प्रत्यक्ष अनुभव बाणल्यामुळें कोणी स्तुति किंवा भयंकर निंदा केली तरी त्या दोन्ही गोष्टींकडे तो कौतुकानेंच पहात असतो. त्याचप्रमाणें तो सदैव आत्मसाक्षात्कारांत विश्रांति घेत असतो.

मुक्त पुरुष आपल्या सर्व वासना भगवंताचे चरणीं लीन करून सदैव रहात असल्यामुळें त्याचें मन वृत्तिशून्य बनतें. तो बाह्यदर्शनीं कांहीं वेळां वेड्यासारखा वागतो तर कांहीं वेळां मूक बनतो. तर कांहीं वेळां एखादा 'बालोन्मत्तपिशाच्चवत' वृत्तीनें वागतांना दिसतो. त्याचें कोणतेंहि कर्म अहेतुक असतें. संकल्पविकल्प नाहींसे झाल्यानें त्याचे सर्व विचार आपोआप थांबतात. त्यामुळें तो सदा

मौनांत असतो. त्याच्या तोंडून कधींहि निंदा-स्तुति बाहेर पडत नाहीं. जिकडे तिकडे आत्मचैतन्यच भरून राहिल्याचा अनुभव त्यास मिळतो. मुक्त पुरुषाची एक महत्त्वाची खूण म्हणजे त्याच्या वागण्यांत कोणत्याहि गोष्टीचा आग्रह कधींहि दिसून येत नाहीं. तो सदैव अंतर्बाह्य आनंद सागरांत डुंबत असतो.

मुक्तांचीं हीं लक्षणें केवळ कल्पनेनें आकलन होणें अशक्य आहे. स्वतः त्या अवस्थेच्या जवळ गेल्याशिवाय त्या अवस्थेचें मर्म समजणार नाहीं ! संत-सत्पुरुषांचीं चरित्रें वाचतांना त्यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न आपणांस करावयाचा आहे, अशा भूमिकेंतूनच हें वाचन व्हावयास हवें.

## श्री. केळकरमहाराज

श्री. गोपाळबुवा रामचंद्र केळकर हेदेखील एक महान् स्वामीभक्त होऊन गेले. त्यांचा जन्म शके १७६९ मध्यें झाला. घरच्या गरिबीमुळें त्यांचें शिक्षण तीन इयत्तापर्यंतच होऊं शकलें. परंतु बेताचें शिक्षण असूनहि त्यांना रेल्वेंत स्टेशनमास्तरची नोकरी मिळाली व ते मुंबईस आले. पुढें नोकरीनिमित्त त्यांना वऱ्हाड प्रांतांतहि जावें लागलें.

त्यानंतर त्यांच्या पोटांत कांहीं रोग झाला व अनेक औषधोपचार करूनहि जेव्हां तो हटेना तेव्हां त्यांनीं मनाशीं असें ठरविलें कीं, जो कोणी या जगताचा ईश्वर असेल त्यानें हा रोग जर आठ दिवसांचे आंत बरा केला तर त्या एका भगवंतावांचून आयुष्यांत पुन्हां कोणाचीच चाकरी करावयाची नाहीं ! आणि आश्चर्य असें कीं, खरोखरच आठ दिवसांचे आंत त्यांचा रोग साफ नाहींसा झाला ! त्यामुळें, यापुढें सत्पुरुषसेवेंतच उर्वरित आयुष्य सार्थकीं लावावें असें ठरवूत घरांत कुणालाहि न सांगतां ते अक्कलकोटास

श्रीसमर्थांच्या दर्शनास आले. ( शके १७९४ ) त्याठिकाणीं ते जवळजवळ दीडदोन वर्षें समर्थसेवेंत होते. त्या काळांत समर्थांचा त्यांचेवर अनुग्रह झाला. त्यानंतर ते मुंबईस स्वामीसुतांच्या सहवासांतहि सुमारें चार महिने होते.

स्वामीसुतांचे शिष्य श्रीब्रह्मचारीबुवा शके १७९५ मध्यें श्रीसमर्थांच्या संगमरवरी पादुका घेऊन चिपळुणास गेले व त्यांनीं हल्लींच्या मठाजवळच एका लहानशा झोपडींत त्या पादुका ठेवल्या व ‘ आमचा मनुष्य येईपर्यंत यांची पूजा करा ’ असें तेथील एका शाळामास्तरांना सांगून ब्रह्मचारीबुवा मुंबईस परत आले. त्याप्रमाणें श्री. केळकरमहाराज येईपर्यंत त्या शिक्षकांनीं त्या पादुकांची प्रेमानें पूजा–अर्चा वगैरे सांभाळली.

त्यानंतर श्री. केळकरमहाराज स्वामीसुतांच्या आदेशानुसार चिपळुणास आले व त्यांनीं लहानसा मठ उभारून त्या पादुकांची तेथें स्थापना केली आणि उर्वरित आयुष्य स्वामीसेवेलाच वाहून टाकलें.

शके १८०० मध्यें श्रीसमर्थांचें निर्याण झाल्याची दुःखद वार्ता श्री. केळकरमहाराजांना मुंबईहून तारेनें समजली व सद्‌गुरूंच्या विरहामुळें अत्यंत कष्टी होऊन त्यांनीं प्रायोपवेशन सुरूं केलें. परंतु तिसऱ्याच दिवशीं श्रीसमर्थांनीं आपल्या या प्रिय शिष्याला साक्षात् दर्शन देऊन आपण गेलों नाहीं ही गोष्ट पटवून दिली व त्यांचें सांत्वन केलें.

श्रीसमर्थांनीं दिलेल्या चांदीच्या लहान पादुका व दण्ड, या वस्तु आजहि चिपळूण मठांत पहावयास सांपडतात. ‘ तूं दर गुरुवारीं भिक्षा माग म्हणजे तुला कांहींहि कमी पडणार नाहीं ’ असें श्रीसमर्थांनीं गोपाळबुवांना सांगितलें होतें. त्याप्रमाणें ते दर गुरुवारीं न चुकतां चिपळुणांत हिंडून भिक्षा मागत. श्रीसमर्थांनीं

त्यांना एक झोळीहि दिली होती. ही भिक्षेची प्रथा श्री. केळकर महाराजांचे नातू श्री. कृष्णाजीबुवा यांनीं आजहि निष्ठेनें चालू ठेविली आहे.

श्रीसमर्थांनीं श्री केळकरमहाराजांना श्रीप्रीतिनंद स्वामीकुमार असें नांव ठेविलें होतें. फाल्गुन शुद्ध एकादशी शके १८४१ या दिवशीं श्री. केळकरमहाराजांनीं देह ठेवला. त्यांच्या अस्थी शुद्ध करून त्यावर मठाचेच आवारांत एक लहानशी समाधि बांधलेली आहे.

श्री. केळकरमहाराजांनीं श्रीस्वामीसमर्थांच्या सेवेंत असतांना पाहिलेल्या समर्थांच्या अद्भुत लीला लिहून ठेविल्या असून त्यांची हकीकत पुढील प्रकरणांत येणारच आहे.

स्वामी श्रीसत्यदेवानंद सरस्वती लिहितात-

'श्रीसमर्थांच्या विभूतिमत्वाचा' परिमल त्या काळांत इतका सर्वदूर पसरला होता कीं, श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज किंवा माहूरचे श्रीविष्णुदास यासारखे अन्य सद्गुरुकृपांकित संतरूपी भृंगहि श्रीसमर्थ चरणकमळीं येऊन श्रींचें आशीर्वादरूपी मधुपान करून गेले होते. शेगांवचे सत्पुरुष श्रीगजाननमहाराज व शिर्डीचे साईबाबा यांनींहि बालवयांत स्वामीसमर्थांचा अनुग्रह घेतला होता असें म्हणतात. श्रीरामकृष्ण परमहंस यांच्यावरदेखील कलकत्त्याच्या मुक्कामांत श्रीसमर्थांची कृपा झाली होती असें ऐकिवांत आहे !'

## सत्पुरुष लक्षणें

श्रीसमर्थांच्या या महान् शिष्यांचा परिचय करून घेतल्या-नंतर अशा या महान् सत्पुरुषांच्या अंगीं कोणते गुण प्रकर्षानें दिसून येतात याचा विचारहि येथें करणें योग्य होईल. श्रीसमर्थांची कृपा होण्यासाठीं हे गुण जास्तींत जास्त आपल्या अंगीं बाणविण्याचा

प्रत्येकानें नेटाचा प्रयत्न करावयास हवा. त्याचप्रमाणें तसें केल्यास आजच्या समाजाची विस्कटलेली घडी, तरुणांच्या मनांतील वैफल्याची भावना, सर्वत्र माजून राहिलेली अशांति, द्वेष, मत्सर इत्यादि समाजधारणेला मारक गोष्टी नष्ट होऊन जीवन सुखसमृद्धीनें उजळून जाऊन एक आदर्श समाज निर्माण होईल ! शेवटीं मनःशांति ही महत्त्वाची असून ती परमार्थमार्गानेंच प्राप्त होणारी आहे. त्याचप्रमाणें साधू–संतांच्या उपदेशामुळें समाज निष्क्रिय बनतो ही समजूत चुकीची आहे. उदा०– दुसऱ्यावर दया करा असें संत नेहमीं सांगतात. याचा अर्थ दुष्टांवरहि दया करा असा नाहीं. श्री तुकाराममहाराज दयेची व्याख्या करतांना म्हणतात– '**दया तिचें नांव भूतांचें पाळण**'– परंतु तेच तुकारामबुवा लगेच पुढें सांगतात– '**आणिक निर्दळण कंटकाचें**–'

संत सत्पुरुषांचे सर्वच गुण सर्वसामान्य मनुष्याला अंगीं बाणविणें कदाचित् जमणार नाहीं. परंतु त्यांची सदैव स्मृति ठेवणें व तसें वागण्याचा जास्तींत जास्त प्रयत्न करणें कुणालाच अवघड नाहीं !

सत्पुरुषांच्या अंगीं कोणते गुण प्रामुख्यानें दिसून येतात याची माहिती नाथांच्या 'भागवतांत' वाचावयास मिळते. श्री. के. वि. बेलसरे यांनीं 'भावार्थ भागवत' या आपल्या सुंदर लेखमालेंत दिलेलीं सत्पुरुष लक्षणें येथें किंचित् संक्षेपानें देतों–

१) कृपालुता–ज्यामुळें आपल्याला दुःख होतें तें दुसऱ्याला कधीं न करणें आणि ज्यामुळें आपल्याला सुख होतें तेंच सगळ्यांना करणें हीच कृपालुता होय. कृपाळू मनुष्य अत्यंत दयाळ असतो, सर्वांचा जीव आपल्या जिवांत घालतो, सर्वांवर सारखी कृपा करतो आणि त्यांचें दुःख हरण करून त्यांना सुख देतो.

२) अद्रोहता–सर्वांच्या ठिकाणीं भगवंत भरलेला पाहिल्यानें

कोणाचाहि द्वेष मनांत न धरणें ही अद्रोहता होय. देहावर कांहीं आपत्ति आली तर प्रारब्धाचा क्षय होत आहे असें मानून संकट आणणाऱ्यावर न रागावतां शांत रहाणें याला अद्रोहता म्हणतात.

३) **तितिक्षा** :– तितिक्षा म्हणजे शांति. शांति हें संतांचें वैभव होय. शांति म्हणजे अनिवार सहनशीलता. लोकांनीं त्रास दिला तरी कोणालाहि वाईट न म्हणतां आपली शांति टिकविणें ही तितिक्षा समजावी.

४) **सत्य** :– व्यवहारी जगांत सत्य अल्पायुषी असतें. जन्मल्याबरोबर त्याचा मृत्यु व्हायचा. तें कोठेंच वाढीला लागत नाहीं. परंतु आत्मानुभवामध्यें संतांची व सत्याची गांठ पडून संतांनीं त्याचा अंगीकार केला. सत्य म्हणजे संतांचें राहतें घर होय. सत्य म्हणजे शुद्ध परमात्मस्वरूप होय.

५) **अनवद्य** :– निंदा, मत्सर इत्यादि सारे दोष आत्मज्ञानानें धुऊन टाकून जो गुरुचरणीं लीन होतो व गुर्वाज्ञारूपतीर्थांत स्नान केल्यानें ज्याचें चित्त अत्यंत पवित्र होतें त्याला अनवद्य असें म्हणतात.

६) **समसर्वां समभावें** :– मीच आत्मरूपानें सर्वदेशीं पसरलों आहें अशी अनुभूति येऊन सर्व प्राणिमात्रांना जो सारखेपणानें पाहतो त्याचा हा गुण होय.

७) **परोपकार** :– आपपरभाव न ठेवतां सर्वांवर उपकार करणें एवढेंच जो जाणतो तो संत समजावा.

८) **अकामता** :– कामवासनेसकट सर्व विषयवासना विसरतो तो संत असतो. आत्मानंदानें तृप्त झाल्यामुळें आणखी कांहीं मिळवायचें ज्याला उरत नाहीं आणि म्हणूनच प्राप्त परिस्थितीमध्यें जो अत्यंत समाधानांत राहतो तो संत असतो.

९) **दांतता** :– बाह्येंद्रियांचें नियमन करून जो आपलें चित्त

भगवंतानें मारून टाकतो, त्याच्या अंगीं दांतता येते. दांत पुरुषाचें मन निःसंशय व निष्काम असतें.

१०) **अतिमृदुता :–** संत सर्वांना अतिमृदु व गोड वाटतो. पिंजलेल्या कापसाच्या गोळ्याप्रमाणें त्याचें अंतःरंग सर्वांनाच अत्यंत कोमल वाटतें.

११) **वृत्तिशून्यता :–** हें फार पवित्र व थोर लक्षण आहे. ज्यांच्या अंतःकरणांत जीवाची ब्रह्माशीं मगरमिठी पडते त्याचें सर्व कर्म ब्रह्मस्वरूप असतें. तो कर्म करतो असें लोक म्हणतात, पण खरोखर तो ब्रह्मस्वरूपांतच वागत असतो. हा अनुभव ज्याचा त्यालाच येतो, लोकांना तो कळत नाहीं. मडकें तयार झाल्यावर कुंभार तें चाकावरून उतरवितो तरी चाक थोडा वेळ फिरत राहतें. त्याचप्रमाणें पूर्वसंस्कारबलानें संत कर्में करतांना दिसतो. तरीपण त्याच्या अंगीं यत्किंचित् कर्तेपण उरत नाहीं. परस्त्री आणि परधन यांनीं त्याचें मन कधींहि विटाळत नाहीं. म्हणून तें अत्यंत पवित्र असतें. व्रत, तप, ज्ञान, तीर्थ इत्यादींना त्याच्यामुळें पवित्रता येते !

१२) **अकिंचन :–** सच्चिदानंदांत मन मग्न झाल्यानें सर्व विश्व ज्याला चैतन्यस्वरूपच दिसतें त्याला परिग्रहाचें भान उरत नाहीं. याचें नांव अकिंचन होय. अकिंचन साधु दृश्यवस्तूंच्या पसाऱ्यांत राहतो खरा, परंतु जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्थांमध्यें अमुक एक वस्तु मला हवी असा संकल्प त्याच्या मनांत येत नाहीं. देहगेहाची अनासक्ति म्हणजे अकिंचनता.

१३) **अनीहा :–** अनीहा म्हणजे निर्वासनता किंवा निष्कामता किंवा निरिच्छा होय. अनीहा संतांची गृहिणी समजावी. अहं आणि ममता इच्छेच्या मैत्रिणी असून जीवाला बंधन करतात. अनीहेनें असंगपणाचें शस्त्र घेऊन त्यांना मारून टाकलें तेव्हां कामक्रोधादि सर्व विकार आपोआप मरून गेले. अंतःकरणांतील वासना

विराम पावली कीं कर्म आपोआप गळतें आणि देव त्याला वश होतो. अनीहा हा संतांचा गौरव आहे.

१४) **मितभोजन** :– अन्नाशिवाय प्राण रहात नाहीं हें खरें, परंतु भूक लागली असतां यदृच्छेनें जें भोजन समोर येईल तें भगवंताच्या स्मरणानें पवित्र करून आवडीनें सेवन करणें हें मित-भोजन होय. भगवंताशीं समरस झालेला संत साक्षित्वानें साऱ्या रसांचें सेवन करतो म्हणून सारें जेवूनहि तो न जेवलेला असतो.

१५) **शांत** :– दृश्यामध्यें खळबळ उडून अनेक ऊर्मि उठ-ण्याचा प्रसंग आला तरी ज्याचे मनांत चलबिचल होत नाहीं, त्याला खरी शांति साधली असें समजावें.

१६) **स्थिरता** :– आत्मस्वरूपीं मन स्थिरावल्यानें आपल्याला जन्ममरण दोन्ही नाहींत अशी निश्चल स्थिति असणें याचें नांव स्थिरता होय.

१७) **शरणागति** :– नदी समुद्राला मिळाली म्हणजे त्याच्याशीं सर्वस्वीं एकरूप होऊन जाते, त्याचप्रमाणें ज्याची वृत्ति भगवंताला शरण जाऊन भगवत्स्वरूप होते, त्याला शरणागति साधली असें समजावें.

१८) **मनन** :– चिंतन करणें मनाचा धर्म आहे. त्याचा उप-योग करून अहोरात्र जो आत्मचिंतन करतो आणि तें करतां करतां आत्मस्वरूप होऊन जातो तो मननशील मुनि समजावा.

१९) **अप्रमत** :– मन अत्यंत चंचल आहे, त्यामध्यें क्षणोक्षणीं अनंत वृत्ति उत्पन्न होतात. या वृत्ति आपल्याला केव्हां फसवतील याचा नेम नाहीं. अशा मनाला साधु दमन करून ताब्यांत ठेवतात. कृष्णसर्पाचें तोंड हातांत धरलें आणि हात जरा ढिला झाला तर तो तत्काळ दंश करतो. तो मरेपर्यंत त्याचें तोंड आवळलें पाहिजे,

अगदीं तसेंच साधु मनाला वागवतात. अखड सावधानता ठेवून मनाला ताब्यांत ठेवणें हा साधूंचा मोठा गुण आहे.

२०) **गंभीरता** :– प्रपंचांत सुखदुःखांच्या प्रचंड घडामोडी झाल्या किंवा अंतःकरणांत विकारांच्या कितीहि उसळ्या आल्या तरी ज्याचा मनोधर्म डगमगत नाहीं तो खरा गंभीर होय. साधु समुद्राप्रमाणें गंभीर असतो.

२१) **धैर्य** :– मन, बुद्धि, इंद्रियें व प्राण यांना आंवरून जो नित्य आत्मसन्मुख ठेवतो, त्यांना तेथून देहाकडे येऊं देत नाहीं तो खरा धैर्यवान होय. प्रपंचामध्यें मोठी गडबड उडून काळाचा जबरदस्त तडाखा बसला तरी ज्याची वृत्ति स्वरूपापासून यत्किंचित् विचलित होत नाहीं, त्याला धैर्यवान म्हणावें.

२२) **जितषड्गुण** :– देहबुद्धि जाळून आत्मानंदांत राहिल्यानें अशाश्वताचे सहा विकार ज्याला बाधत नाहींत तो जितषड्गुण होय. स्वानंदानें तृप्त झाल्यानें भूक लागत नाहीं, खऱ्या जीवनानें संतोष पावल्यामुळें तहान लागत नाहीं, आत्मसुखामुळें शोक आणि दुःख विरून जातात, स्वरूपाच्या साक्षात्कारानें संशयरहित होऊन मोह नाहींसा होतो. तिन्ही अवस्थांच्या बाहेर राहिल्यानें वृद्धपणाची आठवण रहात नाहीं आणि देहाचें भान गेल्यानें मरणाचें स्मरण उरत नाहीं.

२३) **अमानिता**–परमात्मा सर्व प्राणिमात्रांत दिसल्यानें मानाभिमान सोडून अतिशय नम्रवृत्तीनें वागणें म्हणजे अमानिता होय.

२४) **मानद**–मानद म्हणजे मान देणारा. सर्व चराचरांमध्यें आपल्या स्वामीला पाहिल्यानें साधुपुरुष सर्वांपुढेंच आनंदानें लोटांगण घालतो. देव, मनुष्य किंवा गाढव हा भेद त्याच्या मनांत येत नाहीं.

२५) **परबोधकता**-परबोधकता म्हणजे दुसऱ्याला उपदेश करण्याचें सामर्थ्य. सर्वच ज्ञानी पुरुष जगाला उपदेश करूं शकतात असें नाहीं. कोणी ज्ञान प्राप्त झाल्यावर वेडा बनतो, कोणी आश्चर्यानें तटस्थ होऊन राहतो, कोणी लांकडासारखा पडून राहतो, कोणी संपूर्ण मौन धरतो, तर कोणी उपदेश करतांना फार कठीण करून सांगतो ! म्हणून जो स्वतः ब्रह्मानंदांत निरंतर डोलत असून शब्दज्ञानांत पारंगत असतो आणि शिष्याला ज्ञान सांगण्याला समर्थ असतो तो अवतारी संत होय. ज्याच्या अंतःकरणांत भगवंताचें प्रेम आहे त्याला उपदेश करणें सोपें असतें. पण ज्यांच्यामध्यें तें नसतें त्यांच्यामध्यें तें उपदेशानें उत्पन्न करण्याचें सामर्थ्य अवतारी संतांजवळ असतें.

२६) **मैत्री**-दूध आणि पाणी जसें एकरूप होऊन जातें, त्याचप्रमाणें साधु सर्वांशीं अत्यंत आपलेपणानें वागून त्यांचें दुःख निवारण करतो. सर्व जगाकडे आप्तभावनेनें पाहिल्यामुळें तो सगळ्यांचा जुना मित्र म्हणून फार सौजन्यानें वागतो.

२७) **कारुण्य**-प्रत्युपकाराची अपेक्षा न ठेवतां आणि मी दयाळू आहें हा अभिमान न बाळगतां दीनांचें दुःख निवारण करणें हें पूर्णदयेचें लक्षण होय.

२८) **भगवंताची भक्ति**-मायारूपी कठीण नदी कर्ममार्गाच्या सहाय्यानें तरून जाण्याचा प्रयत्न करणारे मध्येंच गटांगळ्या खातात. परतीराला पोंचणारे कोणीच दिसत नाहींत. परंतु हे सर्व उपाय बाजूस ठेवून भगवंताला प्रेमानें अनन्य भावें शरण जाणारे लोक कर्मरूपी नदी सहज तरून जातात. प्रेमानें स्मरणांत रंगून

गेल्यामुळें कर्माची आठवण राहिली नाहीं तर त्याचा दोष नाहीं. मी देहच आहें ही कल्पना असणें हें अविद्येचें लक्षण आहे. चित्त स्मरणानें रंगून देहभान नाहींसें झालें कीं अविद्या आपोआप लयास जाते...जपाशिवाय नाम, धारणेशिवाय ध्यान, संकल्पाशिवाय कर्म, प्राणायामाशिवाय वृत्तिनिरोध आणि विषयाशिवाय स्वानंद या शुद्ध भक्ताच्या खुणा आहेत.'

---

प्रकरण दहावें

# श्रीस्वामीसमर्थांच्या लीला व चमत्कार

(पुढें चालू)

## राधा वेश्येचे स्तन सपाट झाले !

अक्कलकोटास राधा नांवाची एक रूपगर्विता होती. ही वेश्याव्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करीत असे. राधेच्या रूपानें साक्षात् लावण्यच जणू साकार झालें होतें. संस्कृत कवींनीं वर्णिलेलें सौंदर्याचे सारे निकष तिच्या ठायीं एकवटले होते !

अशा ह्या राधेच्या कानांवर समर्थांची कीर्ति गेली नि त्या दिव्य विभूतीचें दर्शन घेण्यासाठीं ती एक दिवस समर्थांकडे गेली. (कांहींच्या मतें समर्थांचें सत्त्व पाहण्यासाठीं कोणी एका चिकित्सक गृहस्थांनींच तिला त्यांचेकडे पाठविली. अरेरे ! केवढें हें पाप ! ) असो.

त्यावेळीं समर्थांजवळ अनेक भक्त, सेवेकरी व ब्रह्मनिष्ठ वामनबुवाहि होते. समर्थांचें दर्शन घेऊन ती त्यांचे चरणांजवळ बसली असतां समर्थांचें दिव्य स्वरूप पाहून तिच्या मनांत विचार आला, ' ह्या दिव्य शरीरास कधीं स्त्री संग घडला असेल का ?'

तिच्या मनांत हे कुविचार चालू असतांनाच श्रीसमर्थांनीं तिला विचारलें, ' का ग, स्त्री-पुरुषांत भेद काय ? तुला पुरुषापेक्षां अधिक काय आहे ?'

त्यावर थोडा विचार करून किंचित् लडिवाळपणें ती म्हणाली, ' महाराज, आम्हां स्त्रियांना पुष्ट स्तन असतात, तसे

पुरुषांना नसतात.' एवढें वाक्य धिटाईनें म्हणून तिनें किंचित् उसासा टाकला.

तिच्या या उत्तरावर श्रीसमर्थ हंसून म्हणाले, 'अग, हे तुझे स्तन या ब्राह्मणास देऊन जा. येथें आमचेजवळ काय पहातेस ?'

या शब्दांनीं ती किंचित् वरमली व स्वामीमहाराजांना नमन करून चालती झाली.

पुढें चमत्कार असा कीं, 'तिच्या जारकर्मांतील जणूं दलाल' असे तिचे पुष्ट, उभार स्तन व कोणताहि आजार न होतां हळूंहळूं जिरत जाऊन साफ नाहीसें झाले व तिची छाती पुरुषाप्रमाणें सपाट दिसूं लागली.

परंतु **या शारीरिक फरकापेक्षांहि तिच्या अंतरंगांतील फरकच जास्त विस्मयकारक ठरला !** तिला आपल्या कसबिणीच्या धंद्याचा उबग आला व ती श्री क्षेत्र काशी येथें जाऊन श्रीचरणांचें ध्यान करीत आनंदानें कालक्रमणा करूं लागली.

या प्रसंगाच्या अनुरोधानें श्री. श्रीपादशास्त्री किंजवडेकर लिहितात–'आतांपर्यंत विद्याश्री, राजश्री, आणि सौंदर्यश्री या तिघांनीं समर्थांच्या सामर्थ्याचा कानोसा घेण्याचा प्रयत्न केला. विष्णुबुवांचें रूप घेऊन विद्यादेवी आली, पदास्त झाली ! मालोजीराजांचें रूप घेऊन राज्यश्री आली, हतबल झाली ! राधेचें रूप घेऊन सौंदर्यलहरी आली, समर्थांच्या सौंदर्यसागरांत विलीन होऊन गेली !!'

राधेचें जारकर्म पाहून तुकोबांप्रमाणेंच 'न साहावें मज तुझें हें पतन' असा विचार श्रीसमर्थांच्या मनांत निर्माण झाला. परंतु केवळ उपदेशानें तिला या मार्गांतून परावृत्त करण्यापेक्षां श्रीसमर्थांनीं चमत्कारानें हें घडवून आणलें. असा शारीरिक आणि मानसिक बदल करण्याचें सामर्थ्य केवळ महान् अवतारी विभूतींतच

असूं शकतें ! हे दोन्ही उपाय योजून समर्थांनीं तिची वाहवत चाललेली जीवननौका सत्पथावर आणून मानवी जीवनांचें ध्येय जें भक्तिमार्गानें ईश्वरप्राप्ती त्याचें तिला स्मरण करून दिलें !

## समर्थांच्या नखांचे ताईत करणारा न्हावी

श्रीस्वामी समर्थांची स्वारी अक्कलकोटास असतांना एक न्हावी त्यांचा श्मश्रू करण्यासाठीं येत असे. हा न्हावी स्वामींचीं कापलेलीं नखें टाकून न देतां तीं जमवून ठेवून त्यांचे ताईत तयार करीत असे. हे ताईत भूतबाधा झालेल्या लोकांना फार गुणकारी ठरत. दृष्ट लागणें, आजार, असाध्य रोग यांवरहि त्यांचा रामबाण उपयोग होई !

परंतु ह्या ताईतांना जसजशी मागणी वाढूं लागली तसतशी न्हाव्याच्या मनांत लोभ वासना निर्माण होऊन त्यानें ते ताईत चक्क विकावयास सुरुवात केली. परंतु त्यानंतर मात्र त्या ताईतांचा गुण येईनासा झाला !

जोंवर केवळ भक्तिभावानें व श्रद्धेनें काम चाललें होतें तोंवर स्वामी महाराजांच्या साध्या नखांनींहि मोठमोठीं कामें झालीं, परंतु त्यामागची श्रद्धा कमी होऊन जेव्हां धंदेवाईक स्वरूप आले तेव्हां त्या नखांचा गुणहि नष्ट झाला !

श्रीस्वामी समर्थांचें अत्यद्भुत दिव्य शरीर इतर सामान्य जनांप्रमाणें प्रारब्ध भोगण्यासाठीं निर्माण झालेलें नव्हतें. त्यांच्या प्रत्येक अणुरेणूंतहि आर्त-पीडितांचीं दुःखें नष्ट करण्याचें महान् सामर्थ्य होतें. त्यांच्या चर्मपादुकांच्या खालील मातीनेंदेखील कित्येकांना गुण आला. 'पुष्पासंगे मातीस वास लागे' या उक्तीनुसार स्वामीसमर्थांच्या सान्निध्यांत ज्या ज्या वस्तू आल्या त्या विलक्षण दिव्यत्वानें उजळून निघाल्या. थोर अवतारी विभूतींचे श्रेष्ठत्व यांतच दडलेलें असतें. अमूक एकाला त्याच्या नखाचीहि सर नाही

असें आपण म्हणतो. स्वामी समर्थांच्या बाबतींत ही म्हण अक्षरशः खरी होती.

**श्रीसमर्थांना पंचपक्वान्नें व लाल मिरच्या सारख्याच !**

श्रीस्वामीसमर्थांपुढें रोज शेंकडों लोक नाना प्रकारचा नैवेद्य आणून ठेवीत. त्यामध्यें पेढे, बर्फी, श्रीखंड, इत्यादि पक्वान्नें तर पुष्कळच असत.

ही पंचपक्वान्नांची गर्दी पाहून एक दिवस एका चेष्टेखोर इसमास वाटलें, 'स्वामींची खाण्यापिण्याची चांगलीच चंगळ आहे.'

त्याच्या मनांतील हा मूर्खपणाचा विचार अंतर्ज्ञानी स्वामी महाराजांना समजावयास किती वेळ ! त्यांनीं ताबडतोब पेढे–बर्फीची ताटें बाजूस सारून लाल मिरच्या मागवल्या व त्या गृहस्थासमोर कचाकच खावयास सुरुवात केली. तें पाहून शंकेखोर मनांत वरमला व त्यानें महाराजांपुढें लोटांगण घातलें !

श्रीसमर्थांना लोह आणि सुवर्ण, मंगल आणि अमंगल, सोंवळें आणि ओंवळें, ब्राह्मण आणि अंत्यज सर्व कांहीं सारखेंच होतें. त्यांचेपुढें लक्षावधि रुपये येऊन पडत, परंतु त्यांच्या दृष्टीनें त्यांना राखेपेक्षां जास्त महत्त्व नव्हतें. मग पेढे–बर्फी या क्षुल्लक वस्तूंची काय मातब्बरी !

तुकोबांच्या भाषेंत सांगावयाचें तर–

'मुंगि आणि राव। आम्हां सारखाची जीव ॥
गेला मोह आणि आशा। कळिकाळाचा हा फांसा ॥
सोनें आणि माती। आम्हां समान हें चित्तीं ॥
तुका म्हणे आलें। घरां वैकुंठ सावळें ॥

## गोसाव्यास दत्तरूपानें दर्शन

श्रीस्वामीसमर्थांच्या अलौकिक चरित्राचा बारकाईनें विचार केला तर असें दिसून येतें कीं, आर्त, ज्ञानी, अथार्थी आणि मुमुक्षु असे सर्वच थरांतील लोक त्यांच्या भजनीं लागले व 'अधिकार तैसा दावियेला मार्ग' या संतोक्तीनुसार श्रीसमर्थांनीं त्यांना मार्ग-दर्शन केलें. ज्यांना पुत्र नव्हता त्यांना पुत्र दिला, ज्यांना आर्थिक अडचण होती त्यांना द्रव्यराशींचा ठेवा देऊन त्यांची अवस्था 'देता किती घेशील दो करानें' अशी करून सोडली! जे केवळ ज्ञानाच्या अपेक्षेनें आले त्यांच्यापुढें ज्ञानराशी ओतल्या. सकाम आणि निष्काम, कोणत्याहि भावनेनें केलेली भक्ति गोड करून घेऊन आपल्या कृपेचा मेघ त्यांचेवर सतत वर्षत ठेवला.

एकदां स्वामीसमर्थांची कीर्ति ऐकून शके १७९१ च्या मार्ग-शीर्षांत एक गोसावी त्यांचा शोध घेत अक्कलकोटास आला. तो प्रभुदत्तात्रेयाचा निःस्सीम भक्त होता. आपल्या आराध्यदैवतानें आपल्या भक्तीवर प्रसन्न होऊन आपणांस दर्शन द्यावें हीच कुणाहि भक्ताची इच्छा असते. संतांचे प्रासादिक अभंग याच व्याकुळतेच्या पोटीं जन्माला येतात. प्रस्तुतचा गोसावीदेखील दत्तभेटीसाठीं आतुर झाला होता.

तुकोबांच्या शब्दांत तो जणू रोज दत्तात्रेयाला पुढील शब्दांत आळवीत होता-

'नमन माझें गुरुराया। महाराजा दत्तात्रेया ॥ १ ॥
तुझी अवधूत मूर्ति। माझ्या जीवाची विश्रांति ॥ २ ॥
जीवींचें सांकडें। कोण उगवील कोडें ॥ ३ ॥
अनसूया सुता। तुका म्हणे पाव आतां ॥ ४ ॥

श्रीदत्तात्रेय हा गुरुदेवांचा अवतार आहे. म्हणूनच त्याला 'श्रीगुरुदेवदत्त' असें म्हणतात. या अवतार विग्रहाची उपासना गुरुभावनेनें केल्यास ती कलियुगांत त्वरित फलद्रूप होते. कारण हा अवतारच अविनाशी आहे.

श्री श्रीधरस्वामी आपल्या 'रामविजय' ग्रंथांत लिहितात,

**अवतारही उदंड होती । सर्वेंचि मागुती विलया जाती ।**
**तैशी नव्हे श्रीदत्तात्रेय मूर्ती । नाश कल्पांतीं असेना ।।**

संतश्रेष्ठ श्रीगुलाबराव महाराजांनींहि याबाबत अशीच ग्वाही दिलेली आहे. ते आपल्या '**प्रियलीला महोत्सव**' या प्रासादिक ग्रंथरत्नांत म्हणतात—

**नाना अवतार होऊनियां गेले । दत्तत्व संचलें जैसें तैसें ।**

निरिच्छतेनें श्री दत्तात्रयांची सेवा केल्यास दत्तात्रेय तात्काळ प्रसन्न होतात. यामुळेंच त्यांना 'आशुतोषः' असें नांव प्राप्त झालें आहे.

असें असतांना त्या गोसाव्यास दत्तदर्शन न झालें तरच आश्चर्य ! त्यानें अक्कलकोटास येऊन स्वामीसमर्थांचें दर्शन घेतलें. त्याचवेळीं त्यांच्या मनांतील दत्तदर्शनाची आस ओळखून समर्थ आपलें रूप पालटून साक्षात् दत्तात्रेय स्वरूपांतच त्याच्यापुढें उभे राहिले !

योगीराज दत्तात्रेयांची ती काषायवस्त्रांकित दिव्य मूर्ति पाहून गोसाव्याची काया रोमांच पुलकित झाली. त्याचे अष्ट सात्विक भाव उचंबळून आले आणि त्यानें त्या मूर्तीला अनन्यभावानें वंदन केलें. त्याचे डोळे आपोआप मिटले गेले व तो निजानंदसुखांत मग्न झाला.

बराच वेळानें त्यानें डोळे उघडले, परंतु आतां समोर ती

मघां पाहिलेली दत्तमूर्ति नव्हती... तिचेंच लोकोद्धारासाठीं प्रकट झालेलें आजानुबाहु मानवी रूप त्याच्यासमोर प्रसन्न हास्य करीत उभें होतें ! !

## स्वामीसमर्थांचें छायाचित्र

आज स्वामीसमर्थांचीं जवळजवळ १५ । १६ वेगवेगळीं छायाचित्रें उपलब्ध आहेत. मात्र, त्यांचें पहिलें छायाचित्र टिपण्याचा मान 'कोडॅक कॅमेरा कंपनी' कडे जातो. हें पहिलें छायाचित्र शके १७७९ चे सुमारास घेतलें असावें असें दिसतें. या छायाचित्राचें वैशिष्टय म्हणजे या छायाचित्रांत स्वामीसमर्थांच्या मुखमंडलाभोंवतीं पसरलेलें तेजोवलयहि स्पष्टपणें दिसून येतें. तसें प्रत्येक मनुष्याच्या भोंवतीं एक तेजोवलय (आरा) असतेंच, परंतु सामान्य मनुष्याचें तेजोवलय तितकें प्रकाशमान व तेजस्वी नसतें. मोठमोठ्या अवतारी विभूतींचें तेजोवलय मात्र विलक्षण तेज:पुंज असतें आणि स्वामीसमर्थ म्हणजे तर साक्षात तेजाची मूर्ति ! त्यांचें तेजोवलय निर्जीव कॅमेऱ्यानेंहि यथातथ्य टिपलें तर आश्चर्य नाहीं ! 'जयाचिया किरणाचे निखरपणें । नक्षत्रांचे होत फुटाण ।' असेंच श्रीसमर्थांचें विलक्षण तेज होतें. असो.

श्रीस्वामीसमर्थांच्या पहिल्या छायाचित्राची कथा जितकी विस्मयकारक तितकीच गंमतीदार व महाराजांच्या अत्यद्भुत सामर्थ्याची चुणूक दाखविणारी आहे !

त्या काळांत 'कोडॅक कॅमेरा कंपनी' नें आपलें ऑफिस नुकतेंच मुंबईंत थाटलें होतें. 'फोटो' ही चीज भारतांत अगदीं नवीनच होती. त्या काळांत फोटो काढण्यास खर्चहि बेसुमार येत असे. एवढा खर्च मोठमोठ्या संस्थानिकांना व राजेरजवाड्यांनाच काय तो परवडत असे !

ही कला भारतांत लोकप्रिय करून आपला धंदा वाढविणें हेंच कोडॅक कंपनीचें ध्येय होतें व त्यासाठीं सर्वांना पूज्य असणाऱ्या एखाद्या महान् व्यक्तीचा फोटो घेऊन आपल्या धंद्याची जाहिरात करण्याचें कोडॅकच्या चालकांनीं ठरविलें. अशी सर्वांना पूज्य व्यक्ति कोण असा प्रश्न निर्माण होतांच त्यांच्या डोळ्यांसमोर अर्थातच अक्कलकोटच्या स्वामीमहाराजांची मूर्ति चमकली !

श्रीस्वामीसमर्थांच्या चमत्कारांच्या विलक्षण हकीकती त्या-काळांत 'पुणें वैभव' व 'इंदुप्रकाश' या वृत्तपत्रांतून ठळकपणें प्रसिद्ध होत असत. त्यामुळें स्वामीमहाराजांबद्दल लोकमानसांत विलक्षण कुतूहल व औत्सुक्य निर्माण झालें होतें. व लोकगंगेचा प्रवाह अक्कलकोटच्या 'करुणासागरा' ला भेटण्यासाठीं विलक्षण वेगानें वहात होता. मुंबई सरकारला देखील समर्थांच्या अगम्य लीला ऐकून त्यांचेविषयीं आदर उत्पन्न झाला होता व मुंबई सरकारनें समर्थांची योग्य व्यवस्था ठेवण्याचा अक्कलकोटच्या नरेशांना आदेश दिला होता.

श्रीसमर्थांनीं लोकमानसांत हें जें आदराचें स्थान मिळविलें होतें त्याचा पुरेपूर फायदा घेण्याचें कोडॅक कंपनीच्या व्यापारी वृत्तीच्या चालकांनीं ठरविलें तर आश्चर्य नव्हतें ! त्याप्रमाणें श्री-समर्थांचें एक छायाचित्र घेण्यासाठीं आपल्या एका निष्णात प्रतिनि-धीला त्यांनीं फोटोग्राफीच्या सर्व साधनांसह अक्कलकोटास रवाना केलें.

अक्कलकोटास आल्यानंतर त्या युरोपियन साहेबानें श्रीसम-र्थांच्या भक्तगणांना भेटून महाराजांचें छायाचित्र घेण्याचा आपला मनोदय त्यांना कळविला. परंतु त्यांनीं 'याबाबत महाराजांनाच काय तें विचारा' असें मोघम उत्तर दिलें.

त्याप्रमाणें साहेबानें समर्थांची परवानगी काढण्याचा प्रयत्न

केला. परंतु समर्थांनीं साहेबाला दाद दिली नाहीं! शेवटीं साहेब इरेला पेटला! त्यानें श्रीसमर्थांच्या नकळतच त्यांचें छायाचित्र घेण्याचें ठरविलें!

त्यावेळीं श्रीसमर्थ एका घनदाट वृक्षाखालीं बसले होते. छाया प्रकाशाची रांगोळी जमिनीवर पसरली होती. साहेबानें दूर उभें राहून कॅमेरा लावला. आणि तो समर्थांच्या एखाद्या उत्तम 'पोझ'ची वाट पाहूं लागला. परंतु प्रत्येक वेळीं कांहींना कांहीं अडथळे येऊं लागले. महाराज एखाद्या चांगल्या 'पोझ' मध्यें आहेत असें पाहून त्यानें काळ्या फडक्यांत डोकें खुपसून फोटोची तयारी करावी तों दुसऱ्याच क्षणीं समर्थ पाठमोरे तरी होत किंवा कुणीतरी त्यांचेआड येऊन उभा राही! त्यामुळें फोटोग्राफर साहेब दांत-ओंठ खात पुन्हां काळ्या फडक्यांतून बाहेर येत! असा प्रकार दहा-वीस वेळां तरी झाला असेल!

शेवटीं त्यानें तेथून कॅमेरा हलविला व तो एका झाडाआड लपवून ठेवला आणि थोड्याच वेळांत त्याला फोटो काढण्यांत यशहि आलें! साहेब हुरळून गेला व 'कशी जिरवली' अशा आविर्भावांत महाराजांकडे ऐटीनें पाहूं लागला. परंतु त्याची फजिती वेगळ्याच प्रकारें करण्याचें श्रीसमर्थांनीं योजिलें होतें!

त्यानें घरीं जाऊन फोटो धुतला आणि त्याबाबत खुद्द महाराजांचाच अभिप्राय विचारावा असा विचार करून तो श्रीसमर्थांकडे आला. त्यानें तो फोटो समर्थांपुढें ठेवून त्याबावत अभिप्राय विचारला.

श्रीसमर्थांनीं कांहीं न बोलतां तो फोटो समोरच्याच एका सेवेकऱ्याकडे फेकला व त्याचा अभिप्राय विचारला. तो फोटो पाहून तो सेवेकरी म्हणाला, 'वा: काय सुंदर रामाचा फोटो आहे!'

साहेबाला कांहींच समजेना ! तेवढ्यांत समर्थांनीं तो फोटो दुसऱ्या एका सेवेकऱ्यापुढें फेकला. तो पाहून तो सेवेकरी म्हणाला, 'वा वा ! अंबाबाईचा इतका छान फोटो आयुष्यांत प्रथमच पहायला मिळाला !'

साहेबानें कपाळावर हात मारून घेतला ! नंतर समर्थांनीं इतर सर्व सेवेकऱ्यांना तो फोटो दाखविला, परंतु तो श्रीसमर्थांचा आहे असें एकजण म्हणेल तर शपथ ! कुणाला त्यांत शंकराची ध्यानस्थ मूर्ति दिसली तर कुणाला चतुर्भुज विष्णूचें स्वरूप दिसलें. कुणाला खंडोबा तर कुणाला विठोबा ! ज्याला त्याला आपापल्या इष्टदेवताच त्या फोटोवर दिसूं लागल्या !

तें पाहून साहेबाचा पारा चढला. तो म्हणाला, 'महाराज, हे लोक अडाणी दिसतात ! हा फोटो आपलाच आहे एवढी साधी गोष्टहि त्यांच्या मठ्ठ डोक्यांत शिरत नाहीं. तेव्हां आपण स्वतःच हा फोटो पाहून आपला अभिप्राय द्यावा.'

त्यावर श्रींनीं 'असें काय ? हें माझें चित्र ?' असें म्हणून तो फोटो पुन्हां त्याचेसमोर धरीत म्हटलें, 'आम्ही असें दिसतों काय ?' फोटोग्राफरनें फोटोकडे पाहिलें, तों काय ? त्या फोटोंत त्याला नराच्या ऐवजीं वानर दिसूं लागला ! तें पाहून सर्वांनीं त्याला मूर्खांत काढलें.

फोटोग्राफरला आपली चूक उमगली ! श्रींची परवानगी न घेतां आपण फोटो काढण्याचा आगाऊपणा केला त्याचें हें फळ, याची खात्री होऊन त्यानें समर्थमाऊलींची अनन्यभावानें क्षमा मागितली. नंतर तो हात जोडून म्हणाला, 'महाराज, आपलें चित्र घरोघर असावें व आमच्या धंद्यालाहि आपल्यासारख्या दिव्य विभूतीचें पाठबळ असावें यासाठीं आम्हांला आपलें एक सुंदर छायाचित्र हवें आहे. तरी तें काढण्याची परवानगी द्यावी.'

चुकीची कबुली दिल्यानंतर श्रीचा राग कोठच्या कोठें पळून गेला ! त्या फोटोग्राफरनें पश्चात्तापयुक्त स्वरांत आपली चूक मान्य करतांच समर्थ प्रसन्नपणें हंसले व 'ठीक आहे' असें म्हणून त्यांनीं त्याला स्वत:चा फोटो घेऊं दिला.

त्या काळांत या विलक्षण हकीकतीचा बराच बोलबाला झाला होता असें दिसतें. श्रींचे जसे कांहीं स्वतंत्र फोटो आहेत तसेच 'ग्रुप फोटो' हि आहेत. त्यांत सुंदराबाई, चोळप्पा वगैरे सेवेकरी श्रींच्या सन्निध दिसून येतात.

हे फोटो ज्यांनीं टिपले त्यांचें ऋण स्वामीमहाराजांचे भक्त कधींहि विसरूं शकणार नाहींत. कारण त्यांच्याच करामतीमुळें स्वामीमहाराजांच्या अजानुबाहु दिव्य मूर्तीचें दर्शन यथातथ्य स्वरूपांत होऊं शकतें व इतर थोर अवतारांप्रमाणें चित्रकारांच्या काल्पनिक चित्रांवर विसंबून रहावें लागत नाहीं.

श्रीस्वामीसमर्थांच्या दुसऱ्या एका छायाचित्राची अशीच एक विलक्षण हकीकत एका वृद्ध स्वामीभक्ताकडून समजली. ती विश्वासार्ह वाटल्यामुळें येथें देतों-

स्वामीसमर्थांचें छायाचित्र काढण्यासाठीं अनेक छायाचित्रकार अक्कलकोटास येत असत. परंतु समर्थांची इच्छा असल्यासच फोटो निघत असे. त्यांच्या इच्छेविरुद्ध किंवा नकळत काढलेलें छायाचित्र हमखास काळेंकुळकुळीतच येत असे ही आश्चर्याची गोष्ट होय !

एकदां अक्कलकोटास फडके नांवाचे एक छायाचित्रकार समर्थांचें छायाचित्र घेण्याच्या इच्छेनें आले होते. समर्थांजवळ त्यांनीं आपला मनोदय व्यक्त करतांच समर्थ म्हणाले, 'पांच बजे आव.'

त्याप्रमाणें फडके संध्याकाळीं ठीक पांच वाजतां कॅमेरा घेऊन

समर्थांकडे गेले, परंतु समर्थ फोटोबद्दल विषयच काढीनात! त्यांनीं फडक्यांना गुडगुडी धरण्याची आज्ञा केली व सात वाजेपर्यंत ते गुडगुडीच ओढीत बसले आणि मग एकदम फडक्यांना म्हणाले, '**निकालो फोटो.**'

परंतु अंधारांत कसचा फोटो येणार! त्यावेळीं कांहीं फ्लॅशची सोय नव्हती. फडक्यांनीं ही अडचण समर्थांना सांगताच समर्थ बराच वेळ पोट धरून हंसले व त्यांनीं फोटो न काढतां नुसतीच कांच धुण्यास त्यांना सांगितलें. आणि आश्चर्य असें कीं, फोटो न घेतांहि कांचेवर श्रीसमर्थांचा एक सुंदर फोटो आला! प्रस्तुतचा फोटो, (गुडगुडी ओढीत असलेला) या पुस्तकांत मुद्दाम दिला आहे.

ब्रह्मीभूत श्री रामचंद्रराव यरगट्टीकर यांचेविषयीं अशीच एक हकीकत प्रसिद्ध आहे. श्री यरगट्टीकर हे परमार्थमार्गांतील एक फार मोठे अधिकारी पुरुष होऊन गेले. त्यांचा फोटो काढण्या-साठीं एक फोटोग्राफर कॅमेरा घेऊन त्यांचेकडे गेला. तेव्हां यर-गट्टीकर म्हणाले, 'तूं कितीहि प्रयत्न केलास तरी माझा फोटो तुला काढतां येणार नाहीं.'

त्या फोटोग्राफरनें अक्षरशः दहावीस वेळां श्री यरगट्टीकरांचा फोटो घेण्याचा प्रयत्न केला, परंतु एकदांहि फिल्मवर त्यांची आकृति उमटली नाहीं!

संतांच्या लीला संतच जाणोत!

## श्रीसमर्थकृपेनें धनप्राप्ति!

अक्कलकोट येथें गोविंदशास्त्री या नांवाचे एक दरिद्री गृहस्थ रहात होते. दारिद्र्यामुळें त्यांना जीवनांत कांहींच रस वाटत नव्हता. तुकारामबुवा म्हणतात—

'भिक्षापात्र अवलंबणें। जळो जिणें लाजिरवाणें।'

अहो, भीक मागून जीवन जगण्यापेक्षां मरण काय वाईट?

गोविंदशास्त्र्यांच्या मनांत अशा तऱ्हेचे विचार घोंघावत असतांनाच पूर्वसुकृतामुळें त्यांना श्रीस्वामीमहाराजांना भेटण्याची इच्छा उत्पन्न झाली व ते एक दिवस श्रीसमर्थांच्या दर्शनास आले.

गोविंदशास्त्र्यांच्या मनांतील आशय ओळखून समर्थ एकदम म्हणाले, '**तुमचे घराचे परसांत पारीचें झाड आहे, त्या खालीं जें आहे तें घेऊन स्वस्थ हरिहरि करीत बसा.**'

श्रींच्या मुखांतून बाहेर पडलेले हे अमृतमय शब्द ऐकून निर्धन गोविंदशास्त्र्यांना किती आनंद झाला असेल त्याची कल्पना वाचकांनींच करावी ! श्रींना नमन करून ते धांवतच घरीं गेले व त्यांनीं परसांतील त्या विवक्षित झाडाखालीं खणून पाहिलें, तेव्हां त्यांस त्याठिकाणीं अमाप धन मिळालें ! पुढें श्रींच्या आज्ञेनुसार त्यांनीं राहिलेलें आयुष्य हरिहरि करण्यांतच कारणीं लावलें !

अक्कलकोटास आलेल्या एका वृद्ध तेल्यासहि श्रींनीं अशीच धनप्राप्ति करून दिली. ती सारीच हकीकत अतिशय विस्मयकारक आहे !

या वृद्ध तेल्याची आर्थिक परिस्थिति अतिशय ओढग्रस्तीची होती. परंतु स्वामीमहाराजांच्या कृपेनें दारिद्र्याचें निवारण होईल अशी दृढ श्रद्धा मनांत बाळगून तो एक दिवस अक्कलकोटास स्वामीसमर्थांच्या दर्शनास आला. त्यावेळीं स्वामीमहाराजांची स्वारी शेख नुरुद्दीनसाहेबांचे दर्ग्याजवळ बसली होती. तेल्याच्या मनांतील भाव करुणाघन स्वामींनीं तेव्हांच ओळखला. परंतु ते प्रथम कांहींच बोलले नाहींत.

तेवढ्यांत कोंकणांतील एक ब्राह्मण सहकुटुंब श्रींच्या दर्शनास आला. त्याला संतति नसल्यामुळें जीवनांत रस वाटत नव्हता. परंतु गुरुमहाराजांच्या कृपेनें आपली मनोकामना पूर्ण होईल याबद्दल त्याला निश्चित खात्री होती.

श्रींचें दर्शन घेऊन सदर ब्राह्मण त्यांना वारा घालीत उभा राहिला. त्याची बायकोहि हात जोडून शेजारींच उभी होती.

तेवढ्यांत श्रीसमर्थ त्या स्त्रीकडे पहात हंसून म्हणाले, 'अग लिबे, (हें तिचें पूर्वजन्मींचें नांव असावें.) हा म्हातारा तेली **पूर्वजन्मींचा तुझा नवरा आहे. तुझेच पोटचे हे तीन मुलगे त्याचेजवळ आहेत. त्यांस जवळ घे.'**

श्रींच्या मुखांतील ते विस्मयकारक शब्द ऐकून ती ब्राह्मण स्त्री प्रथम लज्जित झाली. परंतु श्रींची वाणी असत्य कशी असेल असा विचार करून तिनें त्या मुलांना जवळ घेतलें. ते मुलगेहि 'आई आई' करीत तिला प्रेमानें बिलगले ! केवळ स्वामीकृपेनेंच त्यांना आपल्या आईचें नव्या स्वरूपांत दर्शन झालें होतें तो प्रसंगच अतिशय हृदयस्पर्शी होता ! तो वृद्ध तेली, ती ब्राह्मण स्त्री व तिचीं पूर्वजन्मांतील तीं गोंडस मुलें, सर्वांच्याच डोळ्यांत अश्रु दाटले होते. मुलें आईची ऊब मिळाल्यामुळें तिला घट्ट बिलगलीं होतीं. हरवलेलें गवसलें होतें...

तेवढ्यांत समर्थ त्या स्त्रीस पुढें म्हणाले, 'अग लिबे, **तूं त्या तेल्याबरोबर त्याचें गांवीं जा. तुझ्या हातानें तूं पुरलेला एक हंडा घरांत पश्चिमेच्या बाजूला रंगीत खांबाखालीं आहे. तो काढून तूं त्यांतील सर्व द्रव्य या तेल्यास दे, म्हणजे तुला पुत्रप्राप्ति होईल.'**

श्रीसमर्थांची ही आज्ञा ऐकून सर्वजण त्या तेल्याचें गांवीं गेले. तेव्हां त्यांना त्या विवक्षित ठिकाणीं द्रव्यानें कांठोकांठ भरलेला एक सुंदर हंडा मिळाला ! त्यांतील द्रव्य त्या स्त्रीनें निर्लोभ वृत्तीनें त्या तेल्याचे स्वाधीन केलें व ती पतीसमवेत आपल्या गांवीं निघून गेली. पुढें लवकरच तिनें यथाकाल एका पुत्ररत्नास जन्म दिला !

अशाप्रकारें श्रींनीं त्या वृद्ध तेल्याचें दारिद्र्यहि दूर केलें व त्या ब्राह्मण दांपत्यास पुत्रलाभहि करून दिला !

स्वामीसमर्थांची लीला अशी अगाध होती !

या संदर्भांत श्री. स. कृ. फडके आपल्या "**दत्त भक्त रहस्य**" या पुस्तकांत पृष्ठ २०३ वर लिहितात–"एखाद्या निर्धन ब्राह्मणानें स्वामींकडे जाऊन दैन्य भाकावें आणि स्वामींनीं त्यास 'आमच्या संन्याशाजवळ पैसा कोठचा ? वाटल्यास ही काळी माती नाहींतर तीं हडकें लागतील तेवढीं घेऊन चला, नाहींतर हें सापाचें वेटोळें घेऊन जा' असें म्हणावें. मग सुदामदेवाप्रमाणें विन्मुख होऊन घरीं जातांना निरुपायानें पार्थिवाला तरी उपयोगी पडेल म्हणून काळी माती, किंवा अस्पृश्य खरी पण बायकोचे आग्रहास्तव स्वामींचा प्रसाद म्हणून हडकें, असला प्रसाद पदरांत बांधून घरीं जावें व पहावें तों त्यांची चिनई चांदी आणि सोनें झालेलें ! असे प्रकार स्वामींच्या चरित्रांत आढळतात. गरिबाचें ऋणमोचन करावें, अपुत्रिकांस संतति द्यावी, रोग्यांस आरोग्य द्यावें; अशा रीतीनें जो त्यांच्याकडे जाई त्यांचा योगक्षेम ते पहात होते. पण यावर कोणी अशी शंका काढील कीं, अशा रीतीनें मातीची चांदी होऊं लागली तर कापसाच्या बोंडाकरितां पावसाच्या लहरीवर जमिनीची मशागत कोण करील ? हाडांचीं काडें करून अर्धपोटीं राहणारी गरीब प्रजा हाडांचें एकदम सुवर्णच कां करून घेणार नाहीं ? परंतु हे प्रश्न व्यर्थ आहेत. सोनें आणि चांदीच काय पण नराचा नारायण होण्याची किमया प्रत्येक मनुष्याच्या स्वाधीनची असूनहि फार करून कोणीहि ती खटपट करीत नाहीं, हीच ईश्वराची माया होय.

"दुसरें असें कीं स्वामींकडे लक्षावधि लोक दर्शनाला गेले असतील. पण सर्वांनीच कांहीं सोन्याच्या लगडी मिळविल्या नाहींत

ज्यास आपलें प्रारब्ध अनुकूल असेल, त्यांसच संताजवळ मागण्याची बुद्धि होते. बुद्धिः कर्मानुसारिणी !" असो.

## कार्तिकस्वामींचे रूपांत दर्शन !

श्रीस्वामीसमर्थांनीं आपल्या भक्तांना त्यांच्या इष्ट देवतांच्या रूपांत दर्शन दिल्याच्या हकीकती यापूर्वी आल्याच आहेत. अशाच प्रकारची आणखी एक विस्मयकारक हकीकत सांगितली जाते.

रामशास्त्री डोंगरे या नांवाचे बडोद्याकडील एक गृहस्थ एकदां स्वामीसमर्थांच्या दर्शनास आले होते. त्यांना पुढें दक्षिण भारतांत कार्तिकस्वामींच्या दर्शनास जावयाचें होतें. त्यांनीं आपली ही इच्छा यतिरायांपुढें प्रकट करतांच स्वामी फक्त 'जाऊं नको' एवढेंच म्हणाले.

त्यामुळें रामशास्त्री विचारांत पडले व त्यांनीं, स्वामीभक्त बाबासाहेब सबनीस यांस आतां काय करावें असा प्रश्न केला. तेव्हां त्यांनीं साहजिकच 'स्वामींची आज्ञा मोडणें बरें नव्हे' असें त्यांस उत्तर दिलें. त्यामुळें रामशास्त्री पुढें न जातां अक्कलकोटासच राहिले.

पुढें कार्तिकी पौर्णिमेच्या दिवशीं रामशास्त्री नित्याप्रमाणें श्रींच्या दर्शनास गेले. तेव्हां समर्थ एकदम उभे राहिले व त्यांनीं रामशास्त्र्यांस कार्तिकस्वामींच्या स्वरूपांत दर्शन देऊन त्यांची इच्छा पूर्ण केली !

हा विस्मयकारक प्रकार पाहून स्वामीमहाराज हे साक्षात् परमात्मस्वरूपच आहेत, याबद्दल रामशास्त्र्यांची खात्री झाली व ते पुढें दोन वर्षेंपर्यंत त्यांची एकनिष्ठपणें सेवा करीत अक्कलकोटासच राहिले.

## 'गंगा भागीरथी झालीस म्हणजे व्याधि जाईल–'

एक दिवस एक पोटदुखीनें जर्जर झालेली स्त्री श्रीसमर्थांचे दर्शनास आली व तिनें आपली व्यथा श्रींपुढें प्रकट केली. तेव्हां श्रीसमर्थ सहज म्हणाले, 'तूं गंगा भागीरथी झालीस म्हणजे तुझी व्याधि जाईल.'

त्याप्रमाणें लवकरच तिचा पति निधन पावल्याचें पत्र आलें व तिची पोटदुखीहि तत्काल बरी झाली !

## 'मादरचोद, पेढे भूल गया !'

पोटदुखीनें त्रस्त झालेला असाच एक ब्राह्मण होता. त्यानें सर्व मानवी उपाय हरल्यावर पोटदुखींतून मुक्त होण्यासाठीं श्रीक्षेत्र नरसोबाचे वाडीस जाऊन असा नवस केला कीं, 'आपली पोटदुखी दत्तकृपेनें बरी झाली तर आपण सव्वा रुपयाचे पेढे वाटूं.'

त्याप्रमाणें दत्तप्रभूंनीं नवसाला पावून त्याची पोटदुखी बरी केली. परंतु नवस फेडण्याची गोष्ट तो पुढें अजिबात विसरून गेला. या गोष्टीस दहा वर्षें लोटल्यानंतर तो एकदां सहज स्वामी-समर्थांच्या दर्शनासाठीं अक्कलकोटास आला. त्यावेळीं त्याला पहा-तांच समर्थ मोठ्यानें म्हणाले, '**मादरचोद, पेढे भूल गया !**'

स्वामीसमर्थांचे ते उद्‌गार ऐकतांच त्या ब्राह्मणाच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला ! त्याला एकदम दहा वर्षांपूर्वींच्या नवसाची आठवण झाली व त्यानें विस्मरणाबद्दल स्वामीमहारा-जांची क्षमा मागून पुढें लवकरच आपला नवस फेडून टाकला.

या हकीकतीवरूनहि स्वामीमहाराज दत्तस्वरूपच होते ही गोष्ट सहज लक्षांत येते.

## 'उंच नीच कांहीं नेणे भगवंत'

एकदां एक गरीब ब्राह्मण स्त्री श्रींना दाखवण्यासाठीं मोठ्या प्रेमानें नैवेद्य वगैरे घेऊन श्रींच्या दरबारांत आली. परंतु ती गरीब असल्यामुळें सुंदराबाई वगैरे सेवेकरी तिची दाद लागूं देईनात. त्यामुळें ती बिचारी एका कोपऱ्यांत निमूट बसून राहिली.

परंतु ही गोष्ट समर्थांना अंतर्ज्ञानानें समजतांच ते मोठ्यानें ओरडले, 'भटिणीच्या नैवेद्यास कोण आड येतो ? माजलेले पाय-पोस खातील.'

एवढें बोलून श्रीसमर्थांनीं त्या स्त्रीस ताबडतोब नैवेद्य घेऊन येण्याची आज्ञा केली. त्यावेळीं त्या स्त्रीच्या मनाला किती अपार आनंद झाला असेल त्याची वाचकांनींच कल्पना करावी ! तिनें चटकन् उठून श्रींना मोठ्या भक्तिभावानें नैवेद्य दाखविला. श्रींनीं तो नैवेद्य मोठ्या आनंदानें ग्रहण करून म्हटलें, 'अग भटणी, तुला खोडकर पोरगा होईल बरें.'

श्रींच्या मुखांतील ही अमृतवाणी ऐकून तर त्या स्त्रीच्या आनंदाला नुसतें उधाण आलें ! बिचारीच्या वयाचीं पंचेचाळीस वर्षें उलटून गेलीं होतीं. परंतु घरांत अजून पाळणा कांहीं हलला नव्हता.

पुढें समर्थवचनानुसार एका वर्षांतच त्या स्त्रीला पुत्र-रत्नाचा लाभ झाला व ती स्वामीसमर्थांची एकनिष्ठ भक्त बनली. समर्थांच्या नुसत्या आठवणीनेंदेखील तिला गहिंवरून येऊन ती प्रेमानें रडत असे.

सद्‌गुरूच्या ठिकाणीं मनाची इतकी तन्मयता व्हावयास हवी. मग गुरुकृपा दूर नाहीं.

## 'हरिवंश ऐका म्हणजे मुलगा होईल!'

बडोद्यास रामचंद्रराव घोरपडे या नांवाचे एक सरदार होते. त्यांना कन्या संतति होती. परंतु पुत्रमुख पहाण्याचें भाग्य अद्याप प्राप्त झालें नव्हतें. त्यामुळें ते नेहमीं उदास असत. पुढें स्वामीसमर्थांची कीर्ति कानांवर आल्यावर आतां स्वामीच आपली मनोकामना पूर्ण करतील असें त्यांना खात्रीपूर्वक वाटूं लागलें व त्यांनीं आपल्या एका कारकुनास लागलीच अक्कलकोटास पाठवून त्याच्यामार्फत आपलें गाऱ्हाणें श्रींच्या कानांवर घातलें. तेव्हां श्रींच्या मुखांतून चटकन् पुढील अमृतवाणी बाहेर पडली,-'**हरिवंश ऐका म्हणजे मुलगा होईल.**'

त्या कारकुनानें बडोद्यास जाऊन ही हकीकत आपल्या मालकास सांगितली व श्रींच्या वचनावर विश्वास ठेवून सरदारसाहेबांनीं रोज हरिवंशाचें श्रवण सुरू केलें; व आश्चर्य असें कीं, थोडयाच दिवसांत त्यांना पुत्ररत्नाचा अमोल लाभ झाला व श्रींच्या ठायीं त्यांच्या मनांत अपार श्रद्धा निर्माण झाली!

या ठिकाणीं हरिवंशाचें श्रवण हें कदाचित केवळ निमित्तच असूं शकेल. कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम अशी ज्यांची शक्ति त्या स्वामीसमर्थांच्या भक्तांना पुत्रलाभासाठीं हरिवंश वाचण्याची तरी काय आवश्यकता?

परंतु मग भक्ताच्या निष्ठेची पारख कशी होणार? दुसरें असें कीं, भक्तांचा प्रयत्नवादावरील विश्वास तरी कसा वाढणार? 'शेत पिकवा आणि खा.' असाच श्रीसमर्थांचा आपल्या भक्तांना नेहमीं उपदेश असे. या दृष्टीनेंच भक्तांचे असाध्य रोग बरे होण्यासाठीं समर्थ बहुतेक वेळां कांहींना कांहीं औषधयोजनाच सुचवीत. त्यायोगें समर्थांवरील निष्ठा व भक्तांचा प्रयत्नवाद या दोन्ही गोष्टींची कसोटी लागत असे.

मुंबईच्या ठाकुरदासबुवांच्या कुष्ठरोगावर त्यांनीं धुनींतील जळकें लांकूड उगाळून लावण्यास सांगितलें. दुसऱ्या एकास अंगास विष्ठा लावण्यास सांगितलें. त्यानें समर्थांचीच विष्ठा श्रद्धापूर्वक अंगास लावली व त्याचा कुष्ठपरिहार झाला. निंबाच्या पाल्याचा रस, सैंधव व सुंठ तसेंच, हत्तीच्या लेंड्या व लिंबाचा पाला हें त्यांनीं पोटदुखीवर सुचविलेलें औषध होतें. संततीसाठीं शिरसाचा डिंक व साखर, सुलभ प्रसूतीसाठीं गाईचें उष्टें पाणी, त्वचारोगावर हस्तिदंत तर नेत्ररोगांवर हत्तीचें मूत्र, मांजरीचें मूत, नारूवर म्हशीचें गरम शेण, खोकल्यावर चिनी मातीच्या भांड्यांतील साखर घातलेलें गरम दूध, वात रोगावर हुक्क्याचा धूर याप्रमाणें त्यांनीं चमत्कारिक औषधें सुचविलेलीं आहेत.

वस्तुत: केवळ कृपादृष्टीनें पाहूनहि कुणाचाहि असाध्य रोग चुटकीसरसा बरा करण्याचें अगाध सामर्थ्य निश्चितपणें समर्थांच्या अंगीं वास करीत होतें. परंतु या सहजसुलभ मार्गाऐवजीं कांहीं-तरी औषधयोजना किंवा ईश्वरसेवा सुचविण्यांत समर्थांचे अनेक हेतु होते. शिष्याच्या ठिकाणची निष्ठा व प्रयत्नवाद यांची परीक्षा हे दोन प्रधान हेतु तर त्यामागें होतेच परंतु तिसरा एक फार महत्त्वाचा हेतु त्यामागें होता.

महान् अवतारी विभूतींचे चमत्कार पाहून कांहीं वेळां त्यांच्याकडे इतके लोक आकृष्ट होतात कीं त्या महापुरुषांना स्वत:ची नित्यनैमित्यिक कर्में करण्यासहि फुरसत मिळत नाहीं. लोकोद्धारासाठीं चमत्कारांद्वारें लोकसंग्रह करणें त्यांना आवश्यक असलें तरी वारंवार चमत्कारच करीत राहिल्यास 'अति तेथें माती' या म्हणीनुसार त्या चमत्काराचें महत्त्वहि कमी होतें व गर्दीचा त्रास मात्र त्यांच्या वांट्याला येतो ! त्यामुळें कित्येक वेळां आपणहि सामान्य जनांसारखेच आहोंत असें भासविण्याचा खटा-

टोप या विभूतींना करावा लागतो व त्यांतूनच एखाद्या धन्वंतरी-प्रमाणें ते इलाज सुचवीत असतात ! अस्तु.

## किमयाकार संन्याशाची विलक्षण हकीकत !

उत्तर हिंदुस्थानांतील एक संन्यासी किमयाविद्येंत अतिशय प्रवीण होता. मोठमोठ्या साधूंची व फकिरांची सेवा करून त्यानें महद्कष्टानें ही विद्या प्राप्त करून घेतली होती. तो या विद्येंत कालांतरानें इतका निष्णात बनला होता कीं, ओढावयाच्या चिलमींतूनदेखील तो सहज अर्धा तोळा सोनें तयार करून दाखवीत असे ! अशा प्रकारें रोज तीन चार तोळे सोनें तयार करून, तें विकून त्या पैशांवर तो मोठ्या मिजाशीनें रहात असे. संन्यासी असूनहि तो कधीं यतिधर्मानुसार वागत नसे. पैशाच्या बळावर अनेक भोजनभाऊ शिष्य त्यानें आपल्याभोंवतीं गोळा केले होते. स्वतःच्या दिमतीला त्यानें दोन घोडे व एक बैलगाडीहि ठेवली होती. तो रूपानें सुंदर असून नेहमीं अतिशय थाटांत रहात असे ! मिष्टान्न भोजनाची त्यास विलक्षण आवड होती. त्याचें भाषणहि अतिशय मिठ्ठास व दुसऱ्यावर चटकन् छाप पाडणारें असे. हिंदी, उर्दू व मराठी अशा तिन्ही भाषांवर त्याचें सारखेंच प्रभुत्व होतें ! मिठ्ठास वाणी आणि किमया यामुळें सर्वसामान्य मनुष्य लागलीच त्याच्या-कडे आकृष्ट होत असे. परंतु त्यापैकीं कुणी चिकित्सक बुद्धीनें किमयेविषयीं आडवेतिडवे प्रश्न विचारूं लागला किंवा विरोधी बोलूं लागला तर मात्र तो संन्यासी वाटेल त्या अवाच्य शिव्या-शापांचा वर्षाव त्याच्यावर केल्याशिवाय रहात नसे !

हे संन्यासीबुवा असेच फिरत फिरत एकदां नासिकच्या पंच-वटींत येऊन उतरले. त्याठिकाणीं श्रीअक्कलकोटस्वामींचे सच्छिष्य श्री. बाबा घोलप हे आपल्या शिष्यांसह रहात होते. ते नेहमीं

समाधि लावून निजानंदांत मग्न असत.

एकदां ब्रह्मनिष्ठ वामनबुवा वांबोरीकर पंचवटीस आले असतां घोलपबुवांनीं प्रस्तुत संन्याशाची हकीकत त्यांचे कानावर घातली व त्यांची एकदां भेट घेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें वामन-बुवा संन्यासीबुवांकडे गेले. त्यावेळीं त्या संन्याशाकडे आचार्य, शास्त्री वगैरे बडी बडी विद्वान मंडळी बसलेली होती व तो संन्यासी त्यांच्यासमोर आत्मस्तुति करीत होता. तो म्हणाला, ' ही किमयाविद्या अतिशय गहन आहे. मी तर काय, परंतु प्रत्यक्ष गोरक्ष, मच्छिंद्र यांनींहि किमया करूनच मोठी योग्यता मिळविली. तसेंच श्रीगुरुदत्तात्रेयांनींदेखील या किमयेसाठींच अवतार घेतला. रामकृष्णादि अवतार पूज्य मानले गेले तें तरी या किमयेमुळेंच ! फार काय, भगवान विष्णूनेंदेखील समुद्रांत एकांतांत बसून किम-येनेंच एक एक पदार्थ निर्माण केले. किमया करील तोच खरा सिद्ध ! पोटासाठीं भीक मागणें, दारोंदार जाऊन तोंड वेंगाडणें हीं काय खऱ्या साधूचीं लक्षणें आहेत ? आम्ही पहा ! रोज या किमयेच्या योगें तीनचार तोळे सोनें तयार करतों व सुखांत राहातों.'

त्या किमयाकाराची ही अद्वातद्वा बडबड ऐकून वामनबुवांना त्याचा अतिशय राग आला. ते म्हणाले, ' पण बुवा, ज्यानें सर्व कर्मांचा न्यास केला आहे तोच ' संन्यासी ' त्यामुळें किमया ही संन्यास धर्माविरुद्ध आहे. संन्याशानें धातुस्पर्श करणेंसुद्धां त्याज्य आहे. असें असतां आपण ही नसती उठाठेव कां करतां ?'

वामनबुवांचा रोखठोक सवाल ऐकून संन्यासीबुवा चिडला नि वामनबुवांकडे रागानें पाहून त्यानें विचारलें, ' कां हो, तुमचे गुरु कोण ?'

तेव्हां वामनबुवांचे स्नेही गोविंदराव म्हणाले, 'आमचे गुरु दत्तावतार योगीराज श्रीअक्कलकोटस्वामीमहाराज आहेत.' असें म्हणून त्यांनीं स्वामीमहाराजांच्या नांवाचा उच्चस्वरांत जयघोष केला-

'अनंतकोटि ब्रह्मांडनायक राजाधिराज योगिराज श्री अक्कलकोटस्वामीमहाराज की जय-'

परंतु स्वामीसमर्थांची ही स्तुति त्या बोके संन्याशाच्या कानाला कशी गोड लागावी ? तो त्या सर्व मंडळींना शिव्याशाप देत त्यांना मारण्यासाठीं त्यांचे अंगावर धांवून आला.

परंतु वामनबुवा व त्यांच्या बरोबरीची मंडळी स्वामीसमर्थांचें स्मरण करीत निर्भयपणें तशीच उभी राहिली. त्यांनीं त्याला पुढील उपदेश केला, 'बाबारे, अनेक जन्म फिरतां फिरतां हा दुर्लभ मनुष्यजन्म तुला लाभला आहे तो असा मदोन्मत्त होऊन फुकट घालवूं नकोस. त्यापेक्षां सद्गुरूला शरण जा म्हणजे तुला सर्व जगच सुवर्णमय दिसूं लागेल. मग किमया करण्याची इच्छाच होणार नाहीं एकदां अक्कलकोटास जाऊन त्या दत्तावताराचें दुर्लभ दर्शन तर घेऊन ये.'

परंतु त्या मूढ सन्याशास हा हितोपदेश कसा रुचावा ? तो आपल्याच गर्वांत म्हणाला, 'तुम्ही मूर्ख लोक उगाच त्यांची स्तुति करतां तुमच्या गुरूंना माझ्यासारखें सोनें तयार करतां येतें का ?'

वामनबुवांनीं त्या मूर्ख संन्याशाची नाना प्रकारांनीं समजूत घालून पाहिली, परंतु रामा शिवा गोविंदा ! तो पूर्वीच्याच ताठ्यांत म्हणाला, 'तुमचे गुरु जर इतके सामर्थ्यशाली आहेत तर त्यांनीं येथल्या येथेंच मला चमत्कार दाखवावा. मी काय वाटेल तें झालें तरी त्यांच्या दर्शनास जाणार नाहीं !'

तेव्हां वामनबुवा आल्या मंडळींसह तेथून उठले व घोलप-

स्वामींकडे आले. त्यांनीं घडलेली सर्व हकीकत घोलपस्वामींना ऐकविली. तेव्हां समर्थनिंदा करणाऱ्या त्या पापी संन्याशाचा घोलपस्वामींना इतका राग आला कीं, ते त्या भरांत म्हणाले, 'तो फारच मदोन्मत्त दिसतो. परंतु दुष्टास शासन होईल. घाबरूं नका.'

त्याप्रमाणें दुसऱ्याच दिवशीं चमत्कार झाला! संन्यासीबुवा धातूचें सोनें करण्यासाठीं नेहमींप्रमाणें चारी बाजूंनीं पडदे लावून एकांतांत बसले. सर्व तांत्रिक मांत्रिक विधि त्यांनीं उरकले. परंतु ...परंतु त्यादिवशीं सोन्याच्या ऐवजीं कोळशाची काळी ठिक्कर गोळीच त्यांना मिळाली. तें पाहून त्यांचा जळफळाट झाला. त्यानें फिरून प्रयत्न केला, परंतु आतां त्याची सिद्धि त्याला सोडून गेली होती. तें पाहून तो शिष्यांनाच मारावयास बाहेर धांवला. परंतु त्याची सिद्धि नष्ट झालेली पाहून त्याच्या भोजनभाऊ शिष्यांनीं त्याचे घोडे घेऊन केव्हांच पोबारा केला होता!

त्यानंतर वामनबुवा आपल्या मंडळींसह पुन्हा एकदां त्याचेकडे गेले. त्यांना पाहून तर त्या संन्याशाच्या तळपायाची आग मस्तकांत जाऊन पोंचली. 'मूर्खांनो, तुम्हींच माझी सिद्धि नष्ट करून माझा घात केलात. थांबा. तुम्हांला एकेकाला आतां ठारच करतों-' असें म्हणत त्यानें शिव्यांचा भडिमार करीत एका भला मोठा धोंडा उचलला व तो वामनबुवांचे अंगावर धांवून आला. त्याचा तो उग्र अवतार पाहून वामनबुवांना दरदरून घाम फुटला. आतां आपला खास कपाळमोक्ष होणार असें वाटून त्यांनीं श्रीसमर्थांच्या नांवाचा गजर मोठमोठ्यानें सुरूं केला.

तेवढ्यांत असा चमत्कार झाला कीं, तो भला थोरला दगड पेलवा न आल्यामुळें त्याच्याच अंगावर पडला व तो संन्यासी निश्चेष्ट होऊन जमिनीवर पडला!

थोडया वेळानें तो सावध झाला आणि म्हणाला, 'हां भय्या अक्कलकोटका स्वामी सच्चा है. अक्कलकोटका स्वामी सच्चा है" असें म्हणून त्यानें वामनबुवांस मोठया प्रेमानें घट्ट मिठी मारली. त्याच्या नेत्रांतून अश्रुपात होत होता. जणूं त्या अश्रूंच्या रूपानें त्याचें पापच धुऊन निघत होतें !

दुसरे दिवशीं तो आपल्या रामचरण नामक शिष्याला बरोबर घेऊन अक्कलकोटास गेला.

त्यावेळीं सद्गुरुस्वामींची स्वारी बाललीला करीत खासबागेंत मोठया आनंदांत बसली होती. सभोंवार भक्तजनांची गर्दी नित्याप्रमाणेंच होती. तो संन्यासी भीतभीतच स्वामीमहाराजांपुढें आला. त्यांची तेजःपुंज मूर्ति पाहून त्यानें नकळतच त्यांच्यापुढें साष्टांग नमस्कार घातला.

तेवढयांत स्वामीसमर्थांचें लक्ष त्याच्याकडे गेलें. स्वामी म्हणाले, '**का रे दुष्टा, एवढा माजलास कशानें ? घाल दगड डोक्यांत. कोळसे झाले तर जीव दे. तुला किमया हवी काय ? मग तो पलीकडचा वृक्ष बघ.**' असें म्हणून स्वामीसमर्थ पोट धरधरून हंसूं लागले.

संन्यासीबुवांनीं पलीकडच्या त्या निंबवृक्षाकडे पाहिलें, तों त्यांतून सोन्याचें पिवळेंजर्द पाणी स्रवतांना दिसूं लागलें ! त्याचप्रमाणें आजूबाजूची जमीनहि सुवर्णमय दिसूं लागली !

'अरेरे ! आपण इतके दिवस किमयेचा फुकट अभिमान बाळगला' असा विचार मनांत येऊन त्याला पूर्ण पश्चात्ताप झाला. त्याला 'ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या' असें वाटूं लागलें. त्याचें शरीर कंप पावूं लागलें. मी म्हणजे शरीर नव्हे, ही सारी माया आहे. ब्रह्म हेंच खरें. बाकी सर्व माया. ही गोष्ट त्याच्या मनाला पटली.

स्वामीसमर्थांच्या केवळ दर्शनानेंच त्याला स्वतःची ओळख

पटली. धन्य धन्य स्वामीमहाराज तुमची !

तो चमत्कार पाहून संन्यासी स्वामीसमर्थांना शरण आला व त्यानें अनुग्रह करण्याची प्रार्थना केली. तेव्हां त्याच्यावर कृपा करून महाराज त्याचे अंगावर भगवें वस्त्र व मृगाजीन फेकून म्हणाले, '**जाव हमारे माहूर गडमें, मजेमें चूप बैठे रहो.**'

त्याप्रमाणें स्वामींची आज्ञा शिरसावंद्य मानून तो संन्यासी पुढें माहूरगडाकडे निघून गेला.

वाट चुकलेल्यांना योग्य मार्गावर आणून सोडणें हेंच महान् अवतारी विभूतींचें प्रधान कार्य असतें !

## 'आम्ही सोंवळ्याचें अन्न खात नसतों.'

एकदां समर्थांच्या दर्शनास बडोद्याहून जानकीबाई नांवाची एक ब्राह्मण स्त्री आली. ती सोंवळ्या ओंवळ्याचे नियम विलक्षण कटाक्षानें पाळणारी होती.

एकदां तिच्या मनांत स्वामीसमर्थांना नैवेद्य दाखवावा असें आलें. त्याप्रमाणें एक दिवस सायंकाळचे वेळीं ती नैवेद्य घेऊन कडक सोंवळ्यानें समर्थांकडे निघाली. रस्त्यानें जातांना कुणाचा चुकून स्पर्श होईल व आपलें सोंवळें बिघडेल या भयानें ती एक एक पाऊलदेखील अतिशय काळजीपूर्वक व मोजून टाकीत होती ! परंतु या अतिरेकाच्या भरांत ती रस्त्यावर कोसळली. व तिला एका विंचवानेंहि दंश केला खरें सांगायचें तर स्वामीमहाराजांनींच तिला ही अद्दल घडविली होती !

परंतु तशाहि स्थितींत ती बाई कशीबशी धडपडत स्वामींच्या चरणांशीं आली व तिनें नैवेद्याचें ताट त्यांचेपुढें ठेविलें.

परंतु स्वामी कशाला नैवेद्य खातात ? बाईनें फारच आग्रह केला असतां ते म्हणाले, '**आम्ही सोंवळ्याचें अन्न खात नसतों.**

तुझ्या नाटकवाल्या प्रिय पुरुषास ताट नेऊन दे.'

स्वामींच्या तोंडचे हे निखाऱ्याप्रमाणें झणझणीत परंतु वस्तुस्थितिनिदर्शक शब्द कानांवर पडतांच त्या बाईची अवस्था काय झाली असेल याचा वाचकांनींच विचार करावा ! तिनें तत्काळ स्वामींचे, पारिजात पुष्पाहून कोमल असे चरण धरले व ती त्यांना अनन्यभावानें शरण आली. आणि मग कुठें स्वामीमहाराजांनीं त्या नैवेद्यांतील थोडासा अंश ग्रहण केला आणि ते त्या स्त्रीस म्हणाले, '**पांढरी झाल्यावर तुला भक्ति लागेल.**'

समर्थ वचनाप्रमाणें त्या स्त्रीस पुढें लवकरच कोड फुटलें व त्यानंतर तिच्या मनांतील सर्व विकल्प नष्ट होऊन ती पूर्णपणें भक्तिमार्गांत रंगून गेली !

या हकीकतीवरून स्वामीसमर्थांना सोंवळ्याओंवळ्याचा विधिनिषेध नव्हता कीं काय असा प्रश्न वाचकांच्या मनांत निर्माण होईल. परंतु तसा प्रकार नाहीं. कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक करूं नये हेंच स्वामीसमर्थांना सुचवावयाचें आहे. 'नेम फार करूं नये नि नेमावांचून राहूं नये' असा स्वामीसमर्थांचा हा दंडक म्हणजे प्रापंचिकांच्या आचरणाचा सुवर्णमध्य होय ! त्याचप्रमाणें जोंवर अंतरंग शुद्ध नाहीं तोंवर बाह्यांगीं सोंवळ्याचा अतिरेक करणें तरी कितपत प्रशस्त आहे ? तुकारामबुवांनीं म्हटलेंच आहे-

'**नाहीं निर्मळ जीवन, काय करील साबण ?**'

दुसरें असें कीं, ज्यांचें अंतरंग शुद्ध आहे अशांच्या सोंवळ्याओंवळ्याला स्वामीसमर्थांनीं कधींहि विरोध केलेला नाहीं. श्रीबाळप्पामहाराज, ब्रह्मनिष्ठ वामनबुवा, श्रीबाळकृष्णमहाराज, या समर्थांच्या शिष्य-प्रशिष्यांचें आचरण इतकें शुद्ध, शुचिर्भूत व स्नानपानादि नियम इतके कडक कीं, तें पाहूनच लोक आश्चर्य

करीत! महाराजांना जर हें मान्य नसतें तर त्यांनीं बाळप्पाला पूर्ण एक तप अहोरात्र आपल्या सेवेस ठेवून घेतलेंच नसतें!

सोंवळ्याप्रमाणेंच यज्ञ दान, तप, तीर्थयात्रा, अहिंसा, मूर्तिपूजा, अन्नशांती, ग्रहशांती, बाह्य कर्मांची शुचिता, वर्णाश्रम व्यवस्था, गोमातेचें रक्षण, वेदाध्ययन या सर्व गोष्टी श्रीसमर्थांना पूर्णपणें संमत होत्या. किंबहुना सनातन हिंदु धर्माचे हे विविध पैलू अधिक दैदिप्यमान व प्रखर तेजस्वी करण्यासाठींच भगवान् श्रीस्वामींचा भूतलावर अवतार होता!

परंतु वरवर पाहणाऱ्याला श्रींचें आचरण बहुतेक वेळीं चमत्कारिक वाटे. याबाबत स्वामीगुरुपदानंद यांनीं 'कें गुरुगौरव वर्णिता उन्मेष असे' या लेखांत × व्यक्त केलेले विचार मननीय आहेत. ते लिहितात--

'महाराज एखादेवेळीं एखाद्या अंत्यजाच्या अथवा परधर्मीयाच्या हातचें खात असत. पण त्या खाल्लेल्या अन्नाची, दुसऱ्यानें मिष्टान्नाप्रमाणें खावयास योग्य अशी विष्ठा तयार करण्याचें केवळ ईश्वरी सामर्थ्य त्यांच्यापाशीं होतें. कोणाच्याहि हातच्या आहारापासून श्रीगुरूंच्या उदरांत तयार होणारा मल, कुष्ठरोगासारख्या दुर्धर व्याधि समूळ नष्ट करण्यास समर्थ होता. महाराज एखाद्या रजस्वलेला बळेंच स्पर्श करीत पण संकल्पमात्रेंकरून स्त्रीचा पुरुष आणि पुरुषाची स्त्री करण्याची अनन्यलभ्य शक्ति त्यांच्यापाशीं होती. श्रीगुरु एखाद्या मृतव्याचें घरीं जाऊन बसत. परंतु मृताला जिवंत करण्याची ताकद समर्थांजवळ होती. हें सर्व हेतुपूर्वक उपेक्षून किंवा अनवधानानें विसरून श्रीगुरुदेवांच्या 'धर्मातीत' आचरणाला 'धर्मलण्ड' पणाचा वास येईल, असें सोंवळें, मूर्तिपूजा,

× माऊली—श्रीसमर्थपूजा अंक: १९६१

आचार, स्वधर्मपालन यासंबंधीं एकांगी लिखाण आजच्या कर्मशैथिल्याच्या काळांत तरी यत्किंचितहि करणें सर्वथैव अनिष्ट आहे..."

## सुंदराबाई सेवेकरीण

श्रीस्वामीचरित्रकार भागवत लिहितात कीं, 'महाराजांचे जे सेवेकरी होते, त्यांपैकीं बहुतेक भोजनभाऊच होते. महाराजांपासून महाप्रसादाची प्राप्ति करून घेतलेला एकहि प्राणी ऐकिवांत नाहीं.' भागवतांची ही उक्ति थोडीशी अतिशयोक्तीची असली तरी एकंदरीनें पाहतां समर्थांची सेवा, सेवा म्हणून करणारे निष्काम सेवेकरी विरळाच होते ही गोष्ट मान्यच करावी लागेल !

समर्थांची सर्वांत जास्त सेवा करण्याची संधि सुंदराबाईला मिळाली. परंतु सुंदराबाईचें लक्ष सेवा करण्यापेक्षां समर्थांपुढचा मेवा खाण्याकडेच अधिक होतें !

सुंदराबाई स्वभावानें अतिशय कडक परंतु लोभी होती. ही सोलापूरकडील राहणारी. एकदां तिच्या पायास उष्णतेमुळें फोड आले व ते कोणत्याहि औषधोपचारानें बरे होईनात. त्यामुळें ती समर्थांच्या सेवेसाठीं अक्कलकोटास येऊन राहिली.

त्यावेळीं समर्थांची सर्व सेवा बहुतेक चोळप्पाच करीत असे. समर्थांना स्नान घालणें, त्यांच्या कपाळीं केशर–कस्तुरीचा टिळा लावणें, त्यांना लंगोटी नेसवून इतरहि कपडे घालणें जेवतेवेळीं घांस भरविणें, शौचास व लघुशंकेस नेणें इत्यादि सर्व सेवा चोळप्पाच करीत असे. परंतु ही सेवा करतांना त्याची धांवपळ व धांदल उडे. त्यामुळें त्यानें सुंदराबाईलाहि मदतीसाठीं घ्यावें असें ठरवून तो विचार समर्थांना बोलून दाखविला. त्यावेळीं समर्थ पुढील भवितव्य ओळखून म्हणाले, 'चोळ्या, हिला ठेवूं नको बरें. ही तुझ्या डोकीवर मिरी वाटील.'

समर्थ ही चेष्टाच करीत आहेत असें समजून चोळप्पानें सुंदराबाईला सेवेसाठीं रुजूं करून घेतलें आणि पाहतां पाहतां सुंदराबाईनें आपलें प्रस्थ इतकें वाढविलें कीं चोळप्पालाहि ती मुठींत ठेवूं लागली ! समर्थांना लघुशंकेस व शौचास घेऊन जाणें, स्नान घालणें, त्यांना जेवण भरविणें इत्यादि चोळप्पाचीं सर्व कामें तिनें आपल्याकडे घेतलीं. एवढेंच नव्हे तर समर्थांचें दर्शनहि तिच्या परवानगीवांचून होईनासें झालें ! ती समर्थांबरोबर आठ आठ दिवस राजवाड्यांत जाऊन राही. तिच्याजवळ मायावी लाघवीपणा करून दुसऱ्यावर भुरळ पाडण्याची कला पूर्णपणें वसत असल्यामुळें तिनें राणीला वश करून घेऊन चोळप्पाविरुद्ध अनेक खोट्यानाट्या गोष्टी तिला सांगितल्या. त्यामुळें राणीनें चोळप्पास समर्थांच्या सेवेंतून दूर केलें. चोळप्पाची 'ब्याद' दूर झाल्यावर सुंदराबाईचा एकतंत्री 'हुकूमशाही' अंमल सुरू झाला आणि तिनें स्वतःचें घर भरावयास सुरुवात केली. 'गुरुलीलामृत' कार लिहितात 'अंमल बाईचा एकचक्री । होऊनि मांडिली दर्शन विक्री । समर्थहि वचना भीतरीं । राहिले घडा भरे तों ॥'

सुंदराबाईचीं कारस्थानें समर्थांना समजत नव्हतीं असें नाहीं. परंतु सुंदराबाईचें पूर्वजन्मींचें पुण्य या जन्मीं फळाला आल्यामुळेंच समर्थांची सेवा करण्याचें महद्भाग्य तिला लाभलें होतें. समर्थ सुंदराबाईविषयीं बोलतांना नेहमीं म्हणत, 'शेतावर पांखरें येऊं नयेत म्हणून मडक्याला चुना लावून बुजगावणें करतात, तसलें हें सुंदराबाईचें मडकें आहे.' अशीं हीं मडकीं बहुतेक सर्वच साधुसंतांजवळ तयार असतात. लोकांचा उपसर्ग फार होऊं नये यासाठीं असली उपाययोजना त्यांना करावीच लागते !

पुढें कांहीं दिवसांनीं बाळप्पांना स्वामीसमर्थांची सेवा करावी असें तीव्रतेनें वाटूं लागलें. त्यावेळीं समर्थ मोदींच्या घरांत येऊन

राहिले होते व समर्थांच्या सेवेचें काम फक्त सुंदराबाईच करीत होती. तिला आपल्या हाताखालीं एखादा मेहनती व हुषार सेवक हवाच होता. सुंदराबाईनें बाळप्पांची भक्ति पाहून त्यांना समर्थांची पिकदाणी व तस्त साफसुफ करून ठेवण्याची सेवा सांगितली. बाळप्पा समर्थांचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांनीं ती सेवा मोठ्या आनंदानें सुरू केली. पुढें पाणी तापविणें, गंध उगाळणें, स्वयंपाक करणें इ० कामेंहि बाळप्पांकडे आलीं. बाळप्पा आल्यानंतर समर्थांची व्यवस्था फार उत्तमप्रकारें होऊं लागली.

इकडे समर्थांच्या नांवावर भक्तांकडून पैसे उकळण्याचा सुंदराबाईचा उद्योग व्यवस्थित चालू होता. तिचे हात ओले केल्याशिवाय समर्थांचें दर्शन होत नसे. सुंदराबाई मुद्दामच नेहमीं फाटकीं व विरलेलीं लुगडीं नेसत असे. मात्र तिच्याजवळ एक कोऱ्या लुगड्याची घडीहि ठेवलेली असे. एखादा श्रीमंत भाविक समर्थांच्या दर्शनास आला तर ही लबाड बाई आपलें फाटकें लुगडें दाखवून 'एखादें नवें लुगडें द्याल तर गरिबावर उपकार होतील' असें कळवळून म्हणत असे. त्या गृहस्थानें ही गोष्ट मान्य केल्यास सुंदराबाई आपल्याजवळची कोऱ्या पातळाची घडी त्यास आणून दाखवी व त्याची किंमत पंधरा सोळा रुपये आहे असें सांगे. तो भाविक श्रीमंत तिच्या हातावर तेवढे पैसे ठेवी. ते पैसे बाईच्या पेटींत जाऊन पडत ! अशा प्रकारें एका फाटक्या व एका नव्या लुगड्यावर बाईनें शेंकडों रुपये कमावले !

एवढें असूनहि महाराज मात्र नेहमीं बाईच्या अर्ध्या वचनांत ! स्वामी चरित्रकार मुळेकर लिहितात, 'महाराजांस निजा म्हणून बाईनें म्हटलें तर लागलीच त्यांनीं निजावें, उठा म्हटलें म्हणजे उठावें, घोटभर पाणी प्या म्हटलें तर तेवढेंच पाणी प्यावें. महाराज निद्रित असले तरी बाईस रुपये मिळावयाचे असले म्हणजे

तिनें महाराजांस, उठा दर्शन द्या, असें म्हणावें. म्हणज महाराज तयार. मूळची स्त्रीजात, व महाराजांसारखें रत्न हातांत आल्यावर मग सुंदराबाईच्या आढ्यतेचें काय वर्णन करावें !'

एकदां एका भक्तानें समर्थांपुढें पंचवीस रुपये ठेवले सुंदराबाईनें ते तत्काळ उचलून घेतले. समर्थांनीं ते पैसे चोळप्पाला देण्यास सुंदराबाईला सांगितलें. परंतु ती अळंटळं करूं लागली. तेव्हां समर्थांनीं आपला जोडा तीन वेळां तिच्या डोक्यावर मारला तेव्हां बाईनें रागानें चोळप्पापुढें पैसे फेकून दिले.

अशाप्रकारें सुंदराबाईचा मस्तवालपणा फारच वाढूं लागला तर समर्थ तिलाहि शिक्षा करीत. परंतु तिनें आपला लोभी व मत्सरी स्वभाव शेवटपर्यंत कांहीं बदलला नाहीं. सर्वच सेवेकऱ्यांना तिनें नकोजीव करून टाकलें. एकदां भुजंगा वाण्याचें व तिचें भांडण झालें. तेव्हां भुजंगानें बाईस अर्वाच्य शिव्यांची लाखोली वाहिली. त्यामुळें तिनें आकान्त मांडून जीव देण्याची तयारी चालविली. हें वृत्त समर्थांना कळतांच त्यांनीं तिला सेवेकऱ्यांमार्फत दोन तीन बोलावणीं पाठविलीं. परंतु ती राजकारणी बाई इतक्या थोड्या बोलावण्यांनीं कसची येते ? शेवटीं समर्थ स्वतः गेले व त्यांनीं बाईस जीव देण्याचें कारण विचारलें. त्यावर भुजंगानें आपणांस बीभत्स शिव्या दिल्या असें बाईनें सांगतांच समर्थ म्हणाले, 'अगे, जसे भिंतीस कोनाडे असतात, खुंट्या असतात, **त्याप्रमाणें शरीरास उंचनीच अवयव असतात. त्यासंबंधानें कोणी कांहीं बोललें तर तें मनांत आणूं नये.**' अशी समजूत काढून समर्थांनीं तिचा हात धरून तिला परत घरांत आणलें.

त्यानंतरहि सुंदराबाईचीं व इतर सेवेकऱ्यांचीं भांडणें सुरूच होतीं. विशेषतः बाळप्पांचीं व तिचीं भांडणें जास्त प्रमाणांत होत होतीं. या तिच्या भांडखोर व मत्सरी स्वभावामुळे ती

सर्वांनाच अप्रिय झाली होती. तेव्हां तिला समर्थांच्या सेवेंतून दूर करावें अशा अर्थाचे अर्ज प्रजेनें मामलेदार व कारभारी यांचेकडे केले. परंतु सुंदराबाईचा राणीजवळ मोठा वशिला असल्यामुळें ते सर्व अर्ज टोपलींत गेले ! तेव्हां लोकांनीं कलेक्टर, गव्हर्नर यांचेकडे तक्रारी केल्या. त्यांनीं याबाबत चौकशी करून बाईस काढून टाकून पंचांची नेमणूक करावी असा हुकूम कारभाऱ्यांना सोडला.

त्यावेळीं नानासाहेब बर्वे हे अक्कलकोटचे कारभारी होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून बाईस काढून टाकण्याचा हुकूम तर आला परतु तो अंमलांत आणण्याची नानासाहेबांची छाती होईना. कारण बाई समर्थांच्या लोभांतील आहे हें त्यांना ठाऊक होतें !

त्यादिवशीं नानासाहेब नेहमींप्रमाणें समर्थांच्या दर्शनास आले. तेव्हां समर्थांनीं एकच मार्मिक वाक्य उच्चारलें, '**काय रे असेंच काम करतोस का ?**'

तें ऐकून नानासाहेब मनांत उमजले व दुसऱ्या दिवशीं पोलीस व फौजदारांना त्यांनीं बाईस समर्थांपासून दूर करण्यास पाठविलें. फौजदारांनीं कलेक्टरसाहेबांचा हुकूम बाईस वाचून दाखविला व समर्थांपासून चालतें होण्यास सांगितलें. परंतु बाई तेथून हालेना. तिनें समर्थांजवळ हें गाऱ्हाणें नेलें. परंतु समर्थांनीं मुखांतून एक शब्दहि काढला नाहीं. तेव्हां बाईनें डोकें फोडून प्राण देण्याची धमकी दिली. परंतु समर्थांचा बाईला पाठिंबा नाहीं हें पाहून फौजदारानें बाईस जरब दिली तेव्हां बाई निरुपायानें तेथून निघून गेली.

त्यानंतर तिच्या घराची झडती घेतां हरभरे, तेल, धान्य, लुगडीं यांचा ढीग पोलिसांना सांपडला. पेढे-बर्फीचीं ताटेंच्या ताटें कुजून चाललीं होतीं ! हा सर्व माल पोलिसांनीं जप्त करून त्याचा लिलांव केला.

अशा प्रकारें सुंदराबाईची कलंकित कारकीर्द एकदांची संपली व सर्वांनीं सुटकेचा निःश्वास सोडला.

## बैरामजीशेठ

नळदुर्ग येथें बैरामजीशेठ नांवाचा एक पारशी गृहस्थ तालुकदाराच्या हुद्द्यावर होता. तो मोठा चमत्कारिक व अतिशय नास्तिक म्हणून प्रसिद्ध होता.

एकदां केसे सराटी या गांवीं श्रीसमर्थांची स्वारी आली असतां बैरामजीच्या हाताखालील कारकुनांनीं तिकडे जाण्यासाठीं त्याचेकडे रजा मागितली. तथापि रजा देणें तर दूरच, परंतु बैरामजी उलट त्यांचेवर चिडून म्हणाला, 'मूर्खांनो, अरे मनुष्याचें दर्शन घेऊन कधीं कुणाचें भलें झालें आहे का ? शहाण्या मनुष्यानें संन्याशाचे पाय तर कधींहि धरूं नयेत !'

अशा प्रकारें अधिकारमदानें उन्मत्त होऊन त्यानें श्रीसमर्थांचीदेखील यथेच्छ निंदा करावयास कमी केलें नाहीं ! त्यामुळें कारकुनांना परमावधीचें दुःख झालें. परंतु सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं ! ते बिचारे श्रीसमर्थांच्या महन्मंगल नांवाचा जप करीत स्वस्थ बसले.

परंतु त्यांची अडचण जाणून समर्थच अचानकपणें नळदुर्गास प्रकट झाले ! त्यामुळें सर्व कारकुनांनीं काम संपल्यावर समर्थांकडे धांव घेतली. दत्तावधूतांचें दर्शन घेऊन ते तृप्त अंतःकरणानें आपापल्या बिऱ्हाडीं परतले.

परंतु दुष्ट बैरामजीला ही बातमी समजतांच त्याच्या तळपायाची आग मस्तकांत गेली ! त्यानें समर्थांच्या दर्शनाला गेल्याबद्दल दुसऱ्या दिवशीं सर्वांना दण्ड ठोठावला ! तेव्हां मात्र कारकून चिडले ! 'आमच्या खाजगी गोष्टींत ढवळाढवळ कर-

घ्याचा आपणांस कांहींच अधिकार नाहीं. पाहिजे तर आमचा राजिनामा घ्या.' असें सर्वांनीं निक्षूनपणें बैरामजीस सुनविलें.

कारकुनांची ती एकजूट पाहून बैरामजी नरमला व त्यानें कारकुनांशीं सामोपचाराची बोलणीं सुरू केलीं! तेव्हां कारकुनांनीं त्याला म्हटलें, 'आपण स्वामीसमर्थांचें एकवार स्वतः दर्शन घ्या आणि मग त्यांचेविषयीं काय तें मत ठरवा!'

ही गोष्ट बैरामजीस पटली व तो कारकुनांबरोबर समर्थांच्या दर्शनास गेला. परंतु समर्थांची व त्याची दृष्टादृष्ट होतांच त्याचें सर्वांग थरथरूं लागलें आणि तो गर्भगळित होऊन जमिनीवर आडवा पडला.

तेव्हां समर्थांनीं उग्र मुद्रेनें त्याच्याकडे पहात त्याचीं एकएक पापें त्याच्यासमोर उघडीं करावयास सुरुवात केली आणि मग शेवटीं विचारलें, 'तुमच्या धर्मशास्त्रांत असेंच वागण्यास तुम्हाला सांगितलें आहे का?'

यावर बैरामजी कांय बोलणार? त्यानें श्रीसमर्थांची क्षमा मागितली व कचेरी बंद ठेवून तो अहर्निश स्वामीचरणांशींच लीन होऊन बसून राहिला.

पुढें एक दिवस त्यानें आपणांस उपदेश देण्याची समर्थांना प्रार्थना केली त्याचा फारच आग्रह पाहून समर्थांनीं त्यास पुढील उपदेश केला—

**कधीं करूं नये जीव-हिंसा। विनास्वार्थ दुसऱ्यासि पीडूं नये सहसा। मोठा अधिकार संपत्ति यांचा भरंवसा। चिरकालींचा मानूं नये॥ पक्षापक्ष निंदा द्वेष त्यागून। सत्य न्यायधर्म मार्गें असावें सद्वर्तन। सर्वदा करावें परमेश्वर-भजन। दुर्व्यसन कोणतेंहि नसवें॥ असावा योग्यायोग्य सारासारविवेक। अतीत अभ्यागतासि अर्पावें अन्नोदक। स्वहित न्यायार्जित धनें अबाधक। साधावें**

धरहित अवश्य तें ।। बांधावे परोपकारार्थ वापी कूप तडाग । धर्मशाला विश्राम पथिकांसि उपभोग । जगीं सत्कीर्ति वाढवूनि देहत्याग । होतां ईश्वर पावतो शुद्ध भक्तीनें ।। सर्व धर्मांचें हेंचि उपदेश रहस्य जाणावें । प्रपंच परमार्थ साधूनि बंधमुक्त व्हावें । दया क्षमा शांतीसह शुद्धचित्त असावें । जन्माचें सार्थक होतें तेणें ।।

पुढें या उपदेशाप्रमाणें वैरामजीनें आपलें आचरण सुधारलें व उर्वरित आयुष्यांत श्रीसमर्थांची निःस्सीम सेवा करून स्वतःचा उद्धार करून घेतला.

## क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके

साहित्यसम्राट न. चिं. केळकर लिहितात, 'नानासाहेब पेशव्यानतर ज्यांचें नांव घेतांच इंग्रज कावरेबावरे होत असे फडके हेच प्रथम झाले. 'वासुदेव बळवंत' हे शब्द टिळकपूर्वक काळांत राष्ट्रीय स्फूर्तीचे शब्द समजले जात.'

सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर भारतीय स्वातंत्र्याचें ध्येय स्पष्टपणें डोळ्यांसमोर ठेवून, ब्रिटिशांचें राज्य उलथून पाडण्यासाठीं सशस्त्र राज्यक्रांति करून पहिली चढाई वासुदेव बळवंतांनींच केली. त्यामुळें अर्वाचीन काळांतील 'आद्य क्रांतिकारक' असा त्यांचा सार्थ गौरव केला जातो.

वासुदेव बळवंतांना स्वातंत्र्याचा एकच ध्यास लागला होता. परदास्याच्या शृंखला कडाकड तोडण्यासाठीं सारा महाराष्ट्र त्यांनीं आपल्या ओजस्वी व त्वेषपूर्ण भाषणांनीं खडबडून जागा करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या हांकेला आशादायक प्रतिसाद मिळाला नाहीं ! आणि हा स्वातंत्र्यवेडा वीरपुरुष कांहींसा निराश झाला ! परंतु त्यानें प्रयत्न सोडला नाहीं.

## दत्तभक्त फडके

श्री. फडके यांचे चरित्रकार श्री. वि. श्री. जोशी आपल्या पुस्तकांत पृष्ठ ७० वर लिहितात, 'श्रीदत्त हें वासुदेव बळवंतांचें आराध्यदैवत होतें. त्याच्या श्रीपादवल्लभ नामक ध्यानाचें चित्र कसर इत्यादींमुळें वाईट होऊं नये म्हणून तुरटीच्या पाण्यांत वाळवून सिद्ध केलेल्या कागदावर त्यांनीं एका चित्रकाराकडून काढून घेतलें होतें. दत्ताच्या रौद्र ध्यानाचें हें चित्र उठावणीसाठीं बाहेर पडेपर्यंत त्यांच्या बिऱ्हाडांत प्रमुखपणें दिसत असे. त्याची पूजा केल्यावांचून आणि गुरुचरित्राच्या पोथीचा अध्याय वाचल्यावांचून वासुदेव बळवंत अन्नग्रहण करीत नसत. त्यांच्या काळीं मुद्रणकला तितकी सुलभ नव्हती. अशा काळांतहि दत्तगुणवर्णनपर ग्रंथांचें प्रकाशन वासुदेव बळवंतांनीं अंगावर घेतलें, हें त्यांच्या जहाल दत्तभक्तीचेंच द्योतक होतें.'

त्यांची वृत्ति तरुणपणापासूनच निवृत्तिमार्गाकडे वळलेली होती. त्यांनीं मंत्रसिद्धीसाठींहि उग्र तपस्या केल्याचें दिसून येतें. त्यांच्या सततच्या ध्यानमग्न वृत्तीमुळें त्यांच्या आजूबाजूचे लोक कित्येकदां चकित होऊन जात !

इंग्रज सरकारविरुद्ध त्यांच्या मनांत प्रथमपासूनच राग होता. आपल्या आजारी आईला भेटण्यासाठीं त्यांना शिरढोणला जाणें आवश्यक होतें. परंतु ते जेथें नोकरीस होते तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्यांची रजा नामंजूर केली. हें घडेपर्यंत दोन चार दिवस गेले. वासुदेव बळवंत तसेच डोंगर–पठारें तुडवीत प्रक्षुब्ध मनःस्थितींत शिरढोणला पोहोंचले. परंतु त्यांची आई जग सोडून गेली होती ! हें केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं आकसानें रजा नामंजूर केल्यामुळेंच घडलें होतें व तेव्हांपासून इंग्रजांचा सड

घेण्याचे विचार फडक्यांच्या मनांत घोळूं लागले. पुढें सार्वजनिक सभेंतील न्या. रानडे यांचीं स्फूर्तिदायक भाषणें, सार्वजनिक काकांची देशभक्तीची शिकवण, १८७६ च्या भयानक दुष्काळाचीं प्रक्षोभक दृश्यें इत्यादि गोष्टींमुळें फडके सशस्त्र क्रांतीसाठीं उद्युक्त झाले आणि त्यांनीं शूर रामोशी लोकांना हाताशीं धरून इंग्रजां-विरुद्ध बण्डाचें निशाण उभारलें.

**तत्पूर्वी आपल्या अंगीकृत कार्यास दैवी अधिष्ठान लाभावें** यासाठीं फडके अक्कलकोटास गेले. त्याकाळांत श्रीस्वामीसमर्थांच्या कीर्तीचा परिमल सर्वदूर पसरला होता. श्री. फडके हे भाविक असल्यामुळें साधुसंतांच्या दर्शनाची आवड त्यांना प्रथमपासूनच होती. श्रीस्वामीसमर्थांच्या दर्शनासाठीं ते यापूर्वीहि दोन वेळां अक्कलकोटास गेले होते असें म्हणतात.

परंतु यावेळीं त्यांना श्रींचें नुसतेंच दर्शन नको होतें. इंग्रजां-विरुद्ध उभारलेल्या सशस्त्र बंडांत श्रींचे परममंगल, परमसामर्थ्य-शाली आशीर्वाद त्यांना हवे होते !

अक्कलकोटास आल्यानंतर त्यांनीं अत्यंत भक्तिभावानें श्रीसमर्थांच्या अजानुबाहु दिव्य मूर्तीचें दर्शन घेतलें व आपली तेजस्वी तलवार श्रींच्या पुढ्यांत ठेवून ते तेथें जवळच बसून राहिले. श्रींनीं अंतर्ज्ञानानें आपला हेतु जाणून ती तलवार स्वह-स्तानें आपणांस द्यावी अशी त्यांची इच्छा होती.

परंतु '**अभी वखत नहीं**' एवढेच सूचक उद्गार काढून श्रीसमर्थांनीं सेवेकऱ्यांमार्फत फडक्यांची तलवार तरटीच्या झाडावर ठेवून दिली ! फडके कांहीं वेळ तेथें बसून होते. परंतु श्रींनीं ती तलवार स्वहस्तें त्यांना दिली नाहीं ! तसें घडतें तर भारतवर्षाला स्वातंत्र्याची पहांट पूर्वीच दिसती ! परंतु प्राप्त घडी आल्या-

शिवाय क्षुल्लक गोष्टीहि प्राप्त होऊं शकत नाहींत तेथें देश कसा स्वतंत्र होणार ?

थोडा वेळ वाट पाहून फडके उठले. त्यांनीं श्रीसमर्थांना वंदन केलें व झाडावरची तलवार स्वतःच काढून चालते झाले.

त्यानंतरचा इतिहास सर्वविश्रुत आहे. इंग्रजांना सळो कीं पळो करून सोडणारा हा झुंजार वीर कल्लदगी जिल्ह्यांत बेळगांव आणि कोल्हापूर यांच्यामध्यें मेजर डॅनिअल याला बेसावध व तापानें फणफणलेल्या अवस्थेंत सांपडला. मेजर डॅनिअलला त्यांनीं द्वंद्वयुद्धाचें आव्हान दिलें. परंतु डॅनिअलनें तें स्वीकारलें नाहीं. त्यानंतर त्यांच्यावर खटला भरण्यांत येऊन त्यांना भीषण जन्म-ठेपेची शिक्षा झाली. परंतु एडन येथूनहि ते तुरुंग फोडून निसटले. पण दुर्दैवानें पकडले गेले व तेथेंच १७ फेब्रुवारी १८८३ या दिवशीं त्यांचें दुःखद निधन झालें.

## गोसाव्यास द्वारकाधिशाचें दर्शन !

एकदां एका गोसाव्यास जलोदराची व्याधि उत्पन्न झाली. परंतु शरीर मजबूत असल्यामुळें त्यानें प्रथम कांहीं दिवस तिकडे लक्ष दिलें नाहीं. परंतु थोड्याच दिवसांत रोग बळावत चालला व त्याचें पोट दिवसेंदिवस फुगत चाललें. अन्नावरची वासना उडाली व भयंकर अशक्तपणा वाटूं लागला. त्यामुळें रोजची भिक्षा मिळ-विण्यासाठीं चार घरें फिरणेंहि त्याला अशक्य होऊन बसलें.

प्रस्तुत गोसाव्याच्या मनांत द्वारकेस जाऊन द्वारकाधिशाचें दर्शन घेण्याची इच्छा पुष्कळ वर्षांपासून होती. तसें कृष्णभक्तीचें वेड त्याला लहानपणापासूनच होतें. भक्ति एका विशिष्ट पायरी-पर्यंत पोहोंचली कीं, आपल्या उपास्य दैवताच्या साक्षात्काराची आस भक्ताच्या मनांत साहजिकच निर्माण होते. त्याप्रमाणें त्या

गोसाव्यासहि कृष्णदर्शनाची विलक्षण ओढ लागून राहिली होती. परंतु हें जमावें कसें ? ईश्वरदर्शन ही कांहीं इतकी सहजसुलभ गोष्ट नाहीं तपेंच्या तपें, जन्मच्या जन्म त्यासाठीं साधना करायला हवी.

तो बिचारा हेच विचार मनांत घोळवीत कसाबसा गाणगापुरास येऊन पोहोंचला. त्या ठिकाणीं त्याला अक्कलकोटास कुणी एक अवतारी विभूति प्रगट झाल्याची बातमी समजली. ती ऐकून त्या दत्तावधूतांचें दर्शन घेण्याची तीव्र इच्छा त्याच्या मनांत निर्माण झाली व तो तसाच अक्कलकोटास आला.

त्यावेळीं श्रीसमर्थांची स्वारी नव्या विहिरीजवळ आनंदानें बालक्रिडा करीत होती. त्यांचे आसपास अनेक सेवेकरी व दर्शनेच्छूंची गर्दी होती. तो गोसावी तपास करीत करीत तेथें येऊन पोहोंचला. त्याला पाहातांच समर्थ सेवेकऱ्यांकडे पहात म्हणाले, 'अरे त्यास वाट करून द्या.' सेवेकऱ्यांनीं चट्कन् उठून त्या गोसाव्याचा हात धरून त्यास समर्थांकडे आणलें.

समर्थांचें तें दिव्य रूप पाहून त्या गोसाव्यानें अत्यंत भक्तिभावानें त्यांना प्रणिपात केला.

तेवढ्यांत समर्थ हंसून म्हणाले,' गोसावीबुवा, तुमची द्वारकाधिशाच्या दर्शनाची इच्छा पुरी होईल बरें.'

आपल्या मनांतील इच्छा यतिरायांनीं अचूक ताडलेली पाहून त्या गोसाव्याच्या मनांत विचार आला कीं, हे साक्षात् दत्तावतारच असले पाहिजेत.

समर्थ तत्काळ म्हणाले, 'आम्ही कुणीहि असूं. त्याचेशीं तुला काय करायचें ? तूं त्या कडुलिंबाचीं पानें खाऊन गप्प बैस.'

समर्थांची आज्ञा प्रमाण मानून त्यानें समोरच्या कडुलिंबाचीं पानें तोडून तोंडांत टाकलीं. परंतु तीं अतिशय कडू लागल्यामुळें

त्यानें लागलीच थुंकून टाकलीं.

तेव्हां समर्थ हंसून म्हणाले, 'अरे, त्या दुसऱ्या फांदीचीं पानें खा !'

त्याप्रमाणें त्यानें दुसऱ्या फांदीचीं पानें तोडून खावयास सुरुवात केली. तीं पानें त्यास साखरेसारखीं गोड लागलीं. तेव्हां त्यानें आणखी पानें तोडून मोठ्या चवीनें खावयास सुरुवात केली. तें पाहून इतर सेवेकऱ्यांनीहि पानांवर ताव मारला !

पुढें आश्चर्य असें कीं, तीनच दिवसांत त्या गोसाव्याचा जलोदर साफ बरा झाला व प्रकृति सुधारून त्यास हुषारी वाटूं लागली

त्यामुळें आनंदित होऊन तो पुन्हां समर्थांच्या दर्शनास आला.

त्यावेळीं यतिरायांची स्वारी उत्तमासनावर विराजमान झाली होती श्रीवामनबुवा लिहितात– 'मैंदर्गीचा पाण्डुरंग सोनार मोत्यांचीं कुण्डलें घेऊन आला होता. तीं कुण्डलें अत्यंत मनोहर दिसत होतीं. स्वामीसमर्थांच्या कर्णांत तीं त्यानें स्वतःच घातलीं. त्यावेळीं समर्थांच्या कंठांत रौद्र स्फटिक अन् प्रवाळांच्या माला प्रकाशत होत्या. अंगाला दिव्य सुगंधाची उटी लावली होती. भालप्रदेशावर अष्टगंध रेखलें होतें. पुष्पहार, श्रीफल, कर्पुरादि घेऊन लोक समर्थपूजेसाठीं तिष्ठत राहिले होते.'

तो गोसावी त्या परमहंस यतिरायांसमोर नमस्कार करून विनम्रपणें उभा होता. तेवढ्यांत समर्थांनीं आपलें रूप पालटलें. आणि समर्थांच्या जागीं त्याला भगवान् श्रीकृष्णाची घनःशाम सुंदर मूर्ति दिसूं लागली. त्या चतुर्भुज, तेजस्वी सांवळ्या श्रीरंगानें कंठांत वनमाला धारण केल्या होत्या. हातांत आयुधें होतीं. मुकुटावर मोरपिसें शोभत होतीं. मुखमंडलाभोवतीं पौर्णिमेच्या चांदण्या-

प्रमाणें शांत, आल्हाददायक तेज पसरलें होतें.

त्या सांवळचा 'परब्रह्मा' कडे पहात असतां गोसाव्याचें देहभानच हरपलें !

तेवढ्यांत श्रीसमर्थांनीं आपलें मूळरूप धारण केलें आणि गोसावी एखाद्या विलक्षण स्वप्नांतून जागें व्हावें त्याप्रमाणें हळूहळूं भानावर आला. त्याचवेळीं दुसरा एक चमत्कार घडून आला. तो असा—समर्थांच्या कानांतील सुवर्ण कुण्डलें जाऊन त्याजागीं दगडाचीं कुंडलें दिसूं लागलीं ! तें दृश्य पाहून सर्वांसच अतिशय नवल वाटलें. नंतर सेवेकऱ्यांनीं तीं दगडीं कुण्डलें काढून त्याजागीं पुन्हां सोन्याचीं कुण्डलें घातलीं !

## चोहोंकडे जाहलें पाणी पाणी

एकदां अक्कलकोटास पावसाअभावीं पिकें वाळूं लागलीं. त्यामुळें शेतकरी चिंतातुर झाले व त्यांनीं ही हकीकत समर्थांच्या कानांवर घातली. तेव्हां समर्थ म्हणाले. '**पर्जन्यसूक्त आणि रेणुका-सहस्रनामाचे पाठ करा.**' त्याप्रमाणें चोळप्पानें बावडेकर पुराणिकांना सांगून लागलीच तशी व्यवस्था करविली.

त्यानंतर दोन तीन दिवसांनीं स्वामीसमर्थ आपल्या सेवकां-सह तीन कोसांवर असलेल्या जेऊर गांवीं गेले. तेथील शंकराच्या देवळांत जाऊन समर्थांनीं शिवलिंगाकडे पाहून, '**तुम्ही वृष्टि कां करवीत नाहीं ?**' असें रागानें विचारलें. तेथून ते वळसंग नांवाच्या दुसऱ्या गांवाकडे गेले. तेथल्या ग्रामस्थांनींहि 'पाऊस केव्हां पडेल' असा प्रश्न समर्थांना केला. समर्थ कांहीं न बोलतां सर्व लोकांसह तेथील शिवमंदिरांत गेले व शिव्यांचा भडिमार करीत त्यांनीं शिव-पार्वतींना विचारलें, '**तुम्हांला हरभरे हवेत काय ?**' असें म्हणून त्यांनीं हरभरे मागविले व स्वहस्तानें ते सर्व देवांवर उडविले.

त्याच वेळीं प्रचंड वारा सुटला व आकाशांत विजांचा चमचमाट होऊन काळे ढग जमूं लागले आणि थोड्याच वेळांत मुसळधार सरी कोसळूं लागल्या. त्या पर्जन्यवृष्टीमुळें आजूबाजूच्या पंचवीस कोसांतील जमीन भिजून निघाली व सर्वत्र आनंदीआनंद झाला !

## अन्नपूर्णेनें दिधलीं सकल सिद्धान्नें

एकदां स्वामीसमर्थांची स्वारी ऐळमेल्लीहून निघून कोनळी गांवाजवळच्या रानांतून अक्कलकोटाकडे निघाली होती. त्यांच्याबरोबर बरेच सेवेकरी होते. समर्थ कोठेंहि निघाले तरी एखाद्या राजाप्रमाणें त्यांचें वैभव असे !

'समागमें एक शत सेवेकरी । गोवृषभ अश्वादिक होते ॥' असें या प्रसंगाचें वर्णन वामनबुवा ब्रह्मचारी करतात.

ऐळमेल्लीहून दोन-अडीच कोस गेल्यावर सूर्यास्त झाला. वाट मोठी अडचणीची व कांट्याकुट्यांनीं भरलेली. सेवेकरी भुकेनें व तहानेनें व्याकुळ झालेले. त्यामुळें एक पाऊलहि पुढें टाकण्याचें त्राण त्यांच्या शरीरांत राहिलें नव्हतें. परंतु समर्थांना 'थांबा' असें सांगण्याची कुणाची प्राज्ञा होती ? समर्थांच्या रुद्रावताराची सर्वांना पुरेपूर कल्पना असल्यामुळें सर्वजण निमूटपणें समर्थांच्या पाठोपाठ चालले होते.

परंतु त्यांच्यांत श्रीपादभट नांवाचा एक अल्पवयी सेवेकरी होता. तरुण वय असल्यामुळें वृत्ति थोडीशी बंडखोरच होती. तो पुढें जाऊन समर्थांच्या वाटेवरच पडून राहिला आणि समर्थांना म्हणाला,

समर्थांसि म्हणे मी लेकरूं लहान ।
आम्ही सर्व क्षुधातुर अन्नाविण ।

आमचे घेऊनि जीव प्राण ।
करावें गमन वाटेल तिकडे ॥

श्रीपादभटाचे तें बोल ऐकून समर्थ हंसले. सेवेकऱ्यांचे हाल पाहून त्यांचाहि जीव कळवळला आणि त्यांनीं एका शेतांत मुक्काम ठोकला. कांहीं सेवेकऱ्यांनीं अर्ध्या कोसावरून पाणी आणलें व समर्थांना कांहीं फलाहारहि दिला.

तेवढ्यांत समर्थांनीं सर्व सेवेकऱ्यांना पलीकडच्या आम्रवृक्षा-कडे भोजनासाठीं जाण्यास सांगितलें. परंतु तें कुणासच खरें वाटेना. समर्थ आपली चेष्टा करीत असावेत असेंच बहुतेकांना वाटलें.

परंतु श्रीपादभट व परशुराम हे सेवेकरी मात्र श्रीसमर्थ-वचनावर पूर्ण विश्वास ठेवून त्या आम्रवृक्षाकडे गेले.

तों त्या ठिकाणीं एक वृद्ध सुवासिनी उभी होती. तिला नमस्कार करून श्रीपादभटानें तिची विचारपूस सुरू केली. तेव्हां ती सुवासिनी म्हणाली, 'आज या शेतांत आमची कांहीं मंडळी भोजनासाठीं यावयाची होती. परंतु ती अजून आलेली नाहींत व आतां येतील असें वाटतहि नाहीं. तेव्हां हें सर्व अन्न तुम्हांला हवें असेल तर आनंदानें घेऊन चला.'

श्रीपादभट व परशुराम या दोघांनाहि तें भाषण ऐकून विल-क्षण आश्चर्य वाटलें. ही समर्थांचीच लीला असावी याबद्दल कुणा-च्याहि मनांत संदेह उरला नाहीं. नंतर त्या सुवासिनीजवळचें सर्व अन्न घेऊन ते दोघे मोठ्या आनंदानें समर्थांजवळ आले. समर्थांनीं सर्वांना पत्रावळी लावण्यास सांगितलें. नंतर मशाली लावून सर्वांनीं भोजन उरकलें.

अशाप्रकारें त्या दिवशीं प्रत्यक्ष अन्नपूर्णेनेंच येऊन समर्थांच्या सेवेकऱ्यांची भोजनाची सोय केली !

श्रीस्वामीसमर्थांचा संचार अशाप्रकारें वाटेल तेव्हां व वाटेल त्या गांवीं होत असे. त्यांना सोंवळ्याओंवळ्याचें बंधन नसल्यामुळें वाटेल त्याच्या हातचें जेवण चालत असे. त्यांच्या ठायीं सर्वभूतीं समभाव दिसून येत असे. ते रस्त्यानें कसे चालत याविषयीं वामनबुवांनीं मोठें मजेदार वर्णन करून ठेवलें आहे. ते लिहितात, 'चालतां चालतां ते एखाद्या वृक्षास मिठी मारीत. मार्गांतील झाडांवरून व दगडांवरून हळुवार पाय फिरवून 'काय पाहिजे' असें विचारीत. रस्त्यानें स्वतःशीच बोलत व हंसत. त्यांना अधूनमधून गुडगुडी ओढण्याची लहर येई. हंसतांना त्यांचें सर्वांग हलत असे. कुणाच्याहि मनांतील प्रश्न ओळखून त्याचें उत्तर देण्याचा खेळ तर सारखा चालू असे. मधूनच त्यांचे मुखांतून वेदमंत्र, श्लोक, दोहरे व अभंग बाहेर पडत. स्वारी नित्य ब्रह्मानंदांत निमग्न असे.'

## पुष्पासारिखे सूक्ष्म झाले

एकदां स्वामीसमर्थ खेड मणुराहून अक्कलकोटास येत होते. समर्थ बहुतेक मेण्यांतूनच प्रवास करीत. त्यांचा मेणा उचलण्यास सहा माणसें लागत, असा उल्लेख वामनबुवांच्या 'गुरुलीलामृतांत' आढळतो. (अध्याय ५४ ओ. ९१) समर्थ खेड मणुऱ्याहून मेण्यांत बसून निघाले. त्यावेळीं त्यांचा मेणा सहा ब्राह्मणांनीं उचलला होता

परंतु मुसळधार वृष्टि होऊन गेल्यामुळें रस्ता चिखलानें भरून गेला होता. तरीपण त्या निष्ठावन्त सेवेकऱ्यांनीं तशा बिकट मार्गानेंहि तीन कोस मेणा वाहून नेला. तें पाहून शेवटीं यतिरायांनाच त्यांची दया आली व ते मेण्यांतून खालीं उतरले. तेव्हां सेवेकऱ्यांनीं त्यांचेसाठीं एक लहान घोडा आणविला व समर्थ त्यावर आरूढ झाले.

परंतु घोडा आधींच लहान व त्यांत समर्थांची उंची भरपूर, त्यामुळें समर्थांचे पाय जमिनीला लागूं लागले !

तें पाहून सेवेकऱ्यांनाच कसेंतरी वाटूं लागलें व त्यांनीं समर्थांना हात जोडून म्हटलें, 'महाराज, आपण पुष्पासारखें सूक्ष्म होऊन मेण्यांत बसावें. मग आम्ही या चिखलांतहि आनंदानें मेणा चालवतों.'

तें ऐकून समर्थ पोट धरून हंसूं लागलें आणि घोड्यावरून उतरून पुन्हा मेण्यांत जाऊन बसले. आतां परमहंस स्वामीसमर्थांनीं आपलें शरीर फुलासारखें सूक्ष्म बनविलें होतें. योग्यांना जसें शरीर हवें तेवढें मोठें व जड बनवितां येतें तसेंच तें मुंगीसारखें सूक्ष्महि बनवितां येतें. अणिमा व महिमा सिद्धींच्या द्वारें हा चमत्कार घडूं शकतो.

समर्थांचा जयजयकार करीत त्या सहा जणांनीं मग तो मेणा अगदीं फुलासारखा वाहून नागणसूर गांवापर्यंत आणला.

नागणसूरकरांना समर्थ आल्याची सुवार्ता समजतांच त्यांच्या दर्शनासाठीं सर्वांनीं एकच गर्दी केली. दुसऱ्या दिवशीं नागणसुराहून समर्थांनीं आपला मुक्काम वाडी येथें हलविला तेथें धान्यादिक वस्तु मिळत नसल्यानें सर्वांनीं बाजरी भरडून तीच शिजवून खाल्ली.

दुसऱ्या दिवशीं सर्व सेवेकऱ्यांनीं अन्नधान्याची ही अडचण समर्थांना निवेदन केली. तेव्हां समर्थ हंसून म्हणाले, 'चांगलीं पक्वान्नें घेऊन एक भक्त लवकरच येतो आहे. तुम्ही निश्चित रहा !'

इतक्यांत केज धारूरचे देशपांडे सहकुटुंब तेथें आले व त्यांनीं समर्थांना प्रणिपात करून लगेच स्वयंपाक तयार केला व शंभर पानें मांडलीं. तें मिष्टान्न खाऊन सर्व सेवेकरी तृप्त झाले व त्यांनीं समर्थांची नानाप्रकारें स्तुति केली.

## चोळप्पांचें निधन

त्याच वेळीं गांवांत कॉलऱ्याचा उपद्रव सुरू होता. समर्थभक्त चोळप्पाला त्यारात्रीं भयंकर ताप भरला. सर्व मंडळी त्यामुळें घाबरून गेली व त्यांनीं यतिरायांना ही हकीकत सांगितली. चोळप्पाच्या मृत्यूचें भविष्य समर्थांनीं पूर्वींच वर्तविलें होतें. परंतु चोळप्पावर समर्थांची विलक्षण प्रीति होती. त्यामुळें चोळप्पाची ती दारुण स्थिति पाहून समर्थांनाहि गलबलून आलें. त्यांनीं चोळप्पांचा ज्वर स्वतःकडे घेतला. त्यामुळें ती रात्र कशीबशी निघाली.

श्रीसमर्थ चोळप्पासाठीं काय हवें तें करून घेतील असें भय वाटूनच कीं काय, मंडळींनीं दुसऱ्या दिवशीं सूर्योदय होतांच नानासाहेब देशपांडे केजकर यांची गाडी मागवून समर्थांना अक्कलकोटीं पोंचविलें.

समर्थ जातांच इकडे चोळप्पाचा ज्वर वाढूं लागला आणि समर्थांच्या त्या लाडक्या भक्तानें समर्थांचा धांवा करतां करतांच देहत्याग केला. ही दुःखद घटना आश्विन शुक्ल नवमी शके १७९९ या दिवशीं घडून आली.

चोळप्पाचें पुण्य थोर म्हणून समर्थ चरणांची अखण्ड सेवा करण्याचें महद्भाग्य त्याला लाभलें. स्वामीसमर्थांची मूर्ति निरंतर हृदयांत सांठवून त्यानें समर्थ सेवेसाठींच आपला देह जन्मभर झिजविला. कपट त्यास कसें तें ठाऊकच नव्हतें. त्याच्याविरुद्ध अनेकांनीं समर्थांकडे गाऱ्हाणीं नेलीं. परंतु त्याच्या शुद्ध भक्तीची ओळख समर्थांना पटली होती. त्यामुळें त्यांनीं नेहमीं चोळप्पाचीच बाजू घेतली.

अखेरच्या क्षणीं चोळप्पाला श्रीसमर्थांचें दर्शन घडूं शकलें

नाहीं. परंतु सेवेकऱ्यांनीं मोठ्या युक्तीनें समर्थांचें चरणतीर्थ मिळवून तें त्याच्या मुखांत घातलें.

चोळप्पानें श्रीसमर्थांच्या समाधीची जागा आपल्या घरांत त्यापूर्वी कांहीं दिवस तयार केली होती. त्यावेळेस श्रीसमर्थांनीं चोळप्पास विचारलें होतें, '**चोळ्या, हें काय करतोस रे**'

'कांहीं नाहीं महाराज.' चोळप्पा ओशाळून म्हणाला होता.

परंतु समर्थांनीं त्याचें वर्म जाणून म्हटलें होतें, '**चोळ्या, यांत अगोदर तुला घालीन. मग मी जाईन बरें.**'

त्याप्रमाणें चोळप्पास समर्थांच्या अगोदर प्रयाण करावें लागलें आणि त्यानंतर सहा महिन्यांनीं स्वतः श्रीसमर्थहि समाधिस्थ झाले !

---

प्रकरण : ११ वें

# चिपळूण बखरींतील हकीकत

( श्रीसमर्थांच्या चिपळूण येथील मठांत श्रीगोपाळबुवा रामचंद्र केळकर या समर्थभक्तांनीं लिहिलेली त्याकाळची एक जुनी बखर आहे असें समजल्यावरून आम्हीं चिपळुणास जाऊन ती बखर संपूर्ण वाचून काढली. प्रस्तुत बखरींत जी नवीन व अप्रसिद्ध माहिती आढळून आली तेवढीच या प्रकरणांत समाविष्ट केली आहे. )

श्री. गोपाळ रामचंद्र केळकर हे राजापूरकडील राहणारे असून रेल्वेंत नोकरीस होते. त्यांना एकदां ताप येऊन त्यांचें पोटांत रोग झाला. सुमारें सहा महिने नामांकित वैद्यांचे अनेक उपाय झाले व पैसाहि बराच खर्च झाला. परंतु गुण मात्र आला नाहीं. घरची गरिबी असल्यामुळें आणखी औषधोपचार करण्यास जवळ पैसा नव्हता. त्यामुळें कोठेंतरी दूर निघून जावें असें ठरवून ते टेंभुर्णी येथें गेले. परंतु टेंभुर्णीस निभाव लागेना, त्यामुळें ते रामपुरास आपल्या बंधूकडे गेले. दिवसेंदिवस रोग वाढतच होता. पुढें अंगांत वायु शिरून सर्वांगांतून कळा येऊं लागल्या. त्यामुळें सर्वांगास बिब्बे लावले. सकाळीं वायु पायांत, संध्याकाळीं हातांत, रात्री कमरेंत असा खेळूं लागला. तेव्हां कंटाळून जाऊन त्यांनीं अन्न वर्ज्य केलें. रात्रंदिवस झोंप नसल्यामुळें अशा स्थितींत जगण्यापेक्षां मरण बरें असें त्यांना तीव्रतेनें वाटूं लागलें !

पुढें एक दिवस त्यांनीं मनाशीं असें ठरविलें कीं, जो कोणी या जगताचा ईश्वर असेल त्यानें हा वायु जर आठ दिवसांचे आंत बरा केला तर एका भगवंतावांचून यापुढें कुणाचीहि चाकरी करावयाची नाहीं. त्यांनीं असा निश्चय केला मात्र, आणि आश्चर्य असें कीं, आठ दिवसांचे आंत त्यांचा वायु नाहींसा झाला. त्यामुळें नोकरीधंदा सोडून एखाद्या सत्पुरुषाच्या सेवेसाठींच उर्वरित आयुष्य वाहून टाकण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यावेळीं देशांत दोन सत्पुरुष विशेष प्रसिद्ध होते. एक नासिकचे देवमामलेदार व दुसरे अक्कल-कोटचे स्वामीसमर्थ. या दोहोंपैकीं देवमामलेदारांकडे गेल्यास भाऊ तेथून परत आणतील असें वाटून त्यांनीं स्वामीसमर्थांकडे जाण्याचें ठरवून सरळ अक्कलकोटचा रस्ता धरला निघतांना आपण एका स्नेह्याकडे जात आहों असें त्यांनीं आपल्या बंधूस खोटेंच सांगितलें वाटेंत त्यांचे खूपच हाल झाले. परंतु त्यांनीं त्याची पर्वा केली नाहीं.

ते अक्कलकोटास पोहोंचले तेव्हां त्यांचेजवळ पांच पैसे होते. पैकीं एका पैशाच्या खारका घेऊन ते समर्थांच्या दर्शनास गेले. त्यावेळीं श्रीसमर्थांची स्वारी खासबागेंतील वडाच्या गर्द सांवलींत बसलेली होती. तेथें जाऊन त्या पांच खारका त्यांनीं समर्थांपुढें ठेविल्या आणि साष्टांग नमस्कार घातला. समर्थांची ती मनोहर मूर्ति पाहतांच गोपाळरावांना अत्यंत आनंद झाला. समर्थांनीं त्या पांच खारका उचलून आपल्या खजिन्यांत टाकल्या. त्यानंतर भिक्षा मागून निर्वाह करावा व त्रिकाल श्रींचें दर्शन घ्यावें असा गोपाळ-रावांचा कार्यक्रम सुरू झाला.

श्री. केळकर लिहितात–' त्या ठिकाणीं जे सेवेकरी होते त्यांत बहुतेक गांजा, तंबाखू ओढणारे व लौकिक गोष्टींची वायफळ चर्चा करणारेच जास्त होते. आपली पारमार्थिक उन्नति व्हावी हा हेतु

पुढें ठेवून सेवा करणारे थोडेच होते.'

श्रीस्वामीसमर्थांकडून कांहीं गुरुपदेश मिळावा अशी गोपाळरावांची इच्छा होती. त्यासाठीं समर्थांच्या पायांवर डोकें ठेवतांच जे शब्द त्यांचे मुखांतून निघतील तोच गुरुपदेश असें समजून त्याप्रमाणें वागावयाचें व त्यांनीं रामकृष्ण, दत्त वगैरे दैवतांचा कांहीं मंत्र दिल्यास तो जपावयाचा असें गोपाळरावांनीं ठरविलें. परंतु आश्चर्य असें कीं, पायांवर डोकें ठेवण्यापूर्वी महाराज कितीहि बोलत असले तरी डोकें ठेवूं लागतांच बोलणें एकदम बंद होत असे !

पुढें एक दिवस गोपाळराव देशमुखांच्या वाड्यांत निजलेले असतांना समर्थ त्यांचे स्वप्नांत येऊन म्हणाले, 'तुझा रोग आम्ही नाहींसा करतों' असें म्हणून त्यांनीं पोटावरून हात फिरविला आणि ते निघून गेले. तेवढ्यांत लघवीस लागल्यामुळें गोपाळराव जागे झाले. दोन तांबे लघवी झाली आणि पोट सैल झालें. तें पाहून समर्थांची अगाध लीला पाहून त्यांना रडेंच कोंसळलें.

दुसऱ्या दिवशीं गोपाळराव समर्थांचे दर्शनास गेले असतां समर्थ त्यांचेकडे पाहून म्हणाले, 'भटाचें आतां पोट पहा.' इतर मंडळीना हें बोलणें असंबद्ध वाटलें, परंतु गोपाळरावांना खूण पटली

## विचित्र स्वप्न

त्यानंतर पंधरा दिवसांनीं गोपाळरावांना एक विचित्र स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत समर्थ कांहीं सेवेकऱ्यांसह शेतांत बसलेले दिसले त्या सेवेकऱ्यांत गोपाळरावहि होते. तेवढ्यांत कांहीं मुसलमान 'दिन-दिन' करीत हातांत नागव्या तलवारी घेऊन त्या मंडळींना मारण्यास आले. तेव्हां सर्व मंडळी भीतीनें कांपूं लागली. गोपाळरावहि भयभीत झाले. परंतु तितक्यांत समर्थांनीं गोपाळ-

रावास उचलून खांद्यावर घेतलें आणि चालते झाले. ते एका डोंगरांत गेले व त्यांनीं गोपाळरावांना खालीं ठेवलें. नंतर समर्थ कटीवर हात ठेवून त्यांचेसमोर उभे राहिले. गोपाळरावांनीं श्रींच्या पायांवर डोकें ठेवून मला अनुग्रह द्यावा अशी प्रार्थना केली. त्यावर ' अवकाश आहे ' असें उत्तर मिळालें.

तेवढ्यांत गोपाळराव खडबडून जागे झाले व स्वप्न आठवून विस्मय करीत राहिले.

## अनुग्रह

एक दिवस समर्थांची स्वारी फिरत फिरत आपल्या सेवेकऱ्यांसह हचनाळ म्हणून एक गांव आहे तेथें गेली. त्या ठिकाणीं दोन दिवस मुक्काम पडला. पहांटे कोणी उठण्यापूर्वींच विहिरीवर स्नान उरकून घ्यावें असें ठरवून गोपाळराव भल्या पहांटें उठले. त्यांना तंबाखू ओढण्याची संवय होती. त्यांनीं चिलीम भरली व विस्तवासाठीं ते दोन घरें फिरले. परंतु विस्तव मिळाला नाहीं. मग ज्या ठिकाणीं महाराज होते तेथें गेले. श्रींची स्वारी त्या दिवशीं कुलकर्ण्यांच्या वाड्यांत निद्रिस्त झाली होती. जवळ पांच-सहा सेवेकरी निजलेले असून मध्यें पलंगावर श्रीसमर्थ शालजोडी पांघरून निजलेले होते. जवळच एक समई तेवत होती. गोपाळरावानें एक सुंभाची गुंडी तयार करून समईवर धरली. अर्धी गुंडी पेटली. इतक्यांत अंगावरची शालजोडी काढून समर्थ उठून बसले. ते उठलेले पाहून गोपाळरावांना तर कांपरेंच भरलें ! भयानें त्यांच्या-हातांतली गुंडी खालीं पडली. श्रीसमर्थ गोपाळरावांकडे एकटक सारखे पहात होते. त्यावेळीं धैर्य करून गोपाळरावांनीं पुढें होऊन श्रींचे पाय घट्ट धरले व नंतर थरथर कांपत उभे राहून दोन्ही हात जोडले व आपल्या हेतूची प्रार्थना मनांत केली. त्याचवेळीं श्रीसम-

र्थांनीं गोपाळरावांवर अनुग्रह केला. इतक्या कृत्यास सुमारें दोन घटका झाल्या असतील, परंतु कोणीदेखील जागें झालें नाहीं. गोपाळराव अजूनहि हात जोडून समर्थांपुढें उभे होते. तेवढ्यांत सेवेकऱ्यांची चळवळ झाली. त्यासरशीं श्रीसद्‌गुरुदयाघनांनीं पुन्हां शालजोडी पांघरून घेतली व निजले. श्रीसमर्थ कोणावर कधीं कृपा करतील याचा नेम नसे. ( ही एक प्रकारची शक्तिपात दीक्षाच होय–लेखक)

सकाळीं गोपाळराव स्नानासाठीं गेले. तेथील ब्राह्मणाजवळ त्यांनीं स्नानासाठीं भांडें मागितलें. परंतु तें त्यानें दिलें नाहीं. मग एका मराठ्याच्या मनुष्याजवळून मातीची घागर घेऊन गोपाळरावांनीं स्नान उरकलें- ही गोष्ट सेवेकरी दुरून पहात होते. त्यांच्यांत समर्थांना गुडगुडी पाजणारा बळवंतराव म्हणून एक सेवेकरी होता. त्यानें तर 'हा कोंकण्या बाटला. याच्या हातचें पाणी घेऊं नका' अशी निर्भर्त्सना सुरूं केली. ती ऐकून गोपाळरावांना रडें कोसळलें. परंतु ते कांहीं बोलले नाहींत.

त्यावेळीं कांहीं मंडळींनीं बळवंतरावाला म्हटलें कीं, ही गोष्ट न समजून झाली. तेव्हां यास महाराजांचें तीर्थ द्या म्हणजे झालें. तेव्हां श्रीपादभटानें गोपाळरावास तीर्थ दिलें व शुद्ध करून घेतलें.

त्या दिवशीं एका मराठा पाटलानें आंबरस–पुरीचा नैवेद्य श्रींना दाखविण्याचें ठरवून सेवेकऱ्यांना शिधा दिला. व दोन प्रहरीं स्वयंपाक करविला. कोणीं भंडारा केला म्हणजे अशी चाल असे कीं, महाराज भोजनास आले किंवा न आले तरी पंक्तींतील एक पान त्यांचेसाठीं राखून ठेवावयाचें आणि उदक सोडून भोजनास बसावयाचें. महाराज केव्हां येत तर केव्हां येतहि नसत.

गोपाळराव भोजनास बसणार इतक्यांत कांहीं मंडळी ओर-

डून म्हणाली, 'त्या कोंकण्याचें पान पंक्तीबाहेर ठेवा.'

हें ऐकतांच श्रीपादभटानें सांगितलें कीं, त्यांस श्रींचें तीर्थ देऊन शुद्ध करून घेतलें आहे. आतां वेगळें पान ठेवण्याची गरज नाहीं परंतु बळवंतरावास तें सहन न होऊन त्यानें गोपाळरावांचें पान पंक्तींतून बाहेर ओढून ठेविलें आणि त्यांस जागेवरून उठून तिकडे बसण्यास फर्माविलें.

गोपाळराव उठले व तिकडे जाऊन बसले. परंतु सर्व लोकांदेखत आपली अप्रतिष्ठा झाल्यामुळें त्यांना त्याप्रसंगीं रडें कोंसळलें.

समर्थांकरितां जें पान वाढून ठेविलें होतें त्यावर समर्थ येऊन बसले नाहींतच परंतु तें ताट समर्थांपुढें नेतांच त्यांची मुद्रा उग्र झाली व 'आम्ही बाटलों. आम्हांस शिवूं नका. मादरचोद, आम्ही जेवत नाहीं' अशीं वाक्यें दोनचार वेळां मुखांतून बाहेर पडलीं व ते तडक उठून एका उकिरड्यावर जाऊन बसले. कोणाला पुढें येऊं देईनात. पुष्कळांनीं परत चलण्याची प्रार्थना केली, परंतु कोणाचेंच ऐकेनात. असें सायंकाळपर्यंत चाललें होतें. सायंकाळीं राग थोडा शांत झाला व रात्रीं भोजन झालें. या प्रकारामुळें गोपाळरावांना गहिंवरून आलें व त्यांनीं श्रींच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांवर प्रेमाश्रूंचा अभिषेक केला. दुसरे दिवसापासून गोपाळरावांना अर्थातच सन्मानानें जेवण मिळूं लागलें.

पुढें थोडक्याच दिवसांनीं ज्या बळवंतरावानें भर पंक्तींतून पान ओढलें होतें त्यास दैवयोगानें म्हणा किंवा ईश्वरी कोपानें म्हणा, परंतु वेड लागलें. असो.

पुढें कांहीं दिवस गोपाळराव स्वामीसुतांच्या सहवासांत होते. नंतर स्वामीसुतांनीं दिलेल्या पादुका ब्रह्मचारीबुवांनीं शके १७९५ च्या फाल्गुनांत चिपळुणास आणल्या. गोपाळपंत पुढें शके

१७९६ च्या ज्येष्ठांत कुटुंबासह चिपळुणास आले व त्यांनीं त्या पादुकांची सेवा सुरू केली.

## श्रींच्या अप्रसिद्ध लीला

एक दिवस श्रीसमर्थांची स्वारी फिरत फिरत मैंदर्गीस गेली. बरोबर सुमारें दोनशें मंडळी होती. गांवाबाहेर नाथांच्या मठांत मुक्काम पडला. तेथें एकच विहीर होती. परंतु तिचें पाणी खराब झाल्यामुळें त्यास दुर्गंधी सुटली होती. त्यामुळें येथून श्रींचा मुक्काम लवकर उठेल तर बरा असें मंडळींना वाटूं लागलें. कांहीं प्रमुख सेवेकऱ्यांनीं त्या दृष्टीनें प्रयत्नहि करून पाहिले, परंतु श्रींची स्वारी तेथून हलण्याचें चिन्ह दिसेना !

परंतु दुसरे दिवशीं श्रींना दया आली व ते पलंगावरून उठले आणि तडक विहिरीवर गेले. ती विहीर सुमारें वीस हात खोल होती. त्यावेळीं श्रींच्या हातांत सुमारे अडीच हात लांबीची काठी होती. समर्थांनीं ती एकदां विहिरींत घातली व आपल्या नाकास लावली. नंतर पुन्हां ती विहिरींत घालून जवळच्याच एका वडाचे झाडास लावली आणि तेथून ते निघून गेले. श्रींची लीला श्रींनाच ठाऊक !

त्यानंतर एक गृहस्थ विहिरींत उतरून पाण्याची चूळ भरून आला व पाणी उत्तम झाल्याचें सर्वांना सांगूं लागला. तें ऐकून सर्वांना आश्चर्य वाटलें व खातरजमा करून घेण्यासाठीं प्रत्येकानें पाण्याची चव पाहिली. तों खरेंच तें पाणी अत्यंत मधुर झाल्याचें आढळून आलें ! अडीच हात लांबीची काठी वीस हात खोल विहिरींत पोंचली कशी याचें आश्चर्य करीत जो तो श्रींचा जयजयकार करीत परतला. त्यानंतर संध्याकाळीं समर्थांची स्वारीहि अक्कलकोटास परतली.

# मैंदर्गीचा मन्याबा

मैंदर्गीस एक ब्राह्मण होता. त्यास दोन मुलगे व तीन मुली अशीं पांच अपत्यें होतीं. परंतु पूर्वकर्मयोगानें तीं सर्व वेडगळ होतीं. त्यांत मन्याबा म्हणून एक मुलगा होता. पुढें दैवयोगानें तो ब्राह्मण, त्याची बायको व चार मुलें मरण पावलीं. राहतां राहिला फक्त वेडा मन्याबा ! पंचवीस-तीस वर्षें तो आपल्याच गांवीं होता. पुढें एकदां मैंदर्गीची कांहीं मंडळी अक्कलकोटास आली. त्यांनीं या वेड्यालाहि आपल्याबरोबर आणलें होतें. त्यांनीं या वेड्याला समर्थांचे पायांवर घातलें तेव्हां समर्थ त्याच्याकडे पाहून म्हणाले, ' दिवाना, क्या होना रे ?' परंतु त्याला काय समजतें ? मंडळी म्हणाली, ' महाराज, याचें वेड घालवा.' परंतु समर्थ कांहींच बोलले नाहींत. पुढें मंडळी आपल्या गांवीं निघून गेली. हा वेडा मात्र अक्कलकोटांतच राहिला. पुढें पंधरा वर्षें तो तेथेंच होता. समर्थांची त्याच्यावर बहाल मर्जी होती. त्यामुळें त्यांच्या कृपेनें तो सिद्धपुरुषाच्या कोटीला येऊन पोहोंचला. मुका असून तो पुढें मराठी व कानडी या दोन भाषा उत्तमप्रकारें बोलूं लागला. लोक पुढें पुढें त्याला नवसहि करूं लागले. कोणाचें कांहीं काम व्हावयाचें असेल तर, लोक मन्याबाला बोलावून त्याच्या तोंडून ' काम होईल ' असें वदवून घेत व आश्चर्य असें कीं, तें काम हटकून होत असे. एखाद्या वेळीं मात्र मन्याबा ' काम होणार नाहीं ' असें स्पष्ट सांगत असे. त्यावेळीं ' होईल ' असें कां म्हणत नाहींस असें त्यास कुणीं विचारलें तर तो म्हणे, ' स्वामी मारील. ० ० चें कातडें काढील, रक्त काढील.'

समर्थांच्या कृपेनें सिद्धकोटीला पोंचलेल्या पुरुषांत मन्याबा-चीहि गणना करावयास हवी.

## सुंठ-साखरेचा चमत्कार

श्री. गोपाळराव हे चिपळुणास आल्यानंतर दरवर्षी एकदां तरी बैलगाडीनें अक्कलकोटास जात. एकदां ते वीस मंडळींसह असेच अक्कलकोटास गेले असतां त्यांच्याबरोबर सुभेदारबाबा या मराठा गृहस्थांना एकाएकी हगवणीचा विकार सुरू झाला. दिवस-रात्रींतून सुमारें चाळीस-पन्नास वेळां त्यास शौचास जावें लागे. तें पाहून सर्व मंडळी घाबरली. त्यांच्याबरोबर नारायणराव ओगले म्हणून एक वैद्य होते. ते रोज बदलून बदलून औषधें देत होते. परंतु थोडासुद्धां गुण येत नव्हता. त्यामुळें मंडळींनीं या परक्या प्रांतांत रहाण्यापेक्षां परत गांवाकडे निघून जावें असें ठरवून दुसऱ्या दिवशीं चिपळुणास परत जाण्याचें निश्चित केलें. परंतु त्यामुळें सुभेदारबाबांचें चिरंजीव रामचंद्रराव आणखीनच घाबरून गेले व गोपाळरावांकडे येऊन रडूं लागले.

गोपाळरावांनीं त्यांचें सांत्वन करून म्हटलें, 'याला एकच उपाय आहे. महाराज जर कृपा करतील तर सर्व ठीक होईल.'

एवढें म्हणून गोपाळराव व रामचंद्रराव या दोघांनीं स्नानें उरकलीं व एका वाटींत सुंठ-साखर घेऊन ते समर्थांच्या दर्शनास गेले.

त्यावेळीं श्रींची स्वारी चोळप्पाच्या घरांत होती. उभयतांनीं तेथें जाऊन श्रींचें दर्शन घेतलें व आपली अडचण त्यांना निवेदन करून म्हटलें, 'आतां आपली आज्ञा घेऊन आम्ही चिपळुणास परत जाणार. परंतु मध्येंच हें विघ्न उत्पन्न झालें. आतां आमची इतकीच प्रार्थना आहे कीं, आम्ही घरीं जाऊन सुखरूप पोहोंचूं अशी कांहीं तोड काढावी.'

त्यावर समर्थ म्हणाले, 'घरकू जाव.' त्यानंतर सुंठ-साख-

रेची वाटी त्यांच्या पायास लावून प्रसाद म्हणून घेऊन ते दोघेजण परत आले व ती सुंठ-साखर त्यांनीं सुभेदारबाबांना खावयास दिली व जें व्हायचें असेल तें होईल, समर्थ पाठीशीं आहेत अशा दृढ-विश्वासानें त्यांनीं आपल्या बैलगाड्या चिपळुणाकडे चालविल्या. त्यावेळीं मौजेची गोष्ट अशी कीं, सुभेदार गाडींत बसून होते तोंपर्यंत त्यांना शौचास लागली नाहीं. परंतु गाडींतून उतरतांच मात्र शौचास जावें लागलें. असा प्रकार चिपळुणास येईपर्यंत चालू होता. ते गाडींत असतांना त्यांची प्रकृति उत्तम असे. परंतु तिच्यां-तून खालीं उतरतांच पुन्हां जुलाब सुरू होत !

## अरे, काळ्या हत्तीचें डोकें फोड !

मोंगलाईंत काजळें या गांवीं गोविंद मोहिते या नांवाचे एक गृहस्थ राहात होते. त्यास श्रीकृपेनें पुत्रलाभ झाला होता. एक दिवस गोविंदराव अक्कलकोटास येऊन महाराजांना साष्टांग नम-स्कार करून म्हणाले, 'महाराज, प्रपंच फार वाढला आणि उत्प-न्नहि कमी, अशा स्थितींत अब्रूनें दिवस कसे निघतील याबद्दल काळजी लागून राहिली आहे. काय करावें ?'

तें ऐकून समर्थ म्हणाले, 'तुमचे शेतांत विहीर खणावी. ऊंस हळद लावावी.'

त्यावर गोविंदराव म्हणाले, 'महाराज, पुष्कळ विहिरी खणल्या. परंतु पाणी लागत नाहीं.'

समर्थ म्हणाले, 'औदुंबर, पिंपरी, पिंपळ यांच्या मध्यभागीं खणावें.'

त्याप्रमाणें गोविंदरावांनीं, गांवीं जाऊन त्या विवक्षित स्थळीं विहीर खणली. परंतु पाणी लागलें नाहीं. तेव्हां गोविंदराव निराश होऊन परत अक्कलकोटास आले व त्यांनीं ती गोष्ट समर्थांना

निवेदन केली.

समर्थ म्हणाले, ‘अरे काळ्या हत्तीचें डोकें फोड.’

परंतु गोविंदरावांस श्रींच्या या असंबद्ध वाणीचा अर्थ कळेना, म्हणून त्याबद्दल महाराजांना विचारूं लागले. तितक्यांत श्रीपादभट म्हणाले, ‘अहो औदुंबराशेजारीं हत्तीसारखा दगड आहे, तो फोडा म्हणजे पाणी लागेल.’

तें ऐकून गोविंदरावांस आनंद झाला व ते श्रींची आज्ञा घेऊन ताबडतोब गांवीं परतले. गांवीं येतांच त्यांनीं तो ठराविक दगड फोडला आणि आश्चर्य असें कीं, त्या दगडांतून पाण्याचा धोंधों प्रवाह वेगांत वाहूं लागला ! त्यामुळें गोविंदरावांचें शेत चांगलें पिकलें व त्यांची प्रपंच चिंता दूर झाली.

## ‘चार भुजंग ठेवले आहेत.’

एकदां समर्थ अक्कलकोटाबाहेरील आंब्याचे वाडींत बसलें होते. कांहीं सेवेकरी मंडळीहि समर्थांचा तपास काढीत तेथें येऊन पोहोंचली. समर्थांनीं गांवांत परत चलावें म्हणून संध्याकाळीं सर्वांनीं प्रार्थना केली, परंतु ‘कन्या येणार आहेत’ एवढेंच उत्तर समर्थांनीं दिलें. त्याचा अर्थ अर्थातच कोणास समजला नाहीं. नंतर थोड्या वेळानें समर्थ म्हणाले, ‘चोरांपासून निवारण व्हावें म्हणून चार भुजंग तुमच्या रक्षणास ठेवले आहेत.’ एवढें बोलून ते तेथेंच निद्रिस्त झाले. सेवेकरीहि तेथें जवळच झोंपले. मध्यरात्रीच्या सुमारास कांहीं चोर खरोखरच सेवेकऱ्यांचें सामान नेण्यासाठीं तेथें आले. परंतु तितक्यांत कुठून तरी चार भुजंग तेथें अचानक प्रकट झाले व चोरांचा पाठलाग करूं लागले. तो भयानक प्रकार पाहून चोरांना पळतां भुई थोडी झाली व ते कसेबसे धडपडत, ठेंचकाळत आपल्या मुक्कामीं निघून गेले !

## खुणेनें अशुभसूचक

श्रीसमर्थांचें बोलणें नेहमींच मोजकें असे. बहुतेक गोष्टी ते खुणेनें किंवा तीन चार शब्दांतच व्यक्त करीत.

एकदां अनंतभट नांवाच्या ब्राह्मणाची बायको राजूबाई क्षयरोगानें आजारी पडली. तेव्हां अनंतभटानें चोळप्पामार्फत समर्थांना याबाबत प्रार्थना केली व आरोग्यप्राप्तीचा उपाय विचारला. तेव्हां श्रीनीं कांहींएक उत्तर न देतां जवळच असलेल्या शेणाच्या गोवऱ्या चोळप्पाचे हातांत दिल्या व दुश्चिन्ह सुचविलें. पुढें पंधराच दिवसांनीं राजूबाईचा अंत झाला !

## लठ्ठेश्वर पंडिताचा पराक्रम !

एकदां श्रींची स्वारी चंद्रभागेचे तीरीं मणूर म्हणून एक क्षेत्र आहे त्याठिकाणीं होती. पावसामुळें चंद्रभागेला मोठा पूर आला होता. मणूर येथें भोजनाची वगैरे नीट व्यवस्था नसल्यानें चोळप्पा, श्रीपादभट वगैरे सेवेकरी दुसरीकडे चलण्याबद्दल समर्थांना विनवूं लागले.

त्यावर समर्थ म्हणाले, 'पलीकडच्या तीरावर चला.'

परंतु महापुरामुळें नावाहि बंद होत्या व होत्या त्या सर्व पलीकडच्या तीरावर ! पुरांत उडी मारावी तर जवळ भोपळेहि नाहींत. चोळप्पानें ही अडचण समर्थांना सांगतांच समर्थ हंसून म्हणाले,

'आमचा लठ्ठेश्वर पंडित जाईल तर नौका अवश्य घेऊन येईल.'

श्रीपादभटास समर्थ 'लठ्ठ्या' म्हणून हांक मारीत. समर्थांचे हे शब्द ऐकतांच श्रीपादभटानें गुर्वाज्ञा प्रमाण मानून अंगा-

घरचीं वस्त्रें उतरविलीं व एक पंचा नेसून समर्थनामाचा जयजयकार करीत त्या भयंकर पुरांत उडी मारली. पाण्यावर नजर ठरत नव्हती. पाण्याचा धोंधों असा प्रचंड आवाज निघत होता. तशा पाण्यांत श्रीपादभटानें उडी मारलेली पाहून सर्व सेवेकरी घाबरून गेले व श्रीपादभटास वांचविण्याबद्दल समर्थांची प्रार्थना करू लागले.

तेव्हां समर्थ हंसून म्हणाले, 'मरतो कशानें ? आतां नौका घेऊन येईल पहा !'

आणि आश्चर्य असें कीं, तेवढ्या पाण्यांतून पलीकडे जाऊन श्रीपादभट थोडयाच वेळांत नौका घेऊन आला ! तेव्हां समर्थांच्या अगाध लीलेचें सर्वांनाच आश्चर्य वाटलें !

## अक्कलकोटीं राहून बार्शीस जेवण !

बार्शी येथें मल्लिकार्जुन नांवाचा एक जंगम रहात होता. तो कीर्तन उत्तम करीत असे. एकदां श्रीमंत मालोजीराजे यांच्या राजवाडयांत कीर्तन करून तो जंगमाचे मठांत निघाला. सागांत फाटकाचे वेशींत श्रीसमर्थांची स्वारी बसलेली होती. त्यांना पाहून मल्लिकार्जुन आजूबाजूच्या लोकांस विचारूं लागला कीं, 'अक्कलकोटास एक अवतारी यति आहेत ते हेच काय ?' लोकांनीं होय म्हणून सांगतांच मल्लिकार्जुनाच्या मनांत विचार आला कीं, पायांतील पायताण काढून यांस नमस्कार करावा कीं न करावा ?

तेवढयांत समर्थांच्या मुखांतून बिजली चमकावी तसे चटकन् शब्द बाहेर पडले, 'अरे, आमची पंचाईत करूं नकोस. तूं पायां पडलास अथवा न पडलास तरी आम्हांस गरज नाहीं.'

श्रींचें हें अंतरसाक्षित्वाचें भाषण ऐकतांच जंगम पाण्यांतील ढेकळाप्रमाणें विरघळला व श्रींस शरण गेला. पुढें श्रींनी त्याच्या-

वर कृपा झाली व त्यांच्या तीर्थप्रसादानें व आशीर्वादानें त्याच्या मुलीस पुत्रहि झाला. हा जंगम पुढें समर्थांच्या नांवाचा अंगारा लोकांना देत असे व लोकांना त्याचा गुणहि येत असे. श्रीकृपेनें त्याची लोकांत प्रसिद्धीहि होऊं लागली. द्रव्यहि भरपूर जमूं लागलें त्या द्रव्याचा खर्च तो भोजनाकडे करीत असे.

एके वर्षी श्रावण महिन्यांत त्यानें सात दिवस ब्राह्मणभोजन घालण्याचा संकल्प केला व त्यानुसार बार्शीस सुरुवातहि केली. त्यावेळीं समर्थांची स्वारी अक्कलकोट येथें राजवाड्यांत होती. परंतु त्या सात दिवसांत समर्थांनीं एकदांहि भोजन केलें नाहीं.

तेव्हां आठव्या दिवशीं श्रीमंत मालोजीराव हात जोडून समर्थांना म्हणाले, ‘ महाराज, आज सात दिवस झाले, आपण भोजन करीत नाहीं हें कसें ?’

त्यावर श्रीसमर्थ हंसून म्हणाले, ‘ आम्ही बार्शीस मल्लिकार्जुन जंगमाकडे भोजन करून तृप्त होतों. ’

हें ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटलें. कारण समर्थ तर सातहि दिवस अक्कलकोटासच होते. मग ते बार्शीस जेवतील कसे ?

तेव्हां हें खरें कीं खोटें हें पाहण्यासाठीं राजेसाहेबांनीं ताबडतोब एक स्वार बार्शीस चौकशीसाठीं धाडून दिला. त्या स्वारानें बार्शीस जाऊन जंगमांना विचारलें, तेव्हां तेथील सर्वजण सांगूं लागले कीं, ‘ समर्थ गेले सात दिवस भोजनाचे वेळीं आमचेकडेच पंक्तीला होते ! ’

स्वारानें हें अद्‌भुत वर्तमान अक्कलकोटास येऊन सर्वत्रांस सांगितलें तेव्हां सर्वांना आश्चर्य वाटून श्रींच्या अगाध लीलेचें परम कौतुक वाटलें !

## बावडेकर शास्त्री

एकदां शृंगेरी मठांतील एक शास्त्री समर्थांच्या दर्शनासाठीं अक्कलकोटास आले. त्यावेळीं श्रींच्या बालक्रीडा पाहून ते तेथील बावडेकर पुराणिकास म्हणाले, ' अहो अशा वेडचा माणसाजवळ तुम्ही कां राहिलां ? यांच्याजवळ राहून तुमचें कांहीं कल्याण होईल असें मला वाटत नाहीं. तुम्ही माझ्याबरोबर चलाल तर मी तुम्हांस उत्तम शास्त्री करीन.'

बावडेकरांना हें बोलणें पटलें व ते त्यांचेबरोबर जाण्यास तयार झाले.

परंतु त्याच रात्रीं बावडेकर झोंपले असतां त्यांच्या खोलीची कडी खाडकन् पडली व दरवाजा उघडला गेला. त्या आवाजानें बावडेकर जागे झाले. त्यांनी डोळे चोळीत समोर पाहिलें तों समोर श्रीसमर्थांची स्वारी उभी ! बावडेकरांकडे पाहून समर्थ म्हणाले, ' अरे, तूं शास्त्र शिकण्यास केव्हां जाणार ? या तुमच्या शास्त्र्यांनीं कामादिक षड्रिपु जिंकले आहेत काय ?'

एवढें बोलून समर्थ एकाएकीं गुप्त झाले.

श्रींचे शब्द ऐकून बावडेकरांना मोठा पश्चात्ताप झाला व दुसरे दिवशीं श्रीपुढें साष्टांग दंडवत घालून त्यांनीं त्यांची क्षमा मागितली व शृंगेरीस जाण्याचा बेत रद्द केला.

बावडेकरांवर श्रींचें अलोट प्रेम होतें, स्वतः समाधिस्थ होण्यापूर्वी श्रींनीं त्यांस मुद्दामच बार्शी येथें पाठवून दिलें होतें. कारण आपलें शरीर पडलेलें पाहून त्यास अनावर शोक होईल हें समर्थ जाणून होते. अंतःकाळीं समर्थांनीं आपलीं सर्व खेळणीं जवळच्या एका सेवेकऱ्याजवळ देऊन सांगितलें कीं, 'हीं खेळणीं बावडेकरांशिवाय दुसऱ्या कुणास देऊं नकोस.' त्याप्रमाणें तीं खेळणीं

सेवेकऱ्यानें बावडेकरांना दिलीं. तीं हल्लीं बार्शी येथें त्यांच्या वंशज जांकडे पूजेंत आहेत.

याच बावडेकरांविषयीं आणखी एक गोष्ट प्रसिद्ध आहे. ते पूर्वी एकदां नृसिंहवाडीस आले होते. त्यांना त्या ठिकाणीं यज्ञ करावयाचा होता. तेव्हां श्री टेंबेस्वामींचा मुक्काम वाडीसच होता. बावडेकरांचा यज्ञाचा बेत ऐकून ते म्हणाले, 'तुमचे गुरु जे अक्कलकोटचे स्वामीसमर्थ ते प्रत्यक्ष दत्तावतार आहेत. करितां अगोदर त्यांची आज्ञा घेऊन या.'

यावरून प्रत्यक्ष टेंबेस्वामीहि श्रींना अवतारी पुरुष मानीत होते असें दिसतें !

---

प्रकरण १२ वें

# प्रज्ञापुरीचा सूर्य मावळला ...!

ये विषयीं पूर्वचिन्हें । आधींच दाविलीं होतीं संज्ञें ।
परी कवणासी आज्ञापणें । कळो न आलें भविष्य ।।

'काय रे ! आम्हांस खूप लांब जावयाचें आहे. खूप उंच जावयाचें आहे. तूं माझी नोकरी करण्यासाठीं बरोबर येशील का ?' हुक्का ओढतां ओढतां समर्थांनीं शेजारींच बसलेल्या बाळप्पांना विचारलें.

बाळप्पा समर्थांचें हुक्कापान नेहमींप्रमाणें कौतुकानें पहात होते. परंतु समर्थांच्या या प्रश्नानें बाळप्पा दचकले ! त्यांच्या छातींत धस्स् झालें ! त्यांनीं उत्तरादाखल समर्थांना फक्त एक नमस्कार केला.

आणि बाळप्पा याशिवाय दुसरें उत्तर तरी काय देणार ?

श्रीसमर्थांनीं आपल्या महानिर्याणापूर्वीं एक वर्ष अगोदर त्याबद्दलचीं दुश्चिन्हें भक्तमंडळीस दाखवावयास सुरवात केली होती. केव्हां केव्हां ते आरतीहि पालथी घालीत. पुढें पुढें तर त्यांनीं बिछान्यावर झोंपणेंहि वर्ज्य केलें. एवढेंच नव्हे तर आपला बिछाना झाडास बांधून टाकविला. चोळप्पाचे मृत्यूनंतर श्रींना स्वतःचेंहि अवतारकार्य संपवावेंसें वाटूं लागलें होतें, असें वामनबुवांच्या 'गुरुलीलामृतां' तील पुढील ओव्यांवरून वाटतें—

दत्तात्रेयस्वामी मंदगतीनें सांगती । सप्तजन्मींचा पितापुत्र

संबंध ज्या रीतीं । तद्वत् चोळप्पाची तुटली संगती । तो वियोग सहन होत नसे ॥ यास्तव आम्हीही लौकर जाऊं । कोणी कोणाचे नाहीं सखे सोयरे भाऊ । चोळप्पाविण कोठें धांवूं । लीला दावूं कोणाला ॥ अ. ५४ ओ. ३८-३९.

आणि या दृष्टीनेंच त्यांनीं अखेरची निरवानिरव चालविली होती. तथापि ते इतक्या अनपेक्षितपणें आपलें अवतारकार्य संपवितील असें मात्र कुणालाहि वाटलें नव्हतें !

समाधिस्थ होण्याचे पूर्वीं कांहीं दिवस ते अक्कलकोटांतील जंगमाचे मठांत जाऊन चार दिवस राहिले. त्या मठांत जंगमांनीं स्थापन केलेलें एक बरेंच मोठें शिवलिंग आहे. चौथ्या दिवशीं बावडेकर पुराणिक व इतर सेवेकरी यांना सांगून श्रींनीं पांचशें गोवऱ्या आणविल्या आणि त्या शिवलिंगावर रचून ठेवून अग्नि लावून पेटवून दिल्या. त्यानंतर त्या होमांत पांच शेर तूप, पांच शेर साखर, खारका, तांदूळ, फळें, माळा वगैरे टाकल्या. तो प्रकार पाहून जंगम लोकांनीं एकच आकांत केला व श्रींना 'शासन' करण्यासाठीं ते धांवून आले ! परंतु श्रींच्या तेजापुढें कुणाचेंहि चाललें नाहीं. सकाळीं शिवलिंगावरील राख काढून टाकण्याची श्रींनीं भुजंगाला आज्ञा केली. त्याप्रमाणें भुजंगानें शिवलिंग साफ केलें. आश्चर्य असें कीं, तें शिवलिंग पूर्वीपेक्षांहि विलक्षण देदिप्यमान दिसूं लागलें ! लिंगास त्या प्रखर अग्नीचा थोडासुद्धां उपद्रव झाला नाहीं !

त्यानंतर एक दिवस श्रींची स्वारी तात्या सुभेदार यांच्या घरांत अकस्मात् आली. त्यांच्या पाठोपाठ शिष्यमंडळीहि धांवतच तेथें येऊन पोहोंचली. सुभेदाराच्या घराजवळच दगडाची एक कुंडी पडलेली होती. ती कुंडी उचलून मुरलीधराच्या देवळानजीकच्या तळ्यांत टाकण्याविषयीं श्रींनीं सेवेकऱ्यांना आज्ञा केली. त्याप्रमाणें

ती जड कुंडी सेवेकऱ्यांनीं महाप्रयासानें उचलून तळ्यांत बुडविली. त्यावेळीं स्वतः समर्थांची स्वारी तळ्यांत उतरून गुडघाभर पाण्यांत जाऊन उभी राहिली होती. कुंडी पाण्यांत बुडतांच, 'सर्व मंडळी रडा, सर्व मंडळी बोंबा ठोका' असे शब्द श्रींच्या मुखांतून बाहेर पडले.

महानिर्याणापूर्वीं आठ दिवस अगोदर 'शिवहर शंकर नमामि, शंकर शिवशंकर शंभो, हे गिरिजापति भवानिशंकर, शिवशंकर शंभो' असें भजन श्रींनीं सुरूं केलें. श्रींच्या मुखांतून हें भजन सेवेकऱ्यांना त्या दिवशीं प्रथमच ऐकावयास मिळालें. त्यापूर्वीं कांहीं दिवस लहानलहान दगडांच्या समाधीसारख्या आकृति तयार करण्याचा खेळ श्रींनीं चालविला होता.

श्रींची स्वारी तात्या सुभेदार यांच्या घरीं असतांना एकाएकी ज्वर भरून रेच सुरूं झाले. त्यामुळें सर्व मंडळी घाबरून गेली. परंतु दुसऱ्या दिवशीं प्रकृतीस आराम वाटल्यामुळें श्रींनीं नागणहल्लीस जाण्याचा बेत ठरविला व मेण्यांत बसून ते मौजे नागणहल्ली येथें गेले. तेथें चार दिवस त्यांनीं आंबराईंत विश्रांति घेतली. परंतु पुन्हां प्रकृति बिघडूं लागली. अन्न तर पूर्वींच बंद केलें होतें. श्रींच्या बरोबर सखाराम लोखंडे म्हणून एक सेवेकरी होता. त्यानें श्रींना अक्कलकोटास त्यांच्या प्रिय वटवृक्षाखालीं विश्रांति घेण्याचा सल्ला दिला आणि श्रींनीं त्या गोष्टीस संमति देतांच सेवेकऱ्यांनीं श्रींना मेण्यांत बसवून अक्कलकोटास आणलें. परंतु तेथें मंगळवारीं प्रकृति अधिकच बिघडली. स्नान वगैरे नित्यकर्में मात्र पूर्वींप्रमाणेंच चालू होतीं. विशेष म्हणजे अंगांत एवढा ज्वर असूनहि श्रींना कुणी कण्हतांना, कुंथतांना पाहिलें नाही! सुंदराबाईशिवाय इतरांना ते कामाशिवाय जवळ येऊं देत नसत. श्रींनीं अन्न वर्ज्य केल्याचें ऐकून भक्तमंडळी चिंतातुर झाली होती. परंतु 'अन्न खा'

असें सांगण्याचें धैर्य एकासहि झालें नाहीं. तेव्हां कांहीं मंडळींनीं सुंदराबाईकडे ही कामगिरी सोपविली. तिनें मोठ्या मुष्किलीनें दोन चमचे पेज श्रींच्या मुखांत घालण्यात यश मिळविलें.•

'महाराज, आपण बरे केव्हां होणार ?' सुंदराबाईनें श्रींच्या मुखांत पेज घालतां घालतां चिंतातुर स्वरांत विचारलें.

समर्थ हळुवारपणें म्हणाले, 'आतां बरें कशाचें होणार ? आतां आम्हांस दगडांत जाणें आहे.'

श्रींच्या मुखांतील हे शब्द एखाद्या तप्त रसाप्रमाणें सुंदराबाईच्या कानांत शिरले. ती पुढचें भीषण भवितव्य समजून चुकली.

श्रींना आराम पडावा म्हणून नामांकित डॉक्टर–वैद्यांनीं अक्कलकोटाकडे धांव घेतली होती. परंतु श्रींच्या मनांतच देह ठेवण्याचें असल्यामुळें ते कशाला कुणाचें औषध घेतात ? आणि दुसरें म्हणजे ज्यांनीं मृत्यूच्या कराल हातांतून दुसऱ्यांना सोडविलें ते स्वतः थोडेच मृत्यूच्या स्वाधीन होते ? परंतु अवतारी पुरुषहि बऱ्याच वेळां सामान्य जनांप्रमाणेंच व्यवहार करतांना आढळतात असें दिसून येतें.

श्रींच्या मुखांत औषध व मात्रा घालण्याचा पुष्कळ डॉक्टर–वैद्यांनीं प्रयत्न करून पाहिला, परंतु कोणासहि यश आलें नाहीं. औषध तोंडांत जातांच ताबडतोब जसेंच्या तसें बाहेर पडत असे !

श्रींचा आजार वाढत चाललेला पाहून सुंदराबाईनें न राहवून पुन्हां विचारलें, 'महाराज, आपण केव्हां उठाल ?'

समर्थ म्हणाले, 'डोंगर बोलतील तेव्हां उठेन.'

श्रीपादभटानेंहि खिन्नमुद्रेनें हाच प्रश्न केला.

त्याला समर्थांनीं उत्तर दिलें, 'पंढरी जळेल तेव्हां उठेन.'

श्रींच्या या उद्गारांवरून श्री आपलें अवतार कार्य लवकरच संपविणार ही गोष्ट सर्वांस समजून चुकली !

तेव्हां प्रत्येकानें समर्थसन्निध उभें राहून डोळ्यांतील अश्रु पुशीत दोन्ही हात जोडून विचारलें, ' महाराज, आम्हीं पुढें काय करावें ? '

त्यावर श्रीपादभटास श्रींनीं ' वडाचीं मुळें खणीत बसण्यास ' सांगितलें. गणपतराव सेवेकऱ्यास देवळांत राहण्याची आज्ञा केली. बाळप्पांना औदुंबराचे छायेंत बसण्यास सांगितलें व इतर सर्वांस, ' आपले वाडवडील ज्या रीतीनें वागत आले त्या रीतीनें वागावें ' असा उपदेश करून भगवद्‌गीतेच्या नवव्या अध्यायांतील पुढील श्लोक म्हटला–

' अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।। '

## –आणि महानिर्याण !

चैत्र वद्य त्रयोदशी शके १८०० या दिवशीं श्रींनीं आपल्या अवतारकार्याची समाप्ति केली. शेवटपावेतों ते शुद्धीवर असून सर्वांशीं उत्तम प्रकारें बोलत होते.

सर्वांच्या आग्रहावरून श्रींनीं थोडीशी पेज घेतली. सेवेकऱ्यांनीं श्रींचें मुखावरून रुमाल फिरविला. बाळप्पांनीं दिलेली सुपारीहि श्रींनी घेतली. श्रींना अंथरुणावर निजविण्यांत आलें होतें. महानिर्याणाचा समय पळापळानें नजीक येत होता ! भक्त मंडळींचे चेहरे काळवंडले होते. सर्वत्र नीरव शांतता पसरली होती. वारा हलत नव्हता. वृक्षांचीं पानें स्तब्ध होतीं. साऱ्यांचें लक्ष श्रींच्या मुखमण्डलावर स्थिरावलें होतें. श्रींचा चेहरा पूर्वीप्रमाणेंच तेजःपुंज दिसत होता. तेंच प्रसन्न हास्य, तीच तीक्ष्ण व भेदक नजर. आजवर या प्रसन्न मुखानें अनेकांच्या नेत्रांचें पारणें फेडलें होतें.

तेवढ्यांत श्रींनीं आपणांस उठवून बसतें करण्यास श्रीपाद-

भटास सांगितलें. श्रीपादभटानें त्याप्रमाणें हळुवार हातांनीं श्रींना बसतें केलें. श्रींनीं लागलीच पद्मासन घातलें व पाहतां पाहतां ते निजानंदीं निमग्न झाले. डोळ्यांच्या पांपण्या एकाएकीं हलण्याच्या थांबल्या. त्यापूर्वी श्रींचे मुखांतून खसखशीएवढे तीन पांढरेशुभ्र दाणे बाहेर पडले. त्यांचें मुखकमल शांत, प्रसन्न आणि पूर्वीप्रमाणेंच दैदीप्यमान् दिसत होतें. स्वामीमाऊली एकदां तरी डोळे उघडून सर्वांकडे कृपादृष्टीनें पाहतील अशी सर्वांनाच आशा वाटत होती. परंतु तसें कांहीं घडलें नाहीं. 'महाराज, महाराज, महाराज' असा आक्रोश सर्वजण करूं लागले. कुणी दुःखभार असह्य होऊन छाती आणि कपाळ बडवून घेऊं लागले. अशा प्रकारें सर्वत्र एकच हाहाःकार उडाला ! गाई वांसरेंहि हंबरडा फोडूं लागलीं. आकाशींचा सूर्य ढगाआड लपला. पक्ष्यांची किलबिल थांबली वारा वाहतां वाहतां स्तब्ध झाला. सर्वत्र दुःखाची, औदासीन्याची दाट छाया पसरली.

श्रीकृष्णाशिवाय गोकुळ, श्रीरामचंद्राशिवाय अयोध्या, श्रीविश्वेश्वरावांचून काशी ही कल्पना जशी असह्य वाटते, तद्वतच श्रीस्वामीमाऊलींशिवाय अक्कलकोट ही कल्पनाहि कुणाला सहन होईना !

'महाराज, डोळे उघडून एक शब्द तरी बोला कीं हो—' अशी प्रार्थना भक्त मंडळी अतिशय कळवळून, रडून करीत होती. परंतु श्रींच्या मुखांतून एक शब्दहि बाहेर पडला नाहीं !

श्रींच्या निजानंद गमनाची हृदयच्छेदक बातमी गांवांत पसरतांच लोकांच्या झुण्डीच्या झुण्डी श्रींच्या अंत्यदर्शनासाठीं वडाखालीं गोळा होऊं लागल्या. कुणाच्याहि तोंडून शब्द फुटेना. सर्वत्र भयाण शांतता पसरली !

त्यानंतर सर्वांनीं शोक आंवरून श्रींसाठीं एक दिव्य विमान तयार केलें. त्यांत एक सुंदर पुष्पासन अंथरून श्रींचा दिव्य देह त्यावर ठेवण्यांत आला. सनई, चौघडा इत्यादि मंगलवाद्यें वाजूं लागलीं. सर्वांनीं भजन सुरूं केलें. 'हरहर महादेव' अशा घोषानें आकाश दुमदुमून गेलें. श्रींच्या दिव्य देहावर पुष्पवृष्टि होऊं लागली. श्रींची महासमाधि पाहाण्यासाठीं आकाशांत सुरवरांनींहि गर्दी केली !

त्यावेळच्या देखाव्याचें वर्णन यथातथ्य करावयास प्रत्यक्ष बुद्धिदात्री श्री सरस्वती देवीनेंच लेखणी हातांत धरावयास पाहिजे. असो.

त्यानंतर पूजा, आरती वगैरे उरकल्यावर स्वामीनामाचा त्रिवार जयघोष करण्यांत आला. बाहेर डंका, निशाणें, जरी पटक्याचे हत्ती, शृंगारलेले घोडे, पालख्या, मेणे, घोडेस्वार, पायदळ, तोफखाना इत्यादि सर्व लवाजम्यानिशीं सरदार व मानकरी भरजरी पोषाखांत मिरवणुकीसाठीं उभे होते.

तेवढ्यांत, 'अनंतकोटि ब्रह्मांडनायक राजाधिराज योगिराज श्रीअक्कलकोटनिवासी श्रीस्वामीसमर्थ महाराज की ऽऽ जय' असा उच्च स्वरांतील जयघोष आंतून ऐकूं आला. आणि त्या पाठोपाठ श्रीसमर्थांचें दिव्य विमान वाजत गाजत रस्त्यावर आणण्यांत आलें. पुष्पवृष्टि एकसारखी चाललीच होती. रस्त्यावर फुलें आणि गुलाल यांचा सडा पडल्यामुळें रस्ता रंगीबेरंगी दिसत होता.

अशाप्रकारें तें दिव्य विमान वाजत गाजत अतिशय थाटानें चोळप्पाच्या घरीं नेण्यांत आलें. त्याठिकाणीं श्रींकरितां पूर्वींच समाधीची जागा तयार करण्यांत आली होती. विमान त्या ठिकाणीं येतांच श्री. नानासाहेब बर्वे कारभारी व श्री. बाबूराव विष्णु मोघे मामलेदार यांनीं दोन बाजूंस धरून श्रींचा देह समाधीच्या जागेंत

नेऊन ठेवला.

तितक्यांत बाळप्पांनीं येऊन श्रींच्या अंगास सुगंधी अत्तराचें लेपन केलें. श्रींनीं पूर्वीं जसें पद्मासन घातलें होतें तें तसेंच कायम होतें. मुखमंडलावर अतुलनीय तेज विलसत होतें. मुद्रा प्रसन्न दिसत होती.

एक एक जण येऊन श्रींना भक्तिभावानें नमन करीत होता. बाहेर येतांना कुणालाच हुंदका आवरत नव्हता. नंतर समाधीचें द्वार जड अंतःकरणानें बंद करण्यांत आलें. सर्वांचे हात त्या दिव्य अवतारी विभूतीच्या समाधिस्थानापुढें भक्तिभावानें जोडले गेले. समाधींतून अजूनहि पुढील श्लोक ऐकूं येत असल्याचा भास सर्वांना होत होता—

'अनन्याश्चिंतयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।'

प्रकरण १३ वें

# जुन्या कागदपत्रांतील हकीकत

श्रीस्वामीसमर्थांच्या महानिर्याणाची हकीकत पुणें येथील श्री. दत्तात्रय काशीनाथ मोडक यांचेकडील जुन्या कागदपत्रांत वाचावयास मिळाली. सदर हकीकतीचा कागद कै. काशीनाथ रामचंद्र मोडक यांच्या दप्तरांतील असून त्या जीर्ण कागदपत्रांवर इ. स. १८७८ चा 'वॉटरमार्क' आहे. म्हणजे समर्थांच्या निर्याणाच्यावेळींच किंवा त्यानंतर थोड्या फार दिवसांनीं ही हकीकत लिहिलेली असलेली पाहिजे हें उघड आहे. मूळ हकीकत मोडींत लिहिलेली असून तिचा मराठी तर्जुमा असा—

'श्रीस्वामीमहाराज अक्कलकोट हे चैत्र वद्य १३ मंगळवार सह वद्य १४ शके १८००, संवत् १९३४ × × सन फसली १२८७, अरबी सन १२७८, इंग्रजी तारीख ३० माहे एप्रिल सन १८७८ रोजीं अक्कलकोट मुक्कामीं करजकर यांचे घराचे पिछाडीस त्यांचे हमेशाचे वटवृक्षाचे खालीं राहण्याचे ठिकाणीं समाधिस्थ झाले. त्यावेळची आदि अंताची हकीकत येणेंप्रमाणें—

'समाधिस्थ होण्याचे कांहीं दिवस पूर्वी अक्कलकोटांत पेठेचे पश्चिमोत्तर बाजूस येक जंगमाचा मठ आहे. त्या मठांत जंगमांनीं स्थापित केलेलें शिवलिंग दगडाचें मध्यें बरेंच मोठें आहे. त्या ठिकाणीं स्वामींची स्वारी हमेशाचे रीतीप्रमाणें जाऊन तेथें चार रोज राहिले होते, तेथे येक रोज स्वामीमहाराजांनीं बावडेकर

पुराणिकबाबा यांस मुख्यत्वें व इतर सेवेकरी यांस आज्ञा केली कीं, ५०० गोवऱ्या घेऊन या. त्याप्रमाणें गोवऱ्या आणलेवर त्या गोवऱ्या चिता रचतात त्याप्रमाणें त्या शिवलिंगावर त्या गोवऱ्या रचल्या आणि चिता अग्नि लावून पेटविली. चांगली चिता पेटल्यावर त्या चितेंत शेंकडों नारळ व अजमासें तूप पक्के ५ शेर व साखर पक्के ५ शेर व गहूं, तांदूळ, फळें, माळा, फुलें वगैरे सुपारी खेरीजकरून जे जे पदार्थ तेथें होते ते सर्व त्या चितेंत टाकीत गेले. शिवाय गोवऱ्या वगैरे आणखी त्यांत टाकल्या आणि त्या शिवलिंगाचें दहन केलें. तें शिवलिंग त्या जंगम लोकांचें होतें. त्या लोकांनीं पुष्कळ अकांत करून दंगा केला. परंतु स्वामीमहाराजांनीं त्यांस शिव्या वगैरे देऊन त्या लोकांचें कांहीं चाललें नाहीं, कारण स्वामीमहाराजांचे तेजापुढें कोणाचेंहि तेज चाललें नाहीं. शिवाय स्वामीमहाराजांचे मर्जीप्रमाणें वागणारे व आज्ञा पाळणारे सर्व लोक व जंगम यांचा मेळा थोडा त्यामुळें त्या लोकांचें तेथें कांहीं चाललें नाहीं. तेव्हां ते लोक सरकारी कामदाराकडेहि बोभाटा घेऊन गेले. परंतु स्वामीजींनीं केलेले कृत्यासहि अडथळा करण्याचा मगदूर नाहीं. थोडा काना डोळा केला. तथापि त्या लोकांचे मर्जीकरितां शिपाई वगैरे पाठविले. परंतु इतकें होत आहे तोपावेतों त्या गोवऱ्या वगैरे जळून गेल्या व होण्याचें तें पूर्वींच होऊन चुकलें. त्यावेळेस स्वामीमहाराजांस लोकांनीं विचारलें कीं, हें काय करितां ? तेव्हां उत्तर केलें कीं लिंगदेहाचा म्हणजे लिंगाचा यज्ञ करतों असें म्हणाले व हें जाल्यावर ती चिता दुसरे रोजीं थंड झाल्यावर तेथें राखेचा ढीग मोठा पडला. ती राख सर्व सेवेकरी यांजपासून काढवून पुष्कळ घागरी पाणी आणवून तें लिंग वगैरे सर्व जागा धुऊन स्वच्छ करून त्यावर दूध दहीं वगैरे त्या लिंगावर ओतवून पूजा केली. हजारों गोवऱ्या घालून त्या लिंगाचें

दहन केलें. परंतु लिंगास अग्नीचा उपद्रव तीळभरसुद्धां झाला नसून पूर्वी होतें त्यापेक्षां तेजस्वी लिंग झालें. फक्त त्या मठांतील देवळाचे वरचा येक दगडास मात्र खुणेकरितां त्या आचीनें चीर पडली. हाच काय तो प्रकार झाला. शिवलिंगास कांहीं इजा झाली नाहीं.

'पुढें समाधि झाली त्यापूर्वी आठ दहा रोज येक दिवस मौजे नागनाहाळी येथें स्वारी गेली. तेथें महाराजांनीं असें केलें कीं, सेवेकरी महाराजाकरितां त्यांचा बिछाना हमेशाचे रीतीप्रमाणें घालूं लागले त्या वेळेस महाराजांनीं आज्ञा केली कीं, आतां पुढें आमचा बिछाना घालूं नये. या झाडावर बांधून टाकावा. आम्हांस आतां बिछाना नको असें सांगून बिछाना झाडास बांधून टाकवला. कोणास तो बिछाना सोडूं दिला नाहीं. मागाहून नजर चुकीनें सोडला.

'पुढें स्वारी अक्कलकोटीं वटवृक्षाखालीं आल्यावर मंगळवारीं ज्वर येऊन प्रकृती बिघडली. सात दिवस अन्न घेतलें नसून स्नान वगैरे सर्व व्यवहार व बोलणें वगैरे सर्व व्यवहार अंत:कालपावेतों जसे चालत आले तसेच चालत होते. फक्त ज्वर आला इतकेंच काय तें दुखणें झालें. बाकी सर्व यथास्थित होतें. स्वामीमहाराज यांनीं सात रोजपावेतों कांहीं खाल्लें नाहीं. अनशनच होतें. पूर्वीपासून सुंदराबाईशिवाय इतरांस कामाशिवाय जवळ येऊं देत नसून व सुंदराबाईचे तरी हातून अन्न घेतील असें जाणोन सुंदराबाई ही जवळ येऊन घालूं लागली. परंतु त्यांनीं कांहीं न खाता येक दोन चमचे पेज मात्र तिचे हातून घेतली. त्यावेळेस तिला सांगितलें, तूं आतां आमचेजवळ येऊं नको. तुला यश येणार नाहीं. तिनें विचारलें कीं, आपण बरे केव्हां व्हाल ? त्याचा जबाब दिला कीं, आतां बरे कशाचे होणार ? आतां आम्हांस

दगडांत जाणें आहे. आतां बरें होण्याचें नाहीं. जवळ आलीस तर तुझेवर दगड पडतील असें बोलले. त्यावेळेस औषधें वगैरे डॉक्टरांची होतीं, परंतु त्याणी कोणाचें एकसुद्धां औषध घेतले नाहीं. आणिलें तरी घेत नसत. एका वैद्यानें मात्रा कांहीं जबरदस्तीनें दिली ती पोटांत जातांच बाहेर पडली व पोटांत औंश गेला तितकी प्रकृती टवटवीत झाली.'

'स्वामी समाधिस्त झाले त्याचे पूर्वदिवसीं सर्व जवळचे सेवेकरी गणपतराव वगैरे सर्वांनीं महाराजांस विनंती केली कीं, आम्हीं अतां पुढें काय करावें, त्यावरून सर्वांस येकच उत्तर सांगितलें कीं, वडाची मुळी धरून राहावें व आपले वाडवडील ज्या रीतीनें वागत आले त्या रीतीनें वागावें आणि येक गीतेचा श्लोक आपले तोंडानें उच्चार करून सर्वांस उपदेशपर म्हटला तो हा कीं, अनन्याश्चितयं तो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभि युक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥'

'अनुष्ठान वगैरे काय करावें म्हणोन सर्वांनीं महाराजांस विचारलें, त्यावरून आज्ञा केली कीं विहिरीवर महादेव आहे त्याजवर धार धरावी व महाराजांची हमेशाची गाय व वासरूं आहे ती गाय-वासरूं पेठेंत चोळपाचे घरीं बांधीत असत. ती गाय-वासरूं आणण्यास अंतकाळीं सांगितली. त्याप्रमाणें पेठेंत एकजण जाऊन गाय-वासरू ठाणाचे सोडलीं ती सोडतांच त्या गाईनें असा चमत्कार केला कीं, दाव्याची सुटतांच आपोआप वडाखालीं महाराज होते तेथें धांवत येऊन आपणच महाराजांस समोरून प्रदक्षणा उत्तम प्रकारची आपले मर्जीनें घालून नैवेद्य तिला ठेविला तो भक्षण करून तेथें उभी न राहतां आले मार्गानें आपणच परत गेली. अंतःकाळीं गोप्रदानें केलीं.'

'नंतर स्वमुखें महाराज बोलले कीं, आमची मीन रास आहे

असें सांगून शनि मीनराशीचा आहे ना म्हणून विचारलें. नंतर तेथील मंडळींनीं कांहीं ग्रहाचीं दानें केलीं आणि महाराजांसही विचारलें परंतु त्यांनीं करा असें सांगितलें नाहीं. भलें करा असें बोलले '

'समाधि झाले त्याचे पूर्व दिवशी साडेतीनशें रुपयांची शालजोडी शिल्लक होती ती महाराजांनीं आणवून विहरींत बुचकुळून आणण्यास सांगितली. ती शालजोडी धुऊन आल्यावर रामशास्त्री अवधानी म्हणून शास्त्री जवळ बसले होते त्यास द्या म्हणून सांगितलें नंतर त्यास दिली.'

'समाधी जाण्यापूर्वीं एक दोन रोज बाबूराव विष्णु मोघे मामलेदार यानीं महाराजांस विचारलें कीं, आपली जिन्नस सामान वगैरे माल उरला आहे त्यांतून कोणास काय काय देण्याचें असेल तर आज्ञा व्हावी हुकूम होईल तर देऊन टाकू त्यावरून त्यास जाब दिला कीं, येक चिंधी किंवा लंगोटी असून ती सुद्धां आमची नाहीं तेव्हां आम्ही काय द्यावे.'

'महाराजांची प्रकृती बिघडल्यावर ज्वर आल्यापासून मामलेदार हे दररोज विनंती करीत कीं येथें वडाखालीं आतां थंडी फार आहे याकरितां आपण घरांत चलावें त्यास उत्तर करीत कीं, येथें वडाखालींच अतां अम्हांस राहण्याचें आहे. घरांत अतां यावयाचें नाहीं असें म्हणून घरात गेले नाहींत. वडाखालींच समाधिस्थ झाले.'

कांहीं महिन्यांपूर्वीं शहागंजांतील बागेंत विहिरीस पाणी नव्हतें. त्या विहिरींत आपला बिछाना वगैरे सर्व जिनसा जाळून टाकण्यास सांगून शेवटीं आपली लंगोटी ही आपले हातानें फेडून त्या विहिरीवर आग पेटवून त्यांत ती लंगोटी जाळली वरकड छाट्या बिछाना वगैरे सेवेकरी यांनीं स्वामींची नजर चुकवून न

जाळतां जाळला म्हणून सांगून लपवून घेऊन आले.'

'तारीख ३० मिती चैत्र वद्य १३ मंगळवारीं अस्तमानापूर्वीं शेवट पावेतों बोलत शुद्धीवर असून साडेपांच वाजतां देह विसर्जन वडाखालीं केला. नंतर मामलेदार वगैरे पुष्कळ लोकांचा मानस असा होता कीं, समाधीस्थान वडाखालीं जेथें देह विसर्जन झाला तेथेंच करावें असें होतें परंतु अक्कलकोटचे एक मोठे वरिष्ठ अम्मलदार यांचा आग्रह पूर्वीपासून चोळप्पाकडे फार असल्यामुळें वडाखालीं समाधी न देतां विमान वगैरे करून त्यांत महाराजांस बसवून राजकीय डंका निशाण वगैरे राजचिन्हें बरोबर घेऊन सर्व लोकांचें समाजासुद्धां वाद्यें वाजत दारूकाम रोषणाई वगैरे लावून मोठ्या थाटानें पेठेंत चोळप्पाचे मठात नेऊन तेथें समाधीची जागा पूर्वीं केली होती, त्या ठिकाणीं समाधी देऊन आंत मीठ वगैरे पक्का बसविला. त्यावेळेस पूर्वीं हैद्राबादचे राव राजे यांनीं मोठी धर्मशाळा देवळाचे आवाराचे पश्चिमेस मैदानांत बांधली आहे त्या ठिकाणीं समाधी द्यावी म्हणजे आम्ही मोठा खर्च समाधीचा वगैरे देऊन पुजारीपण चोळप्पास देऊं असें त्यांचे कोणी कामदार तेथें होते त्यांनीं न्यायाधीश वगैरे अंमलदार अक्कलकोटचे यांस म्हटलें परंतु त्यांचें कोणी ऐकलें नाहीं. पेठेंतच चोळप्पाचे मठांत नेऊन समाधी दिली. मामलेदार यांनीं वडाखालीं देह अवसान झालें त्या ठिकाणीं लहानसें देऊळ बांधून 'स्वामी महाराजांच्या नित्याच्या पादुका लांकडी आहेत त्यास कप्पा करून त्या व एक बाणलिंग त्या ठिकाणीं स्थापन केलें आहे.'

या कागदावरून असें दिसतें कीं, सुंदराबाईची कारकीर्द पूर्वींच संपली असली तरी समर्थांच्या महानिर्याणापूर्वीं कांहीं दिवस तरी ती समर्थांच्या सेवेसाठीं येत असली पाहिजे. कै. मुळेकर यांच्या चरित्रांतहि समर्थांच्या अखेरच्या दिवसांत सुंदराबाईचा

उल्लेख सांपडतो.

या कागदपत्रांतील समर्थांच्या तोंडचीं वाक्यें मोठीं मार्मिक असून त्यांच्या स्वभाववैशिष्टयांचें दर्शन घडविणारीं आहेत. उदाहरणार्थ मोघे मामलेदारांनीं समर्थांना विचारलें कीं, आपले जिन्नस सामान वगैरे वस्तु कुणास द्याव्यात तें सांगा. त्यावर समर्थ म्हणाले, 'एक चिंधी किंवा लंगोटी असून तीसुद्धां आमची नाहीं. तेव्हां आम्हीं काय द्यावें ?' जन्मभर माझें माझें करीत ऐहिक वस्तु उराशीं कवटाळून धरणाऱ्यांना या समर्थ वाक्यांतून योग्य तो बोध होईल. सत्पुरुषांच्या प्रत्येक कृतींत, प्रत्येक वाक्यांत जीवनाचें महाभाष्य आढळतें. त्याचा अर्थ काढण्याची कुवत व इच्छा मात्र पाहिजे !

तसेंच, समर्थांनीं छाटचा बिछाना वगैरे सर्व वस्तु जाळून टाकण्याची आज्ञा केली. परंतु सेवेकऱ्यांना त्याचाहि मोह आंवरला नाहीं व त्यांनीं त्या वस्तु जाळल्याचें खोटेंच सांगून त्या लपवून ठेवल्या ! समर्थांसारख्या चित् सूर्याजवळ अहोरात्र राहूनहि त्यांच्या मनांतील अज्ञानांधःकार कायमच होता हा विरोधाभास केवळ आश्चर्यजनक आहे ! सुंदराबाई, चोळप्पा व इतर श्रीपादभटासारखे सेवेकरी यांनीं समर्थांची सेवा करतांना सकाम भावनेचें जणूं टोंक गांठलें ! त्यापेक्षां अनंत जन्मींच्या पुण्याईनें लाभलेल्या समर्थांच्या दिव्य सहवासाचा त्यांनीं आत्मोद्धाराचें ध्येय गांठण्याकडे उपयोग करून घेतला असता तर त्यांना प्रति समर्थ करण्याचें सामर्थ्य समर्थांजवळ निश्चित होतें. 'आपणासारिखे करिती तत्काळ नाहीं काळवेळ तया लागीं ' असें विलक्षण सामर्थ्य महान् विभूतींच्या ठायीं असतें. परंतु कामक्रोधादि षड्रिपूंच्या आहारीं गेलेल्या सेवेकऱ्यांना समर्थांचा बिछाना, समोर ठेवले पेढे बर्फी याशिवाय अन्य कोणता लाभ होणार ? बीडकर महाराज, स्वामी-

सुत, बाळप्पा, इत्यादींनीं मात्र आत्मोद्धारांचें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून तन मन धन समर्थ सेवेसाठी रूजूं केलें. स्वामी समर्थांच्या सुखद स्मरणाशिवाय त्यांनीं इतर कशाचें स्मरण ठेविलें नाहीं. जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं त्यांना केवळ श्रीसमर्थ दिसत ! ही भक्त मंडळी म्हणजे निष्काम सेवा कशी असावी याचीं मूर्तिमंत उदाहरणेंच होतीं. त्या निष्काम भक्तीचा फायदा समर्थ कृपेनें त्यांना पुरेपूर मिळाला व तेहि प्रतिसमर्थ ठरले. कारण समर्थ हा एक असा विलक्षण परीस होता कीं, त्याच्या स्पर्शानें सोन्याऐवजीं तसलेच नवे परीस जन्माला येत होते ! अस्तु.

## श्रींचें पुनर्दर्शन

श्रीस्वामीसमर्थ समाधिस्थ झाल्यानंतर त्यांच्या एकनिष्ठ भक्तांना स्वामींचा विरह अजिबात सहन होईना ! 'आतां अक्कलकोटीं जाऊन । कोणाचे दृढ धरावे तारक चरण । आम्हां शरणागतांचें संरक्षण । स्वामीसमर्थांविण कोण करी ।' अशी त्यांची अवस्था झाली ! अशा या दुःखाकुल भक्तांचें सांत्वन स्वतः श्रीस्वामीरायांशिवाय कोण करणार ?

श्रीबाळप्पांची अवस्था तर फारच चमत्कारिक झाली ! आजवर करुणाघन स्वामींनीं यांचेवर खरोखरच पुत्रवत् प्रेम केलें होतें. त्यांच्या अनुष्ठानावर खास जातीनें लक्ष देऊन त्यांचेकडून खडतर उपासना करवून घेतली होती. असें थोर भाग्य श्रीबाळप्पाशिवाय इतर कुणाच्याच वांट्याला आलें नाहीं. त्यामुळें श्रीस्वामीसमर्थ म्हणजे बाळप्पांना मायमाऊली वाटत होती ! त्या माऊलीचा विरह त्यांना सहन व्हावा कसा ?

श्रीबाळप्पांनीं श्रीस्वामीरायांच्या दिव्य समाधीसमोर बसून आपला दुःखभार हलका करण्याचा प्रयत्न केला. परंतु श्रींच्या

एकेक लीला व त्यांचें आपल्यावरील अपार प्रेम आठवून त्यांना दुःखाचा उमाळा आंवरेनासा झाला. आपल्या प्रिय व्यक्तीच्या प्रत्यक्ष निर्याणाच्या वेळीं जितकें दुःख होत नाहीं तितकें तिच्या पश्चात् कांहींवेळा तिच्या आठवणीमुळें होतें. बाळप्पांचें असेंच झालें ! इतका वेळ महत्प्रयासानें आंवरून धरलेले अश्रु श्रींच्या समाधीपुढें बसल्यावर त्यांच्या नेत्रांतून घळघळां वाहूं लागले ! बाळप्पा अन्नपाणी वर्ज्य करून अहोरात्र समाधीपुढें बसून राहिले. कोण घालणार त्यांची समजूत ! कोण करणार त्यांचें सांत्वन !

अखेर दयाघन भगवान् श्रीसमर्थांनाच त्यांची दया आली. आपल्या लेकराचे डोळे पाणावलेले पाहून स्वामीमाऊली धांवत आली. श्रीबाळप्पांनीं डोळे उघडलें, तों समोर श्रींची दिव्य मूर्ति प्रसन्न हास्य करीत उभी ! बाळप्पांचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसेना ! तेंच अजानुबाहू दिव्य रूप, तीच तीक्ष्ण भेदक नजर, तीच स्फटिकांची तेजस्वी माळ, तोच कमण्डलु, त्याच खडावा... साक्षात् समर्थंच बाळप्पांच्या समोर उभे होते. बाळप्पांना मायमाऊलीच्या भेटीमुळें आनंदाचें केवढें भरतें आलें असेल ! त्यांनीं तत्काळ साष्टांग नमस्कार घालून श्रींचे पाय घट्ट धरले. मायलेकरांची भेट झाली !

श्रींनीं बाळप्पांना वर उठविलें आणि त्यांच्या डोक्यावर अभय हस्त ठेवून गंभीर वाणीनें म्हटलें, '**तुला मीं ज्या पादुका दिल्या आहेत, तेथें मी चैतन्यरूपानें प्रत्यक्ष वास करीत आहें. यापुढें तेथेंच मी तुझी सेवा घेईन.**'

एवढें सांगून श्रीसमर्थं जागचेजागींच अंतर्धान पावले !

चिपळूणचे श्री केळकरमहाराज यांनाहि श्रींनीं असेंच पुनः दर्शन दिल्याची विलक्षण हकीकत यापूर्वींच्या प्रकरणांत आलीच आहे.

त्यानंतर श्रींची स्वारी निलेगांव येथें अचानक् प्रकट झाली ! समाधीपूर्वी श्रीसमर्थ मोंगलाईतील निलेगांव येथें गेले असतां तेथील जहागिरदार श्री. भाऊसाहेब यांचेजवळ पुन्हां निलेगांवीं येण्याचें त्यांनीं कबूल केलें होतें. महान् विभूति एकदां दिलेलें वचन कधींहि मोडीत नाहींत. परंतु त्यापूर्वींच श्रीसमर्थ समाधिस्थ झाले. मग ही वचनपूर्ती होणार कशी ? परंतु श्रींची लीला केवळ अगाध होती ! समाधीनंतर पांचव्याच दिवशीं आपल्या वचनपूर्तीसाठीं श्रींची स्वारी आपल्या सर्व भक्तमंडळींसह अचानक निलेगांवीं प्रकट झाली. ही वार्ता भाऊसाहेबांना समजतांच ते लागलीच आपल्या इष्ट मित्रांसह श्रींच्या दर्शनास गेले. श्रींच्या समाधीची वार्ता त्यांना अद्याप समजलेली नव्हती. त्यावेळीं श्रींना त्यांनीं आपल्या घरीं येण्याचा आग्रह केला. परंतु 'उद्यां येऊं' एवढेंच उत्तर देऊन श्रींनीं त्यांना त्यावेळेस निरोप दिला. रात्रीच्या वेळीं श्रींच्या सान्निध्यांत थोडा वेळ सत्कारणीं लावावा या विचारानें ती सर्व मंडळी पुन्हां रात्रीं श्रींच्या मुक्कामावर गेली. परंतु त्यांना समर्थ कोठेंच दिसले नाहींत ! म्हणून भाऊसाहेबांनीं श्रींच्या शोधासाठीं आपला एक जासूद अक्कलकोटास पाठवून दिला. परंतु तो परत येण्यापूर्वींच दुपारच्या वेळीं श्रींची स्वारी भाऊसाहेबांचे घरीं अचानक प्रकट झाली ! त्यांच्या दर्शनानें भाऊसाहेबांना अत्यानंद झाला व त्यांनीं श्रींना भोजनास थांबण्याची आग्रहाची विनंति केली. परंतु कांहीं एक भाषण न करतां श्रींची स्वारी एकदम अंतर्धान पावली !

तेवढ्यांत अक्कलकोटीं गेलेला जासूद परत आला व त्यानें श्रीसमर्थ गेल्या मंगळवारींच समाधिस्थ झाल्याची बातमी सांगितली ! ती ऐकून श्रींच्या अगाध लीलेचें सर्वांनाच विलक्षण कौतुक वाटलें व सर्वांनीं श्रीसमर्थ माऊलीचा त्रिवार जयघोष केला.

—अनंतकोटि ब्रह्माण्डनायक राजाधिराज योगिराज श्री

अक्कलकोटनिवासी श्रीस्वामीसमर्थ महाराज की जऽऽऽय !!!

## 'हम गया नहीं, जिंदा है-'

सुप्रसिद्ध लेखक डॉ. वि. म. भट यांनीं आपल्या 'योगसिद्धि व ईश्वर साक्षात्कार' या ग्रंथांत पृष्ठ ३८९ वर स्वत:चा एक मोठा आश्चर्यकारक अनुभव दिला आहे. ते लिहितात- 'मला हृदयाचा विकार १९४४ मध्यें प्रथम जडला. नक्की आठवण नाहीं, पण महाराजांनीं मला जें स्वप्नांत दर्शन दिलें तें त्या सुमारासच असावें. श्रीकृष्णाच्या व स्वामींच्या कृपेनें त्या काळांत माझ्या गळ्याभोंवतीं पडलेले यमपाश तुटले आणि मी त्या मरणप्राय संकटांतून वांचलों. पुढें ८ वर्षें प्रकृति उत्तम राहिली. १९५२ मध्यें पुन्हां हृद्रोगानें उचल केली आणि मी धंदा सोडून पुण्यास येऊन राहिलों. त्या वर्षांत आठ वेळां मला हृद्‌शूलाचे आवेग आले. महाराजांना माझी, पण माझ्या नकळत काळजी लागलेली होती. एकेदिवशी अचानक पुण्यास इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें असलेले भूगर्भशास्त्राचे प्राध्यापक प्रो. रामभाऊ गोडबोले, एम. एस् सी., पी. एच्. डी. हे मजकडे भर दुपारीं उन्हांत १॥-२ चे सुमारास आले. महाराजांचा वरदहस्त असलेल्या पाडगांवकर महाराजांचे ते एकनिष्ठ भक्त आहेत. त्यांना मीं फक्त एकदांच पाहिलें होतें. तोंडओळख फक्त झाली होती. ते मला विचारूं लागले, 'भट, तुम्हांस हृद्रोग आहे का ?' त्यांना ही गोष्ट माहीत नव्हती. मी 'हो' म्हणालों. माझ्या होकारानें त्यांना आदल्या रात्रीं झालेल्या स्वप्नदृष्टांताचा एक मुद्दा पटला. त्यांनीं पुन्हा विचारलें, 'तुमचा आणि अक्कलकोटच्या स्वामींचा संबंध काय ?' मी म्हणालों, 'स्वप्नदर्शनाशिवाय कोणताहि नाहीं.'

'मग महाराजांना तुमची इतकी काळजी कां ?' असें

त्यांनीं पुन्हां विचारलें. मला तो प्रश्न उमजला नाहीं. मीं त्यांना ‘खुलासा विचारतां ते म्हणाले,’ काल रात्रीं महाराजांनीं मला स्वप्नांत दर्शन देऊन, डॉ. भटांना हृदयाचा रोग आहे, त्यांना ललितास्तोत्र’ वाचावयास सांग, असा संदेश सांगितला. आणि म्हणून मी तुमचा पत्ता काढून आज तुमच्याकडे इतक्या तांतडीनें आलों’ मी क्षणभर आनंदाश्चर्यानें स्तिमितच झालों. महाराजांची कोणतीहि सेवा चाकरीच काय पण क्षणभर कधीं त्यांचें नामस्मरणहि न करणाऱ्या माझ्यासारख्या क्षुद्र पामराबद्दल महाराजांना इतकी काळजी ! ! ! वेळ साधेल तेव्हां ईश्वर नामस्मरण करणारा मी, हा प्रकार पाहून गहिंवरून गेलों. माझ्या डोक्यांत आनंद, आश्चर्य, महाराजांचें पितृवात्सल्य, मला वांचविण्याची तत्परता, त्यासाठीं आपल्या एका अनन्य भक्ताला माझ्यासाठीं स्वप्नदृष्टांत, तो निरोप मला कळविण्याविषयीं त्यांची घाई इत्यादि घटनांनीं व विचारांनीं थैमान घातलें आणि माझें मन अक्षरशः विरघळून महाराजांच्या चरणांवर कृतज्ञतेची अंजुलि वाहूं लागलें. प्रो. गोडबोल्यांना माझी कांहींच माहिती नसल्यानें, मी कदाचित् नास्तिक, अश्रद्ध असेन अशी कल्पना येऊन ते म्हणाले, ‘तुमची श्रद्धा असेल तर तें स्तोत्र रोज वाचा-अगर नका वाचूं. तो तुमचा प्रश्न आहे. मी फक्त निरोप सांगण्यासाठीं आलों आहें. तें पुस्तक तुम्हांला आपोआप मिळेल. आतां मी जातों.’ असें म्हणून ते निघून गेले. त्यानंतर कित्येक दिवस कांसवीप्रमाणें दृष्टिपातानें मला नकळत माझें संरक्षण करण्याच्या महाराजांच्या वात्सल्याबद्दल मी अगदीं भारल्यासारखा होऊन गेलों होतों.

या मनःस्थितींत असतांनाच मला तें स्तोत्र आपोआप मिळालें आणि त्याचें पठण माझें चालूंच होतें...’

अशाप्रकारें डॉ. भटांच्या हृद्रोगावर स्वामीसमर्थांनीं उपाय सुचविला व त्यांना बरें केलें.

श्रीसमर्थांची लीला अगाध आहे. आजहि खऱ्या सद्भक्तांच्या पाठीशीं उभे राहून त्यांच्या सर्व संकटांचें निवारण ते करीत आहेत. श्रद्धा आणि भक्ति मात्र पाहिजे !

## श्रीसमर्थवचनामृत

श्रीसमर्थांनीं आपल्या अवतारकार्यांत प्रसंगानुरूप आपल्या भक्तांना जो उपदेश केला तो एकत्रित स्वरूपांत साररूपानें येथें दिला आहे. श्रींच्या कृपेला पात्र होण्याची ज्यांची तीव्र इच्छा असेल त्यांनीं या उपदेशाप्रमाणें वागण्याचा कटाक्षानें प्रयत्न ठेवावा व श्रीकृपा प्राप्त करून घेऊन जीवनाचें सार्थक करावें. श्रींचा उपदेश थोडक्यांत असा आहे—

भक्ति विकल्परहित असावी. देव शुद्ध भावाचा भुकेला आहे.

आळशी मनुष्याचें तोंडहि पाहूं नये. प्रत्येकानें बैलाप्रमाणें अविश्रांत श्रम करून पोटापुरतें मिळवावें. सतत प्रयत्न करणाऱ्याला परमेश्वर साह्य करतो.

आपापलें कर्तव्यकर्म प्रत्येकानें प्रामाणिकपणें बजावून श्रीसमर्थांची आठवण सदैव हृदयांत ठेवावी.

पाषाण मूर्तींची पूजा करण्यापेक्षां गुरुभक्ति करणें अधिक श्रेयस्कर होय.

विद्वत्तेचा टेंभा मिरवण्यापूर्वीं आपलें अंतरंग कितपत शुद्ध बनलें आहे तें तपासून पहा. तसेंच, बाह्य सोंवळें ओवळें पाळण्याचा अतिरेक न करतां शुद्ध अंतःकरणानें भक्ति करा.

परमेश्वर प्राप्तीसाठीं निष्काम कर्म करीत असावें.

निर्लज्जो गुरुसान्निधौ। गुरूची सेवा करतांना कोणतेंहि काम हलकें समजूं नये, किंवा तें करतांना लाजूं नये.

वेळेचा अपव्यय न करतां जीवनाचा प्रत्येक क्षण सार्थकीं लावण्याचा प्रयत्न करावा.

ज्याच्याजवळ धर्म आहे त्यासच नेहमीं जय मिळतो.

ज्याच्या दर्शनानें पाप जाऊन पुण्य प्राप्त होतें त्यासच साधु म्हणावें.

प्रारब्ध भोग भोगूनच संपविले पाहिजेत.

श्रीसमर्थांच्या दिव्य चरित्राचें जो जो अधिक मनन करावें तों तों श्रींचा उपदेश अधिक स्पष्ट होऊन त्यांतून नित्य नवा बोध मिळत राहतो. ही गोष्ट प्रत्येकानें स्वतः अनुभवण्याची असल्यामुळें तें कार्य सुबुद्ध समर्थ भक्तांवरच सोपवून श्रीसमर्थांनीं आपल्या सर्व लेकरांना ( भक्तांना ) जरूर ती प्रेरणा देऊन त्यांना अधिकाधिक भक्तिमार्गाकडे वळवावें, त्यांचे सर्व विकल्प नष्ट करून श्रीसमर्थ म्हणजेच जगच्चालक परमात्मा अशी त्यांची भावना दृढ करावी व आत्मोद्धाराचा मार्ग दाखवून त्यांच्या जीवनाचें सार्थक करावें एवढीच श्रीसमर्थांच्या परमपवित्र चरणीं नम्र प्रार्थना करून वाचकांची रजा घेतों.

॥ अनंतकोटी ब्रह्माण्डनायक राजाधिराज योगिराज श्री-
अक्कलकोटनिवासी श्रीस्वामीसमर्थमहाराज की जय ॥

परिशिष्ट : १

## श्रीसच्चिदानंदमहाराज ऊर्फ मौनीस्वामी

श्रीस्वामीसमर्थांची जी 'तेजस्वी शिष्य परंपरा' आहे, तींत श्रीसच्चिदानंदमहाराज ऊर्फ मौनीस्वामी (शिनोर) यांचा नामोल्लेख अवश्य करावा लागेल !

त्यांचा जन्म वैशाख शुद्ध द्वितीया शके १७८२ (इ. स. १८६०) रोजीं तळेगांव हिवरें या ठिकाणीं झाला. त्यांचें पूर्वाश्रमींचें नांव शंकर गोविंद कान्हेरे. यांचे वडील चिपळूण तालुक्यांतील परशुराम क्षेत्राजवळील ऐनिमेटें या गांवचे राहणारे. पुढें चरितार्थासाठीं ते पुण्यांत येऊन स्थायिक झाले. त्यांना तीन मुलें व पांच मुली अशीं अपत्यें होतीं. त्यापैकीं श्रीमहाराज हे सर्वांत वडील.

लहानपणापासूनच श्रीमहाराजांचा स्वभाव तापट व करारी होता. दिवसभरांत हातून कांहीं चूक झाल्यास ते आपलें उपास्य दैवत जें मारुती त्याच्यापुढें उभें राहून स्वतःच्या थोबाडींत मारून घेत !

त्यांचा विवाह ते विद्यार्थी दशेंत असतांनाच झाला. परंतु विवाहानंतर फक्त एकाच वर्षांत त्यांच्या पत्नीचा अंत झाला. त्यामुळें अभ्यासावर परिणाम होऊन ते अनुत्तीर्ण झाले. परंतु त्यांच्या मनःस्थितीचा विचार न करतां त्यांचे वडील त्यांस टाकून बोलले त्यामुळें संताप येऊन श्रीमहाराज घराबाहेर पडले व सरळ श्रीक्षेत्र गाणगापूर येथें आले. त्याठिकाणीं बरीच उपासना केल्यावर प्रभु दत्तात्रेयांनीं दृष्टांत देऊन सांगितलें कीं, 'मी अक्कलकोटास अवतरलों असून, माझ्या भेटीसाठीं तेथें यावें.'

त्याप्रमाणें श्रीमहाराज अक्कलकोटला आले.

त्याप्रसंगीं श्रीस्वामीसमर्थ एका विहिरीच्या कांठाशीं बसले होते. श्रीमहाराज त्यांच्या दर्शनास येतांच त्यांच्या तोंडून पुढील श्लोक आपोआप बाहेर पडला—

' माता नास्ति पिता नास्ति नास्ति बंधु सहोदरः ॥
अर्थं नास्ति गृहं नास्ति तस्मात् जागृहि जागृहि ॥ '

ह्याच उपदेश समजून श्रीमहाराज सहा वर्षे श्रींच्या सेवेंत राहिले. त्यानंतर श्रीसमर्थांनीं त्यांना नर्मदाप्रदक्षिणा करण्याची आज्ञा केली. त्यांनीं एकंदर तीन प्रदक्षिणा केल्या. त्यानंतर ते शिनोर ग्रामीं आजारी पडले. पुढें तेथेंच संन्यास ग्रहण केला. बरींच वर्षे मौन धारण केल्यामुळें ते ' मौनी-स्वामी ' या नांवानें ओळखले जाऊं लागले.

श्रीसमर्थकृपेनें त्यांची योगाभ्यासांत अप्रतिम तयारी झाली होती. ते रोज पहांटें तीन वाजतां उठून शौचमुखमार्जन स्नानादि विधि आटोपून ध्यानधारणा, प्राणायाम व आसनें करीत. त्यावेळीं कुणाचा उपद्रव नको म्हणून ते दाराला आंतून कडी लावून घेत.

परंतु एकदां ते कडी लावण्यास विसरले. थोड्या वेळानें तेथील राम-शास्त्री प्रकाशकर हे शास्त्री सहज आंत आले तों त्यांना श्रीमहाराज जमिनी-पासून एक हात उंचीवर अधांतरीं पद्मासन घालून बसलेले आढळले !!

श्रीमहाराजांना कांहीं सिद्धि प्राप्त होत्या, परंतु त्यांचा उपयोग ते कधींहि करीत नसत. सर्व ऋतूंत ते घाटावर उघडें पडून असत. केव्हां केव्हां तर उन्हाळयांत ते घोंगडी पांघरून झोंपत तर कडाक्याच्या थंडींत त्याच्या कमरेला नुसती लंगोटी असे !

एखाद्या वेळीं लहर आल्यास ते श्रीमंती थाटांतहि राहात. एकदां प्रवासांत ते हातांत सोन्याचें रिस्टवॉच घालून निघाले ! त्यावेळीं त्यांच्या-जवळ एक चांदीचा कमण्डलूहि होता. त्यांचा हा थाट पाहून डब्यांतील एक मुसलमान त्यांना सहज म्हणाला, ' स्वामी, तुमच्यासारख्या संन्याशाला हा थाट ठीक नव्हे. तुमच्या हातांतलें हें घड्याळ तुमच्यापेक्षां मलाच अधिक शोभून दिसेल ! '

त्याच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच श्रीमहाराजांनीं तावडतोब आपलें सोन्याचें घड्याळ त्याच्या हवालीं केलें !

श्रीसच्चिदानंद महाराजांचीं जीं पत्रें उपलब्ध आहेत त्यांत प्रापंचिक माणसासाठीं पुढील उपदेश केलेला सांपडतो—

ते लिहितात, ' संसार निःसार आहे. संतसमागमानें, हर्ष-शोक दूर

ठेवून दक्षतेनें संसार करावा–'

'संसारांत कसें वागावें हें समजण्यासाठीं दासबोधांतील एक एक समास रोज वाचीत जावें. घर, दार, विद्या हीं प्रारब्धाधीन आहेत. व्यावहारिक दृष्टया मनुष्यानें प्रयत्न करावा. त्या प्रयत्नांमध्यें जय किंवा अपजय इकडे दृष्टि न देतां उदासीन वृत्तीनें राहून संसार करावा... कोणत्याहि कार्यांत धैर्य धरावें. 'सत्यं जयति' या न्यायानें जय व्हावा...'

श्रीसच्चिदानंदमहाराज कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८५६ (इ. स. १९३४) या दिवशीं शेगांव दुमाला पंढरपूर या ठिकाणीं वयाच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी समाधिस्थ झाले.

---

## परिशिष्ट : २

### श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज

श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज वयाच्या बाराव्या वर्षींच सद्गुरूच्या शोधार्थ घराबाहेर पडले. त्यापूर्वींहि एकदां ते याच कामासाठीं घरांतुन कुणाच्या नकळत निघून गेले होते. परंतु त्यांच्या वडिलांना त्यांचा पत्ता लागला व ते कोल्हापुराहून त्यांना परत गोंदवल्यास घेऊन आले. त्यानंतर त्यांच्या वडिलांनीं त्यांना विवाह-बंधनांत अडकवून टाकलें. हेतु हा कीं, त्यांनीं पुन्हां पलायन करूं नये ! परंतु विवाहानंतर थोड्याच दिवसांत सद्गुरुभेटीची तळमळ असह्य होऊन श्रीमहाराज वयाच्या बाराव्या वर्षीं पुन्हां एकदां घराबाहेर पडले. यावेळीं मात्र त्यांनीं आपल्या आईला सूचना देऊन ठेविली होती. त्यामुळें ते गेल्यानंतर शोधाशोध झाली नाहीं.

श्रीमहाराज घराबाहेर पडले त्यावेळीं त्यांचें वय अवघें बारा वर्षांचें होतें. जगाचा अनुभव नाहीं, अंगावर फक्त एक लंगोटी काय ती होती. गौर वर्णाचा हा सतेज बालक रामनामाचा अखंड जप करीत सद्गुरुशोधार्थ वणवण फिरत असलेला पाहून सर्वांनाच अचंबा वाटला !

प्रथम श्रीमहाराज मिरज येथील सत्पुरुष श्रीअण्णाबुवा यांना भेटले.

हे सिद्धपुरुष बालोन्मत्तपिशाच्चवत् वृत्तीनें रहात, परंतु श्रीमहाराजांची बाल-मूर्ति पहातांच त्यांनीं, 'परमात्मा तुझें कल्याण करील' असा शुभाशीर्वाद दिला. श्रीमहाराज तेथून देव मामलेदारांकडे आले. श्रीदेवमामलेदार यांचा अध्यात्मिक अधिकार फार मोठा होता. श्रीमहाराजांनीं त्यांच्या अनुग्रहाची इच्छा प्रकट करतांच देव मामलेदार म्हणाले, 'बाळ, तुला अनुग्रह देण्याचा मला अधिकार नाहीं. तूं दुसऱ्या कुणाकडे जा !'

तें ऐकून श्रीमहाराज थेट अक्कलकोटला येऊन स्वामीसमर्थांना भेटले. त्यापूर्वी थोडा वेळ स्वामीसमर्थ एकसारखे ओरडत होते, 'अरे, तो बघ आला; आला रे आला. कसा माझा बाळ आहे. त्याला कुणी बोलाल तर याद राखून ठेवा.'

आजूबाजूच्या मंडळीना श्रींच्या या असंबद्ध भाषणाचा उलगडा होईना. तेवढयांत श्रीगोंदवलेकरमहाराज अक्कलकोटीं येऊन पोहोंचले. स्वामीसमर्थांचें दर्शन होतांच त्यांच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा घळघळा वाहूं लागल्या व त्यांनीं स्वामीसमर्थांना साष्टांग नमस्कार घातला. स्वामींनीं त्यांना प्रेमानें कुशींत घेऊन 'माझा बाळ' असे उद्गार काढले. त्यांच्या डोक्याचें अवघ्राण केलें व 'तुझें काम माझ्याकडे नाहीं' असें सांगून पुढें पाठविलें.

त्यानंतर थोडयाच दिवसांत श्रीमहाराजांना त्यांचे खरे गुरु– श्री तुकारामचैतन्य– भेटले ही हकीकत सर्वश्रुतच आहे.

---

## परिशिष्ट : ३

### श्रीसमर्थांचे मठ

खुद्द अक्कलकोटांत श्रीसमर्थांचे पांच मठ आहेत. (१) पेठेंतील समाधि मठ–हा मठ श्रीसमर्थांच्या अवतारकालांतच बांधण्यांत आला. संस्थानचे त्यावेळचे ॲडमिनिस्ट्रेटर श्री. विंचूरकर श्वेतकुष्ठ झाल्यामुळें स्वामींच्या दर्शनास आले होते. त्यावेळीं स्वामीसमर्थांनीं विंचूरकरांना

त्यांच्या हातांतील हिऱ्याची अंगठी फेकून देण्यास सांगितलें. विंचूरकरांनीं ती अंगठी फेंकून न देतां श्रीसमर्थांपुढेंच ठेवली. पुढें चोळप्पानें ती विकून तिच्या पैशांतून हा मठ श्रीसमर्थांच्या समाधिगुहेसंहित बांधविला. या मठाच्या गर्भागारांत असलेल्या श्री. गणपति, देवी इत्यादि मूर्ति व शिवलिंग या सर्वांची स्थापना समाधीपूर्वींच फार मोठया समारंभानें व अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीनें झाली. त्यावेळीं होमहवनासाठीं श्रीचिदंबर दीक्षित यांचे पौत्र जातीने उपस्थित होते. स्वतः श्रीसमर्थांच्या उपस्थितीमुळेंहि या सर्व कार्य-क्रमाला विशेषच शोभा आली ! यांच मठांत श्रीसमर्थांची समाधि असून मठाची व्यवस्था चोळप्पांच्या वंशजांकडे आहे. हें स्थान जागृत असल्याचा अनेकांचा अनुभव आहे.

( २ ) **वडाखालील मठ-** श्रीसमर्थांचें हें कायमचें बसण्याचें आवडतें स्थान. हा मठ १९२०-२१ सालीं पंचकमिटीनें बांधविला. या वडाखालीं जो आड आहे त्याचें पाणी पूर्वीं खारें होतें. एक दिवस समर्थांचा एक भक्त ज्योतिबा पाणी आणण्यासाठीं साखर विहिरीकडे निघाला असतां समर्थांनीं त्याला ' कहां जा रहा ' असें विचारलें. ' ज्योतिबानें,' पाणी आणावयास जातो असें सांगतांच समर्थांनीं, ' यहां का लेव ' अशी आज्ञा केली. परंतु इथलें पाणी खारें आहे अशी ज्योतिबानें सबब सांगतांच समर्थ म्हणाले, ' पागल कहीं का खींचो पानी यहां का। यहां पानी नहीं नमकीन रुचीका मीठा । चाखो यहां ही ' तेव्हां ज्योतिबानें तेथलेंच पाणी काढलें, आणि चमत्कार असा कीं, तें पाणी खारें लागण्याऐवजीं अतिशय मधुर लागलें ! तें पाणी अद्यापहि गोड असून गांवांतील इतर आड आटले तरी या आडांतील पाणी कधींहि आटत नाहीं !

( ३ ) **श्रीबाळप्पा महाराजमठ-** श्रीसमर्थांनीं श्रीबाळप्पा महाराजांना आपल्या पादुका देऊन मठ बांधण्याची आज्ञा केली व भागवतांतील पुढील श्लोक म्हटले.

मदर्चां संप्रतिष्ठाप्य मंदिरं कारयेदृढम् ।
पुष्पोद्यानानि रम्याणि पूजायात्रोत्सवाश्रितान् ॥५०॥
पूजादीना प्रवाहार्थं महापर्वस्वथान्वहम् ।
क्षेत्रापण पुरग्रामान् दत्त्वामत्सार्ष्टि तामियात् ॥ ५१॥

( श्रीभागवत: स्कंद ११: अध्याय २७. )

या श्लोकांचा सारांश असा कीं, ' माझ्या पादुका पेऊन त्यांवर एखादा उत्तम मठ स्थापन कर. तेथें फुलझाडें लावून बाग कर व ठरलेले वार्षिक उत्सव करीत जा. म्हणजे त्यांचें चांगलें फळ मिळेल.' त्यानुसार श्रीबाळप्पांनीं हा मठ बांधला. त्यांच्यानंतर श्री. गंगाधरमहाराज व त्यांच्या पश्चात् श्रीगजाननमहाराज हे सध्या मठपति आहेत. प्रस्तुत मठांत श्रीसमर्थांच्या दंड, छाटी, कंठमणि, माळ इत्यादि पवित्र वस्तु ठेवलेल्या आहेत.

( ४ ) **जोशीबुवांचा मठ**–अक्कलकोटचे त्यावेळचे कारभारी श्री. चिंतोपंत टोळ यांचें हे रहाण्याचें स्थान. श्री. टोळ हे समर्थांचे एकनिष्ठ भक्त असून रोज नेमानें श्रीचरणीं सहस्र तुलसीपत्रें वहात असत. परंतु श्रीसमर्थ अक्कलकोटाबाहेर गेल्यास या नेमांत खंड पडत असे. श्री. टोळांची ही अडचण ओळखून समर्थांनी एका पाटावर आपलीं पावलें उमटविलीं. त्या दिवसापासून टोळ त्या पादुकांवरच तुलसीपत्रें वाहूं लागले. तो पाट अद्यापहि या मठांत जतन करून ठेवण्यांत आला आहे.

( ५ ) **राजे रायरायन् यांचा मठ**– राजे रायरायन् हे हैद्राबादेकडील एक मोठे जहागिरदार होते. पुढें ते राजयक्ष्म्यानें आजारी पडले. त्यांतुन बरे होण्यासाठीं त्यांनीं मोठमोठ्या नामांकित डॉक्टर व हकिमांचीं औषधें सुरूं केलीं, परंतु उपयोग झाला नाहीं. अखेर दत्ताच्या दृष्टान्ताप्रमाणें ते अक्कलकोटास येऊन श्रीसमर्थांच्या चरणीं लागले. त्यांना पाहून समर्थ शेखनूरसाहेबाच्या दर्ग्यांत जाऊन तेथील एका थडग्यावर झोंपून राहिले. समर्थांच्या या कृतीमुळें तुमचा मृत्यु टळला असें तेथील फकिरांनीं राजेरायरायन् यांना सांगितलें. पुढें समर्थांनीं राजेरायरायन् यांना लिंबाच्या रसात नऊ मिरे घालून रोज घेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं सुरूं करतांच त्यांची प्रकृति सुधारली. पुढें राजेरायरायन् यांनीं दहा हजार रुपये खर्चून गांवाबाहेर एक सुंदर मठ बांधला व त्यांत स्वामीसमर्थांच्या पादुकांची मोठ्या समारंभानें स्थापना केली.

या प्रमुख मठांव्यतिरिक्त भारतांत अन्यत्रहि श्रीस्वामीसमर्थांचे अनेक मठ आहेत. त्यांची संक्षिप्त माहिती अशी–

### पुणें

( ६ ) **ग्लोब टॉकीज जवळील मठ**:–(२२ शुक्रवार पेठ, पुणें २.) श्री. अण्णा वीरकर शेटे हे श्रीसमर्थांचे एकनिष्ठ उपासक होते. श्रींच्या

दर्शनार्थ ते नेहमीं अक्कलकोटास जात. एक दिवस श्रीसमर्थांनीं आपल्या चर्मपादुका त्यांना देऊन त्यांची पुण्यास स्थापना करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें श्री. शेटे यांनीं ग्लोब टॉकीजजवळ त्यांची भक्तिभावानें स्थापना केली. पूर्वी या ठिकाणीं अक्षरशः उकिरडा होता. परंतु आज एका रम्य मठाची वास्तु तेथें दृष्टीस पडते. श्रीसमर्थांचा प्रत्यक्ष वास या ठिकाणीं आहे अशी भाविकांची श्रद्धा आहे व तसे अनुभवहि कांहीं भक्तांना आलेले आहेत. स्वतः श्रींनींहि आपण या ठिकाणीं गुप्तरूपानें राहूं असें श्री. शेटे यांना सांगितलें होतें असें म्हणतात. या मठांत श्रींची लहानशी संगमरवरी मूर्ति स्थापन करण्यांत आली असून मठांतच औदुंबराखालीं दत्तात्रेयाची मूर्ति आढळून येते. चैत्रशुद्ध द्वितीयेचा श्रीस्वामीजयंतीचा उत्सव येथें मोठ्या प्रमाणावर साजरा होऊन रात्रीं पालखी निघते. रोज शेकडों भाविक दर्शनासाठीं येथें येत असतात. हल्लीं हा मठ ट्रस्टींच्या ताब्यांत आहे.

( ७ ) **भटांचा मठ**–( ६६८ सदाशिव पेठ, पुणें. २ ) श्री. स. ना. भट या भाविक गृहस्थांनीं समर्थांच्या दृष्टान्तानुसार स्वतःचें घराशेजारींच मठ स्थापन केला असून रोज शंभर सव्वाशें लोक दर्शनास येतात. मठांत श्रीसमर्थांचे तीन भव्य फोटो असून मठांतील एकंदर वातावरण अत्यंत प्रसन्न आहे.

## मुंबई

( ८ ) **कांदेवाडी**–हा मठ स्वामीसुतांनीं स्थापन केला.

(९) **दादर**–श्रीसमर्थांचे प्रशिष्य (श्रीतात महाराजांचे शिष्य) सुरतेचे श्रीबाळकृष्ण महाराज यांनीं डी. एल्. वैद्य रोडवर हा मठ स्थापन केला.

( १० ) **ठाकुरद्वार**– श्रीकृष्णबुवा ठाकुरदास यांचें श्वेतकुष्ठ श्रीसमर्थ कृपेनें नाहींसें झाल्यावर श्रींनीं आपल्या पादुका त्यांना देऊन 'रघुनाथजीके सन्निध हमकू नाचनेकू जगा रखो' अशी आज्ञा केल्यामुळें मुख्य श्रीरामाच्या देवस्थानानजीक त्यांनीं छोटयाशा मंदिरांत या पादुकांची स्थापना केली.

(११) **महालक्ष्मी**–श्री. विनायकराव वासुदेव यांच्यावर श्रींची पूर्ण कृपा होती. 'पत्थरावर पैसे ठोक' अशी श्रींची आज्ञा झाल्यावरून शके १८१४ मध्यें त्यांनीं महालक्ष्मी येथें एका लहानशा संगमरवरी मंदिरांत श्रींच्या पादुकांची स्थापना केली.

## अन्य ठिकाणचे मठ

( १२ ) ताथवडें–श्रीबाळप्पामहाराज श्रींच्या पादुका घेऊन संचार असतां कोल्हापूर मुक्कामीं श्री. वामनराव घाणेकर यांजवर त्यांची कृपादृष्टि झाली घाणेकरांना सिद्धि प्राप्त झाली. पुढें त्यांनीं पुण्याजवळ ताथवडें येथें श्रींचा मठ स्थापना केला. पुण्यांतील दाढीवाला दत्त हें देवस्थानहि श्री. घाणेकर यांनींच स्वामीकृपेनें स्थापिलें आहे.

( १३ ) मैंदर्गी–श्रीकृपेनें सिद्ध पुरुष झालेल्या मैंदर्गीच्या मुसलमान जमादारानें मैंदर्गी येथें मंदिर बांधून श्रींच्या प्रासादिक पादुकांची स्थापना केली. मैंदर्गी हे गांव अक्कलकोटापासून तीन कोसांवर आहे.

( १४ ) शिवडाव–वामन महाराजांचे शिष्य श्री. दाजीमहाराज उर्फ कैवल्याश्रम स्वामी यांनीं रत्नागिरी जिल्ह्यांत शिवडाव येथें ' परमार्थ साधनालय ' नांवाचा मठ स्थापन केला.

( १५ )जालना–(मराठवाडा)– शके १८२२ (इ. स. १९००)मध्यें श्रीबाळप्पामहाराजांनीं या मठाची स्थापना केली.

(१६) मूर्तिजापूर– श्रीबाळप्पामहाराजांच्या आशीर्वादानें श्री. नारायणराव जमादार या श्रीमंत गृहस्थांना पुत्ररत्नलाभ झाला. तेव्हां त्यांनीं याठिकाणीं मोठ्या भक्तिभावानें गुरुशिष्यांच्या पादुका स्थापून सुंदर मठ बांधला.

( १७ ) उमरेड(नागपूर)– छत्तीसगड प्रदेशांतील विलासपूर या गांवीं श्रीबाळप्पांचा मुक्काम असतांना नारायणराव बानेरकरांना त्यांच्या अलौकिकत्वाचा कांहीं अनुभव येऊन त्यांनीं सर्वसंगपरित्याग करून अयाचित वृत्ति पत्करली व उमरेड येथें मठ स्थापन केला.

( १८ ) बडोदें–येथील ' सूरसागर ' नजीक श्रींची संगमरवरी मूर्ति स्थापन झाली आहे.

( १९ ) सुरत--श्रीबाळकृष्णमहाराजांनी इ. स. १९११ मध्यें हा मठ स्थापन केला.

( २० ) वेंगुर्लेंकॅप–श्रीसमर्थांचे आनंदनाथ महाराज नांवाचे शिष्य होते. त्यांना श्रीनीं स्वतःचे मुखांतून अर्धा इंच लांबीच्या आत्मपादुका काढून दिल्या होत्या. श्रीआनंदनाथांनीं मठ बांधून त्यांची त्याठिकाणीं स्थापना केली.

(२१) येवलें व (२२) होडावडें (सावंतवाडी)-या दोन्ही ठिकाणीं श्रींचे मठ स्थापन झालेले आहेत.

( २३ ) केज (मोंगलाई)-श्रीसमर्थांचे आज्ञेवरून नानासाहेब केजकर यांनीं या मठाची स्थापना केली.

( २४ ) देवलग्राम व ( २५ ) राजुर-अक्कलकोटीं प्रकट होण्या-पूर्वी श्रीसमर्थांनीं स्वत: या ठिकाणीं आपले मठ स्थापन केल्याचें त्यांच्या चरित्रांत नमूद आहे.

( २६ ) नगर-श्रीस्वामीसुतांनीं स्वत: नगर येथें जाऊन या मठाची स्थापना केली. येथील पादुका ज्या धोंडभट नांवाच्या ब्राह्मणानें सोंवळें नेसून डोक्यावर नगरपर्यंत वाहून नेल्या, त्या ब्राह्मणाच्या सर्वांगावर कोड फुटलें होतें. परंतु नगर मुक्कामीं येईपर्यंत सर्व कोड नाहींसें झालें असें सांगतात !

(२७) नाखरें ( रत्नागिरी )- नाना सोहनी हे गृहस्थ स्वामी-सुतांच्या दर्शनामुळें पूर्ण विरक्त झाले. त्यांच्या पत्नीची स्थिति त्यांच्या सारखीच झाली. व त्या दोघांनीं हातांत झोळी घेऊन भिक्षा मागण्यास सुरुवात केली. ते पुढें नाखरें या गांवीं गेले. तेथें त्यांनीं श्रींचा मठ स्थापन केला. त्या मठांत स्वामीसुतांनीं कृपाप्रसाद म्हणून दिलेल्या पादुकांची नानांनीं प्राणप्रतिष्ठा केली.

(२८) विजापूर (२९) ठाणें (३०) वसई या ठिकाणींहि स्वामी-सुतांनीं मठांची स्थापना केली.

( ३१ ) चिपळूण-शके १७९५ त स्मामीसुतांनीं श्रीब्रह्मचारीबुवां-बरोबर श्रींच्या पादुका चिपळूण येथें पाठविल्या. पुढें श्री. गोपाळबुवा केळकर शके १७९६ त तेथें गेले व त्यांनीं मठ स्थापन केला. श्रींनीं दिलेल्या चांदीच्या पादुका व दण्ड या वस्तु तेथें पूजेत ठेवलेल्या आहेत. श्रींच्या जन्मोत्सवानिमित्त येथें दरवर्षी मोठ्या थाटांत समारंभ साजरा होतो. त्यावेळीं एक चमत्कार पहावयास मिळतो. तो म्हणजे, पादुकांवरील चांदीचें छत्र सुमारे दहा मिनिटें गदगदां हालत असतें ! दर गुरुवार व एकादशीस येथें भजन होतें. रोज अनेक लोक दर्शनास येतात.

( ३२ ) देहू (३३) चर्चन (३४) सावईवेरें (गोवा) येथेंहि श्रींचा मठ आहेत.

(३५) फलटण -येथें चर्मकार भक्तांनीं श्रींचें देऊळ बांधलें आहे.

( ३६ ) उम्बराळें—( ता. वसई जि. ठाणें ) श्रींनी स्व हस्तें मोरेश्वर-बुवा जोशी यांना दिलेल्या पादुकांची या मठांत स्थापना करण्यांत आली आहे.

श्रीतातमहाराजांचा शिष्यवर्ग गुजराथ व कारवार या ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर आहे. तसेंच श्रीबाळप्पामहाराजांनीं श्रींच्या चैतन्य-पादुका घेऊन महाराष्ट्राचा कानाकोपरा, बंगाल, बिहार, ओरिसा, महा-कोशल राजस्थान, आणि मध्य प्रदेश तों थेट उत्तर प्रदेशापर्यंत संचार केला. तेव्हां या प्रदेशांतहि श्रींचे मठ असू शकतील. परंतु त्यांची विश्वसनीय माहिती प्रस्तुत ग्रंथलेखकास नाहीं.

---

## परिशिष्ट : ४

### श्री स्वामीसमर्थांची जन्मपत्रिका

श्रीस्वामीसमर्थांसारखी असामान्य विभूति वास्तविक ग्रहगोलांच्या आधीन नव्हती. उलट ग्रहगोलच तिच्या आधीन होते ! ज्यां बोलविल्या वेद बोले । ज्यां चालविल्या सूर्य चाले । ज्यां हालविल्या प्राण हाले । जो जगातें चाळितां ॥ अशी ज्यांची सत्ता त्यांच्यावर ग्रहगोल काय परिणाम करणार ? आणि तसें पाहिलें तर सिद्ध कोटीला पोंचलेल्या महापुरुषांवर ग्रहांचे शुभाशुभ परिणाम होऊंच शकत नाहींत ! 'जातक रहस्य' या पुस्तकांत सुप्रसिद्ध ज्योतिषी कै. द्वा. ना. राजे. पृष्ठ ३५७ वर लिहितात—'...तिसरा वर्ग सिद्ध लोकांचा. हे लोक ग्रह परिणामातीत असतात...ज्यांना सुख, दुःख, लाभ, हानी, जन्ममृत्यु वगैरे द्वंद्वें सारखींच आहेत, ज्यांना त्रिविध तापाची बाधा होऊं शकत नाहीं व ज्यांनीं आपलें तपोबलानें मन जिंकलें आहे व जे लोक ऐहिक सुख मृगजलवत् मानतात त्यांना गुरुचंद्राचे शुभ योगापासून फायदा होणार नाहीं अगर शनि-रवीचे अशुभ योग त्यांचेवर आपत्ति आणूं शकणार नाहींत. अशा लोकांवर फक्त नेपच्यून, हर्षल, गुरु व शनि या ग्रहांचेच थोडे फार परिणाम होतात. त्यांचेवर वरील ग्रहांचे परिणाम अध्यात्मिक बाबतीं-

-तच होतात. हे परिणामसुद्धां आपले तपोबलानें व इच्छाशक्तीनें ते बदलूं शकतील !'

तथापि, आपणहि सामान्य जनांप्रमाणेंच आहोंत असें दर्शविण्याचा या महान् अवतारी विभूतींचा प्रयत्न असतो व त्यांतूनच त्यांच्या जन्मकुंडल्यांचा जन्म होतो !


श्री. नानाजी रेखी यांनीं श्रींची जन्मपत्रिका तयार केल्याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. ती जन्मपत्रिका अशी --

## श्री. नानाजी रेखी यांनीं तयार केलेली श्रीसमर्थांची जन्मकुंडली

ॐ

**।। श्री स्वामी समर्थ ।।**

बहुधान्यनाम संवत्सरे शके १०७१, चैत्र शुद्ध द्वितीया, अश्विनी नक्षत्र, द्वितीय चरण, प्रीतियोग, टोंपण नांव नृसिंहभान, आद्य नाडी, देवगण, मेषराशी, राशीस्वामी मंगळ, जन्मकाल सूर्योदयापूर्वी दोन घटिका, जन्म-नांव-चैतन्यस्वामी, यजुर्वेदी ब्राह्मण, काश्यप गोत्र.




निर्याणकाल-चैत्र वद्य १३ शके १८००, दुपारीं चार वाजता.

प्रस्तुतची कुंडली मुंबई, चेंबूर, पुणें, नगर व अक्कलकोट या मठांतून लावलेली आहे. श्रीसमर्थांनीं 'आमची मीनराशी' असा उल्लेख बऱ्याच वेळां केलेला आहे. परंतु उपरिनिर्दिष्ट पत्रिकेंत राशी मेष दाखविली आहे. त्यावरून श्रीसमर्थांना आपली 'लग्नराशी' अभिप्रेत असावी असें वाटतें !

## परिशिष्ट : ५

### श्री स्वामीसुतांचे प्रेमळ अभंग

१

स्वामीराया माझी घ्यावी आतां सेवा ॥
पुन्हां जन्म देवा देऊं नको ॥ १ ॥
जन्म देसी तरी देई चरणापाशीं ॥
सादर सेवेशीं करुनी घ्यावा ॥ २ ॥
तुझी भक्ति माझी जोड ती असावी ॥
वासना नसावी आणिका ठायीं ॥ ३ ॥
स्वामी सुत म्हणे सुखें जन्म द्यावा ॥
करुनीया देवा ऐशापरी ॥ ४ ॥

२

माझें चित्त तुझें गुणीं रंगोनिया ॥
जावें स्वामीराया प्रेमयुक्त ॥ १ ॥
तूंचि माझा देव तुझ्या चरणीं भाव ॥
बळकटची ठेव बांधोनिया ॥ २ ॥
अनाथांचा दाता तुझें ब्रिद साजे ॥
अनाथ बाळ तुझें तारी त्यांसी ॥ ३ ॥
स्वामीसुत म्हणे चित्त तुझें गुणी ॥
माझें तें रंगोनी जावें बापा ॥ ४ ॥

### आरती श्रीस्वामीसमर्थांची

(चाल : आरती ज्ञानराजा)

आरती स्वामिराजा–कोटि आदित्यतेजा
तूं गुरु, मायबाप–प्रभो आजानुभुजा ॥ ध्रु० ॥
पूर्ण ब्रह्म नारायण–
देव स्वामी समर्थ–
कलीयुगीं अक्कलकोटी–आले वैकुंठनाथ ॥ १ ॥

लीलया उद्धरीले-
भोळे भावडे जन-
बहु तीव्र साधकासी-केलें अपुल्यासमान ॥ २ ॥
अखंड प्रेम राहो-
नामीं ध्यानीं दयाळा
'सत्यदेव सरस्वती '-म्हणे आम्हां सांभाळा
आरती स्वामिराजा ॥ ३ ॥

## आरती

जयदेव जयदेव जय जय अवधूता । अगम्य लीला स्वामी त्रिभुवनि तुझी सत्ता ॥ ध्रु ॥ तुझें दर्शन होतां जातीं हीं पापें । स्पर्शनमात्रें विलया जाती भवदुरितें । चरणीं मस्तक ठेवुनि मनि समजा पुरतें । वैकुंठीचें सूख नाहीं यापरतें । जयदेव० ॥ १ ॥ सुगंध केशर भाळीं वर टोपी टीळा । कर्णी कुंडल शोभति वक्षस्थळी माळा । शरणागत तुज होतां भय पडलें काळा । तूझे दास करिती सेवा सोज्वळा । जयदेव० ॥ २ ॥ मानवरूपी काया दिससी आम्हांस । अक्कलकोटीं केला यतिवेषें वास । पूर्णब्रह्म तूंची अवतरलासी खास । अज्ञानी जीवांस विपरीत भास । जयदेव० ॥ ३ ॥ निर्गुण निर्विकार विश्वव्यापक । स्थिरचर व्यापुनि अवघा उरलासी एक । अनंत रूप धरिसी करणें मायीक । तुझे गुण वर्णितां थकले विधिलेख । जयदेव० ॥ ४ ॥ घडतां अनंत जन्मीं सुकृत हें गांठीं । त्याची ही फलप्राप्ती सद्गुरुची भेटीं । सुवर्णताटीं भरली अमृत-रस वाटी । शरणागत दासावरि करि कृपादृष्टि । जयदेव जयदेव जयजय अवधूता । अगम्य लीला स्वामी त्रिभुवनि तुझि सत्ता ॥ ५ ॥

## भजन

श्रीस्वामी समर्थ जयजय स्वामीसमर्थ ।
अक्कलकोटवासी माझा स्वामी भगवंतऽ ॥

## शेजारती

ओवाळीतों शेजारती । स्वामीराया तुजप्रती ।
करीती जे भवनाश । अंगीकारा श्रीगुरुमूर्ति ॥ ६६० ॥

रामकृष्ण जयीं होशी । सीता रुक्मिणी तुजसी ।
ओवाळीती शेजेवरी । येथें वास दीनदासीं ॥ १ ॥
होऊनी अत्रिपुत्र । विचरसी सर्वत्र ।
तै तुज मातापूरी । ओवाळीति योगी पवित्र ॥ २ ॥
श्रीपाद तूंचि जाण । होसी नृसिंह आपण ।
तै तुज ओवाळीती । प्रेमभावें भक्तजना ॥ ३ ॥
तोचि तूं अक्कलकोटीं । येसी स्वामी जगजेठी ।
कर्दळी वनांतुनी । उद्धराया पापी कोटी ॥ ४ ॥
स्वामीदासें पहुडवीता । निद्रा घेसी यतीनाथा ।
सद्‌गुरुपदिं ठेवी । रघुनंदन माथा ॥ ५ ॥

---

## श्रीस्वामी सत्यदेवानंद सरस्वति विरचित
## शेजारती

उशीर झाला सद्‌गुरुराया स्वामी समर्था–प्रभो
स्वामी समर्था
आतां निद्रा करा, विनवितों पदिं ठेवुनि माथा ॥ ध्रु० ॥
नरहरि सोनारें हा घडिला मंचक सुंदर–
सुवर्णमंचक सुंदर
निर्मळ केलें पहा जनीनें अवघें शेजघर
सावत्यानें सुमनें दिधलीं अनेक रंगांचीं–
देवा बहुविध गंधांचीं
ज्ञानदेवें कोमल शय्या रचिली हो त्यांची ॥ १ ॥
एका जनार्दनी भावें पडदे सोडिले–मंदिरीं
पडदे सोडिले
'हुक्का प्यावा' रामदासें हात जोडिले
चवरी घेऊन करीं तुकोबा 'म्हणती झोंपावें
–प्रार्थीलें तरी न कोपावें'
सत्यदेवानंदा पाय चुरावया द्यावे ॥ २ ॥

उशीर झाला सद्‍गुरुराया स्वामी समर्था
प्रभो स्वामी समर्था । आतां निद्रा करा
विनवितों पदिं ठेवुनि माथा ॥

---

श्रीसमर्थांची कृपा संपादन होण्यासाठीं श्रींची सेवा कोणत्या प्रकारें केली पाहिजे यासंबंधीं 'श्रीगुरुलीलामृत' कार पंचावन्नाव्या अध्यायांत म्हणतात--

श्रीगुरुस्वामि देव दिगंबर ।। निजानंदीं निमग्न झाल्यावर ।। वारंवार भक्तांसि कृपासागर ।। पूर्ववत् सगुण दर्शन देती ।। २५३ ।। समाधीचें दर्शन पूजन अर्चन ।। प्रेमें करिती जे सेवन ।। त्या सर्वांचे मनोरथ सिद्ध होऊन ।। होती पावन निःसंशयें ।। २५४ ।। स्वामि समर्थांच्या समाधीसमोर ।। जे पुराण कीर्तन भजन गाती सुखकर ।। प्रदक्षिणा स्तोत्रें नमस्कार ।। सप्ताह पारायण करिती विध्युक्त जे ।। २५५ ।। समाधीवर दत्त चरणांवरी ।। पुरुष सूक्त रुद्राभिषेक प्रेमभरीं ।। लघुरुद्र महारुद्रादि वेदमंत्रीं ।। करिती ते सर्व भोगिती सुख इहपर ।। २५६ ।। दत्तात्रेय चरणारविंदा सन्निध ।। वेद घोष वेद पारायण भक्तियुक्त शुद्ध ।। करिती तयांचे मनोरथ सिद्ध ।। अवश्य होती निश्चयात्मक ।। २५७ ।। त्या समाधीस्थानाच्या सेवनें करून ।। भूत प्रेत पिशाच्चादि होती सर्व बाधा प्रशमन ।। कुष्टरोग महारोगादि व्याधि संपूर्ण ।। होती निरसन सत्य सत्य ।। २५८ ।। विद्यार्थीयांसि विद्याप्राप्ति ।। धनार्थीयांसि धनलाभ निश्चिती ।। पुत्रार्थीयांसि पुत्रफलें लाधती ।। दत्तचरण पादुका सेववानें ।। २५९ ।।

परंतु एवढें सांगून ते पुढें लिहितात-

दर्पणांत दिसे जैसें असेल मुख ।। तैसेंचि मुख्यत्वें पाहिजे शुद्धचित्त सुरेख ।। संशयापन्नासि न मिळे सुख ।। संशयात्मा विनश्यति ।। २६२ ।।

---

।।श्री स्वामीसमर्थार्पणमस्तु ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे
दा. क्र. १८०८२
ग्रं. क्र.
दि:

REFBK-0016042